Storage
AC
125
.M3
M16
v.1

BUHR B
a39015 00018728 9b

MĀḌAGĀṄVAKARĀÑCĒ SAṄKALITA VĀṄMAYA

GOVINDA NĀRĀYAṆA MĀḌAGĀṄVAKARA

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

THE UNIVERSITY OF MICHIGAN LIBRARIES

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

Digitized by Google
Original from

माडगांवकरांचें संकलित वाङ्मय

खंड १ ला

संपादक

अ. का. प्रियोळकर
स. गं. मालशे

Original from

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

माडगांवकरांचें संकलित वाङ्मय

खंड १ ला

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN



कै. न्या. मू. गोविंद दीनानाथ माडगांवकर

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

Madagavakarance sankalita vanmaya

कै. सर गोविंद दीनानाथ माडगांवकर स्मारक–ग्रंथावलि

ग्रंथ–दुसरा

माडगांवकरांचें संकलित वाङ्मय

खंड १ ला

★

ले. गोविंद नारायण माडगांवकर

★

Govinda Narayana Madagavakara

: संपादक :

अ. का. प्रियोळकर

स. गं. मालशे

मराठी संशोधनमंडळ

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई १४.

मूल्य पांच रुपये

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

Storage
AC
125
.M3
M16
v.1

प्रकाशक :
स. गं. मालशे,
संचालक, मराठी
संशोधन मंडळ,
दादर, मुंबई.

पहिली आवृत्ति १९६८

या प्रकाशनाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळालें आहे.

मुद्रक :
पुरुषोत्तम अच्युत गुर्जर
मुंबई वैभव प्रेस, ४१७/४२१
सरदार वल्लभभाई पटेल रोड,
गिरगांव, मुंबई नं. ४

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

PL 480-S&

प्रकाशकाचे दोन शब्द

कै. सर गोविंद दीनानाथ माडगांवकर यांच्या विश्वस्तांकडून दहा सहस्र रुपयांचा निधि मराठी संशोधनमंडळाच्या स्वाधीन करण्यांत आला. त्या निधीच्या व्याजांतून स्मारकग्रंथमाला प्रसिद्ध करण्यांत यावी, असें ठरलें. तदनुसार स. १९५४ मध्यें 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' हा ग्रंथ पहिलें पुष्प म्हणून प्रसिद्ध झाला. प्रस्तुत 'माडगांवकरांचें संकलित वाङ्मय—खंड १ ला' हा ग्रंथ दुसरें पुष्प म्हणून प्रसिद्ध होत आहे. कै. गोविंद दीनानाथ यांच्या स्मरणार्थ दिलेल्या निधींतून त्यांच्याच एका थोर पूर्वजाचें वाङ्मयऋण फेडण्याची संधि मराठी संशोधनमंडळाला लाभत आहे, ही गोष्ट अत्यंत औचित्यपूर्ण आहे.

सर गोविंदराव (जन्म २१ मे १८७१) यांचें शिक्षण सेंट झेवियर स्कूल, सेंट झेवियर कॉलेज आणि बॅलिओल कॉलेज (ऑक्सफर्ड) या शिक्षणसंस्थांत झालें. १८९२ सालीं आय्. सी. एस्. झाल्यावर त्यांनीं ब्रह्मदेशांत असिस्टंट कमिशनर म्हणून आपल्या आयुष्यक्रमास सुरुवात केली. १८९७ सालीं त्यांची मुंबई प्रांतांत डिस्ट्रिक्ट व सेशन जज्ज म्हणून कायम नेमणूक झाली. १९२० सालीं कराची येथें ॲडिशनल ज्युडिशियल कमिशनर म्हणून त्यांची बदली होऊन पुढें १९२५ ते १९३१ पर्यंत ते मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ति होते. १९३० सालीं कांहीं काळ त्यांनीं मुंबई हायकोर्टाचे चीफ् जस्टिस् म्हणून काम चालविलें. १९३१ सालीं सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनीं इंदूर संस्थानचे सल्लागार, बडोदें हायकोर्टाचे अध्यक्ष, बॉम्बे रेव्हिन्यू ट्रायब्यूनलचे अध्यक्ष व कोल्हापूर येथील सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश म्हणून काम केलें. ता. १७ एप्रिल १९४७ रोजीं वयाच्या ७६ व्या वर्षी ते दिवंगत झाले.

पहिल्या प्रतीच्या साहित्यसेवेबद्दल माडगांवकरघराणें प्रसिद्ध आहे आणि तिचा परिचय प्रा. अ० का० प्रियोळकर यांनीं अन्यत्र करून दिलाच आहे. स्वतः ग्रंथलेखन करण्याप्रमाणेंच ग्रंथलेखन किंवा ग्रंथप्रकाशन यांना साहाय्य करणें, हीहि एक प्रकारची साहित्यसेवाच होय. अनेक शिक्षणसंस्था आणि साहित्यसंस्था यांना मदत करण्याकरितां पैसे मागें ठेवून सर गोविंदराव यांनीहि आपल्या घराण्याचें कुलव्रत दुसऱ्या प्रकारच्या साहित्यसेवेनें पुढें चालविलें असें म्हणावयास हरकत नाहीं. मराठी संशोधनमंडळाप्रमाणेंच पुणें विद्यापीठ, राजवाडे संशोधनमंडळ, सिद्धार्थ कॉलेज इत्यादि संस्थांना त्यांच्या पैशांतून एकंदर एक लक्ष सात हजार सातशें रुपये देणगीदाखल देण्यांत आले.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

ग्रंथप्रकाशनाला साह्य देऊन आपल्या प्रियजनांचें स्मारक करण्याचा हा उपक्रम फारच स्तुत्य आणि अनुकरणीय आहे. त्यामुळें एकतर प्रियजनांची स्मृति मागें राहतेच; पण त्याबरोबर ज्ञानप्रसारालाही चालना मिळते. अशा प्रकारचीं स्मारकें व्हावीं म्हणून लोकांकडून जर मराठी संशोधनमंडळाला देणग्या मिळत राहतील तर, द्रव्याभावीं अडून राहिलेलें किती तरी ग्रंथांचें प्रकाशन या संस्थेस हातीं घेणें शक्य होइल.

श्री. चिंतामण द्वा. देशमूख, न्या. मू. गणपत स. राजाध्यक्ष व रा. मधुकर बळवंतराव माडगांवकर या माडगांवकर यांच्या विश्वस्तांनीं वरील निधि आमच्या संस्थेला दिला, याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

या ग्रंथाच्या प्रकाशनासाठीं महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळानें अनुदान दिल्यामुळें ग्रंथाचें मूल्य कमी ठेवणें शक्य झालें आहे. संस्कृतिमंडळाच्या या उदार अनुदानाबद्दल संस्था त्याची ऋणी आहे.

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

अनुक्रमणिका

प्रस्तावना (गो. ना. माडगांवकर : चरित्र आणि कार्य) ... १ ते २४

१. पत्रावळी १
२. अन्न ६
३. मनुष्याचें आच्छादन १६
४. रेशमी रुमाल २५
५. मधाचें पोळें २९
६. द्रोण ३४
७. कावळ्याचा घरोटा ४०
८. अचाट खाणें मसणांत जाणें ४५
९. बळी तो कान पिळी... ... ... ४९
१०. भरतखण्डांतील कारीगर ५३
११. आत्मशिक्षण ६२
१२. कापूस ७५
१३. यत्नेन किं दुलभम् ? ८५
१४. द्रव्येण सर्वे वशाः ९५
१५. अति सर्वत्र वर्जयेत् ९९
१६. मादक पदार्थ १०२
१७. मराठींत ‘ सर्वसंग्रह ’ नामक ग्रंथ असावा १०६
१८. स्वभाषा प्रज्वलित ठेवावी ११०
१९. ज्ञानप्रसारकसभेची सभासदांस विनंती ११५
२०. स्वभाषेस प्रौढी कशी येईल ? ११८
२१. प्रार्थना १२२
२२. आम्हांमध्यें स्वतंत्रपणा कधीं येईल ? १२४
परिशिष्ट (१) १२९
परिशिष्ट (२) १४३
शुद्धिपत्र १४४

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

माडगांवकरघराण्याची वंशावलि



Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN



Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

कै. गो. ना. माडगांवकर

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

गो. ना. माडगांवकरांचें हस्ताक्षर



Bombay 23rd Aug/[illegible].

To
Krishna Shastri Chiplunkar Esq.
Secretary to the
Dakshina Prize
Committee.

Sir,

May I request the favor of a reply to my letter regarding my recent work "Bombay Past & Present" मुंबईचें वर्णन.

I have the honor to be
Sir,
Your most obedt. St.
Govind Narayan

' मुंबईचें वर्णन ' या ग्रंथासाठीं दक्षिणा प्राइज कमिटीकडून पारितोषिक मिळालें, त्यासंबंधीं कै. गो. ना. माडगांवकरांनीं कै. कृष्णशास्त्री चिपळूणकरांना पाठविलेलें पत्र.

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

प्रस्तावना

गोविंद नारायण माडगांवकर

'मुंबईचें वर्णन' (१८६३) या सुप्रसिद्ध मराठी ग्रंथाचे कर्ते गोविंद नारायण यांचें निधन शंभर वर्षांमागें म्हणजे १५ मार्च १८६५ रोजीं झालें. अर्वाचीन कालांतील आरंभींच्या पहिल्या चार वाङ्मयसेवकांपैकीं ते एक गणले जातात. पहिले सदाशिव काशिनाथ छत्रे, दुसरे बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर, तिसरे हरि केशवजी पाठारे, आणि चवथे गोविंद नारायण माडगांवकर. गोविंदजींचें वैशिष्ट्य हें कीं, 'सृष्टींतील चमत्कार' हा ग्रंथ सोडला तर त्यांचें इतर वाङ्मय स्वतंत्र स्वरूपाचें आहे. त्या काळच्या इतर लेखकांचें वाङ्मय प्रायः भाषांतरवजा असे. माडगांवकर हें उपनांव अलीकडे त्यांच्या घराण्याला लागलेलें आहे. स्वतः गोविंद नारायण हें उपनांव वापरीत नसत. जुन्या काळीं अशीं आडनांवें नांवाला जोडण्याची विशेष पद्धति नव्हती. मुंबई युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यावर अशीं आंडनांवें धारण करण्याची प्रथा सुरू झाली. 'दादोबा पांडुरंग' या नांवाखालीं मुंबई युनिव्हर्सिटीच्या कॅलेंडरांत सिनेटच्या सभासदांच्या यादींत "Surname not known," अशी तळटीप आढळे !

गोविंद नारायण यांचीं लहानशीं चरित्रें विनायक कोंडदेव ओक (**बालबोध**, नोवेंबर १८८७.) आणि बाळकृष्ण नारायण देव (**विविधज्ञानविस्तार**, सप्टेंबर १९१८, पृ० १०९–१२१) यांनीं लिहिलीं आहेत. त्यांच्याच आधारावर इतरांनीं मागाहून अल्प माहिती दिलेली दिसते. त्या काळच्या पद्धतीप्रमाणें त्यांत पाल्हाळ फार आहे. हातार्शी मिळालेले गोविंद नारायणांचे कांहीं ग्रंथ पाहून आणि अगदीं अलीकडेपर्यंत–म्हणजे सुमारें १९२४ पर्यंत–ह्यात असलेले त्यांचे चिरंजीव नारायणराव यांजकडून त्यांनीं माहिती मिळविली असावी. स्वतः माझी व गोविंदजींच्या चिरंजीवांची १९२३ सालच्या एप्रिलच्या सुमारास भेट झाली होती; पण आजारी पडून मीं एकाएकीं मुंबई सोडल्यामुळें त्यांच्याकडील गोविंदजींच्या चरित्राच्या साधनांचा तपास करणें मला जुळलें नाहीं.

जन्मस्थान व कुल

'गोविंद नारायण' असें साधें नांव त्यांच्या पुस्तकांवर आढळतें; परंतु इतर मिशनरी वगैरे लोक त्यांना आदरानें 'गोविंदजी' असें संबोधीत. डेक्कन व्हर्न्याक्युलर सोसायटीनें १८५१ सालीं प्रसिद्ध केलेल्या 'सृष्टींतील चमत्कार' या इंग्रजी व मराठी भाषेंतील एका पुस्तकावर 'गोविंदजी' असें नांव आहे. तें डॉक्टर विल्सन यानें घातलेलें असावें. याचा उल्लेख पुढें येणार आहे.

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN
THE UNIVERSITY OF MICHIGAN LIBRARIES

समकालीन वृत्तपत्रांत त्यांचा मृत्युलेख आढळेल आणि विशेष माहिती मिळेल या हेतूनें मीं शोध केला; पण त्या काळच्या मराठी किंवा इंग्रजी वृत्तपत्रांत मला तो आढळला नाहीं. जुन्यांतलें जुनें गोविंदजींचें चरित्र म्हणजे 'बालबोधां'त प्रसिद्ध झालेलें–नवेंबर १८८७ च्या अंकामधील चरित्र. यांत गोविंदजींचा जन्म १८१५ सालीं मडगांवांत झाला, असें लिहिलें आहे; परंतु 'मनोरंजना'च्या १९१० सालच्या दिवाळी अंकांत प्रसिद्ध झालेल्या छोट्या चरित्रांत जुनें गोवेंनजीक पेरी येथील त्यांचा जन्म, असें म्हटलें आहे. विविधज्ञान-विस्तारांतील आपल्या लेखांत बा. ना. देव यांनीं 'मडगांवनजीकचा' पेरी गांव ही त्यांची जन्मभूमि असें नमूद केलें आहे; परंतु पेरी हा गांव मडगांवजवळ नसून गोव्याचा, म्हणजे कदंबांची राजधानी जिकडे होती त्या जुन्या गोव्याचा (ज्याला व्हडलें गोंय किंवा Goa Velha असें म्हणतात), भाग आहे. त्यांचें आजोळ पेरी येथें असावें, आणि त्या काळच्या पद्धतीप्रमाणें त्यांचा जन्म आजोळीं झाला असावा.

पेड नांवाचा रेल्वेलाइनीजवळ मडगांवचा एक भाग आहे. या पेडचें पुढें 'पेरी' करण्यांत आलें, असें मडगांवचे एक शोधक गृहस्थ, रा. काशीनाथ दामोदर नायक हे सुचवितात; परंतु मला पहिला तर्क जास्त संभवनीय वाटतो. गोव्याजवळच्या पेरी गांवात मी जाऊन आलों. गोविंदजींचें गोत्र भारद्वाज व कुलदेव दामोदर, असें माडगांवकरांच्या एका वंशजाकडे चौकशी केली असतां कळलें. हें घराणें प्रार्थनासमाजानुयायी असतां त्या घराण्यांतील आजच्या मंडळीला आपलें गोत्र व कुलदेवही माहीत आहेत, हें पाहून मला कौतुक वाटलें. १९२३ सालीं डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांच्या भेटीला मी पुण्यास गेलों असतां, त्यांनीं माझें गोत्र काय व कुलदेव कोण, याची चौकशी केली; आणि तें ऐकून घेतल्यावर, "आमची कुलदेवता श्रीशांतादुर्गा," असें ते म्हणाले. आजच्या सनातनी ब्राह्मण घराण्यांतील तरुणांपैकीं फारच थोड्यांना आपलें गोत्र सांगतां येईल !

गोविंद नारायण हे गोमंतकांतील मूळ कोणत्या घराण्यांतील हें जाणून घेण्याकरितां, भारद्वाज गोत्र आणि दामोदर कुलदेव असलेलें घराणें मडगांवांत सध्यां आहे कीं काय याची मीं चौकशी केली. "शेणवी किंवा शेणवी घोडे" या आडनांवाचें असें घराणें तिकडे असल्याचें रा. काशीनाथ दामोदर नायक हे कळवितात. शेणवी हें जातीचें नांव अशी पुष्कळांनीं आपली चुकीची समजूत करून घेतलेली आहे. 'पंडित' किंवा गुजराती 'मेहता' या अर्थाचें तें व्यवसायदर्शक उपनांव आहे. यावरून मांडगांवकर घराण्याचें मूळ उपनांव शेणवी किंवा शेणवी घोडे, असावें असा तर्क करतां येईल. 'शुचिर्भूतपणा' या पुस्तकाच्या पहिल्या दोन आवृत्तींवर (१८४९, १८५३) 'शेणवी' असें गोविंदजींचें उपनांव आढळतें.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

तपकिरीचा धंदा

गोविंदजींचे वडील पोर्तुगाली तपकिरीचा धंदा करीत, असें त्यांच्या चरित्रकारांनीं लिहून ठेवलें आहे. तपकीर ही तंबाकूपासून करतात हें सांगण्याचें कारण नाहीं. तंबाकू हा पोर्तुगीजांनींच प्रथम हिंदुस्थानांत आणला. त्याचें मूळ स्थान ब्राझील. ब्राझील ही पोर्तुगीजांची एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत वसाहत होती. पुढें १८९१ च्या सुमारास तें स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य झालें. तंबाकूचीं पानें ब्राझीलहून पोर्तुगालांत नेऊन त्यांची पूड करीत व तिकडून गोव्यांत तिची आयात होई असें वाटतें. गोव्यांत तपकिरीला 'पूड' म्हणतात. तपकीर हा शब्द कुठून आला कळत नाहीं. अकबराच्या दरबारांत पोर्तुगीज मिशनऱ्यांनीं प्रथम तंबाकू नेला. तंबाकूची आयात परस्पर ब्राझीलहून हिंदुस्थानांत होत असे, याबद्दल गोवा सरकारच्या दप्तरांतील माहिती प्रो. पिसुर्लेंकर यांनीं एका निबंधांत प्रसिद्ध केली आहे[1]. ब्राझीलचा तंबाकू ही जुन्या काळीं गोवा सरकारची एक मोठी उत्पन्नाची बाब होती. या तंबाकूच्या व्यापाराचा मक्ता देण्यांत येई. या मक्तेदाराकडून तंबाकू किंवा पूड (तपकीर) घेऊन जे विकीत, त्यांना 'पूडकार' असें नांव असे. या आडनांवाचें घराणें अद्याप गोमंतकांत आहे. पहिल्या बाजीरावाला भेट म्हणून पोर्तुगीजांनीं 'पूड' किंवा तपकीर पाठविली होती, असें नमूद असल्याचें पिसुर्लेंकरांकडून कळतें. गोविंदजींचे वडील असे 'पूडकार' होते. मडगांवांत त्यांचें पुडीचें व इतर औषधांचें दुकान होतें. पुढें मुंबईत हा व्यापार केल्यास जास्त किफायतशीर होईल म्हणून ते आपल्या कुटुंबासह सन १८२४ च्या सुमारास मुंबईस आले. त्यांचें दुकान काळिकादेवीच्या रस्त्यावर होतें. पोर्तुगाली तपकिरीबरोबर इतर बारीकसारीक औषधेंही ते विकीत. त्या काळीं मुंबईत लोकांना तपकिरीचें विलक्षण वेड होतें व हें व्यसन मुलांमध्येंही पसरलें होतें. बाबा पदमनजी (हे पुढें हिंदूचे क्रिस्ती झाले) डॉ. वुइलसनच्या शाळेंतील आपली शालेय माहिती 'अरुणोदय' नामक आत्मचरित्रांत देतांना लिहितात.

"मि. नारायण (शेशाद्री) यांच्या वर्गांत गेलों तेव्हां मला तपकिरीचें व्यसन लागलें होतें. आम्हीं कित्येक मुलांनीं मिळून तपकीर विकत आणण्याचा व डबी एकमेकांस देऊन बाहेर जाऊन ती ओढण्याचा एक लहानसा क्लब केला होता. एके दिवशीं ही गोष्ट रा. गोविंदजी नारायण यांच्या नजरेस पडली, तेव्हां त्यांनीं ती आमच्या मास्तरांस सांगितली. मास्तरसाहेबांनीं वर्गांतील मुलांस तंबाखूपासून तोटे व हानि काय होते यावर कांहीं लिहून आणावयास सांगितलें. त्याप्रमाणें कित्येकांनीं या

---

१. P. S. Pissurlencar, "A Presenca do Brazil no archivo Historico de Goa", Actas Vol. II, Lisboa 1957, pp. 349–358.

Digitized by Google · Original from UNIVERSITY OF MICHIGAN · THE UNIVERSITY OF MICHIGAN LIBRARIES

व्यसनाला प्रतिकूल व कित्येकांनीं अनुकूल अशा गोष्टी लिहून आणून वाचून दाखविल्या. मीं कांहीं लिहिलें नव्हतें. परंतु जेव्हां माझी वाचायची पाळी आली, तेव्हां मी उभें राहून असें म्हटलें कीं, आजपासून मी तपकीर ओढण्याचें सोडून दिलें. हाच माझा निबंध. तेव्हां तंबाखूच्या विरुद्ध मुलांनीं टाळ्या पिटल्या व गोविंद नारायणसाहेबांस फार संतोष वाटला." (पृ. १२०)

पहा, बापानें तपकिरीचा व्यापार केला आणि मुलानें पुढें तिच्याविरुद्ध प्रचार चालविला !

आपले संस्कृत पंडित तंबाकूचें अस्तित्व इंद्र, ब्रह्मादि देवांपर्यंत मागें नेऊन भिडवितात ! एका संस्कृत सुभाषितामध्यें म्हटलें आहे कीं, इंद्रानें ब्रह्मदेवास या जगामध्यें सारभूत असें काय आहे, असा एकदां प्रश्न केला. तेव्हां ब्रह्मदेव आपल्या चार तोंडांनीं एकदम म्हणाले :—" तंबाकू, तंबाकू, तंबाकू, तंबाकू."

बिडौजाः पुरा पृष्टवान् पद्मयोनिं ।
धरित्रीतले सारभूतं किमस्ति ॥
चतुर्भिर्मुखैरित्यवोचद्विरिञ्चिः ।
तमाखुस्तमाखुस्तमाखुस्तमाखुः ॥

तंबाखूवरील असे आणखीही संस्कृत श्लोक आहेत, ते तंबाकूच्या सेवनाला चटावलेल्या ब्राह्मणांनीं अलिकडे रचलेले आहेत !

भावंडें व शिक्षण

नारायण माडगांवकरांना एकंदर तीन मुलगे होते. विष्णु, गोपीनाथ आणि गोविंद. त्यांपैकीं सर्वांत वडील जो विष्णु तो वडिलांना दुकानांत मदत करी. गोपीनाथ व गोविंद यांना नारायणजींनीं शाळेंत घातलें. हे मुलगे मराठी कोठें शिकले तें कळण्यास मार्ग नाहीं; पण इंग्रजी शिक्षणाकरितां त्यांना एल्फिन्स्टन नेटीव एज्युकेशन ईस्टिटयूशनच्या शाळेंत घालण्यांत आलें, असें म्हणण्यास आधार आहे.

मुंबई सरकारच्या दप्तरखान्यांत, "List of some of the Boys of the Higher classes who left English school of the Elphinstone Native Education Institution from 1827 to 1842," अशी एक यादी आहे, (G. D. 1843) तींत गोपीनाथ व गोविंद या दोघांचींही नांवें आढळतात. गोपीनाथांनीं ही संस्था १८२२ सालीं सोडली. १८४३ सालीं ज्या वर्षी ही यादी तयार झाली, त्यावेळीं हा विद्यार्थी काय करी याचा जो शेरा आहे तो असा : "Lately assistant in the General Assembly's Institution and now

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

sectioner in the secretary's office". "Sectioner" म्हणजे section-writer असावा. बाळकृष्णपंत देव यांनी गोविंदजींच्या चरित्रांत गोपीनाथ "सरकारी फौजीखात्यांत नौकर होते," असें लिहिलें आहे. पुढें केव्हांतरी या नव्या खात्यांत ते गेले असतील.

गोविंदजींनीं १८३४ सालीं एल्फिन्स्टन इंस्टिटयूशनची शाळा सोडली. पुढें १८४३ सालीं "Teacher in General Assembly's school" असा त्यांच्या-बद्दल शेरा या यादींत आहे. त्यांनीं शाळा कां सोडली याविषयीं देव लिहितात, "त्यांचा इंग्रजी अभ्यास ४।५ वर्षें चालून सध्यांच्या प्रवेशपरीक्षेपर्यंत आला असावा. इतक्यांत स. १८३३ च्या सुमारास त्यांच्या वडिलांचा अंत झाला व कुटुंबपोषणाचा सर्व भार व जबाबदारी अल्पवयांतच त्यांच्या अंगावर पडली. त्यांचा शाळेंतला अभ्यासक्रम सुटला. उदरनिर्वाहाच्या मार्गास लागणें त्यांस भाग पडलें."

कुटुंबपोषणाचा भार अंगावर पडल्यामुळें गोविंदजींना एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन सोडावी लागली, असें मला वाटत नाहीं; कारण त्यांचे थोरले बंधु दुकान चालवीत आणि दुसरे बंधु नोकरी करीत होते. सरकारी शाळेपेक्षां मिशनरी शाळेंत शिक्षण चांगलें मिळत असे, असा 'प्रभाकर'[२] व 'चाबुक' (गुजराती) पत्रांत उल्लेख आढळतो. पण तें पुढें. त्यांचे वडील बंधु तेथें शिक्षक होते, त्यामुळें पुढील शिक्षणाकरितां फ्री चर्च असेंब्लीच्या म्हणजे रे. विल्सनच्या शाळेंत ते गेले असावेत. येथें शिक्षण पुरें केल्यावर त्यांनीं तेथेंच शिक्षकाची नोकरी धरली असें दिसून येतें.

डॉ. विल्सन यांच्या संपादकत्वाखालीं मुंबईत निघणाऱ्या The Oriental Christian Spectator या मासिकाच्या १८३९ सालच्या जानेवारीच्या अंकांत

---

२. "पाद्रींच्या शाळांपेक्षां नेटीव इडुकेशन इनस्टिटयुशनची शाळा चांगली, असें लोक आजपर्यंत समजत असत. याचें कारण हें कीं पाद्रींच्या शाळांपेक्षां सरकारी शाळेंत शिकण्यास साधनें चांगलीं व एथें खिस्ती धर्म शिकवीत नाहीं. परंतु आज ती समजूत कमी होत चालली आहे. आतां पाद्रींच्या शाळाही किंबहुना या शाळेपेक्षां चांगल्या जाहाल्या आहेत. एथलेपेक्षां तेथें शिकविण्याचीं चांगली साधनें आहेत. इतकें असून पुनः एथल्याप्रमाणें मुलांस करही द्यावा लागत नाहीं. तेव्हां या नेटीव इनस्टिटयशनचे खात्यांत फारच मुलांची शिकण्याची आबळ चालली असें बहुतेकांच्ये म्हणण्यांत आहे व याचप्रमाणें क्रम चालला असतां या सरकारी शाळेपेक्षां पाद्रींच्या शाळा स्वल्पकाळेंकरून वरचढ होतील यांत अगदीं शंका नाहीं. (**प्रभाकर,** ३१ जाने. १८४७).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN THE UNIVERSITY OF MICHIGAN LIBRARIES

The General Assembly's Institution च्या परीक्षांची माहिती दिली आहे.[3] तिच्या College Division मध्ये बक्षिसें मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी आहे, तींत गोविंद नारायणाचें नांव आहे. (१) Natural History, (२) Translations into Indian Languages, (३) Natural Theology या तीन विषयांत त्यांना बक्षिसें मिळालीं. इतर विषय English Classics, Mental and Moral Philosophy आणि Mathematics या विषयांत त्यांना बक्षिसें मिळालीं नाहींत. यावरून १८३८ अखेरपर्यंत गोविंद नारायणाची विद्यार्थीदशा चालू होती, असें वाटूं लागतें. Earn While Learn हा चालू जमान्यांतील दंडक त्या काळीं रूढ होता, असें वाटत नाहीं.

शिक्षक व व्यवस्थापक

इकडे शिक्षण पुरें केल्यावर याच शाळेंत गोविंदजींनीं शिक्षकाची नोकरी धरली हें उघड दिसतें. शिक्षकाबरोबर धि ओरिएंटल ख्रिश्चन स्पेक्टेटर या मासिकाचे एजंट (व्यवस्थापक) व प्रकाशक म्हणून १८४४ ते १८५६ पर्यंत त्यांचें नांव आढळतें. Bombay Auxiliary Society च्या तिसऱ्या वार्षिक रिपोर्टांत "The Study of Marathi has been pursued as before under the instruction of a learned Brahman, and the superintendence of Mr. Nesbit, assisted by Mr. Govind Narayan", असा मजकूर आढळतो. १८५३ च्या रिपोर्टांत स्कुल डिविजनमधील देशी भाषांतर शिकविण्याचें काम गोविंदजींकडे आणि कॉलेज डिविजनमधील भाषांतराचें काम डॉ. विल्सनकडे असल्याचें नमूद आहे.

बाबा पदमनजी आत्मचरित्रांत लिहितात, "ही (दाक्तर उइलसनसाहेबांची) शाळा त्या वेळीं (१८४९) कालबादेवीच्या रस्त्याच्या गायवाडी नांवाच्या गल्लींत होती; तींत मी त्याच वर्षाच्या आगस्ट महिन्यांत गेलों. तेथें नवीन मुलांस वर्गांत बसविण्याचें वगैरे काम रा. रा. गोविंदजी नारायण यांजकडे होतें. त्यांनीं मला स्कुल डिविजनच्या दुसऱ्या क्लासांत बसविलें." पुढें तळटीपेंत ते म्हणतात, "हे गृहस्थ त्या काळांतील प्रसिद्ध मराठी ग्रंथकर्त्यांपैकीं होते...त्यांजवर दा. उईलसन वगैरे फ्री चर्च मिशनेरी यांचा फार लोभ होता."

ता. १३ एप्रिल १८५५ रोजीं फ्री जनरल असेंब्लीची नवी इमारत (सध्यांचें विल्सन हायस्कूल) उघडण्याचा समारंभ झाला. त्या वेळीं केलेल्या आपल्या भाषणांत डॉ. उइल्सन यांनीं गोविंदजींचा असा उल्लेख केला,

3. O. C. S., 1839, p. 5.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

"Your execellent friend Mr. Govindji Narayan, still a valuable agent of this institution, and one of the most zealous and successful authors connected with our reformed Marathi literature."[4]

या प्रसंगीं गोविंदजींचेंही विद्यार्थ्यांना उद्देशून भाषण झालें. त्याचा रिपोर्ट असा आढळतो.

"The Rev. Narayan Sheshadri and Mr. Govind Narayan then delivered addresses to the pupils in Marathi which were listened to with much interest."[5]

यावरून गोविंदजी हे हिंदु असतांही डॉ. वुइल्सनप्रभृति मिशनरींचा त्यांच्यावर किती लोभ होता हें कळून येईल. याचें कारण, ते "आपलें काम मनोभावें करणारे, निर्व्यसनी, सुशील आणि भाविक होते," असें त्यांच्या एका चरित्रकारानें दिलें आहे.

ज्ञानप्रसारकमंडळींतील कार्य

मुंबईच्या एल्फिन्स्टन विद्यालयांत 'उपयुक्त-ज्ञानप्रसारक' या नांवाची एक सभा ता. १ सप्टेंबर १८४८ पासून स्थापन झाली. तिचे आरंभींचे अध्यक्ष प्रसिद्ध व्याकरण-कार दादोबा पांडुरंग हे होते; परंतु पुढें त्यांचें स्थलांतर झाल्यामुळें नारायण दीनानाथजी यांची, त्यांच्या जागीं योजना झाली. नारायण दीनानाथ हे हायकोर्टांत ट्रान्सलेटरच्या हुद्यावर होते.

ज्ञानप्रसारक मंडळी म्हणून ही संस्था प्रसिद्ध होती. हिच्यामार्फत पुढें 'मराठी ज्ञानप्रसारक' नांवाचें मासिक एप्रिल १८५० पासून निघूं लागलें. या मासिकांत या सभेपुढें वाचलेले निबंध व इतर लेख प्रसिद्ध होत. ज्ञानप्रसारकसभेपुढें वाचावयाच्या निबंधांच्या बाबतींत, "धर्मसंबंधीं व सांप्रतच्या राज्यप्रकरणसंबंधीं सर्वथा निबंध लिहिले जाणार नाहींत, व त्या विषयावर नुसता संवाददेखील होणार नाहीं," असा नियम होता.

या मंडळीचे सभासद एल्फिन्स्टन विद्यालयाचे जुने नवे विद्यार्थी असत. गोविंद नारायण हे या विद्यालयाचे एक जुने विद्यार्थी होते. त्यामुळें त्यांचा सभेशीं संबंध आला; परंतु तो उशीरां आला असावा असें दिसतें. १८५६ च्या आक्टोबरच्या 'ज्ञान-प्रसारकांत' त्यांनीं सभासदांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देणारें झणझणीत भाषण केल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

---

4. O. C. S., May 1855, p. 192.
5. Ibid, p. 200.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN
THE UNIVERSITY OF MICHIGAN LIBRARIES

या भाषणांत ते म्हणतात, “ ह्या सभेकडून मराठी भाषेची सुधारणूक होऊन तींत अनेक तऱ्हेचे ग्रंथ व्हावे. मराठी भाषेंत ‘ सर्वसंग्रह ’ नांवाचा ग्रंथ असावा; ज्यास इंग्रजीमध्यें “ सायक्लोपीडिया ” म्हणतात असे ग्रंथ आपल्या भाषेंत नसल्यामुळें ती भाषा पूर्णतेस आली नाहीं. हें काम सिद्धीस नेण्यास जर आमचे सभासद मनावर घेऊन किमानपक्ष वर्षांतून एकेक विषयावर निबंध लिहून तयार करतील, तर हें काम सहज सिद्धीस जाईल. ” ता. २ जानेवारी १८५७ रोजीं पुनः असेंच एक कळकळीचें भाषण करून ‘ ज्ञानकोशा’चा (ज्याला ते ‘ सर्वसंग्रह ’ असें नांव देतात) पाया या सभेकडून पडावा, अशी पुनः सूचना त्यांनीं केली आहे. १८५६ या वर्षी त्यांनीं “ उद्भिज्ज विद्या ” या विषयावर पांच व्याख्यानें दिलीं. तीं पुढें स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालीं. १८५७ मध्यें गोविंद नारायण यांनीं ‘ व्यवहारोपयोगी नाटक,’ ‘ अन्न ’ आणि ‘ मनुष्याचें आच्छादन ’ अशा तीन विषयांवर निबंध वाचले. या वर्षाच्या अहवालांत त्यांच्यासंबंधीं मजकूर आढळतो तो असा :—

“ सर्वांच्या लक्षांत हें असेलच कीं आपले सुज्ञ उपाध्यक्ष रा. गोविंद नारायणजी यांनीं साल मजकूरीं सभेच्या कामामध्यें फार श्रम घेतले. याजकरितां त्यांची स्तुति करणें अवश्य आहे. ”

‘ स्वतंत्रपणा ’ कसा येईल ?

ता. १९ ऑगष्ट १८५९ रोजीं ज्ञानप्रसारकसभेपुढें केलेल्या भाषणांत आपल्या लोकांच्या वृत्तीसंबंधीं जे निर्भीड स्वाभिमानाचे उद्गार त्यांनीं काढले आहेत ते लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. ते म्हणतात,

“ आमच्या लोकांचा स्वभाव खुशामती आणि कृपण होऊन गेला आहे; त्याजवर त्यांनीं कांहीं लक्ष द्यावें. कोणी त्यांस रानटी बेसमजुती, अज्ञानी व मनुष्याच्या योग्यतेस चढणारे नव्हेत अशीं दूषणें देतात, तरी तीं आम्हीं सर्व निमुटपणें ऐकून घेतों; परंतु आपल्या बुद्धीचा व्यय करून नवीन शोध करणें व यांत्रिक विद्येमध्यें आपली मति चालवून लोकांस चमत्कार दाखवून जो रानटीपणाचा आळ आपणावर आला आहे तो दूर करण्याच्या खटपटींत कोणीच पडत नाहीं. शेंदोनशें रुपयांचा रोजगार मिळाला आणि आपलें काम झालें म्हणजे झालें. मग ते रानटी म्हणोत किंवा काफ्री म्हणोत त्याविषयीं त्यांना कांहीं दुःख नाहीं... आम्हांला बुद्धि आहे, ज्ञान आहे, शक्ति आहे आणि संपत्तिहि आहे, परंतु त्यांचा बरोबर व्यय करतां येत नाहीं. त्यामुळें आमचा स्वभाव अति आर्जवी होऊन गेला आहे. आम्हांस असें वाटतें कीं, दुसऱ्याची खुशामत करणें हेंच आमच्या सुखाचें साधन. हा स्वभाव आमचे लोक सोडून देतील आणि विद्येच्या मागें लागतील, तेव्हांच ते राजमान्य व खरे सुखी होतील.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

“ हल्लीं आम्हांस चाकरी करण्याचा नाद फार लागला आहे, त्यामुळें आम्हांस भित्रेपणा जडला आहे. मोठा असो किंवा गरीब असो, जो उठला तो चाकरी करावयास धांवतो. जे गरीब आहेत त्यांनीं मात्र चाकरी करावी हें योग्य आहे; परंतु जे श्रीमंत आहेत त्यांनीं आपआपल्या मुलांस अनेक प्रकारचे धंदे शिकवावे. जेव्हां आम्हांमध्यें पुष्कळ व्यापारी, देशपर्यटण करणारे, कलाकौशल्य शिकणारे, व शेतीच्या कामांत मन घालणारे, असे लोक होतील **तेव्हांच आम्हांमध्यें स्वतंत्रपणा येईल.** ”

हे गोविंदजींचे सडेतोड व प्रांजल बोल वाचून त्या काळच्या तरुणांच्या मनोवृत्तीची कल्पना होते. आजच्याही तरुणांच्या वृत्तींत फारसा बदल झालेला असेल असें वाटत नाहीं.

हा जो ‘स्वतंत्रपणा’ असा शब्द गोविंदजींनीं योजला होता त्यांत ‘देशाचें स्वातंत्र्य’ असा आजचा अर्थ अभिप्रेत होता कीं काय, नक्की सांगणें कठीण आहे. त्या काळींही स्वातंत्र्याची भावना लोकांमध्यें जागृत होती असें म्हणण्यास आधार आहे. गोविंदजींचे एक सच्छिष्य डॉ. भाऊ दाजी लाड यांनीं लायसन्स बिलाविरुद्ध जें याच सुमारास भाषण केलें, त्यांत ते म्हणाले होते,

“ **जर कधीं असें घडून आलें कीं, माझ्या देशांत सुधारणूक आणि ज्ञान यांची वृद्धि होऊन तो आपली राज्यव्यवस्था आपण करण्यास योग्य झाला, तर दिवसें दिवस मानुषधर्म वृद्धि पावत चालला आहे, त्यावरून मला असा भरंवसा येतो कीं, इंग्लंड देश ती गोष्ट कबूल करून उदारपणें आपणास साम्राज्याच्या ओझ्यापासून मुक्त करून घेण्यास राजी होईल, आणि माझ्या स्वदेशीय जनांस विद्या शिकवून त्यांचें एक स्वतंत्र लोकांचें राज्य केल्याचें जें यश त्यांस प्राप्त होईल तितक्यांतच संतोष मानून राहील.** ”[६]

हें डॉ. भाऊ दाजींचें व्याख्यान राजकारणाचें जिला वावडें होतें, त्या ज्ञानप्रसारकमंडळीच्या मुखपत्रांत म्हणजे ‘मराठी ज्ञानप्रसारकाच्या’ १८५९ सालच्या अक्टोबरच्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे.

डॉ. भाऊ दाजी हे मुंबईची जी पहिली राजकीय संस्था “ धी बॉंबे असोसिएशन ” तिचे एक संस्थापक व कार्यवाह होते. या संस्थेमधून मुंबईची प्रेसिडेन्सी असोसिएशन आणि तिच्यांतूनच पुढें हिंदी राष्ट्रीय सभा निघाली.

गोविंदजींनीं सगळें वाङ्मय नव्या पिढीमध्यें नीति व ज्ञान यांची वाढ करण्या-

---

६. **ज्ञानप्रसारक,** वर्ष १०, अं. ८, पृ. २३५ (नवंबर १८५९).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN THE UNIVERSITY OF MICHIGAN LIBRARIES

करितां लिहिलें आहे. कारण या गुणांखेरीज आपल्यामध्यें " स्वतंत्रपणा " रुजूं शकणार नाहीं, अशी त्यांची भावना होती.

ता. २ जानेवारी १८५७ रोजीं जी ज्ञानप्रसारकमंडळीची सभा भरली, त्यावेळे-पासून गोविंद नारायण हे ज्ञानप्रसारकमंडळीचे बरेच वर्षें उपाध्यक्ष होते. सन १८६३ ते ६४ च्या सेशनसाठीं त्यांची ज्ञानप्रसारकमंडळीच्या अध्यक्षपदीं योजना झाली होती. या सालीं रा. सा. महादेव गोविंदशास्त्री (कोल्हटकर) आणि रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक हे उपाध्यक्ष, बाळ मंगेश वागळे, नारायण महादेव परमानंद, जनार्दन सखाराम गाडगीळ आणि महादेव गोविंद रानडे हे व्यवस्थापक आणि माधव नारायण शिरगांवकर हे चिटणीस, असें कार्यकारी मंडळ होतें.

तरुणांचे मार्गदर्शक

गोविंदजींचे खासगी मराठी व इंग्रजी वर्ग असत. त्यांच्यामध्यें डॉ. भाऊ दाजी, डॉ. नारायण दाजी, ना. नारायण वासुदेव दाभोळकर यांसारख्या पुढें नांवारूपास चढलेल्या व्यक्तींनीं शिक्षण घेतलें. ज्ञानप्रसारकसभेमध्यें रानडे, मंडलिक, भांडारकर वगैरे तरुणांना त्यांच्यापासून स्फूर्ति मिळाली. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें १८६३ च्या अखेर केव्हांतरी त्यांना या सभेच्या कार्यांतून मुक्त व्हावें लागलें. फ्री चर्च असेंब्लीच्या शाळेंतूनही ते याचवेळीं निवृत्त झाले. त्यावेळीं ता. २८ जानेवारी १८६४ रोजीं त्यांचे चहाते व विद्यार्थी यांनीं त्यांना मानपत्र व दोन हजार रुपये जमा करून दिले. आजच्या मानानें या देणगीची किंमत वीस हजार रुपये म्हणतां येईल. ही सभा डॉ. वुइलसनच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. या सभेंत दोन ठराव पास झाले. पहिल्या ठरावानें गोविंदजींनीं तीस वर्षेंपर्यंत केलेलें शिक्षणकार्य, लोकांच्या उन्नतीकरितां अव्याहत केलेले प्रयत्न आणि वाङ्मयविषयक कामगिरी यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यांत आली. दुसऱ्या ठरावांत त्यांच्या नांवानें स्कॉलरशिप ठेवण्याकरितां वर्गणी जमवावी म्हणून एक समिति नेमण्यांत आली. या समितींत डॉ. भाऊ दाजी, विश्वनाथ नारायण मंडलिक, रा. ब्रा. रामचंद्र बाळकृष्णजी, रा. ब. त्रिमलराव व्यंकटेश इनामदार, दादोबा पांडुरंग, रे. नारायण शेषाद्री, बाबा पदमनजी, व्हिसेंति द कुञ्ज, जोसेफ इझिकेल, जॉन क्रिस्प, शापुरजी एदलजी, दिना मोरोबा, गुलाम मोहिद्दीन देहलवी, मोरोबा विनोबा वगैरे निरनिराळ्या धर्मांच्या, जातीच्या व पेशाच्या पुढाऱ्यांचीं नांवें आढळतात, त्यावरून गोविंद नारायण यांची लोकप्रियता दिसून येते. या वेळीं अध्यक्ष या नात्यानें डॉ वुइलसन यांनीं जें भाषण केलें त्याचा रिपोर्ट पुढीलप्रमाणें उपलब्ध आहे :—

Dr. Wilson mentioned that he had called the meeting on the requisition of a large number of friends of Mr. Govindji Narayan, anxious to present him with a testimonial, on the

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

occasion of his withdrawing from active duty in the Free General Assembly's Institution, of which he was one of the earliest pupils, and a monitor and teacher for thirty years. He dwelt with much interest on his promise as a learner and his ability, fidelity, judiciousness, kindness, and perseverance as a teacher and Superintendent of some of the classes of the Institution; on his accuracy and order in keeping the lists and accounts which were under his care; on his constant endeavours, by essays and addresses, to promote the great cause of native reform and advancement; on the success which, in the view of all readers of Marathi and Gujarati, he had obtained in the seventeen popular original works, great and small, with which he had enriched the vernacular literature of the West of India; and on the amiability and respectability of his character, observed and admired by all his friends and acquaintances. (विविधज्ञानविस्तार, सप्टेंबर १९१८, पृ. २२१).

त्या वेळच्या तरुण सुशिक्षितांना गोविंदजी, वेळोवेळीं प्रशंसा करून उत्तेजन देत व तेही गोविंदजींशीं निरनिराळ्या सार्वजनिक प्रश्नासंबंधीं चर्चा करीत, असें हवालदारकृत रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्या चरित्रांत, त्यांच्या डायरींतील व पत्रव्यवहारांतील जे उतारे उद्धृत केले आहेत त्यांवरून दिसून येतें. हवालदार लिहितात.

(१) " गोविंद नारायण यांनीं खालीलप्रमाणें उद्गार एका पत्रांत काढले आहेत. या प्रांतांत तुम्हीं (मंडलिकांनीं) शिक्षणाचे कामांत दाखविलेली मनाची कळकळ व उत्साह हीं सर्वांच्या स्तुतीस पात्र आहेत."[७]

(२) " १२-१२-५७ रोजीं गोविंद नारायण माडगांवकर यांनीं एक रावसाहेबांस असें पत्र लिहिलें होतें.-हा लग्नाचे वेळीं मुंबईकर जो भपका व जी उधळपट्टी करतात त्यावर तुमचें म्हणणें काय आहे ? ज्या आमच्या शिक्षणाचा आम्हीं एवढा गौरव करतों त्याचाच का हा सारा परिणाम ? ह्या शिक्षणानें आमच्यांत कोणचें असें रूपांतर घडवून आणिलें आहे कीं त्याचा आम्ही इतका गर्व वहावा ? खरें बोलावयाचें म्हणजे अजून आम्हीं खऱ्या शिक्षणमंदिराचा पायासुद्धां घातला नाहीं. बरोबर दिशा उमगल्याशिवाय शिक्षणप्रसारांत केलेले आमचे प्रयत्न आरंभावस्थेंत निष्फळ होतील. योग्य दिशा आमच्या लोकांस दाखविण्याचे जों जों

७. ग. रा. हवालदार, **रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र**, मुंबई १९२७, पृ० ६०.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आम्ही प्रयत्न करावेत तों तों लोक अधिकाधिकच चुकत जात आहेत, व वेडेपणा करण्याचा हट्ट धरीत आहेत. जोंपर्यंत त्यांस असल्या मूर्खपणाच्या चालींत मोठा आनंद वाटत आहे, तोंपर्यंत त्यांच्या हातून कांहीं चांगली गोष्ट घडून येईल अशी आशा करणें नको."[८]

(३) ता. १३–१२–५७ चा मंडलिकांच्या रोजनिशींतील उतारा पहा—

"...नंतर गोविंद नारायणजी यांस भेटलों. तेथें वाद झाला. मीं सांगितलें कीं तुम्हीं ज्यांस सुशिक्षित म्हणतां ते तसे नाहींत. पुस्तकी विद्येचें निरनिराळ्या विषयांत कांहीं पाठांतर घोकंपट्टीच्या योगानें असल्या लोकांकडून होतें. परंतु जोपर्यंत त्यांना चांगल्या संवयी जडल्या नाहींत, तोपर्यंत तन, मन, धन, यांचा आपण उपयोग कसा केला त्याचा नीट झाडा त्यांना परमेश्वरास द्यावा लागेल अशी जबाबदारी त्यांस वाटूं लागली नाहीं, तोंपर्यंत त्यांस सुशिक्षित म्हणणें मौर्ख्याचा प्रकार आहे."[९]

"मंडलिक हे गोविंद नारायण इ० स्नेह्यांशीं विद्येपासून हल्लींच्या शिकलेल्या लोकांनी काय काय केलें पाहिजे इत्यादि विषयांवर चर्चा करीत," असें हवालदार यांनीं नमूद केलें आहे.[१०]

इतर संस्थांशीं संबंध

गोविंद नारायण ह्यांचा आपली शाळा व ज्ञानप्रसारकमंडळी यांच्याखेरीज इतर संस्थांशीं होता :—

शाळांतील निरनिराळ्या इयत्तांना पुस्तकें नेमण्याकरितां जी सरकारी कमिटी होती, तिचे गोविंद नारायणजी हे एक सभासद होते. मंडलिकांच्या रोजनिशींत ता. १०–३–१८५७ चा पुढीलप्रमाणें शेरा आहे :–"क्लासबुक कमिटीची सभा डायरेक्टरच्या बंगल्यावर भरली होती. डाक्टर वुइलसन, डाक्टर हार्कनेस, मि. ग्लेसगो, मि. हावर्ड, रा. गोविंद नारायणजी, रा. भास्कर दामोदर व मी हजर होतों."[११] गोविंद नारायण आपले विचार कसे निर्भीडपणें मांडीत त्याचें एक उदाहरण देण्यासारखें आहे. हार्कनेस, डॉ. विल्सन, विनायक वासुदेवजी व गोविंद नारायण असे सभासद असलेल्या क्लासबुक कमिटीपुढें गुजरात विभागाचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर मि. टी. सी. होप यांची एक सूचना आली. ता. २८ मार्च १८५७ च्या आपल्या पत्रांत त्यानें

---

८. हवालदार, उ० नि०, पृ. २८८–९.

९. तत्रैव, पृ. १०४०.

१०. तत्रैव, पृ. १००.

११. तत्रैव, पृ. ७१.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

शिक्षणक्रमांतून बोधवाचन, नीतिबोधकथा, बालमित्र, वाचनपाठमाला, लघुहितोपदेश अशीं कांहीं पुस्तकें कमी करावीं असें लिहिलें होतें. "My reason for this is that they are defective in both matter and language," असें त्याबद्दल कारण दिलें होतें. गोविंद नारायण यांनीं या मि. होपच्या पत्रावर काय विचार प्रकट केले आहेत, पहा :

Many of Mr. Hope's suggestions are very judicious. I do not agree with him, however, in regard to the avoidance of the use of Sanskrit words altogether. Most of the Gujarati words have Sanskrit derivation and properly speaking, the Gujarat- language has not a grammar of its own. All its grammatical terms are taken from the Sanskrit. To write a book in pure Gujarati suited for the present taste, would be as difficult, I think as to write a book in English in the words of ancient Britain.

The coloquial language of most of the Gujarati Brahmins, we find is full of Sanskrit words. Since we take the language of the Brahmins of Poona and Nasik and other like places as a standard for Marathi Literature, why not adopt the language of the Brahmins of the Surat and Ahmedabad as a model for general Gujarati literature. Divested of Sanskrit words the Gujarati will be insipid and poor.

I think it is difficult to expect to have elementary standard Gujarati books from a mere Gujarati students. I am of opinion, that no one can compose a book in vernacular languages to suit the European taste, unlesss he has digested a good deal of English literature. Where can he get the systematic arrange- ment of thoughts and the way of expansion of ideas, but in English Books? My impression is, that in order to be able to write pleasing and interesting books adapted for Government schools, whether Marathi, Gujarati or Hindustani, the authors must be conversant with English literature. I quite agree with Dr. Wilson that unless a man possesses a literary character it is impossible to expect from him any work of general utility.[१२]

Bombay, 15th April 1857 Govind Narayan

---

१२. D. P. I. **Miscellaneous** XX, 1857, pp. 223-4.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

अनेक विद्वान् ग्रंथकार सरकारी आश्रयाकरितां जीं पुस्तकें पाठवीत, त्यांचा निकाल लावण्याकरितां एक समिति नेमलेली असे. तिच्यामध्यें डॉ. हार्कनेस, डॉ. वुइल्सन, मेजर कॅन्डी, मि. जॉन पीट, विनायक वासुदेव, भास्कर दामोदर, गोविंद विठ्ठल महाजन, बाळाजी पांडुरंग (भालेराव), दादोबा पांडुरंग वगैरेंबरोबर गोविंद नारायणजी असत.[१३]

वाङ्मयविषयक कामगिरी

गोविंदजींच्या सत्कारसमारंभाच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना डॉ. वुइल्सन यांनीं गोविंदजींनीं लहानमोठीं सतरा लोकप्रिय स्वतंत्र पुस्तकें ("Seventeen popular original works") लिहिलीं आहेत, असे उद्गार काढले आहेत. मराठीप्रमाणें गुजरातीमध्येंही गोविंदजींनीं लिहिलें असल्याचें त्यांनीं म्हटलें आहे. त्यांचीं एकंदर पुस्तकें कोणतीं तें आतां पाहूं :—

(१) मराठी ग्रंथ

१. **शुचिर्भूतपणा,** मुंबई, १८४९ (पुढील आवृत्त्या–दुसरी आ० १८५३, तिसरी १८५६, चौथी १८९१).

धि बोर्ड ऑफ एज्युकेशनकरितां हें पुस्तक अमेरिकन मिशननें मुद्रित केलें.

२. **ऋणनिषेधक बोध,** मुंबई १८५०.

हा ग्रंथ 'दक्षणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीकरितां आंम्रोळींत छापिला.'

३. **नीतिसंवाद,** मुंबई १८५० (दु० आ० १८६८).

हें पुस्तक डॉ. भाऊ दाजी या आपल्या विद्यार्थ्याला त्यांनीं अर्पण केलें आहे.

४. **हिंदु लोकांच्या रीति सुधारण्याचा बोध,** मुंबई १८५१. द्वितीय आवृत्ति 'कुटुंबसुधारणा' या नांवानें १८९१ सालीं निघाली. ही १८९१ ची आवृत्ति त्यांचे चिरंजीव नारायण गो. माडगांवकर यांनीं प्रसिद्ध केली; पण त्यांत या नांवाच्या बदलाचा निर्देश नाहीं.

५. **सृष्टींतील चमत्कार,** मुंबई १८५१.

Natural Phenomena या सचित्र इंग्रजी पुस्तकासहित हें मराठी भाषांतर आहे. हीं दोन पुस्तकें वेगवेगळ्या ठिकाणीं छापून नंतर एकत्र केलेलीं दिसतात. इंग्रजी भागाचा मुद्रक—"S. Bently and Co., Printers, Bangor House, Shoe lane" (इंग्लंड) आणि प्रकाशक The Committee of General Litera-

---

१३. हवालदार, **उ० नि०,** पृ० ९१.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

ture and Education, appointed by the Society for promoting Christian knowledge व मराठी भागाचा मुद्रक गणपत कृष्णाजी आणि एकंदर पुस्तकाचे छापविणार किंवा प्रकाशक-दक्षिणी भाषेंत पुस्तक प्रसिद्ध करणारी मंडळी (मुंबई). डॉ. विल्सन यांनीं हें पुस्तक तपासल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यांत आले आहेत. आकार १२ × १०·५ (इंचांत).

६. **सत्यनिरूपण,** मुंबई १८५२ (दु० आ० १८५६, ति० आ० १८७७).

तिसरी आवृत्ति लेखकाच्या जगन्नाथ नांवाच्या चिरंजीवांनीं प्रसिद्ध केली आहे. नामदार विलोबी यांनीं 'सत्य' या विषयावर मराठी किंवा गुजराती भाषेंत निबंध लिहिणाऱ्यांना रु० १५०, ६०, ४० अशीं तीन बक्षिसें ठेविलीं होतीं, त्याकरितां हा निबंध लिहिला गेला. या ग्रंथाच्या शेवटीं अगाऊ वर्गणीदारांच्या नांवांची पांच पृष्ठें यादी आहे ती महत्त्वाची आहे; कारण तिच्यावरून त्या काळच्या मुंबईच्या कांहीं नागरिकांची आपणास माहिती होते.

या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या बाराशें प्रती छापल्या होत्या, पण अवघ्या सहा महिन्यांत त्या खलास झाल्या असें, आपल्या ता. १८५४ च्या पत्रांत गोविंद नारायण यांनीं दुसऱ्या आवृत्तीकरिता सरकारकडे मदत मागतांना लिहिलें आहे.

७. **दारूपासून अनर्थ,** मुंबई १८५५ (दु० आ० १८९०).

हें संभाषणात्मक पुस्तक आहे.

८. **उद्भिद्जन्य पदार्थ,** मुंबई १८५६.

या विषयावर ज्ञानप्रसारकसभेपुढें दिलेलीं पांच व्याख्यानें 'मराठी ज्ञानप्रसारकां'त प्रसिद्ध झालीं. (पु. ७, अं० १ ते १० : १८५६–५७.) १८५६ सालीं तीं स्वतंत्र पुस्तकरूपानें बाहेर पडलीं. त्यांचें गुजराती भाषांतर त्यांनीं स्वतः करून १८५९ सालीं प्रकाशित केलें. या भाषांतराच्या बाबतींत एल्फिन्स्टन विद्यालयांतील शिक्षक चिमनलाल नंदलाल यांची आपणाला मदत झाल्याचें त्यांनीं कृतज्ञतापूर्वक प्रस्तावनेंत नमूद केलें आहे. त्या काळीं दक्षिणी माणसांना गुजराती भाषा येत असे. आरंभींचीं गुजराती व्याकरणेंदेखील क्रमवंत, फडके यांनीं केलीं आहेत.

या पुस्तकाचें भाषांतर हिंदीमध्यें झालें असल्याचा संभव आहे. नॉर्थ वेस्टर्न प्रॉव्हिन्सच्या गव्हर्नरांनीं मुंबई सरकारला पत्र लिहून या ग्रंथाचें हिंदीमध्यें भाषांतर करण्याबद्दल परवानगी मागितली होती. हें मूळ पत्र मुंबई सरकारच्या दप्तरखान्यांत आहे. ते असें:—(G. D. 1857/38)

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

NO. 85 A of 1857
G. B. Thornhill Esq.
off. Secy. to the Govt.
N. W. P.

To,
W. Hart Esquire,
Secretary to the Govt.
Bombay.

Dated Head Quarters Camp
Mirzapoor, the 21st January 1857

Sir,

The Hon'ble the Liutt Governor directs me to request that you will be good enough, with the permission of the Right Hon'ble the Governor in Council to furnish this office with five copies of Govind Narayan's work on Vegetable substances and «ca and «ca used for the food of men and to enquire whether there is any objection to its being translated into Hindee and introduced in the vernacular schools of the North Western Provinces, if found adapted to them.

Head Quarters Camp.
Mirjapoor.
the 21st January 1857

I have the honor to be
Sir
Your obedient servant
C. B. Thornhill
Office Secretary to the Govt.
N. W. P.

९. वृक्षवर्णन, मुंबई १८५७, (दु० आ० १८९५).

पहिली आवृत्ति दक्षिणा प्रैज कमिटीकरितां तोमम ग्राहामनें छापिली. दुसऱ्या आवृत्तींत ग्रंथकाराचें लहानसें चरित्र आहे.

१०. लोखंडी सडकांचे चमत्कार, मुंबई १८५८.

युनायटेड स्टूडंट्स आसोसिएशन या मंडळीच्या सभेपुढें १५ मार्च १८५८ या दिवशीं दिलेलें व्याख्यान.

११. व्यवहारोपयोगी नाटक, मुंबई १८५९ (दु० आ० ?, ति० आ० १८६४, च० आ० १८९०).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

ज्ञानप्रसारकमंडळीच्या १८५५ सालच्या रिपोर्टांत पुढील वर्षी बक्षिसाकरितां हा निबंधाचा विषय नेमला होता, असा निर्देश आहे. (म० ज्ञा० प्र०, पु० ६, अं० २१, पृ० ३३).

१२. भोजनबंधु पानतंबाखु, मुंबई १८६० (दु० आ० १८९१).

डायरेक्टर ऑफ पब्लिक ईस्ट्रक्शन यांना आश्रयाकरितां पाठविलेल्या पत्रांत गोविंद नारायण लिहितात :—

With a view to providing the Marathi speaking portion of the Native Community with some light moral reading, I have lately published a book entitled "भोजनबंधू पानतंबाखू" ("Dramatic Readings") in which I have endevoured to point out the evil consequences arising from those habits of constantly chewing Pansupari (betel and areca nut) and eating Tobaco and suffering to which the natives of all classes are as much addicted. My long connection with an educational Institution in this place has afforded me many opportunities of observing the evil consequences of these habits in the public schools as well as at the homes of my Native friends. Besides the abovenamed habits, several others of a kindred nature are touched upon in the book with a view of impressing upon the minds of the rising generation, especially by the necessity of aiming, early, at the acquisition of clean habits and good manners.

In thus bringing to your notice my new book I respectfully solicit for it your kind patronage. The price is three annas per copy. (२७ फेब्रु. १८६०).

सरकारकडून या पुस्तकाच्या शंभर प्रती विकत घेण्यांत आल्या.

१३. सुलेखनविद्या, मुंबई १८६० (दु० आ० १८९१).

या विषयावर गोविंदजींनीं ज्ञानप्रसारक मंडळीपुढें व्याख्यान दिल्याचा १८५९ च्या रिपोर्टांत निर्देश आहे (म० ज्ञा० प्र०, पु० ११, अं० १.) याच सालीं 'ज्ञानवृद्धि' या विषयावरही त्यांनीं व्याख्यान दिल्याचें नमूद आहे; पण तें कोठेंच प्रसिद्ध झालेलें दिसत नाहीं.

१४. मुंबईचें वर्णन, मुंबई १८६३, (दु० आ० १९६३).

हा त्यांचा अगदीं शेवटचा आणि सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे. या ग्रंथाला दक्षणी प्राइस कमिटीनें ७५ रुपयांचें बक्षिस दिलें. त्यासंबंधीं मूळ पत्रव्यवहार मुंबईच्या सरकारी

२

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

दप्तरखान्यांत उपलब्ध आहे. या ग्रंथाचें पुनर्मुद्रण मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयानें अलिकडे केलेलें आहे. हा ग्रंथ अद्ययावत् माहितीच्या टीपांसह प्रसिद्ध होणें अवश्य आहे.

१५. **पत्रावळी व द्रोण,** मुंबई. दुसरी आवृत्ति १८९१ (पहिली ?).

'पत्रावळी' या विषयावर 'मराठी ज्ञानप्रसारका'च्या पुस्तक ८, अं० २ (१८५७) अंकांत व 'द्रोण' या विषयावर याच मासिकाच्या पु० १२, अं० २ (मे १८६१) मध्यें लेख प्रसिद्ध झाले आहेत.

(२) गुजराती ग्रंथ

१. **सत्यनिरूपण,** (गुजराती) १८५३.

२. **उद्भिद् पदार्थ,** (गुजराती) मुंबई १८५९.

३. "**शुचिर्भूतपणा,** आणि ४. **ऋणनिषेधक बोध** यांची गुजराथी आवृत्ती गुजराती भाषेंत ग्रंथ प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीनें अमदाबाद एथें छापिली. किंमत दर प्रतीस ०–४–० आणें", असा मजकूर मराठी उद्भिद्जन्यपदार्थ या पुस्तकाच्या शेवटीं असलेल्या जाहिरातींत आढळतो. हीं पुस्तकें प्रत्यक्ष पाहावयास मिळालीं नाहींत.

'सत्यनिरूपणा'च्या गुजराती भाषांतराला किती मागणी होती, हें गोविंद नारायण यांनीं डायरेक्टर ऑफ पब्लिक इंस्ट्रक्शनला पाठविलेल्या पुढील ता. ३ अक्टो० १८५७ च्या पत्रावरून कळून येईल :—

In 1853 at the suggestion of Col. Le Jacob, Political Agent of Kutch, Col. W. Lang, Political Agent at Rajkot, and several other gentlamen, friends of Native improvement, I having translated my Marathi Willoughy Prize Essay "On the Observance of truth", with special reference to the administration of justice and the advancement of the best interest of Society, into Gujerati, published under the patronage of Col. Jacob the Board of Education though at first subcribed for only 100 copies, subsequently purchased two hundred copies, in addition, Mr. Bocarro, the Depository of Elphinstone Institute likewise within a period of four years purchased from me no less than four hundred copies of the Essay for the schools in Gujerati. In the month of April last Mr. Bocarro applied to me for 100 copies of the pamphlet, but I could supply him with only eighty. There was again a fresh demand yesterday for 100 copies from the Depository of the E. Institution.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

Perceiving that an edition of 1500 has run out within four years, I intend to have a second cheap edition reducing the original price eight annas to five per copy. I, therefore, in submitting herewith a copy of the essay, respectfully, beg that Government taking into consideration the usefulness of the book, will be pleased to assist me to bring out another edition of the work.

(३) हिंदी भाषांतरें

गोविंद नारायणांच्या दोन पुस्तकांचीं भाषांतरें हिंदींतही झालीं आहेत. 'सत्यनिरूपण' (अनु० कृष्णदत्त और वंशीधर) आग्रा येथें प्रथम १८५४ सालीं प्रसिद्ध झालें आणि त्याची द्वितीयावृत्ति १८६० मध्यें निघाली. 'शुचिर्भूतपणा' (१८४६) हें पुस्तक 'शुद्धिदर्पण' या नांवाखालीं (अनु० विधिचंद्र नारायणी) हिंदी भाषेंत प्रथम १८५२ सालीं प्रसिद्ध झालें आणि त्याची द्वितीयावृत्ति मथुरा येथें १८५४ सालीं प्रकाशित झाली.

उद्भिद् पदार्थ या पुस्तकाच्या हिंदी भाषांतरासंबंधीं निर्देश वर आलाच आहे.

गोविंद नारायणांचे निबंध व व्याख्यानें 'मराठी ज्ञानप्रसारक' मासिकांत प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांपैकीं कांहीं निबंध स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले, त्यांचा निर्देश वर आलाच आहे. त्यांच्या बऱ्याच निबंधांवर लेखक म्हणून नांव नाहीं. रिपोर्ट वगैरेमधील इतर उल्लेखांवरून जे त्यांचे म्हणून निश्चित करतां आले, ते येथें दिले आहेत.

(४) निबंध व व्याख्यानें

१. **अन्न**–मराठी ज्ञानप्रसारक, पुस्तक ८, अं० ५ (पृ० १४६–५४)–७ (पृ० २०९–१७) ऑगष्ट–अक्टोबर १८५७.

२. **मनुष्याचें आच्छादन**–म० ज्ञा० प्र०, पु० ८, अं० ७, (पृ० २२५–२४३) नोव्हें० १८५७.

३. **रेशमी रुमाल**–म० ज्ञा० प्र०, पु० १०, अं० १०, (पृ० २९५–३०१) जाने० १८६०.

४. **कावळयाचा घरोटा**–म० ज्ञा० प्र०, पु० १२, अं० ३, (पृ० ८८–९६) जून १८६१.

५. **अचाट खाणें मसणांत जाणें**–म० ज्ञा० प्र०, पु० १२, अं० ९, (पृ० २५७–६३) डिसें० १८६१.

६. **मधमाशांचें पोळें**–म० ज्ञा० प्र०, पु० १२, अं० १, (पृ० १–९) एप्रिल १८६१.

७. **भरतखंडांतील कारीगर**–म० ज्ञा० प्र०, पु० १३, अं० ५ (पृ० १५०–१६२); अं० ६ (१६३–१६५) आगष्ट–सप्टेंबर १८६२.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

मार्च १८६२ मध्यें दिलेल्या व्याख्यानांचा सारांश.

८. **आत्मशिक्षण**–म० ज्ञा० प्र०, पु० १३, अं० ८ (पृ० २४७–२५८) अं० ९ (पृ० २८८–२९०); पु० १४, अं० १ (पृ० २६–३२) नवं०-डिसें० १८६२, जाने० १८६३.

९. **कापूस**–म० ज्ञा० प्र०, पु० १४, अं० ६ (पृ० १७७–१९२) जून १८६३.

१०. **यत्नेन किं दुर्लभम्**–म० ज्ञा० प्र०, पु० १४, अं० १०, (पृ० २८९–९४) ऑक्टो० १८६३.

११. **अति सर्वत्र वर्जयेत**–म० ज्ञा० प्र०, पु० १५, अं० ९, (पृ० २७१–२७४) सप्टें० १८६४.

१२. **द्रव्येण सर्वे वशाः**–म० ज्ञा० प्र०, पु० १५, अं० ४, (पृ० १०४–१०८) एप्रिल १८६४.

(५) प्रासंगिक भाषणें

१. **ज्ञानप्रसारकसभेपुढील भाषण**–म० ज्ञा० प्र०, पु० ७, अं० ७, ८ (पृ० २३१–२२७) अक्टो० नवं० १८५६.

हें भाषण ' ज्ञानोदया ' मध्येंदेखील प्रसिद्ध झालें आहे, आणि सभासदांनीं प्रत्येक सभेला हजर राहाण्याबद्दल गोविंदजींनीं केलेल्या आवाहनाचा मुद्दाम निर्देश करून ज्ञानकोशासंबंधींच्या सूचनेसंबंधीं संपादक लिहितात, " आणखी त्यांनीं एक गोष्ट काढिली कीं ज्ञानसंग्रह म्हणजे सिक्लोपीडिया या पुस्तकाचें प्रस्तुत सर्व मंडळीला फार अगत्य वाटतें. जर ह्या कामांत सदर्हु मंडळी हात घालील तर फार उपयोग होईल. हल्लीं अशा कामाविषयीं पुरें ज्ञान व साहित्य लोकांत आहे. तसें स्वभाषेंत सुरस लिहिणारेहि असतील. यास्तव या मंडळीनें दहावीस विषय पृथक् पृथक् असामीकडे सोंपून देऊन लिहवावे, मग एकाद्या सुज्ञ मनुष्याच्या हातीं देऊन त्याची संगतवार व्यवस्था करवून एकंदर एक निबंधस्वरूपें पुस्तक तयार करावें. हें स्तुत्य काम मंडळीकडून झालें तर फार बरें होईल. "

मराठी भाषेंत ज्ञानकोश असावा, ही कल्पना पहिल्यांदां गोविंदजींनीं पुढें मांडली.

२. **ज्ञानप्रसारकसभेपुढील भाषण**–म० ज्ञा० प्र०, पु० ७, अं० ११, (पृ० ३५०–३५६) फेब्रु० १८५७.

३. **प्रार्थना**–म० ज्ञा० प्र०, पु० १०, अं० ५, (पृ० १२९–१३२) ऑगस्ट १८५९ .हें भाषण ता० २८ जुलै १८५९ रोजीं झालें.

अशा प्रकारचें भाषण संस्थेतर्फे करण्याबद्दल सरकारी आदेश आल्यामुळें तें त्यांना करावें लागलें असावें. हिंदुस्थानसरकारचे चीफ सेक्रेटरी मि. सीसिल बीडण यांचा ७ सप्टेंबर १८५७ तारखेचा एक हुकूम ' ज्ञानोदयांत ' (१–१०–१८५७) प्रसिद्ध झाला आहे. तो असा :—

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

"रैट ऑनराबल गवरनर जनरल इन कौन्सल हे राणी सरकारच्या सर्व विश्वासू प्रजेस असी सूचना करतात कीं, त्यांनीं एकत्र होऊन सर्वसमर्थ परमेश्वरासमोर आपलीं पापें कबूल करून प्रार्थना आणि विनंति करावी आणि बंडाचा मोड होऊन अपराध बंद व्हावे आणि हिंदुस्थानांत सरकारच्या ताब्यांतील सर्व प्रांतांत पूर्ववत स्वस्थता बंदोबस्त आणि समाधान व्हावें म्हणून जे उपाय चालले आहेत त्यांवर ईश्वराचा आशीर्वाद मागावा. याप्रमाणें दर एक इलाख्यांत ता. ४ ऑक्टोबर रविवार हा प्रार्थनेचा दिवस असा पाळावा..."

असा आदेश पुनः निघाला असावा. आणि त्यावरून ही प्रार्थना करावी लागली. या प्रार्थनेच्या शेवटीं गोविंदजी म्हणतात—

—"आमच्या लक्षावधि बंधुजनांचा नाश झाला असता तो बंद केला, बंडाचें भय नाहिसें केलें, दुष्काळ पडेल या काळजींत आम्हीं पडलों होतों तें भय दूर केलें, यथाकालीं विपुल पर्जन्यवृष्टि करून त्वां आपल्या कृपेचें चिह्न आम्हांस दर्शविलें, तर हे कृपासागरा, जो आतां त्वां राज्यांत स्वस्थपणा आणला आहे, तो तसाच सर्वकाळ राहीसा कर...हे जगन्नियंत्या विश्वपालका, या पृथ्वीवर सर्वत्र शांति व्हावी, आमच्या देशाचें कल्याण व्हावें, आमचीं मनें तुझ्या ठिकाणीं लागावीं, महाराणीनें आम्हांवर चिरकाल दयायुक्त न्यायानें राज्य करावें आणि तिचें, तिच्या कुटुंबाचें व तिच्या राज्यांतील सर्व अधिकाऱ्यांचें कल्याण व्हावें."

४. **ज्ञानप्रसारकसभेपुढील भाषण**–म० ज्ञा० प्र०, पु० १०, अं० ६, (पृ० १६१–१६९) सप्टें० १८५९.

ता. १९–८=१८५९ रोजीं झालेलें भाषण.

५. **अमलवर्जकसभेपुढें केलेलें दारूविरुद्ध भाषण**—ज्ञानोदय, पु० १५, अं० १६–१७, (पृ० २६२–२६६) ऑगष्ट, सप्टेंबर १८५६.

हें 'उदयप्रभा' पत्रांतून उद्धृत करण्यांत आलें आहे.

६. **जनरल असेंब्लीच्या शाळेंत केलेलें भाषण**–ज्ञानोदय, पु० १५, अं० २१, ४ नोवेंबर १८५६.

याखेरीज जनरल असेंब्लीच्या विद्यालयांतील एक शिक्षक वासुदेव कृष्ण म्हाले यांचा 'रोम शहराचा संक्षिप्त इतिहास' हा भाषांतरित ग्रंथ शुद्ध केला, असें त्या पुस्तकावर नमूद आहे.

मराठी भाषेची गोडी कशी लागली ?

त्या काळीं एवढी स्वतंत्र वाङ्मयनिर्मिती करणारे गोविंदजी त्या काळच्या इतर तरुणांप्रमाणें प्रथम मराठी भाषेचा तिरस्कार करणारे होते! पुढें त्यांना मराठी भाषेची

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

गोडी कशी लागली हें त्यांनीं 'उद्भिद्जन्यपदार्थ' या १८५६ सालीं प्रसिद्ध झालेल्या आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत सांगितलें आहे. ते लिहितात,

"बहुतेक भरतखंडस्थ लोकांस इंग्रजी भाषा शिकण्याची अभिरुचि उत्पन्न झाल्यामुळें, प्राकृत ग्रंथांचा व भाषेचा उत्तरोत्तर ऱ्हास होतें चाललेला होता; परंतु इंग्रज सरकारनें व संभावित गृहस्थ, जे परोपकार करण्यास तत्पर, त्यांनीं हें पाहून ती सुरक्षित व प्रचलित ठेवण्याचे उद्योग मांडले...

"इंग्रजी शिकावयास लागल्यापासून मला तर महाराष्ट्र भाषेचा तिरस्कार येत असे. असीच बहुतेक लोकांची स्थिति झाली होती. एकादा प्राकृत ग्रंथ वाचावा किंवा हातांत धरावा म्हटलें म्हणजे वाईट वाटे. जेव्हां मीं फ्रीचर्च विद्यालयांत गेलों तेव्हां डाक्तर विल्सन व मयत रेवरेंड राबर्ट निस्बिट यांची मराठी भाषेवर श्रद्धा आणि एतद्देशीय मुलांमध्यें ती भाषा शुद्ध येण्यांविषयींची उत्कंठा व श्रम पाहून मला तिचा थोडा अभ्यास करण्याचें आवश्यक पडलें. पुढें सन १८४७ सांत, दैवयोगानें अशी गोष्ट झाली कीं, डाक्तर लीथ हे कधीं कधीं या शाळेंत येत असत, त्यांणीं विद्यार्थ्यांस स्वभाषा चांगली आली असतां परभाषा शिकण्यास फार सुलभ पडतें, असें मनांत आणून मोठ्या परोपकार बुद्धीनें महाराष्ट्र भाषेंत बसल्या बैठकीस कोणाची मदत न घेतां, व दुसरे ग्रंथ अवलोकन न करतां, त्याचवेळीं योजलेल्या विषयावर जो निबंध लिहील, त्यांस शंभर रुपये इनाम देऊं असें दर्शविलें. ह्या त्यांच्या स्तुत्य कृत्यावरून शाळेंतील बहुतेक शिक्षकांचीं व मुलांचीं मनें सहजच स्वभाषेकडे वळलीं. त्या वेळीं मलाहि त्या गोष्टीचा निदिध्यास लागल्यावरून मीहि तिजवर बरेच परिश्रम केले. तेव्हांपासून मराठी भाषेची गोडी लागून, जें कांहीं अल्प स्वल्प सध्या त्या भाषेचें ज्ञान मला झालें आहे, त्याचा मी सदरीं सांगितलेल्या तीनहि गृहस्थांचा ऋणी आहें."

गोविंदजींचा पहिला ग्रंथ (शुचिर्भूतपणा) १८४९ सालीं प्रसिद्ध झाला हें आपण पाहिलेंच आहे.

गोविंदजींचें हें सगळें वाङ्मय नव्या पिढीच्या ज्ञानांत भर पडावी, मुलांची चौकसबुद्धि वाढावी व तीं नीतिमान व्हावीं अशा एकमेव हेतूनें लिहिलेलें दिसतें. आपले दोष सुधारावे म्हणून त्यांनीं ते दाखविले आहेत; परंतु त्यांत स्वजननिंदा केल्याचें माझ्या पाहाण्यांत आलें नाहीं. त्यांची भाषा त्या काळच्या पद्धतीप्रमाणें शुद्ध, सोपी आणि रसाळ आहे. त्याचें वाङ्मय वाचतांना संस्कृत भाषेशीं त्यांचा परिचय असावा असा ग्रह होतो. इंग्रजी भाषेचेंही वाचन त्यांचें चांगलें असावें, हें त्यांचे 'आत्मशिक्षण' वगैरे निबंध वाचले असतां कळून येतें.

फ्रीचर्च विद्यालयांत डॉ. विल्सन, रे० नेसबिट यांच्या सहवासांत आल्यामुळें मराठी भाषेचा आपणास "अभ्यास करण्याचें आवश्यक पडलें," अशी गोविंदजींनीं

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

दिलेली कबुली आपण पाहिली. डॉ. विल्सन हे अनेकभाषापंडित होते. मराठी भाषेंतही त्यांचे कांहीं ग्रंथ आहेत. मोल्स्वर्थला मराठी–इंग्रजी कोशाच्या बाबतींत त्यांची मदत होती. मोल्स्वर्थच्या कोशाला जोडलेल्या प्रास्ताविक निबंधावरून डॉ. विल्सनचा मराठी भाषेवरील अधिकार कळून येतो. तेव्हां अशा महापंडितांच्या प्रश्नांना व शंकांना उत्तरें देतां देतां किंवा तीं देण्याची तयारी करतां करतां गोविंदजींचा मराठीचा अभ्यास झाला असला पाहिजे. डॉ. विल्सनच्या कसोटीला ते कसे उतरले, हें वेळोवेळीं मराठी ग्रंथकार म्हणून विल्सननें त्याच्यासंबंधीं काढलेल्या धन्योद्गारांवरून कळून येतें.

गोविंदजींनीं प्राचीन मराठी वाङ्मयासंबंधीं विशेष कांहीं प्रत्यक्ष केल्याचें दिसत नाहीं. संतवाङ्मयाचें त्यांचें वाचन असावें, हें मधून मधून त्यांनीं उदधृत केलेल्या संतवचनांवरून कळून येतें. 'नीति संवाद' या त्यांच्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर आरंभीं 'ज्ञानेश्वर येकनाथजी' असा मजकूर आढळतो. त्यावरून त्यांची मराठी संतांवरील निष्ठा कळून येते; पण जें त्यांना करतां आलें नाहीं तें त्यांच्या पुतण्यांनीं केलें. गोविंदजींचे ज्येष्ठ बंधु जे विष्णुपंत, त्यांना रामचंद्र (१८४३–१९१४) व दीनानाथ असे दोन मुलगे होते. हे दोघेही पदवीधर झाले. यांचें शिक्षण गोविंदजींच्या देखरेखीखालीं झालें, असें नमूद आहे. यांपैकीं रामचंद्र विष्णु यांनीं ज्ञानेश्वरीचें संशोधन करून सटीप "ज्ञानदेवी" १९०७ सालीं प्रसिद्ध केली. त्यांच्यानंतर अनेक हस्तलिखितें मिळवून त्यांतील पाठभेदांसह समग्र ज्ञानेश्वरी प्रसिद्ध करण्यास आजपर्यंत कोणीच धजलेला नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्याच्याहीपूर्वी १८८६ सालीं त्यांनीं तुकारामाची गाथा संपादून प्रसिद्ध केली होती. त्याच्यानंतरचें त्यांचें १८९० सालचें प्रकाशन 'रामदासस्वामींचे समग्र ग्रंथ' हें होय. प्राचीन मराठी वाङ्मयाकडे व विशेषतः ज्ञानेश्वरीच्या संशोधनाकडे रामभाऊंचें लक्ष डॉ. भांडारकरांनीं वळविलें, असें 'ज्ञानदेवी'च्या अर्पणपत्रिकेवरून दिसतें. रामभाऊंचे धाकटे बंधु दीनानाथ यांचाही प्राचीन मराठी कवितेचा अभ्यास चांगला होता, असें नमूद आहे. त्यांच्या नांवावर स्वतंत्र ग्रंथ नाहींत; पण 'सुबोधपत्रिकेंत' त्यांनीं पुष्कळ भारदस्त लेख लिहिल्याचें कळतें. त्यांची रामभाऊंना संपादनकार्यांत मदत होत असे. 'वृत्तमंजूषा' या मथळ्याखालीं रामभाऊंनीं 'विविधज्ञानविस्तारा'त मराठी वृत्तांबद्दल कांहीं लेख लिहिले आहेत.

गोविंदजींचा खाजगी पत्रव्यवहार

बाळकृष्णपंत देव यांनीं जो 'विविधज्ञानविस्तारां'त त्यांच्याविषयीं चरित्रलेख लिहिला आहे, त्यावरून त्यांनीं त्यांचा खाजगी पत्रव्यवहार पाहिला होता, असें वाटतें. ते लिहितात, "गोविंदजींची ओळखदेख, स्नेहसंबंध विद्वान व बड्या साहेबलोकांत फार चांगला होता, असें त्यांच्या खाजगी इंग्रजीच्या पत्रव्यवहारावरून दिसतें. त्यांच्या मित्रमंडळांत नुसते मिशनरी साहेब होते, असें नाहीं. त्यांत कांहीं पोलिटिकल

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

एजंटसारखे वडे इंग्रजी अधिकारीही होते. त्यांचीं गोविंदजींस आलेलीं बरोबरीच्या नात्याचीं प्रेमळपणानें भरलेलीं, त्यांतील अनेक प्रकारच्या विद्याविषयक वादविवादानें मनोरम वाटणारीं खुलासेवार–वेळेनुसार खाजगी, घरगुती मजकुराचीं पत्रें पाहून मोठें नवल वाटतें. ”

या पत्रव्यवहाराचा शोध केला असतां त्याचा आतां पत्ता लागला नाहीं! देवांनीं आपल्या लेखांत जो निष्कारण पाल्हाळ केला आहे त्याऐवजीं त्या पत्रांतील निवडक उतारे दिले असते तर बरें होतें. स्वतः गोविंदजींचा “ एका खाजगी गोष्टीचा उतारा ” त्यांनीं दिला आहे. त्यावरून गोविंदजी आपल्या जावक पत्रांची स्थळप्रत ठेवीत, असें दिसतें. तो उतारा असा :—“ एका बड्या संस्थानिकानें मला भेट दिली. भाषणांत साखर इतकी कांहीं पेरली कीं, मला त्याची अगदीं शिसारी आली. शेवटीं मला सध्यां मिळत आहे व पुढें मिळेल त्याहून पुष्कळ अधिक वेतन देण्याचें कबूल करून ‘ मी त्यांच्या पदरीं राहून त्याची सेवा करावी ’ म्हणून मला फारच गळ घातली. पण “ अव्यवस्थितचित्तानां प्रसादोऽपि भयंकरः ” या न्यायानें कोणत्याहि मोहास वश न होतां मीं या राजश्रीपाशीं साफ नन्नाचा पाढा वाचला. यांत मीं चांगलें केलें असें तुम्हांस वाटेल, अशी मी आशा करतों. ”

गोविंदजींना अखेरपर्यंत मिशनरी संस्थेंत दरमहा ६० रुपये पगार मिळे, असें देव लिहितात. विल्सन हायस्कुलांत त्यांची जास्त माहिती मिळविण्याकरितां शोध केला, पण मागील कागदपत्र नष्ट झाल्याचें कळलें.

मरणाचे पूर्वीं कांहीं दिवस डॉ. विल्सननीं गोविंदजींच्या घरीं जाऊन त्यांच्या-बद्दल परमेश्वराकडे प्रार्थना केली, असें नमूद आहे. आरंभीं सांगितल्याप्रमाणें बरोबर शंभर वर्षांमागें म्हणजे १५ मार्च १८६५ रोजीं त्यांनीं इहलोकींची यात्रा संपविली.

गोविंद नारायणांचें समग्र वाङ्मय आतां लोकांपुढें येत आहे, ही संतोषाची गोष्ट होय. त्यांच्या पुण्यतिथीच्या शताब्दीच्या वेळींच तें लोकांना उपलब्ध करून द्यावें अशी आमची फार इच्छा होती, आणि त्याची पुष्कळशी पूर्वतयारीही करून ठेवण्यांत आली होती. पण या ना त्या कारणानें तो योग जुळून आला नाहीं. सध्यां हा पहिला खंड प्रसिद्ध होत आहे. पुढील दोन खंडही प्रसिद्ध करून सध्याचे मराठी संशोधनमंडळाचे उत्साही संचालक हें कार्य लवकरच तडीस नेतील अशी आशा आहे. या खंडाच्या मुद्रणाचें काम त्यांच्याच नजरेखालीं झालें आहे.

सरस्वती बिल्डिंग, केनेडी ब्रिज
मुंबई ४. १–१२–१९६७.

अ. का. प्रियोळकर

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

१

पत्रावळी

उद्योगाचे परिणाम किती सुखकारक आहेत, व त्यापासून प्रपंचसंबंधी सुखें किती सुगम होतात, याचा कांहीं विचार करूं. उद्योगानें प्रथम शरिरास आरोग्य होऊन अंतःकरणाचें समाधान होतें. सुउद्योगांत मन गुंतलेलें असलें म्हणजे मनांत कुवासना येत नाहींत;—दुसऱ्याचें अकल्याण इच्छिणें, घातपात करणें, मत्सर करणें, इत्यादि अमंगळ वासना यांहींकरून मन बद्ध न होतां मोकळें व सरळ असतें. मग तें हवा तो विषय ग्रहण करण्यास तयार होतें. जसें खडूचें सुरेख चित्र करावयाचें असलें तर तो पहिल्यानें कुटून व गाळून नीट करावा लागतो, तसेंच आपल्या शरीरापासून आणि मनापासून सुंदर व मोठीं कृत्यें करून घेण्याचीं असलीं तर त्यांस उद्योगरूप आणि मेहनतरूप खलबत्यांत घालून कुटून तयार केलीं पाहिजेत.

पाहा, सोनें, रुपें, हिरे, माणिक, मोत्यें, इत्यादि अमोलिक पदार्थ उद्योगाचीं फळें आहेत. तसेच अनेक तऱ्हेचे भक्षणीय पदार्थ श्रमाचे अंतीं प्राप्त होतात. तर असा जो हा अपूर्व विषय उद्योग तो काय आहे असा जर आपण विचार करूं लागलों, तर आमच्या ध्यानांत सहज येतें कीं, ईश्वरानें जे मनुष्यास निरनिराळे शारीर आणि मानसिक धर्म लावून दिले आहेत, त्यांप्रमाणें वागणें, आणि दुसरें कांहीं नाहीं. उद्योग करणें म्हणजे डोकीवर दगड घेऊन वाहाणें, व छाती फुटेपर्यंत मेहनत करणें, अथवा मजुरी करणें आणि शरिरास त्रास देणें असें कित्येकांस वाटतें; परंतु ही त्यांची समजूत केवळ खोटी आहे. ज्यास जो उद्योग तोलेल तो त्याणें सुखवस्तु करावा. आणि जरी अशा उद्योगांत कांहीं श्रम झाले; तरी त्यापासून त्यास सुखच होतें. परंतु निरुद्योगी

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

मनुष्य कधींहि सुखी होणार नाहीं. तो केवळ अधम आणि दुःखकारक स्थितींत आहे असें समजावें.

आतां पाहा, कित्येक लोकांस असें वाटतें कीं, मला कांहीं तरी काम करावें लागतें तर मला कांहीं उद्योग न करितां खायास मिळालें असतें तर मी सुखी झालों असतों. तर असा मनुष्य केवळ वेड्या समजुतीचा असें समजावें. जर मनुष्यास कांहीं उद्योग न करावा पडला, तर तो जडभरथासारिखा निरुपयोगी होऊन अल्पायुषी होईल. एखाद्या मनुष्यास जर आपण सांगितलें कीं, तूं कांहींच उद्योग करूं नको, आणि तुझ्या शरिरास अगदीं मेहनत देऊं नको, असें कीं, तूं विचार करण्याच्या खटपटींत पडूं नको; फिरायास जाऊं नको; तूं कांहीं बोलूं नको; एक छप्परपलंग घालून त्याजवर दोन मसरूच्या गाद्या घालून देतों, त्याजवर रात्र आणि दिवस स्वस्थ निजून राहा. तुला अन्न, वस्त्र व चाकर-नोकर वगैरे जें पाहिजे तें सर्व तेथेंच पुरवूं. असें जर सांगितलें तर कोणी कबूल करील काय ? माझी खात्री आहे कीं या प्रकारचें सुख भोगणें अति दरिद्री मनुष्य देखील पत्करणार नाहीं, तर मग तें इतरांस कोठून आवडणार आहे ? यावरून सिद्ध होतें कीं मनुष्यास उद्योग करूनच राहिलें पाहिजे. मग तो मोठा बादशाहा असो किंवा कंगाल रंक असो. त्याला देहधर्मांचे व्यापार स्वताच केले पाहिजेत. खाणें, पिणें, चालणें, बोलणें, व्यायाम करणें, विद्याभ्यास करणें, ईश्वरी मार्ग शोधून काढणें, ईश्वराची प्रार्थना करणें, इत्यादि जसे आवश्यक धर्म करणें मनुष्यास जरूर आहे; तसेच शरीरास तोलेल तितके चांगले उद्योग करणें आवश्यक आहे. कोणत्याच प्रकारचा उद्योग नसला तर मनुष्याच्या आयुष्याचा, बुद्धीचा, आणि शरीराचा नाश होऊन, त्याची स्थिति पशूंपेक्षांहि नीच होऊन जाती.

आमचा मूळ उद्देश पत्रावळी कोण्या प्रकारें कशा, कोठें, आणि कोण करितात, हें दाखवून, क्षुल्लक उद्योगापासून किती सुख प्राप्त होतें, हें आमच्या वाचणारांस दाखवावें, परंतु विचाराच्या ओघानें मनाचा झोंक उद्योगाकडेसच जाऊन प्रथम उद्योगावरच कांहीं विचार प्रगट करण्यांत आले; म्हणून आमच्या वाचणारांनीं असें लक्षांत आणूं नये कीं मूळ विषय सोडून भलत्याच विषयाचा पाल्हाळ एथें केला आहे. या विषयावर लिहिण्याचा मुख्य हेतु हाच आहे कीं, उद्योग हा मनुष्यास प्रधान आहे. तर कोठून तरी त्याचें स्वरूप वाचणारांच्या दृष्टीस पडावें.

पत्रावळी गोमांतक, मालवण, वेंगुर्लें, व सुरत एथें होतात. ह्या कोण लावितात ह्मणाल, तर गरीब लोक व विधवा स्त्रिया ज्यांजकडे दुसरा व्यापार करायास भांडवल नसतें तीं, व ज्यांस दुसऱ्या प्रकारची मजुरी करायास शरीरसंपत्ति नाहीं, अशा प्रकारचीं मनुष्यें बहुधा पत्रावळी लावितात. कोठें गरीब ब्राह्मण, कोठें वाणी, कोठें कुणबी, कोठें खारवी, पत्रावळी लावितात. पत्रावळी कोणकोणत्या झाडांच्या पानांच्या लावितात, असा

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

कोणी सहज प्रश्न करील. तर त्या वडाच्या, माउलीच्या, मोह्याच्या, चाराच्या, पळसाच्या, फणसाच्या, काजीच्या, मांदाराच्या, इत्यादि कुंभ्याच्या पानांच्या बहुतकरून लावितात. इतर कित्येक झाडांच्या पानांच्या ज्या पत्रावळी होतात त्या फार दिवस टिकत नाहींत.

पत्रावळी लावणाऱ्या बहुतकरून विधवा, गरीब व वृद्ध स्त्रिया असतात. पत्रावळी लावायाचीं पानें कशीं, कोठून आणि कोण आणितो, तें पाहा. या वृद्ध बायका सकाळच्या प्रहरीं वडाच्या किंवा फणसाच्या झाडाखालीं जाऊन जीं पानें पिकून गळून पडतात तीं जमवून आणून एकावर एक रचून फळ्याखालीं दडपून ठेवितात, आणि मग त्यांच्या पत्रावळी लावितात. किंवा मजूर लावून, वड, चार, माउली, इत्यादि वृक्षांचीं पानें रानांतून आणवून त्यांचे देंठ कापून पत्रावळी लावितात. मग त्या एक दोन दिवस उन्हांत सुकवून शंभर शंभर पत्रावळींचा एक एक पुडा बांधितात. पत्रावळी लावायास बांबूच्या, माडाच्या किंवा दर्भाच्या चोया करितात.

इतर उद्योगांमध्यें जसें लक्ष, कुशळता व हुशारी पाहिजे, तसीच पत्रावळी लावायासहि पाहिजे. ज्या अडाणी, आळसी व सुस्त स्त्रिया असतात, त्यांकडून चांगल्या पत्रावळी होत नाहींत, म्हणून अर्थांतच त्यांला फार लाभ होत नाहीं. ज्या उद्योगी, कुशळ आणि चतूर बायका असतात, त्या फार सुंदर पत्रावळी लावितात. त्या इतक्या चांगल्या असतात कीं, त्यांवर दूध घातलें तरी गळायाचें नाहीं. अशा पत्रावळी दोन अडीच रुपये हजार खपतात; आणि ज्या अडाणी बायका लावितात, त्या आठ दाहा किंवा साहा आणे खपतात. यावरून पाहा कीं, कोणत्याहि गोष्टींत बराबर लक्ष पुरवून उद्योग केला नाहीं, तर त्यापासून इच्छिलेले लाभ व्हावयाचे नाहींत. जें काम मनुष्य पत्करितो, तें मन लावून मेहनत घेऊन त्याणें केलें, तरच त्याला त्यापासून सुख होईल.

आतां पत्रावळींपासून किती लाभ होतात याचा विचार करूं. वृक्षांचीं गळून पडलेलीं व इतर पानें तेथचे तेथेंच राहून जमिनीवर कुजून गेलीं असतीं. परंतु त्यांवर उद्योग व श्रम केल्यामुळें त्यांच्या पत्रावळी होऊन त्यांजपासून शेंकडो गरीब लोकांचा उदरनिर्वाह चालतो. कित्येक विधवा स्त्रियांनीं केवळ पत्रावळी लावून आपल्या एक दोन मुलांचें संरक्षण करून त्यांस वाचायास लिहायास शिकवून त्यांचीं लग्नें देखील केलीं आहेत; आणि येणेंकरून त्या सुखास पोहोंचल्या आहेत गरीब लोक ज्यांस ताटें वापरायाची शक्ति नाहीं, त्यांस पत्रावळी फारच उपयोगाच्या आहेत. तसाच वाटसरू लोकांस व भोजनसमारंभास यांचा आमच्या लोकांस किती उपयोग पडतो याविषयीं अबालवृद्धांस माहीत आहे. मुंबई येथें पत्रावळींचा मोठा व्यापार चाललेला आहे.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

प्रतिवर्षी लाखो पत्रावळी गोमांतक व सुरत एथून येतात. दोन चार वर्षांमागें सरकारनें त्यांवर जकाद बसविली होती. त्या वेळीं प्रतिवर्षी सरकारास शेंकडो रुपये उत्पन्न होत असत. परंतु आलीकडेस सरकारानें उदार बुद्धि करून या हलक्या मालाची जकाद घेणें बंद केलें आहे असें ऐकतों. यांत सरकारनें मोठाच उदारपणा दाखविला.

ज्या पत्रावळी सुरतेस होतात, त्या केवळ अडाणी खारवी लोक लावितात. त्या बहुधा पळसाच्या असून चार पांच आणे हजार खपतात. त्यांवर प्रवाही पदार्थ घातला असतां ठरायाचा नाहीं. त्या मिठाई खाण्याच्या मात्र उपयोगी. बहुतेकांचा असा समज आहे कीं, सर्वोत्कृष्ट पत्रावळी गोमांतकी. तेथील पत्रावळी मोठ्या व विस्तीर्ण असून चोया मोठ्या कुशळतेनें लाविलेल्या असतात. वेंगुर्लें, मालवण, वाडी, रत्नागिरी व आलिबाग एथें होतात, त्या मध्यम प्रतीच्या.

पाहा, पातेऱ्यासारिख्या पदार्थावर श्रम केले असतां किती लाभ होतात ! गरीब, अशक्त, वृद्ध स्त्रियांचें दारिद्र दूर होऊन त्यांस सुख प्राप्त होतें. इतर लोकांच्या अडचणी दूर होऊन व्यापारी लोकांचा व्यापार चालतो, आणि देशाची सुधारणूक होती. तर विद्येसारिखें अमोलिक रत्न प्राप्त करून घेण्यास जर आपण यथायोग्य परिश्रम केले, तर त्यापासून आपल्या देशाचें आणि आपलें किती कल्याण होईल याचें अनुमान कोणाच्यानें करवेल. आणि तेणेंकरून सध्या भरतखंडांत जो सर्व गोष्टींचा दुर्भिक्षपणा चालला आहे तो दूर होणार नाहीं अशी काय गोष्ट आहे ? यथायोग्य उद्योग करण्याची उमेद, आणि ज्ञानाची अभिरुचि जेव्हां आह्मामध्यें सतत वावरूं लागेल, तेव्हांच आपल्या देशांतील अज्ञानरूप दारिद्राचा उपमर्द होऊन ज्ञानरूप संपत्तीचा झेंडा लागेल.

कोणी ह्मणतो कीं, हिंदुस्थान दारिद्र्यरूप गगनचुंबित पर्वताखालीं गर्द होऊन गेलें आहे. कोणी ह्मणतो कीं, अज्ञानरूप माहानदीस पूर येऊन त्यांत तें वाहून जात आहे. कोणी ह्मणतो कीं, त्यास आलस्यरूप कुंभकर्णी गाढ आणि दीर्घ निद्रा लागली आहे. कोणी ह्मणतो कीं. भित्रेपणारूप जरत्कारूसारिखा अशक्तपणा आला आहे. कोणी म्हणतो कीं ख्याली खुशाली, नाच तमाशे रूप जलोदर होऊन त्याच्या आयुष्याचा क्षय होत चालला आहे. परंतु अशा प्रकारचीं दूषणें लावून घेण्यास आमचा देश कां पात्र झाला, याचा जर आपण क्षणभर विचार करूं, तर आमच्या ध्यानांत येईल कीं, आमचें सर्व दैन्य, आळस, निरुद्योग आणि विद्येची अवज्ञा यांपासून उत्पन्न होतें. आमचे लोक विद्या संपादन करायास योग्य उद्योग करीत नाहींत. तिच्या प्रित्यर्थ खर्चावें तितकें द्रव्य खर्चीत नाहींत. त्यांचें जें द्रव्य ख्यालीखुशालींत जातें त्यांतील एक शतांशहि विद्येकडे लागत नाहीं. ह्मणून अर्थातच आह्मी अज्ञान-

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

सागरांत बुडालों असतां आम्हावर अनेक विघ्नें येऊन पडतात; आणि फुटलेल्या जहाजावरील नावाड्यांची जशी अवस्था होती, तशी आमची सध्याची स्थिति होण्याचें कारण हेंच आहे. प्रपंचावर पुढील पदांतील सारांश लक्षांत आणून वागावें, म्हणजे बहुधा कोणत्याच गोष्टींत अडचण पडणार नाहीं.

॥ प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ [जयानें] केला ॥
॥ तो नर भला भला ॥ ७ ॥ ७ ॥

यांतील रहस्य इतकेंच कीं मनुष्यानें प्रपंच साधावा, म्हणजे अनेक तऱ्हेचे उद्योग व श्रम करून द्रव्य उत्पन्न करावें, आणि त्याचा उपयोग करावा. अतीतअभ्यागतास अन्न घालावें. शांती, क्षमा, दया इत्यादि गुणांची वृद्धि करावी. ईश्वराच्या भजनांत तत्पर असावें. असा जो पुरुष तोच या लोकीं धन्य. नाहीं तर उगाच राम राम म्हणत रस्तोरस्तीं आळशासारिखा फिरतो, आणि ईश्वरानें आपणास सामर्थ्य दिलें आहे त्याचा उपयोग न करितां दुसऱ्यास उपद्रव मात्र देतो, तो मनुष्य "धरत्रीस भार आणि अन्नास काळ" या म्हणीप्रमाणें निरुपयोगी आहे असें समजावें.

ज्ञानप्रसारक–पु. ८, अं. १, (मे १८५७).

२

अन्न*

– १ –

हे सुज्ञ गृहस्थहो,

जे जे पदार्थ पाहाण्यांत येतात, किंबहुना जे आपल्या अस्थित्वास आवश्यक आहेत, त्यांविषयीं तरी विचार करणें हा मनुष्याचा धर्म होय. कोणताहि पदार्थ क्षुल्लक आहे ह्मणून अविचारानें त्याचा अव्हेर करूं नये, कारण सृष्टिकर्त्यानें कोणत्या वस्तूंत कसकसें रहस्य ठेवलें आहे याचा माग लावून मनाची तृप्ति करून घेणें हा एक मनुष्यामध्यें अपूर्व गुण आहे. परंतु तो गुण त्याजमध्यें पूर्णपणीं वसावा म्हणून त्याणें श्रम केले पाहिजेत. श्रमांवांचून हा गुण त्यांजमध्यें प्रकाशित व्हायाचा नाहीं.

ज्या विषयावर आज आपणास व्याख्यान द्यावयाचें तो केवळ साधारण आहे. अन्न हा शब्द सर्वत्र प्रख्यात असून अबालवृद्धांच्या संघाटणांतला आहे. तर असा जो हा शब्द त्याच्या पोटीं अर्थाचा समावेश किती होतो, आणखी अन्न हें कोणत्या पदार्थास नाव असावें, याचा प्रथम आपण कांहीं विचार करूं.

ही गोष्ट वास्तविक आहे कीं, अन्न या विषयाचें विवेचन केल्यानें आज रात्रीस आपणास फार लभ्यांश होईल असें नाहीं; परंतु ज्याअर्थी आपल्या या सभेंत दुसऱ्या अनेक मोठमोठ्या शास्त्रीय विषयांचा विचार होत असतो, त्याअर्थी एकादे वेळेस

*तारीख २१ माहे ऑगष्ट १८५७ रोजीं ज्ञानप्रसारक सभेपुढें दिलेलें व्याख्यान.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

अन्नासारख्या साधारण विषयावर कांहीं विचार करून मन रंजवावें, म्हणून या विषयाचा आज येथें उल्लेख करितों.

अन्न या शब्दाचा साधारण अर्थ धान्यापासून शिजवून केलेला पदार्थ. परंतु वस्तुतः "अन्नमय प्राण" या वाक्याच्या अन्वयें त्याचा अर्थ असा होतो कीं, ज्याचा जो भक्ष किंवा ज्या पदार्थाकडून ज्या प्राण्याचें संरक्षण होतें तें त्याचें अन्न.

आतां प्रत्येक देशांत मनुष्याचा मुख्य आहार तरतऱ्हेच्या धान्याचा असतो, त्याप्रमाणें त्या पदार्थास अन्न अशी संज्ञा दिली आहे. कित्येक देशांत लोकांचा आहार बहुधा गहुंच असतो, म्हणून ते गव्हांच्या पदार्थासच अन्न ह्मणतात. कित्येक देशांत बाजरी बहुत पिकती आणखी तिजवर बहुतेक लोकांचा निर्वाह होतो, ह्मणून तिजपासून जो शिजवून तयार केलेला पदार्थ, त्यास ते अन्न म्हणत असतात. कित्येक देशांत नागली, कोद्रु, मका, यांपासून तयार केलेल्या पदार्थास अन्न असें ह्मणतात कोणी कोणी जोंधळयाच्या कण्यापासून शिजवून तयार केलेल्या पदार्थास अन्न ह्मणतात. ज्या देशांत मासे, मास, बटाटे व इतर कंद खाऊन उपजीविका चालवितात, ते अशा पदार्थांसच अन्न ह्मणतात. बाळकांचा निर्वाह दुधावर होतो, म्हणून दूध हेंच त्यांचें मुख्य अन्न होय. याचप्रमाणें पशु, पक्षी यांचा आहार मांस, फळ, तृण असा आहे. म्हणून ज्या पदार्थांपासून त्यांच्या प्राणाचें रक्षण होतें, ते त्यांचें अन्न असें ह्मणण्यास कांहीं अडचण नाहीं. जसें मनुष्याचें मुख्य अन्न भात, भाकर, तसेंच गाई, घोडे यांचें अन्न गवत, पेंढा असें म्हटलें असतां कांहीं बाध येणार नाहीं.

ही गोष्ट वास्तविक आहे कीं, व्यवहाररूढीप्रमाणें तांदळापासून शिजवून केलेला जो भात, त्यासच अन्न ह्मणतात. कोंकण, कर्नाटक वगैरे देशांत भातावांचून इतर भोजनाच्या पदार्थांस अन्न ह्मटलें असतां ते कबूल करणार नाहींत. पानावर इतर सर्व पदार्थ वाढून भात वाडलेला नसला, तर अन्न अजून वाडलें नाहीं असें म्हणतात. भात मागून घ्यावयाचा असला, तर थोडें अन्न आणा असें म्हणण्याचा प्रघात आहे. यावरून सहज लक्षांत येतें कीं, कित्येक देशांत अन्न हा शब्द एकच पदार्थबोधक आहे खरा, परंतु ह्या शब्दाचा अर्थ उपजीवनाचे सर्व पदार्थव्यापक आहे, म्हणून आपणास आज त्याचा विचार करणें आवश्यक आहे.

जरी प्राकृत भाषेंत अन्न या शब्दाचा अर्थ कोठे कोठे एकदेशीय आहे, तरी संस्कृत भाषेंत त्याचा अर्थ विस्तीर्ण आहे. यावरून संस्कृत भाषेची प्रौढी आणि ती भाषा रचणारांच्या ज्ञानाचा गंभीरपणा उघड दिसून येतो. त्यांणीं अन्नाचे दाहा प्रकार दाखवून त्यांचे दोन भाग केले आहेत. ते असे, चतुर्विधान्नें आणि षड्रसान्नें.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

चतुर्विधान्नें येणेंप्रमाणेः—

खाद्य—भात, भाकर, वडे, लाडु, इत्यादि.
चोष्य—आंबा, लिंबु, आंवळा, इत्यादि लोणचीं.
लेह्य—पंचामृत, रायतें, मेतकुट, इत्यादि.
पेय—क्षीर, दूध, पायस, इत्यादि.

षड्रसान्नें येणेंप्रमाणें :—

मधूर—शर्करामिश्रित अन्नें व इतर गोड पदार्थ.
आंबट—चिंच अथवा दुसरे आंबट पदार्थ मिश्रित करून तयार केलेलीं अन्नें.
तिखट—मिरची, आलें, मिरीं, राय, इत्यादि मिश्रित करून तयार केलेलीं अन्नें.
खारट—मीठ, सैंधव, पापडखार इत्यादि मिश्रित करून तयार केलेलीं अन्नें.
तुरट—बेलफळ, पेंढूर, इत्यादिकांचे केलेले पदार्थ.
कडु—कारलें, कोठिंबर इत्यादिकांचे केलेले पदार्थ.

जे वर साहा रस सांगितले त्यांच्या पोटीं दुसरे अनेक रस आहेत. आतां जे षड्रसांचे साहा निरनिराळे पदार्थ सांगितले, ते केवळ एका रसापासूनच तयार करतां येतील असें नाहीं. कित्येक पदार्थांत यांतील एकच रस मिश्रित करावा लागतो; आणि कित्येकांत दोन, तीन, चार, पांच किंवा साहाहि रस मिश्रित करून एक पदार्थ करावा लागतो. उदाहरण, कारल्याची भाजी हींत साखर, चिंच, मिरची, मीठ हे चार रस घालावे म्हणजे त्याची भाजी हें षड्रसान्न झालें. कारण, कडु आणि तुरट हे दोन रस कारल्यांत मुळचेच आहेत. म्हणून हे साहाहि रस एकत्र होऊन एक पदार्थ झाला.

वर जे षड्रस आणि चतुर्विधान्नांचे दाहा प्रकार आहेत म्हणून सांगितलें ते वस्तुतः चारच आहेत. चतुर्विधान्नांत षड्रसान्नांचा समावेश आहे. याचे मूळ भाग असे आहेत. चार प्रकारचीं अन्नें आणि साहा प्रकारचे रस, परंतु कित्येक विद्वज्जनांनीं त्यांस षड्रसान्नें व चतुर्विधान्नें अशीं निरनिराळीं नावें दिधलीं आहेत.

अन्न म्हटलें म्हणजे उद्भिद पदार्थांपासून होतें. मग तें धान्य असो, फळ असो, मूळ असो, किंवा मास असो. जर या पृथ्वीवर वनस्पति नसती तर प्राण्यांचें रक्षण होणें दुर्लभ होतें. प्राण्यांत माशांचा मात्र वनस्पतिजन्य पदार्थांचा आहार नसतो; हा एक ईश्वरी नेमांत मोठाच चमत्कार आहे.

आतां षड्रसांविषयीं जो आपण विचार केला, त्यामध्यें एका गोष्टीचें प्रतिपादन करणें राहिलें. या साहा रसांपैकीं पांच रस वनस्पतिजन्य आहेत, आणि एक खनिज

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आहे. आणि तोच पदार्थ इतर पदार्थांस रुचि आणणारा आहे. पाहा, ईश्वराची किती अद्भुत करणी आहे कीं, जरी वनस्पतिजन्य पदार्थ मनुष्याच्या उपजीविकेस आवश्यक आहेत, तरी त्याला त्यांत खनिजजन्य पदार्थ मिश्रित केलाच पाहिजे, त्याशिवाय त्यांस रुचि येत नाहीं. पक्वान्नांवांचून इतर सर्व प्रकारच्या अन्नांस रुचि आणण्यास व ते पाचनीय होण्यास मीठ पाहिजे, त्यावांचून पदार्थांच्या स्वादाचा निर्णय व्हावयाचा नाहीं. अन्नांत दुसरा एक खनिजजन्य पदार्थ मिश्रित करावा लागतो, तो कोणता ह्मणाल तर पाणी. पाण्यास जीवन असें नांव आहे. मिठास सबरस असें हिंदुस्थानींत नांव दिलें आहे.

यावर हरदास लोक असी एक गोष्ट सांगतात. तिच्या खरेपणाविषयीं आपणाच्यानें कांहीं बोलवत नाहीं, तरी तिजमध्यें कांहीं विचार आहे, ह्मणून त्यांतील सारांश एथें लिहितों. अकबर बादशाहाचा बिरबलावर फार विश्वास असून, त्याजवर तो फार प्रीति करीत असे; हें पाहून बादशाहाच्या मेहुण्यास अशी इच्छा झाली कीं, बिरबलास कामावरून दूर करवून त्याचा हुद्दा आपण चालवावा. त्याप्रमाणें त्याणें बादशाहास अर्ज केला. तो वाचून बादशाह हंसला, आणखी त्यास उत्तर दिलें कीं, याजविषयीं थोडक्याच दिवसांत विचार करण्यांत येईल. मग एके दिवशीं त्याला असें सांगितलें कीं, जर तुला बिरबलाची जागा पाहिजे, तर मला सबरस आणून दे, ह्मणजे तुला ती जागा देईन. तें ऐकतांच तो गृहस्थ दोन घटिका विचारांत पडून शेवटीं म्हणाला कीं पंध्रा दिवसांनीं आणून महाराजांचे सेवेंत सिद्ध करीन. बादशाहानें तें कबूल केलें; मग त्या गृहस्थानें चार-पांचशें मनुष्यें गोळा करून सर्व वनस्पतींचा रस काढून आणण्यास त्यांस रानोमाळीं पाठवून दिलें. तेव्हां ते लोक भांडीं घेऊन ज्या त्या झाडाचा रस त्यांत भरीत सुटले, आणि जरी पंध्रा दिवस होऊन गेले तरी सर्व झाडांचा रस त्यांच्यानें गोळा करवत नाहींसा झाला. शेवटीं जेवढा रस त्यांनीं जमविला होता तेवढा आणून बादशाहासमोर ठेविला. तें पाहून बादशाह खदखदां हंसला, आणि बिरबलास कचेरींत बलावून आणिलें आणि सांगितलें कीं, मला सबरस आणून दे. त्या वेळीं, महाराज, आज्ञा मान्य आहे, असें त्याणें ह्मणून कनवटीची एक पै काढून आपल्या खिजमतदारापाशीं देऊन त्यास सांगितलें कीं, हिचें मीठ घेऊन ये. त्याणें तें तात्काळ आणून बिरबलाचे स्वाधीन केलें. त्याणें ती मिठाची पुडी घेऊन बादशाहाच्या सिंहासनासमोर ठेविली, आणि ह्मणाला, महाराज, हा सबरस आपल्या सेवेंत सादर केला आहे तो घ्यावा. तें पाहून बादशाह फार खुश होऊन आपल्या मेहुण्यास ह्मणाला, बिरबलावर जी मी प्रीति करितों ती त्याच्या शरिरासाठीं नाहीं, परंतु त्याच्या गुणासाठीं आहे. यास्तव अशा गुणी पुरुषाच्या जागेवर बसण्यास तूं उपयोगी नाहींस.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

अन्न कोणत्या प्रकारचें असावें; तें कितीवेळ सेवन करावें; कोणकोणत्ये वेळीं खावें; त्याजविषयीं विचार करणें कां अवश्य आहे ? आणखी त्याविषयीं काळजी वाहाणें कां आवश्यक नाहीं; तें किती सेवन करावें आणि तें कशासाठीं सेवन करावें; या सर्वांचा आपणास विचार केला पाहिजे.

अन्न कोणत्या प्रकारचें असावें ? जें अन्न आपण सेवन करितों तें गहूं, तांदुळ, बाजरी, ज्वारी इत्यादि धान्याचें असून त्याजबरोबर तूप, दूध, दहीं, शाकभाज्या व इतर आंबट, तिखट, रौच्य असे उपान्नांचे पदार्थ थोडथोडे असावेत. सर्वांपेक्षां पौष्टिक अन्नाचा भाग अधिक असावा. सत्वस्त पदार्थ सेवन केल्यानें शरीर निरोगी राहातें आणि बुद्धि प्रफुल्लीत असून बहुधा सर्व इंद्रियांचे धर्म यथास्थित चालतात. मनुष्याचें आचरण मात्र शुद्ध असलें पाहिजे. आंबट, तिखट अधिक खालल्यानें शरीरांत विकार होऊन प्रकृति स्वाधीन राहात नाहीं, आणखी तेणेंकरून मनासहि व्यग्रता उत्पन्न होती. यावरूनच भरतखंडस्थ वैद्यशास्त्रज्ञांनीं मनुष्याच्या आहाराप्रमाणें त्याच्या स्वभावाचें असें अनुमान केलें आहे. हें अनुमान जरी सर्व गोष्टींत मान्य करवत नाहीं, तरी त्यांत कांहीं खरेपणाचा अंश असावा असें दिसतें.

दूध, तूप, साखर, गूळ व इतर मधूर पदार्थ मिश्रित अन्न खाणारा सत्वगुणी.

मध्यम प्रकारचें अन्न खाणारा (ह्मणजे थोडें आंबट, तिखट आणि गुळचट) रजोगुणी असतो.

अति आंबट, तिखट खाणारा तमोगुणी असतो.

कोणकोणतीं अन्नें किती पौष्टिक आहेत याविषयीं असें अनुमान केलें आहे.

अन्नाद्दशगुणं पिष्टं,
पिष्टाद्दशगुणं पयः,
पयो दशगुणं घृतं,
घृताद्दशगुणं पलं.

यांतील सारांश इतकाच कीं, भातापेक्षां भाकरींत दसपट पौष्टिकपणा आहे; आणखी भाकरीपेक्षां दसपट पौष्टिकपणा दुधांत आहे; आणि त्यापेक्षां दसपट पौष्टिकपणा तुपांत आहे; आणि तुपापेक्षां दसपट मास पौष्टिक आहे.

अन्न दिवसांतून किती वेळ सेवन करावें ? अन्न दिवसांतून चार, तीन, दोन किंवा एक वेळ तरी सेवन केलें पाहिजे. बाळ, वृद्ध, रोगी यांणीं दिवसांतून चार वेळां खावें. जे सशक्त आहेत त्यांणीं तीन किंवा दोन वेळां खावें परंतु एक वेळ खाणें हा केवळ गौण पक्ष आहे. तेणेंकरून मनुष्याच्या प्रकृतीचें मान यथास्थित राहील

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

असें एकाएकीं ह्मणवत नाहीं. फार वेळ उपोषण करणें किंवा घडी घडी खाणें हे दोनहि मार्ग अपकारक आहेत. जें अन्न आपल्या पोटांत जातें त्याचा परिपाक होऊन परिणाम होण्यास सुमारें पांच साहा तास लागतात. आणि एकदां पोटांत गेलेल्या अन्नाचा परिणाम झाल्याशिवाय दुसरें अन्न खाल्लें असतां, जठराग्नि मंद होऊन शरिरांत विकृति होती. कित्येक वैद्यशास्त्रज्ञांचें असें मत आहे कीं, अन्न खाल्यावर किमान पक्ष चार तास तरी जाऊं द्यावे, मग कांहीं खावयाचें असेल तर खावें.

अन्न कोणकोणत्यावेळीं व कसें खावें ? अन्न सकाळीं, दोनप्रहरीं आणि संध्याकाळीं खावें, परंतु अशक्त व रोगी असतील त्यांच्या प्रकृतीच्या मानानें नेमाप्रमाणें द्यावें. सकाळचे प्रहरीं साधारण प्रतीचें अन्न असावें; दोन प्रहरीं जड व पौष्टिक असावें; आणि संध्याकाळीं हलक्या प्रतीचें असावें. एक निपुण अन्नचिकिच्छक फळ खाण्याविषयीं असें म्हणतो :—

सकाळचे प्रहरीं फळाची किंमत सुवर्णासारिखी आहे; आणि दोनप्रहरीं ती रुप्याच्या बरोबरीस येते आणि संध्याकाळीं इतकी उतरून जाते कीं, ती कथिलाप्रमाणें होती. यांतील सारांश इतकाच कीं, सकाळचे प्रहरीं फळ खाल्लें असतां त्यापासून शरीरास अधिक गुण होतो. तेंच संध्याकाळीं खाल्लें असतां त्यापासून अधिकोत्तर गुण होत नाहीं.

अन्नाविषयीं विचार करणें कां आवश्यक आहे ? कोणतें अन्न किती खावें व कोणते पदार्थ शरिरास हितावह आहेत व कोणते अपायकारक आहेत याचा विचार करणें मनुष्यमात्रास भाग आहे. कित्येक पदार्थ पौष्टिक व स्वादिष्ट असतात खरे, परंतु ते अंमलकारक असल्यामुळें ते खाल्ले असतां बुद्धीचा नाश होतो. कित्येक केवळ अम्मलकारकच असून ते सेवन केले असतां त्यापासून शरिराचा, बुद्धीचा आणि सद्गुणाचा नाश होतो, ह्मणून असे पदार्थ सेवन करणें मोठें भयावह आहे. यास्तव अन्नाविषयीं विचार करणें सर्वांस उपयोगीं आहे.

ज्ञानप्रसारक-पु. ८, अं. ५ (ऑगस्ट १८५७).

— २ —

अन्नाविषयीं फार काळजी वाहणें योग्य कां नाहीं ? अन्नाविषयीं फारच काळजी वाहणें अशासाठीं योग्य नाहीं कीं, खाण्याचे चांगले पदार्थ मिळविण्याच्या खटपटींत मनुष्याचें मन एकदां गुंतलें, म्हणजे दुसऱ्या चांगल्या विषयाकडे तें लागत नाहीं.

मग त्याच्या अंगीं अधाशीपणा हा दुर्गुण उत्पन्न होतो, नंतर त्याला खाण्यापिण्याशिवाय दुसरें कांहींच सुचत नाहींसें होतें. सर्व प्रकारचीं अन्नें प्राणरक्षणासाठीं आहेत, म्हणून प्रसंगोपात जशीं तीं प्राप्त होतील तशीं ग्रहण करावीं. आपणास अमुकच पदार्थ प्राप्त झाला नाहीं म्हणून, त्याविषयीं काळजी करीत बसूं नये. उंच

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

प्रकारच्या अन्नासाठींच विचार करीत बसणें हें अज्ञानी मनुष्याचें काम आहे. कित्येक पुरातन नामांकित राजे व इतर मनुष्यें जीं केवळ मिष्टान्नें मिळविण्यासाठीं आपला अमोलिक काळ आणि संपत्ति यांचा विध्वंश करून, अपकीर्तीस पात्र झाले, त्यांचीं कांहीं उदाहरणें खालीं लिहितों.

रोम देशाचा बादशाहा क्यालिगुला, हा मिष्टान्नें खाण्यांत एवढा लंपट झाला होता कीं, चांगल्या मेजवान्यांत त्याणें राज्याची धुमाळी करून टाकिली, आणि लाखो रुपये उधळिले; आणखी कधीं कधीं तो असें हलकें काम करीत असे कीं, दरबारी लोकांवर जुलूम करून आपल्यास मेजवान्या करवून घेत असे. त्याविषयीं दुसरी गोष्ट असी सांगतात कीं, भोजनाचे पदार्थ अधिक मोलवान व्हावे म्हणून त्यांत तो मोत्यांचा मसाला करून घालीत असे.

क्लीओपात्रा राणीविषयीं असें सांगतात कीं, तिणें एकवेळ सुमारें पंचवीस लक्षांचे किंमतीचा मोत्यांचा दाणा विरघळून भोजनाबरोबर त्याचा उपयोग केला या गोष्टीच्या खरेपणावर आपल्याच्यानें एकाएकीं विश्वास ठेववत नाहीं, परंतु उधळे, अविचारी व अधाशी लोक कोणत्या वेळीं काय करतील आणि काय न करतील याचा भरवसा नसतो.

दुसरा एक राजा होता त्यानें आपलें आयुष्य ख्यालीखुशालींत घालवावें. त्याविषयीं असें सांगतात कीं, एके दिवशीं एका कोळयानें उत्तम प्रकारचे मासे भरून आणिले असतां राजानें त्यास ५००० रुपये बक्षिस दिले, आणखी ते स्वयंपाक्याच्या स्वाधीन केले. परंतु स्वयंपाक्याकडून त्यांचा पदार्थ यथास्थित झाला नाहीं ह्मणून त्याचा शिरच्छेद केला. ही कल्पित गोष्ट आहे असा भास होतो. परंतु जुलुमी राजाकडून अशा गोष्टी घडून आल्या ह्मणून नवल नाहीं.

अधाशी लोक अल्पायुषी, रोगी, निर्बुद्ध आणि बहुधा अनाचारी असतात. युनानी देशांत पुरातन काळीं एक राजा होता तो अतिशय खादाड होता. तो अनेक तऱ्हेचीं मिष्टान्नें नेहमी तयार करवून ठेववीत असे, आणि घडी घडी जाऊन तीं खात असे. एकादा पदार्थ त्याला फारच आवडला असला ह्मणजे तो अतिशय खात असे. आणखी तो पदार्थ सगळा आपल्या पोटांत जावा ह्मणून एक वेळ तो खाऊन वांती करून टाकी आणखी पुनः खात असे. याप्रमाणें तो दिवसांतून दोनचार वेळीं वांती करून पोटांत गेलेला पदार्थ बाहेर टाकी. असा त्याचा दुष्ट स्वभाव असे.

अन्न किती सेवन करावें ? जसजसी ज्याची प्रकृति असेल त्या त्याप्रमाणें त्याणें नेमानें अन्न सेवीत जावें. तें फार अधिक असूं नये किंवा फार कमी असूं नये. थोडी भूक ठेवून कोणतेंहि अन्न सेवन करावें. परंतु अधिक कधींहि सेवन करूं नये. सारांश,

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

मनुष्यानें नेहमी मिताहारी असावें. मिताहार करणारे लोक बहुधा दीर्घायुषी, निरोगी आणखी हुशार असतात.एक विद्वान इंग्रज मिताहार करण्याविषयीं असा उपदेश करतो. " हे सुज्ञ जेवणाऱ्या, जेवायास बसला असतां पोटास भूक ठेवून ऊठ, म्हणजे भूक नाहीं असें तुला कधींहि होणार नाहीं. " हा त्याचा उपदेश ग्राह्य आहे. आपण नेहमी पाहातों कीं, कित्येक स्त्रिया, मुलें पुष्ट व्हावीं ह्मणून, त्यांस एकदम पुष्कळ अन्न भरवितात. त्यांचा समज असा असतो कीं, मुलांच्या पोटाची टिमकी मोठी दिसली, म्हणजे तीं बळकट झालीं. अशा अविचाराखालीं मुलांस पुष्कळ अन्न खाववून त्यांस अशक्त, रोगी, किंबहुना अल्पायुषीहि करितात. कित्येक लोक भोजनसमारंभांत गेले असतां मिष्टान्नें मिळालीं म्हणजे अविचारानें सुमार नपाहतां पुष्कळ खातात, परंतु तेणेंकरून ते आपली फारच नासाडी करून घेतात. जरी त्यापासून लागलाच उपद्रव झाला नाहीं, तरी हळुहळु प्रकृतीचा पाया शिथिल होतो. दुसरें, कित्येक लोकांविषयीं असें ऐकण्यांत येतें, कीं कोठेंहि समाराधनेस जेवायास जायाचें असलें तर, पूर्वदिवशीं उपोशण करितात, कीं जेणेंकरून पोटांत मिष्टान्नाचा पुष्कळ समावेश व्हावा. परंतु हा किती मूर्खपणा आहे, कीं पूर्वदिवशीं उपोषण करून ते आपल्या शरिराचा बिघाड करून घेतात. जसें पुष्कळ खाणें अपकारक आहे, तसेंच फार वेळ उपोषण करणेंहि अपकारक आहे. स्वदेशहितेच्छूमध्यें मिताहाराविषयीं कांहीं दिवसांवर कविता छापली होती ती एथें उतरून घेतों.

मिताहार

॥ श्लोक ॥ जिवा अन्न तारी, जिवा अन्न मारी ॥
॥ बहू सेविल्या अन्न होतें विकारी ॥
॥ असें अन्न तें अल्प सेवीत जावें ॥
॥ निरोगी शरीरास होवोनि राहावें ॥ १ ॥

॥ गीति ॥ अधिकाशन केल्यानें अजीर्ण होवोनि रोग भरताती ॥
उदरादिक हे मोठे जडुनि रोग भरताती ॥ २ ॥

॥ श्लोक ॥ अजीर्णाच्या योगें खरुज खवडे ताप जडती ॥
फुगोनीया पोटी दुखुनि अति ते भूमिं पडती ॥
किती ते प्राणाला मुकति पाहाती सर्व नयनीं ॥
अजीर्णाच्या योगें नयच निद्रा त्या [त्यांसि] शयनीं ॥ ३ ॥

॥ छंद ॥ अल्प अन्न भक्षिल्या अलस्य सिघ्र मोडतो ॥
मितअन्न सेविल्या तपादि योग जोडतो ॥
मित अन्न भक्षिल्यास रोग होइना कधीं ॥
ह्मणोनि प्रार्थनेस मान्य मित्रहो करा अधीं ॥ ४ ॥

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

॥ गीति ॥ ईश्वरप्राप्तीलागीं जपतपसाधन करावया पहिलें ॥
गीतेंतहि कथिलें श्रीव्यासें युक्तअहार हें वहिलें ॥ ५ ॥

लिहितात वैद्यशास्त्री ताजें आणि अन्न भक्षणें थोडें ॥
तेणें रोग पराजय होउनि शरिरास बहु बळ जोडे ॥ ६ ॥

योग साधण्याला मित अहार हीच अर्गळा आहे ॥
युक्त अहार असे ज्या त्यालागीं समाधीसुख लाहो ॥ ७ ॥

एका शहरांत एक मिताहारी आणि व्यवहारदक्ष आणि सधन गृहस्थ राहत असून त्याचें मोठें कुटुंब होतें; त्याची संपत्ति आणि संतति एकसारखी वृद्धिंगत होत असे. हें पाहून एका वैद्यानें असा विचार केला कीं, त्याच्या शेजारीं जाऊन आपण राहिलों असतां आपणास पुष्कळ द्रव्य सांपडेल. अशी कल्पना काढून तो त्या सधन गृहस्थाच्या शेजारीं भाड्यानें घर घेऊन राहिला, आणि प्रति दिवशीं वाट पाहात असे, कीं त्या श्रीमंत गृहस्थाकडून आपणास बलावणें येईल. परंतु वर्षसाहा महिने लोटले तरी त्याची कोणी विचारपूस केली नाहीं, तेव्हां तो वैद्य चकित होऊन लोकांस पुसूं लागला कीं, या गृहस्थास आज एक वर्षामध्यें एक दिवस तरी वैद्याची गरज पडली नाहीं हें काय ? तेव्हां त्याणें सांगितलें कीं तो स्वतः मिताहारी असून त्याणें आपल्या कुटुंबांतील सर्व मनुष्यांच्या खाण्यापिण्याविषयीं फार बंदोबस्त ठेविला आहे, म्हणून त्याच्या घरांत कोणी आजारी पडत नाहीं. असें ऐकतांच तो वैद्य आपल्या गांवीं निघून गेला. मिताहारापासून असे लाभ होतात.

अन्न कशासाठीं सेवन करावें ? शरीरांत शक्ति उत्पन्न होऊन आपल्या आयुष्याची वृद्धि व्हावी आणि तेणेंकरून चिरकाळपर्यंत ईश्वराचें गौरव प्रगट करण्यास आपण समर्थ व्हावें म्हणून नेमलेल्या वेळीं अन्न सेवन करावें. सारांश, जें जें आपण करितों, तें तें ईश्वराचें वैभव दाखिवण्यासाठीं करावें. केवळ शरीर पुष्ट असण्यासाठीं जो अनेक तऱ्हांचीं मिष्टान्नें खातो, तो ईश्वरी देणगीचा विपरीत उपयोग करितो असें समजावें. जसजशीं मनुष्यास इहलोकीं सुखें प्राप्त होतील, तसतसा त्याणें त्याजविषयीं दूरदृष्टीनें विचार केला पाहिजे. जीं सुखें आपणास प्राप्त होतील त्यांचा हिसा दुसऱ्यासहि दिल्हा पाहिजे. आपण बळकट असला तर त्याणें आपलें बळ लोककल्याणार्थ लावावें. तसेंच आपलें द्रव्य, ज्ञान, यांचा आपण उपभोग घेऊन त्यांचा कांहीं अंश दुसऱ्यांच्या कल्याणाकडे लावावा, म्हणजे आपल्या जीवित्वाचें सार्थक होतें. मनुष्यानें खाण्यापिण्यासाठीं आणि खशालीखुशाली भोगण्यासाठींच चिरकाळ वांचावें अशी कदापि इच्छा धरूं नये.

मनुष्यानें खाण्यापिण्याची आणि धनाची फार काळजी वाहूं नये, ह्मणून एक विचारी पुरुष याप्रमाणें प्रार्थना करितो :—

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

॥ पोटीं इंद्रीयपोषणाची ॥
॥ इच्छा मोठी धनवानाची ॥
॥ व्यर्थ ह्या जन्मासी आलों ॥
॥ ऐसें वाटे देवाधिदेवा रे ॥

एके दिवशीं डाक्तर गोल्डस्मिथ आणि डाक्तर जानसन ह्या दोघां महापंडितांची जेवणावर गांठ पडली. तेव्हां अनेक तऱ्हेचीं मिष्टान्नें वाढलेलीं पाहून डाक्तर गोल्डस्मिथ याणें असा पूर्वपक्ष केला. लोकांमध्यें अनेक तऱ्हेचीं अन्नें खाण्याची रुढी पडल्यामुळें, ते ख्यालीखुशाली करूं लागतात, आणि प्रपंचसुखांतच निमग्न होतात; यास्तव भोजनाचे पदार्थ जेवढे साधे आणि थोडे असतील तेवढें बरें.

त्यास डाक्तर जानसन यानें असें उत्तर दिलें. महाराज, आपण सांगतां ती गोष्ट माझ्यानें कबूल करवत नाहीं; कारण मला तर असें वाटतें कीं, भोजनाच्या पदार्थांची वृद्धि झाल्यामुळें लोक सुधारत चालून त्यांमध्यें उद्योगाची इच्छा उत्पन्न झाली. आणखी सर्व प्रतीच्या लोकांस कमजास्त अशीं सुखें प्राप्त होऊं लागलीं. ज्या वेळीं लोक रानटी स्थितींत होते त्या वेळीं आपआपल्या पुरतें कोणतेंहि एकादें अन्न मिळवून त्यावर आपला निर्वाह चालवीत असत तेणेंकरून इतर लोकांचें फारसें कल्याण होत नसे. परंतु आतां भोजनाच्या पदार्थांची व मिष्टान्नांची वृद्धि झाल्यामुळें व्यापाराची वृद्धि होऊन जिकडे तिकडे ज्ञानाचा प्रसार होऊं लागला.

आतां मिष्टान्नें मिळूं लागल्यापासून लोक ख्यालीखुशाली होऊन प्रपंचांत निमग्न होतात, आणि त्यांचीं मनें बहुतकरून परमार्थाकडे लागत नाहींत असें जें आपलें ह्मणणें आहे, त्याविषयीं माझें मत असें आहे. पाहा, मिष्टान्न खाणारे लोक किती थोडे आहेत. लष्करी शिपाई व शेतकरी, आणि गरीब व मध्यम प्रतीचे लोक बहुधा साधारण प्रतीचें अन्न खाणारे आहेत केवळ श्रीमंत आहेत ते मात्र पक्वान्नें व मिष्टान्नें वारंवार सेवन करितात आणखी श्रीमंत लोकांमध्यें असे पदार्थ खपतात म्हणून दुसऱ्या लोकांस उद्योग सांपडतो, आणि पदार्थ उत्पन्न करण्यासाठीं ते लोक झटतात. आतां लोकांचीं मनें परमार्थाकडे लागणें किंवा न लागणें हा गुण पदार्थांचा नाहीं, तो त्यांच्या मनाचा कल आहे. वस्तुतः ह्मटलें तर जेवढीं जेवढीं मनुष्यास सुखें प्राप्त होतील तेवढें तेवढें त्यास ईश्वराचें स्मरण अधिक व्हावें, आणि परमार्थाकडेस त्याची दृष्टि पोहोंचावी हा ईश्वरी संकेत आहे यावर त्या दोघां पंडितांचें जें भाषण झालें तें सर्व एका ग्रंथांत सुंदर रीतीनें लिहिलें आहे. त्यांतील तात्पर्य मात्र मीं येथें सांगितलें आहे.

ज्ञानप्रसारक-पु. ८, अं. ७ (अक्टोबर १८५७).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

३

मनुष्याचें आच्छादन *

गृहस्थहो,

आज रात्रौ आपणास वस्त्र किंवा मनुष्याचें आच्छादन या विषयावर कांहीं विचार करावयाचा, तर प्रथम वस्त्र हा शब्द कसा उत्पन्न झाला याचा शोध करणें आपणास आवश्यक आहे. पाहा, वस या धातूपासून वासन (वस्त्र) हा शब्द झाला; त्याचा साधारण अर्थ आच्छादन असा होतो, मग तें वृक्षांच्या सालींचें, झाडांच्या पानांचें, किंवा विणलेल्या कापडाचें, किंवा पशूचें कातडें असो. परंतु सध्याच्या मानाप्रमाणें वस्त्र या शब्दापासून असा बोध होतो कीं, कापसाच्या सुतापासून, सणापासून, रेशिमापासून, लोंकरीपासून किंवा कलाबतूपासून विणून तयार केलेलें कापड.

वासन हा शब्द जरी बहुधा आपल्या परिपाठांतला नाहीं, तरी साळी आणि कापडाचे व्यापारी कानडे लोक वगैरे कापडाच्या घड्या गुंडाळायचें जें वस्त्र त्यास वासन असें म्हणतात.

विणून तयार केलेलें वस्त्र परिधान करण्याचे पूर्वी, म्हणजे जेव्हां लोक रानटी स्थितींत होते तेव्हां, मनुष्यें झाडाचीं पानें, साली, जनावरांचीं कातडीं, यांहीं करून आपली काया आच्छादीत असत, याविषयीं आपणास पुष्कळ प्रमाणें सांपडतात. पुराणांतरीं ऋषींविषयीं वर्णन लिहिलेलें आहे त्यांत ते वल्कलें धारण करीत असत असें लिहिलेलें आहे. वल्कलें हीं झाडांच्या सालींचीं आच्छादनें आहेत. कित्येक वृक्षांच्या साली चिवट असून जाळ्यासारिख्या विणलेल्या असतात. केवण, शिंवण, कुंभा, या वृक्षांच्या साली फार चिवट आणि नरम असतात, तसेंच केळीचीं सोपें हीं झाडाच्या साली आहेत.

---

* ज्ञानप्रसारक सभेपुढें दिलेलें व्याख्यान.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

त्या वस्त्रांसारिख्या पातळ व विस्तृत असतात. हाटेन्टाट लोकांमध्यें कित्येक वृक्षांच्या आंतील साली काढून त्या पाण्यांत भिजवून, कुटून त्यांचा वस्त्रासारखा उपयोग करीत असत. सुमारें दोन हजार वर्षांमागें इंग्लंड देशांतील लोक जनावरांचीं कातडीं नेसत असत; ही गोष्ट तर इतिहासावरून आह्मास उघड समजती. अमेरिका खंडांतील कित्येक प्रदेशांत व दुसऱ्या खंडांतहि रानटी स्थितींत लोक झाडाच्या डाहाळ्यांकडून आपली काया आच्छादन करीत असत व सध्याहि करितात; महिसूर येथील कित्येक लोक झाडाच्या डाहाळ्यांच्या ताट्या करून अद्याप आपली काया झांकीत असतात, तसेंच कर्नाटक देशांत कित्येक रानवट ठिकाणीं कारगर ह्मणून अति शुद्रांची एक जात आहे. त्या लोकांच्या स्त्रिया निगडीच्या डाहाळ्यांच्या कवड्या (ताट्या) करून त्या कमरेस घट्ट बांधितात. या लोकांविषयीं दुसरा एक वृत्तांत कोणी सांगितला, त्याच्या खरेपणावर आमच्यानें एकाएकीं विश्वास ठेववत नाहीं, परंतु रानटी लोकांमध्यें कित्येक गैरशिस्त आणि दोषयुक्त चाली असतात, याजवरून असाहि कांहीं प्रकार असेल असें वाटतें. त्याणें असें सांगितलें कीं, डाहाळ्याचें आच्छादन बांधून एखादी स्त्री रानांत फिरत असतां जर तें सुटून पडलें तर ती जेथचे तेथेंच उभी राहात्ये, आणि मोठ्यानें तीन कुया (आरोळ्या) घालत्ये, म्हणजे तिच्या नवऱ्यानें येऊन ती ताटी तिच्या कमरेस पुनः बांधावी. जर त्या वेळीं नवरा येऊन पोहोंचला नाहीं, तर जो तिला ती ताटी नेसवील तो तिचा नवरा होतो; ह्मणून या स्त्रियांचे नवरे सर्वकाळ बायकांबरोबर फिरत असतात. भरतखंडांत हल्लीं इतक्या रानटी अवस्थेंत लोक असतील असा एकाएकीं संभव होत नाहीं. परंतु पुष्कळ ठिकाणीं लोकांचा अजून पूर्व दिवसच आहे, याविषयीं आपण संशय धरूं नये.

ही गोष्ट बहुधा खोटी असावी; आणि हें कबूल न करण्यास हें बलवत्तर कारण आहे, कीं जेथें जेथें इंग्रज सरकारचा अंमल चालू झाला आहे तेथें तेथें त्यांणीं बहुतेक ठिकाणांतील दुष्ट चाली मोडून टाकविल्या आहेत. कोलापूर, जेजुरी व दुसऱ्या ठिकाणीं वागणी व खंडोबाच्या नावानें सोडलेल्या स्त्रिया (मुरळ्या) वर्षांतून कित्येक दिवसांत निंबाच्या डाहाळ्यांनीं आपलीं शरीरें आच्छादन करून, कांहीं वर्षांमागें शहरांत भिक्षा मागायास फिरत असत. त्यावरून इंग्रज सरकारनें नवा कायदा काढून या दुष्ट स्त्रियांस शहरांत फिरण्याचा प्रतिबंध करून टाकिला, तेव्हांपासून हें खूळ बरेंच मोडलें.

या ज्या आपण वर इतक्या गोष्टी लिहिल्या त्यांवरून असें सिद्ध होतें कीं, वस्त्रें परिधान करण्याची वहिवाट चालू होण्यापूर्वीं लोक अनेक तऱ्हांच्या वस्तूंकडून आपलीं शरीरें आच्छादन करून मनुष्य आपली लज्जा रक्षण करीत असे. ख्रिस्ती शास्त्राच्या आधारावरूनहि असेंच सिद्ध होतें. कारण आदाम आणि हवा यांस जेव्हां देवानें बागेंतून हाकलून लाविलें, तेव्हां त्यांणीं अंजिराच्या पानांनीं आपली काया आच्छादन केली, असें त्यांत लिहिलें आहे.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

मनुष्याला जसें अन्नाचें अगत्य आहे तसेंच वस्त्राचेंहि आहे, आणि अन्न उत्पन्न करण्यास जसे त्याणें अनेक उपाय आणि युक्ति योजिल्या, तसेच वस्त्रांची योजना करण्यास परिश्रम केले. ज्या वेळीं मनुष्य केवळ रानटी स्थितींत होता त्यावेळीं कंद, मूळ, फळ व श्वापदें खाऊन त्याणें निर्वाह चालविला. मग अनेक तऱ्हांचे अन्नाचे पदार्थ शोधून काढिले. त्याचप्रमाणें रानटी स्थितींत असतांना झाडाचीं पानें, साली व जनावराचीं कातडीं, यांहींकरून आपल्या शरीरास अच्छादन करून जिवाचें रक्षण करून घेतलें, ही गोष्ट आपण नुक्तीच सिद्ध करून दाखविली आहे. रानटी स्थितींत मनुष्याला अन्नवस्त्राशिवाय दुसऱ्या सुखांचे उपभोग घेण्याची इच्छा नव्हती आणि त्या काळीं जे सुखाचे अनेक विषय प्रस्तुत आहेत ते नसल्यामुळें त्यांच्या मनास व्यग्रता नव्हती. ह्मणून त्या काळचे लोक साधे, भोळे असे होते आणि हल्लींच्या लोकांमध्यें जितकें तर्कट, ढोंग, लबाडी, हीं आहेत तितकीं त्यांमध्यें नव्हतीं असें अनुमान होतें.

सृष्टीचा क्रम चालू झाल्यावर पुष्कळ काळानें वस्त्रें विणण्याची कृति मनुष्यानें आपल्या बुद्धीनें काढिली ही गोष्ट, वर जीं प्रमाणें सांगितलीं, त्यावरून सिद्ध होती. परंतु वस्त्रें विणण्याची ही कृति प्रथम कोणी, कशी, आणि कोणत्या ठिकाणीं काढिली याचा बराबर निर्णय अजून कोणत्याच लोकांस झाला नाहीं. परंतु बहुतेक विद्वज्जनांचें असें मत आहे कीं कापसापासून वस्त्र विणण्याची कृति प्रथम आशिया खंडांत उपस्थित झाली, आणि याचे खरेपणाविषयीं बहुत कारणें आहेत. प्रथम, आपले बहुतेक देश समशीतोष्ण कटिबंधाच्या प्रदेशांत असल्यामुळें त्यांत अनेक तऱ्हांच्या वनस्पति होतात. कापसाच्या झाडास जसी माफक हवा असावी तशी असल्यामुळें कापसाचें पीक बहुधा याच खंडांत प्रथम झालें असावें. अमेरिकेंत उत्कृष्ट प्रतीचा कापूस पिकतो खरा, परंतु तेथें कापसाचें बीं येथून गेलें, याचा जरी आपणाच्यानें निर्णय करवत नाहीं, तरी कापसापासून कापड विणण्याची कृति अर्वाचीन आहे असें बहुत गोष्टींवरून सिद्ध होतें. भरतखंडाच्या कित्येक भागांत पूर्वींपासून कापसाची कृति माहीत आहे.

धाका, बनारस, पैठण नागपूर, चंदेर, सासवड, बऱ्हाणपूर, ह्या ठिकाणीं कापसाचीं अमोलिक किंमतीची वस्त्रें होतात. या ठिकाणीं शेले, पागोटीं, दुपेटे, धोतरजोडे, साड्या, असीं अनेक तऱ्हांचीं वस्त्रें विणतात. धाका एथें जीं उंच प्रकारचीं वस्त्रें होतात त्यांवरून कित्येक इंग्रज लोकांनीं भरतखंडस्थ कारागीर लोकांच्या कुशळतेविषयीं आणि चातुर्याविषयीं फारच स्तुति केली आहे. एक विद्वान असें ह्मणतो कीं, "भरतखंडांतील दोन बोटांनीं चातीवर सूत काढण्याची युक्ति वर्णन करावयास योग्य आहे. ते लोक ज्या प्रतीचें सूत पाहिजे त्या प्रतीचें दोन बोटांनीं तयार करितात. कोठें कोठें कोळ्याच्या जाळ्यांत बारीक तंतु असतात तेवढे बारीक सूत काढून ते त्याचें

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

उत्कृष्ट प्रतीचें कापड विणतात. तें कापड इंग्लांड देशांत यंत्रावर तयार केलेल्या मलमलीपेक्षां उत्कृष्ट असून टिकण्यांतहि चांगलें असतें." याविषयीं एका वर्तमानपत्रांत असें लिहिलें आहे :—

"डाका किंवा धक्का या नामें एक शहर कलकत्त्याचे आग्नेय दिशेस आहे, तेथें मलमलीचें कापड उत्तम प्रकारचें होतें. पूर्वी तर इतकी उत्तम प्रकारची मलमली या ठिकाणीं होत असे कीं, असी मलमल पृथ्वींत कोणत्याहि स्थलीं होत नसे. हल्लीं तरी मलमलीचें वस्त्र इतकें बारिक निघतें कीं, तें वस्त्र रात्रौ मैदानांत पसरलें आणि त्याच्यावर दव पडलें तर तें वस्त्र दिसत नाहीं. मलमलीचीं वस्त्रें विलायत आदिकरून देशांत होतात; परंतु तीं डाका येथील मलमलीच्या वस्त्रांपेक्षां निरस सर्व प्रकारें आहेत." याविषयीं डाका येथील एका इंग्रजी वर्तमानपत्रांत एका मडमेनें तथ्य लिहिलें आहे, त्यांतील उतारा अबझरवरावरून घेतला आहे तो येणेंप्रमाणें :—

"जर विलायतेची मलमल आणि हिंदुस्थानांतील मलमल यांची तुलना केली तर हिंदुस्थानाची मलमल फार स्वस्त आहे, आणखी हिंदुस्थानची मलमल उत्तम प्रतीची असून ताठ व कणखर इतकी आहे कीं कोणी जर त्या वस्त्रांत पाय दिला तरी ती फाटत नाहीं. विलायतची मलमल पाय देतांच फाटती आणि याखेरीज ती एक वेळां धुतली, कीं ती नेसायाच्या उपयोगी नाहीं. हिंदुस्थानची बहुत वेळां धुवून वापरण्यास कांहीं हरकत नाहीं. मी एका कापडाच्या दुकानदारास विचारिलें कीं, जी डाका येथें २ रुपये गजास मलमल मिळती ती काय दरानें विकसील? तेव्हां त्यानें सांगितलें कीं, ५ रुपये गजाप्रमाणें विकीन.

आम्ही विलायतेस १००० रुपयांवर तऱ्हेतऱ्हेचे व काश्मिरचे कशिदा काढलेले रुमाल व झगे करण्यालायक कापड पाठविलें, तिकडील गिऱ्हाईकास हा माल इतका पसंद व स्वस्त वाटला आहे कीं, ते लोक आनंदानें आम्हांवर फरमास करितात; हा एक लहानसा व्यापार झाला आहे; आतां जर कोणी याचा व्यापार करील तर त्यास खरोखर किफायत होईल."

दुसरा एक विद्वान इंग्रज आपल्या ग्रंथांत असें लिहितो कीं, रोम शहरांत पूर्वी कापसाचीं वस्त्रें ह्या खंडांतून जात असत.

सन १८१४ मध्यें रेकार्ड नावाच्या एका इंग्रजानें पार्लमेंट सभेपुढें भरतखंडांतील उत्पन्नाविषयीं व तेथील लोकांचे उद्योग व कुशलता यांविषयीं साक्षी दिली, त्या वेळीं त्यानें कापसापासून सूत काढण्याच्या व कापड विणण्याच्या युक्तीचें वर्णन केलें आहे. त्यांत तो त्यांची योग्य स्तुति करितो. त्यांची सूत काढण्याची सफाई इतकी वर्णनीय

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आहे कीं, वायूचे तंतूंसारिखें तें बारीक असतें, म्हणून त्याजपासून जें वस्त्र होतें तें अति उत्कृष्ट असतें. त्या वस्त्रास त्याणें इंग्रजीमध्यें "विंड वव्हन क्लाथ" असें नाव दिलें आहे, म्हणजे वायूच्या तंतूचें वस्त्र.

भरतखंडांतील साळवी लोकांविषयीं तो असें ह्मणतो कीं, जरी त्या लोकांमध्यें मोठमोठालीं यंत्रें किंवा युरोपांत किंवा अमेरिकेंत जसे वस्त्रें विणण्याचे मोठमोठे कारखाने आहेत, तसे जरी तेथें नाहींत, तरी ते लोक आपलीं साधीं आवतें घेऊन झाडाखालीं, शेतांत किंवा आपल्या झोपडींत माग लावून इतकें सफाईदार वस्त्र विणतात, कीं कांहीं अंशीं ते आमच्या यंत्रांतून तयार केल्या वस्त्रास मागे पाडतील.

यावरून एथें मला कांहीं वर्षांमागे एका गृहस्थानें गोष्ट सांगितली होती तिची आठवण पडत्ये. त्याणें असें सांगितलें कीं पेशव्यांच्या कारकीर्दींत पैठणाहून एका साळ्यानें तीन हात रुंद आणि बारा हात लांब असा एक उत्कृष्ट प्रतीचा धोतरजोडा आणून पेशव्यास नजर केला. तो इतका बारीक होता कीं, त्यानें त्याचें एक शेवट हातीं धरून जसें यंत्रांतून ओढून काढतात त्याप्रमाणें हरभऱ्याच्या टरफलांतून दुसरें शेवट ओढून काढलें. एवढी त्याची खुमास, बारीक व नाजूक होती. यांत फारच अतिशयोक्ति आहे असें वाटतें. जसें त्या इंग्रजानें वायूच्या तंतूचें विणलेलें वस्त्र असें रूपक योजिलें आहे तसेंच लाक्षणिक भाषेंत पैठणांतील धोतरजोड्याचें कोणी ब्राह्मणानें वर्णन केलें असावें.

जरी या स्थळीं या विषयाचें उद्घाटन करण्याचा प्रसंग नाहीं तरी कारण-परत्वें कांहीं तरी बोलणें भाग आहे ह्मणून बोलतों. पाहा, जरी भरत-खंडांत पुरातन काळापासून उत्कृष्ट प्रतीचे कारागीर आहेत तरी ते बहुधा दरिद्रानें व्यापलेले आहेत. साळवी असो, तांबट असो अथवा हरएक दुसरा कोणताहि कारागीर असो, तो फार करून उत्पन्नभक्षीय असतो. म्हटलें असतां इंग्लंड देशांत वस्त्रें विणण्याची कृति अर्वाचीन आहे. सुमारें पांचशें सातशें वर्षांपासून ते वस्त्रें विणायास लागले. त्यांमध्यें वस्त्र विणण्याचीं यंत्रें व कारखानें सुरू होऊनहि फारशीं वर्षें झालीं नाहींत. परंतु इतक्या काळांत तेथील कारागीर लोक सधन व सुखी झाले आहेत आणि एक एक, दोन दोन, च्यार च्यार असे वस्त्राचे कारखानें चालवितो. आतां आमच्या लोकांचा आणि त्या लोकांचा हा विपरीत प्रकार होण्याचीं कारणें उघड आहेत. त्या लोकांमध्यें व्यवहारचातुर्य, दुसऱ्यांमध्यें ज्ञानाचा प्रसार करण्याची हौस, नव्या नव्या युक्ति शोधून काढण्याचा उल्हास, व दूरदृष्टी सतत वसत असतात. आमच्या लोकांच्या सर्व गोष्टींमध्यें कृपणपणा. एखाद्यास एखादी विद्या प्राप्त झाली असली तर तो दुसऱ्यास ती कल्पांतीं सांगायाचा नाहीं आणि स्वतःहि ती वाढवायाचा नाहीं. जेवढें आपल्यास माहीत आहे तेवढ्यावरच तृप्त असतो. यामुळेंच आमचे कारागीर लोक गरीब असतात.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

एक इंग्रज असें अनुमान करितो कीं, चीन देशांतहि कापसाचें बीं भरतखंडांतून गेलें असावें. आणि कापसापासून कापड विणण्याची ही कृति त्यांजमध्यें सुमारें हजार वर्षांपासून सुरू झाली असावी. कारण असा लेख सांपडतो कीं, ज्या वेळीं ओटु नामक चीन देशाच्या बादशाहास राज्याभिषेक झाला त्यावेळीं सुती वस्त्रें हीं उंच प्रतीचीं असें मानून बादशाहानें परिधान केलीं होतीं. यावरून स्पष्ट दिसतें कीं, त्यांमध्यें त्या काळीं कापसाचीं वस्त्रें विणण्याची कृति माहीत नव्हती.

इतर सर्व वस्त्रांपेक्षां कापसाचें वस्त्र अधिक खपतें. सर्व पृथ्वीवर सुमारें १/७ कापसाचें कापड खपतें. तें अति थंड, ऊष्ण, आणि समशीतोष्ण देशांतहि सारखेंच उपयोगी पडतें. कापसाच्या अंगीं असा गुण आहे कीं त्याचें हवें तसें सूत काढितां येतें. ग्रीष्मऋतूंत बारीक वस्त्र परिधान केल्यानें शरिरास समाधान होतें आणि शरद-ऋतूंत जाडें वस्त्र परिधान केल्यानें शरिरांत उष्णता येऊन थंडीचें निवारण होतें. सम-शीतोष्ण हवेंत दोनहि प्रकारचीं वस्त्रें परिधान केलीं असतां शरिरास समाधान होतें. असा हा कापूस अमोलिक आहे. आमच्या ह्मणण्याचा प्रघात असा आहे कीं, अमुक कपडे थंड आणि अमुक उष्ण आहेत, परंतु कापड उष्ण आणि थंड असें नाहीं. उष्णता आणि थंडी शरीरांत येण्याचीं कारणें निराळींच आहेत.

वस्त्रें वनस्पतीपासून, पशूंपासून, किड्यांपासून आणि धातूपासून होतात. तीं पांच प्रकारचीं आहेत.

१. कापसाचें सूत काढून विणून तयार केलेलीं वस्त्रें, यांस सुती वस्त्रें म्हणतात. संस्कृतांत त्यांस कारपास वस्त्रें असें ह्मणतात.

२. ताग, आंबाडी, यांच्या सालीचे तंतु काढून विणून तयार केलेलीं वस्त्रें, यांस तागाचीं वस्त्रें असें ह्मणतात. त्यांस संस्कृतांत सण वस्त्र ह्मणतात.

३. मेंढा व कित्येक जनावरांच्या लोंकरीपासून जीं वस्त्रें करितात त्यांस लोंकरीचीं वस्त्रें ह्मणतात. संस्कृतांत त्यांस उर्णा वस्त्रें असें ह्मणतात.

४. एक जातीचे किडे आहेत ज्यांस पतंग असें ह्मणतात, ते बारीक रेशिमाचे तंतु काढितात, त्या तंतूंचें विणून तयार केलेलें जें वस्त्र त्यास रेशिमी वस्त्र ह्मणतात. त्यास संस्कृतांत कौशवस्त्र असें ह्मणतात.

५. सोनें, रुपें, तांबें, यांच्या तारी काढून जें वस्त्र तयार करितात त्यास जरीचें वस्त्र ह्मणतात.

वर जीं पांच प्रकारचीं वस्त्रें सांगितलीं त्यांत तागाचें वस्त्र हें प्रथम सुरू झालें असावें असें अनुमान होतें. कारण झाडाच्या सालींचे तंतु पाहून ते विणून त्यांचें कांहीं वस्त्र करावें अशी कल्पना मनांत प्रथम आली असावी. तागापासून गोणपटासारिखीं

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

जाडीं वस्त्रें होतात तशींच बारीक मलमलीसारिखीं उंच वस्त्रेंहि होतात. युरोप खंडांत व अमेरिकेंत तागापासून जशीं सफाईदार व अमोलिक किंमतीचीं वस्त्रें होतात तशीं पृथ्वीवर दुसरे कोठेंच होत नाहींत.

सणाचीं वस्त्रें विणूं लागल्यानंतर हळूहळू लोंकरीचीं वस्त्रें विणण्याची कृति सुरूं झाली असावी. पुराणांतरीं ऊर्णा वस्त्राचें वर्णन केलें आहे त्यावरून हीं वस्त्रें पुरातन काळापासून आपल्या खंडांत माहीत आहेत असें वाटतें. काश्मीर, अमृतसर एथें उत्कृष्ट प्रतीच्या उंच किमतीच्या शाली होतात, तशा पृथ्वीच्या पाठीवर कोठेंच होत नाहींत असें ह्मटल्यास चिंता नाहीं. असें सांगतात कीं, एकएक उंच प्रतीची शाल विणून तयार करण्यास २, ३ वर्षें लागतात. अशा तयार केलेल्या शालीस पांच-सहा हजार रुपये पडतात. कित्येक जुन्या काश्मिरी शाली इतक्या सफाईदार व नाजूक असतात कीं, त्या अंगावर घेतल्या असतां फुलासारिख्या हलक्या लागतात.

बनात, पट्टु व दुसऱ्या जातीचीं ऊर्णावस्त्रें युरोपखंडांत उत्कृष्ट प्रतीचीं होतात. इंग्लांड देशांत जशी उंच प्रतीची बनात होते तसी कोणत्याच खंडात होत नाहीं. तेथें शालीहि होतात परंतु त्या काश्मिरी शालीसारिख्या उंच किंमतीच्या सफाईदार नसतात. इंग्लांडाहून लाखो रुपयांचीं अनेक तऱ्हांचीं लोंकरीचीं वस्त्रें भरतखंडांत व दुसऱ्या देशांत येतात.

ऊर्णावस्त्राची युक्ति निघाल्यावर रेशिमांपासून वस्त्रें करण्याची युक्ति निघाली असावी आणि ज्या पुरुषानें ही युक्ति शोधून काढिली त्याणें मनुष्यजातीवर फारच उपकार केले. लोंकरीच्या तंतूंचीं वस्त्रें विणलेलीं पाहून दुसरीं अनेक तऱ्हांचीं वस्त्रें विणण्याची कृति काढिली असावी असा संभव होतो. रेशीम हे एका जातीच्या किड्यानीं तयार केलेले तंतु आहेत. आतां याचें वस्त्र करण्याची कल्पना प्रथम कोणी कशी काढिली याचा कांहीं शोध लागत नाहीं. परंतु पुराणांतरीं अनेक तऱ्हांचीं पितांबरें त्याकाळीं होतीं असें वर्णन केलें आहे त्यावरून रेशिमी वस्त्र पूर्वींपासून भरतखंडांत माहीत होतें असें सिद्ध होतें.

चीन देशांत रेशीम फार उत्पन्न होतें व रेशिमाची उंच प्रतीचीं वस्त्रें विणण्याची कृति त्यामध्यें प्राचीन काळापासून आहे. यावरून असें एक अनुमान होतें कीं, किड्यांपासून रेशीम उत्पन्न करण्याची युक्ति त्याणींच प्रथम काढली असावी. बहुधा चिनाहून रेशीम इतर खंडांत जातें हें एक त्यास सबळ कारण दिसतें आणि दुसरें, जरी भरतखंडांत अनेक तऱ्हांचीं उंची रेशमी वस्त्रें विणतात तरी त्यांस चिनी लोकांसारखीं सफाईदार करतां येत नाहींत. किनखाप, मखमल, साटीन असीं उंच वस्त्रें चीन देशांत होतात. हाल्लीं युरोप खंडाच्या कित्येक भागांतहि रेशमी वस्त्रें उत्कृष्ट प्रतीचीं विणतात. परंतु रेशमी वस्त्र म्हटलें म्हणजे चीन देशांतच चांगलें होतें.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

पाहा, मनुष्यास विचार करण्यास ईश्वरानें किती साधनें करून ठेविलीं आहेत. पतंगासारिखे किडे ज्यांजकडे पाहावयास देखील आपण विट मानतों त्यांजपासून अशीं अमोलिक वस्त्रें होतात कीं, मोठमोठाले राजे तीं परिधान करण्याची इच्छा बाळगतात. जर इतक्या निरुपयोगी मानलेल्या किड्यापासून इतका उपयोग होतो, तर अमोलिक देह धारण करणाऱ्या मनुष्यापासून परस्परांचें किती हित व्हावें ?

सर्व वस्त्राच्या शेवटीं कापसापासून वस्त्र विणण्याची कृति एशिया खंडांत प्रथम निघाली असावी असें आम्ही पूर्वीं सुचविलेंच आहे. आतां वर जे वस्त्र करण्याचे तीन प्रकार सांगितले त्यांच्या शेवटीं कापसापासून वस्त्र विणण्याची कृति निघाली असावी, असें म्हणण्यास पुष्कळ कारणें आहेत. तीं हीं कीं, प्रथम कापूस वाळवून तो स्वच्छ करून त्याच्या शिरक्या काढिल्या पाहिजेत; नंतर तो पिंजारून त्याच्या वळकट्या करून चातीवर किंवा राहाटावर सुत कांतलें पाहिजे; नंतर माग लावून त्याचें वस्त्र विणतात. यावरून कापसापासून वस्त्र तयार करायाची युक्ति मनांत येण्यास फार उशीर लागला असेल असें वाटतें. जशी कापसापासून वस्त्र विणण्यास खटपट करावी लागती, तसीच ताग, लोंकर व रेशीम, या वस्तूंचीं वस्त्रें करायास करावी पडती. परंतु यांत तात्पर्य इतकेंच कीं, लोंकर, रेशीम, ताग वगैरेचे तंतु स्वतःसिद्ध असून स्वदृष्टीस पडतात, तसे कापसाचे दिसत नाहींत; म्हणून कापसापासून वस्त्र विणण्याची कृति शेवटीं निघाली असावी असें अनुमान केलें आहे. पाहा, लोंकरीचें वस्त्र करायाचें असलें तर ती प्रथम जनावराच्या पाठीवरून कापून काढिली पाहिजे, मग धुवून स्वच्छ केली पाहिजे, मग तिच्या दोऱ्या काढून ती विणली पाहिजे. सारांश, सर्व प्रकारचीं सुखें प्राप्त करून घेण्यास उद्योग प्रधान आहे.

कलाबतूचीं वस्त्रें, झाडापासून, किड्यापासून आणि पशूंपासून वस्त्रें करण्याची कृति साधल्यावर मनुष्यास असी कल्पना आली असावी कीं, आतां सोनें रुपें या धातुपासून वस्त्रें करण्यास येतील कीं, नाहीं; असा तर्क बांधून त्याणीं या धातूचे पत्रे पाडून त्यांचा कलाबतु करून त्याचीं वस्त्रें केलीं. कलाबतु सोन्यारुप्याचे तंतु काढून करितात खरा, परंतु रेशिमास गुंडाळून त्याची तार करावी पडती, आणखी मग त्याचा कापडास उपयोग होतो. कलाबतूचें स्वतंत्र वस्त्र बहुशा करीत नाहींत. तो शालींस, पागोट्यांस, साड्यांस, शेल्यांस, दुपेट्यांस व दुसऱ्या उंच्या वस्त्रांस कांठ, बुट्टे, पदर करायास उपयोगी पडतो. जरीचीं उंचीं वस्त्रें भरतखंडांत फार होतात, तशीं इतर ठिकाणीं होत नाहींत. चीन देशांत अनेक तऱ्हांचे किनखाप होतात. कोठे कोठे कलाबतूचें वस्त्र करितात, त्यास तास किंवा भरजरी किनखाप असें म्हणतात. जरी कलाबतूचीं अशीं वस्त्रें होतात तरी त्यांत पुष्कळ रेशीम मिश्रित करावें पडतें. असीं वस्त्रें राजे, व श्रीमान् लोक यांचें वैभव दाखविण्यास मात्र उपयोगी; या वस्त्रांकडून इतर वस्त्रांसारिखे मनुष्यास लाभ होत नाहींत. कलाबतूची वस्त्रें भारी असून उंच किंमतीचीं

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

असतात, व त्यांजकडून मनुष्याचें थंडीपासून रक्षण होत नाहीं, व तीं परिधान केलीं असतां शरिरास सुखावह आहेत असेंहि नाहीं. इतकेंच कीं, त्यांपासून शोभा मात्र येती. लोखंड, तांबें, या धातूंचा देखील कलाबतु करितात. मनुष्यानें आपला तर्क चालविण्यास कोणत्याच गोष्टींत बाकी ठेविली नाहीं, परंतु अजून त्याला ईश्वराच्या कृत्यांचा थांवा कोठें लागतो. पदोपदीं त्यास असें ह्मणणें प्राप्त होतें, कीं हे ईश्वरा, तुझी लीला अगाध आहे.

वस्त्र मनुष्याचें, उनापासून, थंडीपासून, आणि हवेपासून रक्षण करतें, इतकेंच नाहीं, तर त्यापासून त्यास सुख होऊन भूषण येतें आणि त्याची लज्जा रक्षण होते. यास्तव जेव्हां आह्मास परिधान करायास आपल्या शक्त्यनुसार, बारीक, जाडें, भरडें, वस्त्र सांपडतें, तेव्हां आपण त्याची अनन्यभावेंकरून स्तुति करावी.

मनुष्याचा पोशाक प्रारंभीं कसा होता आणि सध्या त्यांत किती फेरफार झाला आहे याचा विचार करूं या. प्रारंभीं सरासरी लंगोटी नेसून व कांबळा पांघरून निर्वाह करायास लागले. मग हळूहळू पांच साहा हात वस्त्राचा तुकडा कंबरेसभोंवता गुंडाळूं लागले. ही चाल करनाटक व इतर देशांत प्रस्तुत चालू आहे. तेथील लोक पांच हात धोतर नेसतात, त्यास मुंड असें म्हणतात. कम्बरेचें आछादन झाल्यानंतर, डोकीस कांहीं तरी असावें असा मनास भास झाला असावा; त्यावेळीं पहिल्यानें डोकीस रुमाल किंवा फेटा गुंडाळायाची चाल सुरु केली. रुमाल झाल्यानंतर मग हळूहळू पागोटें, आंगरखे, धोतरजोडे, असीं अनेक तऱ्हांचीं वस्त्रें तयार करूं लागले. बारा हात धोतरजोडे, नंवद हात पागोटी, वीस हात घेराचा आंगरखा, कंगणीदार पागोट्या बांधण्याची कृति, हीं अलीकडेसच चालू झालीं. पूर्वीं लोक केवळ साध्या व तीसचाळीस हात लांब पागोट्या बांधीत असत. पाहा, गोमंतकाकडील व मारवाडी लोकांचीं पागोटीं बांधण्याची कृति किती साधी आहे; आणि आपल्या लोकांची पागोट्या बांधण्याची कृति किती सफाईदार व कुशळतेची आहे. कांहीं वर्षांमागें ह्या मुंबई बेटांतील लोकांच्या पागोट्या लहान, हलक्या व साध्या होत्या; परंतु आतां त्या मोठ्या, भारी व कंगणीदार अशा झाल्या आहेत. पागोट्याचें वजन वाढविल्यानें आम्ही चांगलें असें म्हणत नाहीं. कारण डोक्यावर जितकें वजन हलकें असेल तितकें शरिरास हितावह आहे. याचप्रमाणें धोतरजोडे, लुगडीं, साड्या, चोळया, आंगरखे, दुपेटे, यांच्या नव्या तऱ्हा निघून उत्तरोत्तर पोशाक नव्या नव्या तऱ्हांचा होऊं लागला. जो पोशाक हजार वर्षांमागें लोक करीत असत तो पांचशें वर्षांमागें नव्हता, आणि जो पांचशे वर्षांमागें होता तो शंभर वर्षांमागें नव्हता आणि जो शंभर वर्षांमागें होता तो पन्नास वर्षांमागें नव्हता; आणि जो पन्नास वर्षांमागें होता तो सध्या नाहीं. पन्नास वर्षांमागील पोशाकांत आणि सध्याच्या पोशाकांत बराच फेरफार झाला आहे. याप्रमाणें मनुष्य उत्तरोत्तर नव्या नव्या कल्पना काढीत असतो.

ज्ञानप्रसारक—पु. ८, अं. ८ (नोव्हेंबर १८५७).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

४

रेशमी रुमाल

मुंबई शहरांतील कित्येक गृहस्थांस उंच प्रतीचे रेशमी रुमाल वापरणें हें श्रीमंतीचें लक्षण असें वाटून ते अशा प्रतीचे रुमाल घेण्यास फार झटतात. ही त्यांची समजूत किती वेडी आहे हें पुढील संवादावरून कळून येईल.

केरू, भाऊशास्त्री आणि सदू.

एके दिवशीं केरू संध्याकाळीं पांच वाजतां शाळेंतून आल्यावर, लागलाच आत्माराम सगुण याच्या दुकानीं रुमाल घ्यावयास घरांतून बाहेर निघतो. त्यावेळीं त्याचा आणि भाऊशास्त्र्यांचा याप्रमाणें संवाद होतो. केरु घरांतून बाहेर निघून रस्त्यांत आला आहे इतक्यांत समोरून भाऊशास्त्री येतात.

भाऊशास्त्री—कां दादासाहेब ! एवढ्या तांतडीनें आज ह्यावेळीं बाहेर निघालां ?

केरू—शास्त्रीबावा, आत्माराम सगुणाच्या दुकानीं विलायतेहून रेशमी रुमालाची नवी पेटी आली आहे; ती तो आतांच उघडणार. त्यावेळीं आपण जवळ असलों म्हणजे चांगला तऱ्हेवार असेल तो रुमाल आपणास मिळेल, म्हणून जातों दुसरें कांहीं नाहीं.

भाऊशास्त्री.—रुमाल खरीद करायास जाण्याकरितां एवढी लगबग आणि धांदल ! ही मोठी आश्चर्याची गोष्ट ! तो रुमाल असतो तरी कसा ? व त्याची लांबी रुंदी किती ? आणि त्याला किंमत तरी किती पडल्ये अशी ?

के.—रुमाल रेशमी अनेक तऱ्हांच्या रंगांचे असतात, व त्यांजवर नाना तऱ्हांच्या बुट्या व वेली असतात. आणि हात सवाहात लांबी रुंदीचे असून यांची खुमास घट्ट असल्ये. त्याला पांच सहा रुपये पडतात. दुसरें काय अधिक !

Digitized by Google	Original from UNIVERSITY OF MICHIGAN

भा.—वाहवा चांगलें काम ! हात सवाहात फटकुराचा तुकडा तुम्ही पांच साहा रुपये खर्च करून घेणार, आणि त्यावर मजा मारणार ! भली समजूत ! मुंबईकर लोकांच्या या अशाच समजुती. " ओंठावर पीक आणि घरांत भीक " म्हणतात तसें. बरें हा एवढा लाहान सुडका घेऊन त्याचें तुम्ही करणार तरी काय ? धड नेसावयास नाहीं, धड पांघरावयास नाहीं, धड माथ्यास गुंडाळायास नाहीं, धड तोंड पुसायाच्याही उपयोगी नाहीं; कारण तो उंच किंमतीचा आहे. येऊन जाऊन तो हातांत धरून लोकांस दाखवायाचा इतकेंच ना ? अहो या वांटची तुम्ही पांच रुपयांची बनात घेतली असती तर तुम्हास थंडीची पांघरायास झाली असती, आणि पांच दाहा वर्षें टिकलीहि असती. आणि त्यापासून तुमचें किती कल्याण होतें ? काय तुमच्या या वेड्या समजुती ! रात्रीचें धोतर पांघरून थंडीनें आंखडून निजावें आणि सकाळचे प्रहरीं साहा रुपयांचा रुमाल हातांत घेऊन मिरवत फिरावें ! याच प्रकारचा तुम्ही कालेजांत शहाणपणा शिकतां ? येऊन जाऊन इंग्रेजी शिकण्याचा परिणाम हाच–जेवढें मिळवावें तेवढें उडवावें. खातें पोतें बराबर. रागें भरूं नका हो. पण असे रुमाल म्हटले म्हणजे ते गाईकवाडासारिख्यांनीं घ्यावे, आम्हा तुम्हाला काय उपयोगाचे ? तुमच्या बापाला मुळींच चाळीस रुपयांचा दरमहा, त्यांतील एक चतुर्थांश रुमालास खर्चिला म्हणजे काय झालें ? तोंड पुसायास रुमाल हवाच असला तर दोन अडीच आण्यांचा झाला म्हणजे शिमा झाली.

सदू तेथें उभा होता, तो त्यांचें हें भाषण ऐकतांच जवळ आला आणि याप्रमाणें बोलतो.

सदू—कांहो शास्त्रीबावा ! कालेजाकडे व इंग्रेजी शिकण्याकडे रुमाल विकत घेण्याचा काय संबंध ? कालेजामध्यें मुलांस अनेक विद्या शिकवितात, त्याचप्रमाणें त्यांनीं कोणत्या रीतीनें वागावें, आपलीं इंद्रियें कशीं स्वाधीन ठेवावीं, व आपल्या योग्यतेनुसार कसें वागावें हें सर्व शिकवितात. तें ग्रहण करणारा मात्र पाहिजे. विद्यार्थ्यांनीं कोणत्या प्रकारें वागावें व त्यांचें वस्त्रपात्र किती नियमित व साधें असावें हें सर्व जसें आह्मामध्यें आहे तसेंच, किंबहुना अधिक, इंग्रजी नीतिशास्त्रांत आहे बरें. त्याप्रमाणें वागणारा मात्र पाहिजे. इंग्रेजी शिकलें म्हणजे उधळेपणा करावा असें शिकवीत नाहींत. शरीर निर्मळ ठेवावें, व वस्त्र स्वच्छ असावें, नियमित खावें आणि अंथरूण पाहून पाय पसरावे एवढेंच शिकवितात. अह्मा लोकांचा उधळेपणा पाहून कित्येक इंग्रज लोक तर हसतात. बाकीचें तर असो, परंतु विद्यार्थ्यांस वर्तमानपत्र देखील वाचावयाची मनाई आहे बरें. इंग्रेजींतील नियम तुम्हाला ठाऊक काय आहेत ? इंग्रजी शिकाल तेव्हां इंग्रजींत काय नीति आहे हें तुम्हाला समजेल. नाहीं तर "पुस्तकीं विद्या आणि परस्वाधीन जिणें", उपयोग काय ? तुम्ही स्वच्छपणाचा आणि उधळेपणाचा अर्थ एकच करितां असें मला वाटतें.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

भा०—सदोबा, इंग्रेज लोक आज एवढे पृथ्वीचें राज्य करितात त्यांमध्यें नीति व व्यवहारशास्त्र नाहीं असें कोण म्हणेल? नीति असल्याशिवाय ते आज एवढ्या कीर्तीस चढले असते? पण माझें म्हणणें इतकेंच कीं, आमचे लोक इंग्रेजी शिकूं लागले म्हणजे डामडौलाखालींच पैसा उडवून टाकितात; कोठच्या पायांत पिशव्याच घालतील; कोठें रुमालच गळ्यास बांधून फिरतील; कोठें घड्याळाची सांखळ घालून फाटकी फिशारी दाखवितील. याप्रमाणें बाहेरचे डौल घालून ते संसाराकडे लक्ष देत नाहींत, असें मी बहुत ठिकाणीं पाहिलें म्हणून बोलतों. हा इंग्रेजी शिकण्याकडे दोष नाहीं ही गोष्ट खरी आहे. आमचे लोकच मुळीं उल्लड आहेत, म्हणूनच आलिकडे पुष्कळ लोक विद्वानांच्या योग्यतेस चढत नाहींत. विद्यार्थी ह्मटला म्हणजे त्याचें लक्ष येऊन जाऊन विद्येकडे असावें तें एकीचकडे राहातें; आणि ते कोठें रुमाल घ्यावयास चत्र्या पागोट्या बांधायास, इस्त्रीचे अंगरखे घालायास व लाल तोंडें करून रस्त्यांत लावण्या ऐकत फिरायास लागले म्हणजे अर्थातच विद्येवर भोंपळ्याएवढें शून्य. मग त्यांची माणकूबाई जावयांच्यासारिखी अवस्था होत्ये. अहो, विद्यार्थी म्हटला म्हणजे त्यानें किती नियमानें असलें पाहिजे, त्यानें बायकांजवळ बोलूं देखील नये. मग पानसुपारी खाणें आणि नाचतमाशे पाहाणें दूरच राहिलें. पण एथें काय विचारतां! म्हटल्या दिवशीं घरींच गाणीं बजावणीं ऐकण्याची आईबापांनीं सोई केलेली असते. काय हो हें आश्चर्य! बाप आणि मुलगा एकेच सत्रंजीवर लोडास टेंकून गाणें ऐकायास बसतात, हीच काय ती विद्यार्थ्यास शिक्षा आणि दीक्षा.

के.—शाबास शास्त्रीबावा! भली नानाफडनिशी युक्ति काढिली! कोठें लग्नास व सरकारदरबारांत जातेवेळीं सखलाद पांघरून जावेंना! ठीक! ठीक! अशानीच तुम्ही राज्य घालवून बसलां. बनातीपेक्षां, शास्त्रीबावा, पांच रुपयांचा साहा घाबळ्या येतील त्या बऱ्या कीं नाहीं? तुमचें चित्तपावनभट्टी शाहाणपण आमच्या काय उपयोगी? तें तुम्हालाच शाश्वत असो. तुम्हाला हा श्लोक माहीत आहे, "भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः॥ तस्मात्सर्वप्रयत्नेन ऋणं कृत्वा घृतं पिबेत्."

भा० शा०—ठीक! ठीक! असे आपले विचार आहेत काय? तर आमचा बेइलाज. मग आम्ही कांहीं बोलत नाहीं. यावरून तुह्मास इंग्रेजी किती येत असेल हें मी समजलों. घड हेंही नाहीं आणि तेंही नाहीं ह्मणजे असेच हाल. अहो हा श्लोक तुह्मासारिख्या छकेपंजेवाल्यानें केलेला, हा काय आमच्या शास्त्रांत सांपडायाचा नाहीं. ज्यावेळीं भरतखंडभर पूर्वीं नास्तिक मत पसरलेलें होतें, त्यावेळीं हा कोणी रचलेला असावा. आतां काय तुमची इच्छा ह्या श्लोकाच्या अन्वयाप्रमाणें चालायाची आहे? तर मग ठीकच. तुह्मी पांच सांडून दाहा रुपयांचा रुमाल घ्या आणि आठ रुपयांचा इंग्रेजी जोडा पायांत घाला बापडे. आह्मी आपले उगी राहातों. "करे सो पावे, पकावे सो खावे." आमचें कांहीं जात नाहीं—

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

स०--तुमचें ह्मणणें अक्षरशः खरें आहे. तुह्मी केरूचें ऐकून उगीच संतापूं नका. आमच्या ह्या चालीमुळें मुलांचीं मनें बिघडून जातात, मग त्यांला विद्या होत नाहीं. एकदां मन बाहेर फांकलें म्हणजे मग तें कसचें आवरतें; नांवास मात्र कालेजांत जावें, आणि शाळेस बट्टा लावावा. एकदां रुमालावर मन बसलें म्हणजे मग तें विद्येवर कोठून बसेल? मग तें तसें मी कित्येक जणांच्या बापांच्या तोंडांतून असें म्हणतांना ऐकिलें आहे, "काय हो! ह्या इंग्रेजी शाळांत अलिकडे शिकविण्याचा ताळ राहिला नाहीं. येऊन जावून दर महिन्यास पांच आठ रुपयांचीं बुकें घ्यावीं म्हणजे झालें. मग तो मुलगा शिको किंवा न शिको." पण मुलगा शाळेंत बराबर जातो किंवा नाहीं, घरीं बसून शिकतो कीं नाहीं, याजकडे कोणीच लक्ष देत नाहीं. शाळेस मात्र दोष देतात. मला तर असें वाटतें कीं, विद्या संपादन करणें किंवा न करणें हा विद्यार्थ्यांचा गुण आहे. शाळेकडे कांहीं दोष नाहीं. आमचे लोक ह्या ख्यालीखुशाली सोडून विद्येच्या मार्गें लागतील तेव्हांच विद्वान् व सुखी होतील. सध्याच्या मानाप्रमाणें अर्ध्या हळखंडानें पिवळें होऊन फळ काय?

भा० शा०—केरुजी, तुमच्याच म्हणण्याप्रमाणें कां होईना? एखाद्या भाऊदाजी-सारिख्या विद्वान् गृहस्थाकडे जाऊन विचारून पाहा कीं, पांच रुपये खर्चून एक रेशमी रुमाल घ्यावा तो अधिक उपयोगी पडेल, कीं पांच रुपयांच्या धाबळ्या घेतल्या तर त्या अधिक उपयोगास पडतील. रुमालाचें फडकें हें कांहींच उपयोगी नाहीं, पण फाटकी फिशारी दाखवायास मात्र कामीं पडेल हें उघडच आहे. ज्या मनुष्याला विचार आहे तो हें कबूल करीलच. तुम्ही बनातच घ्यावी असें माझें म्हणणें नाहीं. घनवटी धोतरजोडा घ्या. नाहींतर दुसरें कापड घ्याना! पण संसाराकडे लक्ष ठेवावें. रेशमी रुमाल उपयोगी नाहींत असें मी म्हणत नाहीं, ते जे गर्भ श्रीमंत असतील त्यांस तोंड पुसायाच्या उपयोगी. आम्हाला ते काय उपयोगी? मनुष्यानें प्रपंच आणि परमार्थ यांकडे लक्ष ठेवून चालावें. यांतच पुरुषार्थ. केवळ उंच वस्त्रें परिधान केलीं म्हणून श्रीमंत होत नाहीं, त्याच्या आंगीं तसे गुण असले पाहिजेत तेव्हांच तो योग्यतेस चढतो. तुकाराम म्हणतो, "प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ज्याणें केला तो नर भला भला."

ज्ञानप्रसारक—पु० १०, अं. १० (जानेवारी १८६०)

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

५

मधाचें पोळें

कांहीं दिवसांवर एक गृहस्थ असें म्हणाला, " मला एक निबंध लिहावयाचा आहे. परंतु काय करूं ? कांहीं विषय सांपडत नाहीं. इंग्रजी ग्रंथ उघडून पाहावे तर त्यांमध्यें कोणत्याच विषयाचा विचार केल्यावांचून ग्रंथकर्त्यांनीं ठेविला नाहीं. जो विषय मनांत आणावा त्यावर कांहीं ना कांहीं तरी लिहिलेलें सांपडतेंच. तसेंच मराठी व गुजराथी पुस्तकें व मासिक वर्तमानपत्रें काढून पाहिलीं तर त्यांतही प्रत्येक विषयावर थोडें बहुत लिहिलेलें सांपडतें. तर आतां लिहावें तरी कशावर ? मला वाटते कीं कांहीं दिवसांनीं मनुष्यांस लिहावयाजोगते व विचार करावयाजोगते नवीन कांहींच विषय सांपडणार नाहींत." हा त्याच्या मनांतील भाव दृष्टीस पडला; त्याचें मनन करीत मी क्षणभर बसून असें समोर पाहिलें, तों मला मधमाशांच्या पोळ्याची स्मृति झाली. त्या वेळीं असें वाटलें कीं, जरी आजपर्यंत पृथ्वीवरील बहुतेक विषयांचें विद्वज्जनांनीं उद्‌घाटण केलें आहे, तरी अजून असंख्यात नवीन विषय सध्याच्या व पुढें होणाऱ्या संततीस विचार करण्याजोगे आहेत. आणि ज्या विषयांचे विद्वान लोकांनीं पूर्ण शोध लावले आहेत असें आम्हांस वाटतें, त्यांवरही अजून कोट्यावधी लोकांनीं विचार केले तरी त्यांचा संपूर्ण शोध लागणार नाहीं, इतके सृष्टींतील विषय गहन आहेत. अजून आम्हांस साधारण वनस्पतींचा देखील पुरता शोध लागला नाहीं, दुसरे अवघड विषय तर मग एकीकडेसच राहिले.

कांहीं महिन्यामागें शेतोडींत फ्रिचर्च विद्यालयाच्या छपरावर एका कोंपऱ्यास मधमाशांचें पोळें बांधतांना दृष्टीस पडलें. त्याचा प्रकार पाहून प्राणिमात्रास आपल्या अपत्याच्या जिवाचें रक्षण करण्याची जी अनिवार शक्ति आणि स्वाभाविक गुण ईश्वरानें

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

ठेविला आहे, त्याविषयीं मनांत अनेक कल्पना उद्भवूं लागल्या. या मधमाशा, प्रथम सुमार पन्नास पाउणशें तोंडांत कांहीं चिकट पदार्थ घेऊन मोठ्या वेगानें फिरत फिरत येऊन जेथें त्यांस पोळें बांधायचें त्या जाग्याभोंवतीं फिरून जो त्यांनी चिकट पदार्थ आणिला होता तो आसपास पसरून टाकिला.

मग त्यांतील कित्येक माशा उडून गेल्या. नंतर त्या थोडक्याचा वेळानें दुसरा पुष्कळ समुदाय बरोबर घेऊन आल्या. याप्रमाणें त्यांणीं प्रथम घालण्याजोगें सामान तयार केलें. त्याचा प्रकार पाहून किल्यामध्यें सन १८२३ त टौनहाल बांधीत होते, त्या वेळीं जी धामधूम चालली होती तिची आठवण पडली. मला वाटतें कीं, यांतही इंजनेर, मेस्त्री, असे असतील. आतां या लहान प्राण्यांनीं जें साहित्य जमा केलें होतें तें हळूहळू एके ठिकाणीं नेलें. आणि एक दोन दिवसांनीं त्याचा अर्धचंद्राकार भिंतीसारिखा मजबूत थर घातला. इतकें काम तयार होत आहे, इतक्यांत सुमारें पांचशें सातशें माशा जमल्या. नंतर प्रतिदिवशीं त्यांची संख्या वाढतच चालली. त्यांतील सुमारें शेंदोनशें माशा पाळीपाळीप्रमाणें उडून बाहेर जात. व बाहेर गेलेल्या तोंडांत कांहीं पदार्थ घेऊन आल्यानंतर दुसऱ्या बाहेर पडत. याप्रमाणें त्यांची रहदारी सर्वकाळ दृष्टीस पडे. प्रत्येक खेपेस त्या कांहीं पदार्थ आणून त्या इमारतीवर चिकटवीत. आणि घटिका अर्धघटिका तिजवर बसून जिकडे तिकडे ती नीट करीत, याप्रमाणें दोन अडीच महिन्यांत या उद्योगी आणि कुशळ प्राण्यांनीं आपली इमारत पुरी केली. आणि सुरस भक्षणीय पदार्थ आणून तींत भरला. यांची इंद्रियदमनशक्ति मोठी वर्णनीय आहे. जरी हा अमृतासारिखा मध त्यांच्या तोंडापाशीं सतत असे तरी त्या तो चाखून देखील पाहत नसत; एवढ्या जतनेनें त्या तो आपल्या पिल्यांसाठीं राखून ठेवीत. ही इमारत तयार करण्यास व तींत मधरूप द्रव्य सांठवून ठेवण्यास हे सुमारें हजार पंधराशें प्राणी लागले होते. ते नेहमीं आपल्या उद्योगांत निमग्न होते. पाहाणारांस असें वाटे कीं, ज्यापेक्षां यांणीं एवढे श्रम करून त्यांत मिष्टान्न भरून ठेविलें आहे त्यापेक्षां पोळें तयार झालें म्हणजे त्या स्वस्थ बसून तो खातील. परंतु ज्यांनीं हा मध गोळा करून आणिला त्यांणीं त्याचा स्वतः कांहींच उपभोग घेतला नाहीं. त्यांणीं ही इमारत व अन्न आपल्या पुढील संततीसाठीं एवढे यत्न करून तयार केलें होतें. कांहीं काळानें असें पाहण्यांत आलें कीं, ज्या पोळ्याच्या छिद्रांत टकोटक मध भरलेला होता त्यांत लहान लहान प्राणी चलन वलन करूं लागले. पुढें रस्त्यांतील लोक येतां जातां ह्या पोळ्यांचा चमत्कार पाहायास उभे राहात, आणि या प्राण्यांची ही इमारत पाहून विस्मय पावत. या माशा सर्व दिवसभर पोळ्यावर बसलेल्याच आहेत असें दिसत असे खरें; परंतु पाळीपाळीप्रमाणें त्यांतील कित्येक उडून बाहेर जात. ह्या पोळ्यांतील मधरूप द्रव्याचें रक्षण करायास त्या फार जपत असत. कोणी असें ह्मणत कीं, या आतां सर्व पिऊन जातील, तर तो सर्व काढून घ्यावा; परंतु

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

पुष्कळ दिवस तें तसेंच राहिलें. तथापि तो मध त्यांणीं स्वतः खाल्ला नाहीं. इतक्यांत आंतील त्यांची संतती वाढून हळूहळू मध पिऊं लागली; ती उडायाजोगी होई तोंपर्यंत हा मध त्यांस पुरला.

मग कांहीं दिवसांनीं हें पोळें काढिलें. तें काढायासही मोठे प्रयत्न करावे लागले. संध्याकाळचे सतत पांच सहा दिवस एका परातेंत कागदाचे खर्डे ठेऊन त्यांस आग लावून त्यांचा धूर व आंच त्यांस लागेसारिखी केली. तो धूर ह्यांला लागला ह्मणजे त्यांतील दर खेपेस दोनशें चारशें माशा अर्धमेल्या होऊन जमिनी-वर पडत. मग दुसरा दिवसपर्यंत मरून जात. याप्रमाणें पांच सहा दिवसांत त्या सर्व माशांचा नाश झाल्यानंतर तें पोळें कापून काढिलें, त्यांत अत्युत्कृष्ट थोडा मध सांपडला. व पोळयांतील कांहीं मेण हातीं लागलें. ह्या पोळयांतील रचना व निरनिराळे पडदे व अपत्यांस राहाण्याजोग्या बेतवार खोल्या व त्यांचीं दूरदृष्टी पाहून ईश्वराच्या अगाध कृत्याचें स्मरण होऊं लागलें. पाहा, माशी ती काय? आणि तिचे उद्योग ते किती? ती किती श्रम घेऊन घर बांधिती! व रानोमाळ फिरून उत्तम प्रकारचा भक्षणीय पदार्थ तयार करिती! तसेंच मेण हा पदार्थ एवढा घट्ट व चिकट त्या कोठून आणितात व तो कसा तयार करितात हें एक मोठेंच आश्चर्य आहे! कित्येक विद्वानांचें असें मत आहे कीं, हें मेण त्यांच्या अंगींच असतें, तें त्या ह्या प्रसंगीं काढून उपयोगास लावितात व मध अनेक जातीच्या फुलांतून गोळा करून आणितात. कित्येकाचें असें म्हणणें आहे कीं, मेण आणि मध हे दोनही अपूर्व पदार्थ त्या वनस्पतीपासूनच तयार करितात. हें कांहीं असो, ह्या प्राण्याचे उद्योग, दक्षता आणि आपल्या संततीचें रक्षण करण्याविषयींची तत्परता व दूरदृष्टी, हीं प्रत्येक मनुष्यास ग्रहण करण्याजोगीं आहेत. पाहा! या पृथ्वीवर कित्येक मनुष्यें अशीं आहेत कीं, आपल्या पोराबाळांची व कुटुंबांतील मनुष्यांची कांहीच काळजी न वाहतां खुशाल मौजा मारितात आणि पुढें आपल्या संततीस जन्मभर दुःखांत ठेवितात. किती हो ही दुःखाची गोष्ट! मनुष्यासारिख्या विचारी आणि सुज्ञ प्राण्यास आपल्या अपत्याचा प्रतिपाळ करण्याविषयींचा आळस व दुर्लक्ष असे जे मनुष्य त्यांची स्थिती मधमाशांपेक्षां किती नीच व धिःकारायाजोगती आहे! प्रत्येक लहान प्राण्याचे उद्योग पाहून मनुष्यानें सावध झालें पाहिजे. एक सुज्ञ व भगवद्भक्त पुरुष असें म्हणतो. "हे आळशी मनुष्या, तूं मुंगीपाशीं जाऊन उद्योग कसा करावा तो शिक" आणि ज्या-प्रमाणें ह्या मधमाशा आपल्या आपत्यांसाठीं पोळें बांधून मध साठवून ठेवण्यास श्रम करितात, त्याचप्रमाणें मनुष्यानें आपल्या मुलांचें किंबहुना आपल्या कुटुंबातील मनुष्याचें पोषण करण्यास आपली शक्ति वेंचली पाहिजे. ही सामग्री कोणती म्हणाल तर त्यांस लहानपणापासून सुशिक्षा द्यावी, सुज्ञान प्राप्त होई असें करावें आणि सुमार्गास लावावें व

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

सन्मार्गानें द्रव्य मिळवून त्यांसाठीं संचय करून ठेवावा. मनुष्याच्या संततीस सुशीलतारूप पोळें आणि सुज्ञतारूप मध हीं दोनही आईबापांनीं सांठवून ठेविलीं पाहिजेत.

मधमाशांचीं पोळीं कोकणांत व इतर पुष्कळ ठिकाणीं असतात. याच्या आकृति दोन तऱ्हेच्या असतात, एक पूर्णचंद्राकार व दुसरी अर्धचंद्राकार. मधमाशा आणि गांधीलमाशा अशा यांत निरनिराळ्या दोन जाती आहेत. गांधीलमाशांच्या आंगीं विष असतें, त्या डसल्या असतां आंगाची तलखी होऊन कळा मारितात, आंग सुजतें, एखाद्या मनुष्यास ह्या पांच पंचवीस डसल्या असतां त्यास वांती होऊन तो मरणोन्मुख होतो व कितीएक मरतात देखील. या एकाएकीं, उगीच कोणाच्या आंगावर तुटून पडायाच्या नाहींत; त्यांस कोणी किंचित् उपद्रव केला कीं, त्या सगळ्या संतापून सांपडेल त्यास दंश करीत जातात.

ह्यांस कोणी छेडलें असतां त्याचा पिछा त्या सोडित नाहींत. एकीस दुखविलें असतां सर्व समुदाय त्याजवर तुटून पडतो, एवढी त्यांची जूट असती. हे प्राणी स्वभावतः दुष्ट आहेत खरें, परंतु यांत एवढा गुण आहे कीं, एकाएकीं आपण होऊन मनुष्यांस दंश करायास जात नाहींत. त्यांस उपद्रव होतो तेव्हांच त्या उचंबळ होऊन मनुष्यांस उपद्रव करितात. कोणी याविषयीं अशी गोष्ट सांगितली कीं, एका मनुष्यानें या माशांच्या एका पोळ्यांस उपद्रव केला असतां त्या संतापून गांवांतील लोकांस फार त्रास देऊं लागल्या. मग ज्या वेळीं त्यांस ज्या मनुष्यानें उपद्रव केला होता तो सांपडला, त्या वेळीं त्या सर्व त्याच्या मागें लागल्या, आणि त्यास पीडा करूं लागल्या नंतर त्यांचा त्रास त्याच्यानें सहन करवेनासा झाल्यामुळें त्याणें तळयांत जाऊन बुडी मारिली. तरी त्या त्याचे मागें जाऊन सर्व दिवसभर तळ्यासभोंवत्या घुमत राहिल्या. आणि त्याणें किंचित् डोकें वर काढिलें कीं त्याला दंश करीत; शेवटीं त्या मनुष्याचा बेइलाज होऊन तो तेथेंच मरण पावला. इतक्या या माशा दीर्घद्वेषी आहेत, यास्तव गांधीलमाशांचें पोळें दृष्टीस पडलें असतां त्यांस उपद्रव न करण्याविषयीं मनुष्यानें फार जपलें पाहिजे.

बहुधा हीं पोळीं उंच वृक्षावर, ओसाड घराच्या छपऱ्यास, डोंगराच्या कड्यावर किंवा रानांत जेथें मनुष्याचा उपद्रव होणार नाहीं अशा ठिकाणीं करितात. असें असतांही मनुष्य त्यांस उपद्रव केल्यावांचून राहत नाहीं. जेथें त्यांणीं पोळीं बांधिलीं असतील तेथें जाऊन त्यांचें घर जाळून व त्यांच्या अपत्यांचा नाश करून मध काढून घेतो. हा मनुष्याचा किती निर्दयपणा दिसतो ! त्या पोळ्यांतून मध काढण्याचा प्रकार असा असतो—कुणबी किंवा दुसरे कोणी ज्यांस ही कृति माहित असते ते लोक, डोकीवर घोंगडी घालून बरोबर चुडी घेऊन जेथें हें पोळें केलें असेल तेथें रात्रीचे जातात. मग प्रथम एक चूड पेटवून त्या पोळ्याभोंवताली फिरवून माशांस मारून टाकितात; तितक्यानें मेल्या नसल्या तर दुसरी पेटवितात. नंतर पोळें काढून घेतात. तें पिळून

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

त्यांतून मध काढितात. त्यांचीं पिलीं अगदीं लहान असलीं तरच पुष्कळ मध सांपडतो. मोठीं झाल्यावर तीं तो पिऊन जातात. दर पोळ्यांत जसें पोळें असेल त्याप्रमाणें शेरापासून एक मणपर्यंत मध सांपडतो. या एका मधाकरितां सहस्रावधी जिवांचा नाश करावा लागतो. मध औषधास उपयोगी पडतो तसाच भोजनसमारंभांतही त्याचा खप आहे. मेण जाळायास-मेणकापड करावयास, छत्र्यांसाठीं व दुसरे अनेक उपयोगास पडतें. पाहा ! केवळ निरुपयोगी मानलेल्या किड्यांपासून किती अमोलिक पदार्थ उत्पन्न होतो. मध ह्मटली ह्मणजे राजापासून रंकापर्यंत प्रिय आहे. हा पदार्थ सर्व देशांत व सर्व लोकांत उत्तम मानिला आहे.

एका मोगलानें असें सांगितलें कीं, मधमाशा गुलाबाच्या फुलांतून मकरंद नेऊन मध करितात; परंतु तोच मकरंद सुतेऱ्यास सांपडला असतां, तो त्यापासून विष करितो. याचप्रमाणें सुज्ञ मनुष्यास विद्या आणि धन प्राप्त झालीं असतां तो आपलें व लोकांचें कल्याण करितो; परंतु दुष्ट मनुष्यास हीं प्राप्त झालीं असतां तो आपला व लोकांचा नाश करितो.

गांधीलमाशांच्या शरिराचाही मोठा उपयोग आहे. त्यांला मारून वाळवितात आणि त्यांची बारीक बुकी करून दुसऱ्या औषधींत मिळवून एक जातीची पट्टी तयार करितात, तीस ब्लिस्टर असें म्हणतात. याचा वैद्यलोक पुष्कळ ठिकाणीं उपयोग करितात. एथें इतकें सांगायचें कीं, हे कीटक असून यांजपासून लोककल्याण पुष्कळ होतें आणि मनुष्य विचारी व ज्ञानी असून त्याजकडून जर परस्पराचें कल्याण झालें नाहीं तर त्याच्या जन्माचा काय उपयोग ? थोडा शिकला व थोडी संपत्ति प्राप्त झाली ह्मणजे एकादे वेळीं गर्विष्ट होऊन जातो. तर हे किडे, मधासारिखा अपूर्व पदार्थ, जो राजे लोकांतही मान्य होतो तो करितात. त्यांनीं किती गर्विष्ट व्हावें ! आमच्या दारावरून एक मुसलमान जात असे तो वारंवार असे शब्द ह्मणे "सवदेवाला सवदा कर ले कुच नफा होय गा." याचा सारांश इतकाच कीं, मनुष्य पृथ्वीवर सवदा करावयास आला आहे आणि तो सवदा कोणता म्हणाल तर ईश्वरप्राप्ति करून घेण्याचा, तो जेव्हां करून तो घेतो, तेव्हांच त्यास नफा झाला असें समजावें.

ज्ञानप्रसारक–पु. १२ अं. १ (एप्रिल १८६१).

३

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

६

द्रोण

ईश्वरानें निरनिराळ्या देशांच्या लोकांमध्यें निरनिराळे गुण ठेविले आहेत, ही त्याची योजना किती अतर्क्य आहे! कित्येक वस्तु जशा एका देशांत उत्तम प्रकारच्या होतात, तशा दुसऱ्या देशांत कितीही श्रम केले तरी होत नाहींत, हेंच मोठें नवल. ज्या वस्तु चीन देशांत होतात, त्याच फर्म्याच्या युरोपखंडांत कितीही यत्न केला तरी होत नाहींत. पहा! चीन देशांत प्याले, काचीचीं भांडीं, कागदी छऱ्या, रेशमी कापड व दुसरे कित्येक अपूर्व पदार्थ होतात, तसे दुसरे कोठेंच होत नाहींत. काश्मिरी शालीसारिख्या पृथ्वीवर दुसऱ्या कोठेंच होत नाहींत. जरी इंग्रज लोक एवढे उद्योगी व मोठे कुशळ व यांत्रिक विद्येंत एवढे निपुण आहेत, तरी त्यांस देखील अशा शाली साधत नाहींत. शालीच कशास? साध्या चिनई कागदी छऱ्या देखील करणें त्यांस अवघड पडेल. "ज्याचें काम त्यालाच," असें जें म्हणतात, तें खोटें म्हणवत नाहीं. ईश्वरानें प्रत्येक देशाचें व एकएक प्रतीच्या लोकांचें महत्व राखण्यासाठीं ही अशी व्यवस्था केली आहे. युरोपखंडांत जशा अमोलिक वस्तु होतात तशा आपण एथें करूं ह्मणून सर्व शक्ति वेंचिली तरी तो घाट उतरायाचाच नाहीं. याचप्रमाणें देशोदेशांतील दुसरे पदार्थ सृष्टिजन्य आहेत. चीन देशांत चहा, साखर, रेशीम, इत्यादि पदार्थ होतात. भरतखंडांत कापूस, चंदन, सागवानी, शिसवी, फणशी, व अब्नुशी लांकूड, नारळ, तांदूळ व दुसरीं अनेक धान्यें व वनस्पती होतात, तशा दुसऱ्या खंडांत होत नाहींत. जसा द्वीपांतरांतील पदार्थांच्या कृतींत फरक पडतो तसाच सृष्टिजन्य पदार्थांतही फरक असतो. असाच भेद देशोदेशीं शहरोशहरीं, गांवोगांवीं असतो. जो पदार्थ व वस्तु पुण्यांत चांगली होत्ये ती मुंबईत होत नाहीं; आणि मुंबईत होत्ये ती ठाण्यास होत नाहीं, आणि ठाण्यास होत्ये ती भिंवडीस

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

होत नाहीं, व भिंवडीस होत्ये ती कल्याणास होत नाहीं, ही एक मोठी आश्चर्याचीच गोष्ट आहे. हे सर्व भेद जमिनीच्या, हवेच्या, बुद्धीच्या आणि उद्योगाच्या व कुशळतेच्या भिन्नत्वानें होतात. सर्व देशांत सारिखे उद्योगी व कुशळ लोक सांपडणें कठोण. आणि बहुधा उद्योग आणि शिक्षा यांचा परिणाम हाच आहे कीं, त्यांपासून कांहीं उत्तम प्रकारचें फळ उत्पन्न व्हावें. पहा! मनुष्याच्या अंगीं परमेश्वरानें उद्योग ह्मणून जो अमोल्य गुण ठेविला आहे, त्याच्या योगानें मनुष्य आकाश आणि पृथ्वी यांची भेट करितो, तर हा उद्योग अमृतापेक्षांही मिष्ट आहे असें कां ह्मणूं नये? ज्याच्या योगानें मनुष्य सर्व पृथ्वीवरील पदार्थांचा उपभोग घेण्यास पात्र होतो. युरोप कोठें? अमेरिका कोठें? अफ्रिका कोठें? आणि आशिआ कोठें? परंतु मनुष्य कोणत्याहि खंडाच्या एका कोंपऱ्यास जाऊन बसतो, आणि सर्व पृथ्वीवरील पदार्थ तेथें नेतो, हें किती नवल! जर निरनिराळ्या देशांत भिन्न प्रकारच्या वस्तु तयार झाल्या नसत्या तर आज पृथ्वीवर व्यापार ह्मणून काय आहे हें लोकांस समजलें नसतें. व खंडांतरील लोकांची परस्पर भेट झाली नसती. पहा! आज मुंबई शहरांत चारही खंडांतील म्हटला तो पदार्थ सांपडतो. "उद्योगानें सर्व सोपें, आळसानें सर्व कठीण" अशी एक ह्मण आहे. मनुष्यास गरज पडली ह्मणजे युक्ति सुचत्ये, आणि तीपासून त्यास सुख प्राप्त होतें यास्तव मनुष्यास कोणत्याही वस्तूची गरज लागणें व त्याजवर कोणतीही अडचण पडणें हें उपयोगी आहे. चिनी लोकांस भोजनसमयीं घेण्यास प्याले व बशा व इतर कांचेचीं भांडीं करावीं पडलीं, व त्यांच्या त्या स्थितीप्रमाणें त्यांणीं आपली युक्ति उत्तम दशेस आणली. मग त्यांची ती युक्ति पृथ्वीवरील सर्व लोकांस उपयोगीं पडून तीपासून त्यांस द्रव्य प्राप्त होऊन ते योग्यतेस चढले. तसाच प्रकार युरोप व दुसऱ्या द्वीपांतील लोकांचा आहे. ज्याच्या सोईस जी गोष्ट अनुकूळ झाली ती तो ग्रहण करून त्याजवर त्याणें आपला निर्वाह चालविला; इतकेंच नाहीं परंतु ती उत्तम स्थितीस आणिली, ह्मणूनच सर्व वस्तु सर्व देशांत सारिख्या होत नाहींत. आगबोटी, लोखंडी सडका आदिकरून ज्या नव्या कल्पना व शोध निघाले, त्या अडचणीमुळेंच आहेत. देशोदेशच्या रिवाजांप्रमाणें त्यांतील लोकांस भिन्न प्रकारच्या वस्तूंची गरज पडत्ये. आफ्रिकाखंड एवढें रानटी स्थितींत आहे तरी तेथील लोकांनीं आपल्या निर्वाहास व सोईला योग्य अशा थोड्याबहुत तरी युक्ती शोधून काढिल्या असाव्या आणि त्या कदाचित् सुधारलेल्या लोकांस देखील साधणें कठीण पडेल. याचें कारण एक गरज. ते तीर मारण्यांत व तिरकमठे तयार करण्यांत कुशळ असतील आणि तें काम एखाद्या पंडितास व शडशास्त्र्यास देखील समजणार नाहीं.

कित्येक वस्तु केवळ अशिक्षित लोकांनीं केलेल्या असतात, व त्या केवळ हलक्या असतात खऱ्या, परंतु त्यांतही कुशळता ह्मणून आहे; व त्या कुशळतेकडे विद्वान् व

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

अविद्वान् ह्या दोघांहीं सारिखेंच लक्ष देऊन पाहिलें पाहिजे. कारण हे पदार्थ श्रमें-करून साध्य केलेले असतात. हिंदूंशिवाय इतर जातीचे सर्व लोक जेवणसमारंभ झाला असतां बशा, प्याले, गलासें, ताटें, वाट्या इत्यादि वस्तूंचा उपयोग करितात. परंतु हिंदुलोकांत ह्या पदार्थांचा जेवणसमयीं उपयोग करणें निषिद्ध मानितात आणि हिंदुलोकांत देशरिवाजांप्रमाणें अशा वस्तूंचा अशा प्रसंगीं उपयोग करणेंही मोठेंच कठीण. त्या लोकांत कित्येक प्रसंगीं गांवजेवण व सहस्रभोजनें घालण्याची चाल आहे; व कित्येक असा प्रसंग आला असतां पांच दहा हजार मनुष्यांची समाराधना घालितात. अशा समारंभांत प्याले आणि बशा घेणें म्हटलें म्हणजे मोठें अवघडच आहे. तशांत या देशच्या चालीप्रमाणें गरीब कुणबी झाला तरी स्वशक्त्यनुसार लग्नकार्य व देवकार्य झालें तर शेंपन्नास तरी स्वजातीच्या लोकांस जेवण घालितो. अशांस आपल्या योग्यतेनुसार जेवणासाठीं प्याले आणि बशा मिळविणें कठीण पडतें. या देशाचा चालीप्रमाणें या देशांत पत्रावळी आणि द्रोण घेण्याची वहिवाट आहे, ती ठीकच आहे. जे श्रीमंत आहेत ते केळीचीं पानें आणिवतात. केळीच्या पानांवर किंवा पत्रावळीवर जेवला म्हणून त्याच्या अंगीं रानटीपणा येतो असा विचार नाहीं. स्वच्छ पाट बसायास. हिरवेंगार केळीचें पान मांडून उजव्या बाजूस सुंदर चौकोनी द्रोण ठेविला, आणि पानावर अनेक पदार्थ नीट वाढिले असतां, त्या पानास किती शोभा येत्ये, व तें किती स्वच्छ दिसतें ? जेवणसमारंभांत पानाचा उपयोग पारशी व मुसलमान लोकांतही या देशांत होतो. मुसलमान व इस्रायल लोकांत एकाच ताटांत दहावीस देखील खातात व त्यामध्यें एकमेकाच्या उच्छिष्टाचा निर्बंध नाहीं. ह्मणून त्यांस पत्रावळीचा व द्रोणाचा फार खप नसतो. ते लोक ताटाची सोई नसली तर लांकडाचीं पाळीं आणून त्यांत अन्न भरून पांचपन्नास जण एका ठिकाणीं बसून खुशाल गोष्टी करीत जेवतील. जर हींही मिळालीं नाहींत तर हांतरी किंवा धोतर व पासोडा जमिनीवर पसरून त्यावर अन्नाची रास करितात; आणि त्याच्या भोंवताले जेवणारे लोक बसून जेवणावर सपाटा देतात. त्यांच्या मनांत सोवळें ओवळें व उच्छिष्ट यांविषयीं कांहीं कांक्षा नसत्ये. कारण त्यांचा त्यांला जन्मापासूनच संस्कार नसतो. मनुष्याच्या बुद्धीस बाळपणापासून जो संस्कार होतो तोच त्याला जडतो. मग त्यापासून सोंवळ्या ओवळ्याची प्रतारणा वाढत जाते. कोणत्याही गोष्टींत नेम असणें हें चांगले आहे. नाहींतर सर्वच घोटाळा होतो. परंतु दक्षिणी हिंदुलोकांत याचें फारच खूळ माजलें आहे. त्यामुळें त्यांची फारच हानि होत आहे.

इंग्लंड देश फार थंड, तेथच्या लोकांचा पोशाक, तेथील हवा, व त्या देशांतील चालीप्रमाणें त्यामध्यें खुर्चीवर बसून बशांत किंवा प्याल्यांत पदार्थ घालून टेब्लावर मांडून ते खाण्यास सुऱ्या, कांटे व चमचांचा उपयोग करावा पडतो. म्हणून कोणी

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

असें मनांत आणूं नये कीं, सुधारणूक जी आहे ती अशा रीतीनें बसून खाण्यांतच आहे. त्यांच्या देशाच्या स्थितिप्रमाणें व त्यामध्यें आजदिवसपर्यंत जी सोइस्कर वहिवाट चालली आहे, त्याप्रमाणें ते वागतात हें ठीकच आहे. म्हणून ते दोषी आहेत असें कोणी समजूं नये. खाण्याजेवण्याचे हे मनुष्यानें आपणास सोईस येईल त्या रीतीनें केलेले नेम आहेत. ज्यास जसी सोई पडली त्याप्रमाणें त्याची योजना केली. त्यांत पवित्र व अपवित्र म्हणण्याचें कारण नाहीं. पवित्रपणा आणि अपवित्रपणा अंतःकरणाकडे असतो. आपल्या चालींहून दुसऱ्याची चाल निराळी असली म्हणून उगीच तीस दोष लावूं नये कोणत्याही गोष्टीकडे आपले ज्ञानाचा उपयोग करावा. "ज्ञानं परमं पवित्रम्" असें वचन आहे.

पत्रावळी कोठें, व कशा आणि कोण करितात, याविषयीं एक दोन वर्षामागें ज्ञानप्रसारकांत वृत्तांत लिहिला होता. आणि आतां द्रोण जे इतके हिंदुलोकांच्या जेवणसमारंभांत पत्रावळीसारिखेच उपयोगीं पडतात, त्यांचा कांहीं विचार करूं. द्रोण म्हटलें म्हणजे मुख्य दोन प्रकारच्या पानांचे करितात. एक केळीच्या पानाचे व दुसरे पळसाच्या पानाचे. याशिवाय म्हटल्या त्या पानाचे द्रोण कारणपरत्वें लावितां येतील, परंतु ते पुष्कळ सांपडत नाहींत. द्रोण लावण्यांत तरी मोठी कुशळता पाहिजे. भलत्या-सच द्रोण लावितां येणार नाहींत. ते लावायाचा अभ्यास लहानपणापासून असला पाहिजे. त्यामध्येंही उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशा प्रती आहेत; तसेंच लहानमोठे असतात. तुपाचे द्रोण लहान असतात, खिरींचे त्याहून थोडे मोठे, व सांभाऱ्याचे बरेच मोठे असतात. पत्रावळी व द्रोण बहुतेक ठिकाणीं गुरव लोक लावितात. परंतु ब्राह्मण व इतर जातीचे लोकही पुष्कळ ठिकाणीं लावितात; व यांचा व्यापार करितात. उत्तम प्रकारचे केळीच्या पानाचे द्रोण गोमांतकीं होतात. एथें प्रतिवर्षीं लाखों पत्रावळी व द्रोण तयार होतात. तेथून बहुतकरून मुंबई, पुणें, कोलापुर, सातारा इत्यादि शहरांत जातात. सुरतेस पळसाच्या पानाचे द्रोण लावितात, ते मजबूत असतात खरे, परंतु त्यांमध्यें कुशळता नसत्ये, व ते चार आण्यापासून आठ-आण्यापर्यंत हजार सांपडतात. गोमांतकी द्रोण चार आण्यापासून एक रुपया हजार किंमतीचे असतात.

गोव्यांस जे द्रोण तयार होतात, ते लावण्याची कृति अशी आहे. केळीवर जीं पानें फाटून वाळतात तीं कापून काढितात, आणि तीं एकरात्र दवांत खळयांत टाकि-तात. मग सकाळच्या प्रहरीं सूर्योदयापूर्वीं त्यांत जे फाळके, मोठे द्रोण लावाया-जोगते असतील, ते काढून घेऊन एकावर एक असे रचून एका मोठ्या फळ्या-खालीं दडपून ठेवितात. आणि ते चांगले दडपून सरळ व्हावे म्हणून त्यांवर जातें, किंवा जड वजनदार असें दडपण ठेवितात. त्याखालीं ते एकदोन दिवस असतात.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

मग काढून कातरीनें किंवा फळ्यावर ठेवून सुरीनें अष्टकोनी बेतवार कापून त्यांचे पाहिजे त्या आकृतीचे द्रोण लावितात. यांस चोया चांगल्या मजबूत बांबूच्या कराऱ्या लागतात. जे केळीचे बारीक फाळके असतात, तेही बाहेर टाकीत नाहींत. त्यांच्या जुड्या बांधून तंबाकूच्या विड्या बांधावयास विकितात. याप्रमाणें उद्योगी लोक पातेऱ्यापासूनही द्रव्य उत्पन्न करितात. विडीच्या उपयोगास जे बारीक फाळके काढून जुड्या बांधलेल्या असतात त्यांस शेनवतें ह्मणतात. केळीचीं सगळीं पानें ओलीं असतात तेव्हां तीं जेवण-समारंभांत फार खपतात. आणि त्यांपासून द्रव्य उत्पन्न होतें खरें; परंतु केळीचीं पानें जर सतत सगळीं काढिलीं तर तीस केळीं चांगलीं लागत नाहींत. परंतु तीं हिरवीं असतांना न काढिलीं ह्मणून वाळल्यावर वांयां जात नाहींत. उपयोग करणारा मात्र पाहिजे. कोणत्याही झाडाचीं सर्व पानें वारंवार खुडून काढिलीं तर तें लवकरच मरेल.

द्रोण लावण्याचा दुसरा एक प्रकार एकानें सांगितला तो असा. गोव्यांकडेस मोठे बाग व वाड्या आहेत, त्यांस ते कुळागर असें म्हणतात. या कुळागरांत ते लोक नेहमी खपून द्रव्य उत्पन्न करून त्यावर आपला निर्वाह चालवितात. सकाळच्या प्रहरीं ते पाटाचें पाणी सोडून देतात आणि स्वतः जाऊन झाडें शिंपतात. ज्या वेळीं ते सकाळीं पाणी शिंपावयास जातात त्या वेळीं बरोबर थोड्या चोया व कातरी पिशवींत घालून कंबरेस बांधितात. व सुरी, कोयता, कामट्या, हीं आयुधें तर त्यांच्याबरोबर नेहमी असतातच. मग फिरतां फिरतां केळीचीं सुकलेलीं पानें दृष्टीस पडलीं कीं, तेथचे तेथेंच तीं कापून लागलेच त्यांचे द्रोण लावून पाटांत सोडून देतात. मग ते वाहात वाहात जाऊन त्याच्या घरापाशीं जें पाण्याचें टाकें असतें तेथें जमतात. नंतर तो घरीं आला ह्मणजे ते गोळा करून घेऊन त्यांचे शंभरशंभरांचे पुडे बांधितो. या पुड्यास ते लोक काट असें ह्मणतात. मला एक द्रोणाचा काट पाहिजे म्हटलें म्हणजे तो १०० द्रोणाचा पुडा आणून स्वाधीन करतो. पत्रावळी व द्रोण करणारे यांकडून मोठीं कामें होतात व यामध्यें मोठी कुशळता आहे असें नाहीं; परंतु उद्योग आणि युक्ति यांपासून काय निष्पन्न होतें तें दाखवायासाठीं यांचा येथें सविस्तर वृत्तांत लिहिला आहे. ही एक गोष्ट लक्षांत धरिली पाहिजे कीं, पत्रावळी बहुधा बायका लावितात. आणि द्रोण पुरुषच लावितात. बायकांनीं द्रोण लावलेले कोठें अढळत नाहींत. मनुष्य एक उद्योग करायास लागला म्हणजे त्याला दुसरा सुचतो. आणि मग त्यापासून कल्पना वाढतात. ज्या ठिकाणीं हजार पांच हजार पात्रांची समाराधन होत्ये तेथें यांचा फार उपयोग आहे. ह्या देशाच्या रिवाजाप्रमाणें जर या देशांत आमच्या लोकांच्या जेवणसमारंभांत ताटें व प्याले घेऊन जेवायास बसावें पडतें, आणि जेवणारी मंडळी दाहावीस हजार असली, तर तेवढीं ताटें आणि वाट्या घांसायास व धुवायास किती खटपट करावी पडती. व तीं वेळच्या वेळीं जमा करून मोजण्यास फारच श्रम पडते,

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

त्र जेवणाऱ्या मंडळींत कोणी बुभुक्षित असले तर कितीएक त्यांतील ताटें व वाट्या बगलेस मारून चालते झाले असते. ह्याशिवाय एवढीं ताटें व प्याले खरीद करून ठेवणारा व दुसऱ्यास पाहिजे तेव्हां धर्मार्थ देणारा कोठें सांपडला असता! तर ही सगळी अडचण पत्रावळींनीं आणि द्रोणांनीं दूर केली. ज्या स्थितींत जो पदार्थ पाहिजे तो अडचणीशिवाय सयुक्तिक सांपडावा व तो पाहून दुसऱ्याचें समाधान झालें ह्मणजे त्यांतच कांहीं योजना, किंवा विचार आहेत असें समजावें. सारासार विचार करून कांहीं कृत्य होतें व परिणामीं त्यापासून कांहीं चांगलें निष्पन्न होतें त्यासच शाहणे लोक सुधारणा ह्मणतात. सुधारणा याचा अर्थ असा आहे,— जें वाईट आहे त्याचा त्याग करून चांगलें ग्रहण करणें. दुसरें कांहीं नाहीं. सु ह्मणजे चांगलें, धारणा म्हणजे रचना इतकेंच.

हिंदुलोकांत कांशाच्या, पितळेच्या व रुप्याच्या ताटांत जेवण्याचा प्रघात आहे, तसेंच क्षिर, सांभारें, पायस व तूप घेण्यास अनेक धातूच्या वाट्या घेतात. परंतु मोठ्या जेवणसमारंभांत मात्र यांचा उपयोग करित नाहींत. श्रीमान लोकांत स्नेह्यांस किंवा सुहृत्संबंधी-यांस मेजवानी केली असतां रुप्याचीं ताटें, वाट्या मांडून पाचपंचवीस मनुष्यांचा समारंभ असला तर जेवतात. हिंदुलोकांच्या शास्त्रांतही ताटांत जेवावें असें आहे. परंतु अविचारी लोक मात्र तें निषिद्ध मानितात. याचें कारण अनेक अडचणीच असाव्या, दुसरें कांहीं नाहीं. अलीकडे पारशी, मुसलमान व यहुदी लोक बशा, प्याले इत्यादि चीनाई भांड्यांचा उपयोग करितात व कित्येक पारशी लोक सुऱ्या कांटे यांचाही उपयोग करितात. ही युक्ति त्यांणीं इंग्रज लोकांची ग्रहण केली आहे. आणि या गोष्टींत त्याणीं आपली सुधारणा केली असें ह्मटलें म्हणून चिंता नाहीं. सुऱ्या कांटे, यांचा उपयोग करायाचें कारण बहुतकरून त्यांचें जेवण्याचे पदार्थ भिन्न प्रकारचे असतात इतकेंच. परंतु दुसरे लोक सुऱ्या कांट्यांचा जेवणसमारंभांत उपयोग करित नाहींत म्हणून ते अशिक्षित, न सुधारलेले व रानटी असें म्हणणें केवळ अविचारी दिसतें.

ज्ञानप्रसारक–पु. १२, अं. २ (मे १८६१).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

७

कावळ्याचा घरोटा

प्रत्येक जातिच्या पक्षांचे घरोटे, बांधावयाचा समय, त्यांची आकृति, बांधण्याचा प्रकार व त्यांचें साहित्य निरनिराळें असतें. कित्येक वृक्षांचीं पानें एकांत एक शिवून त्यांत घरोटा बांधितात. कित्येक एकावर एक काठ्या रचून त्यांचा घरोटा बांधितात. कित्येक भिंतींच्या खांचीत गवत, व पिसें घालून त्याचें कोठें करितात. कित्येक नुसत्या गवताचाच बांधितात. कित्येक वाळवंटावर रेतींत घरोटा बांधितात. कित्येक डोंगराच्या कड्यावर, कित्येक जमिनींत दोन, चार हात लांब बिळ पाडून त्यांत घरोटा बांधितात. कित्येक समुद्राच्या किनाऱ्यावर खडकांत आंडीं घालितात. याप्रमाणें प्रत्येक जातीचे घरोटे भिन्न भिन्न प्रकारचे असतात. साधारण लोकांच्या प्रचारांत सुमारें पन्नास, साठ घरोट्यांच्या जाती दृष्टीस पडतात, परंतु जर कोणी तसाच पक्षिशास्त्रवेत्ता भरतखंडस्थ विद्वान् शोधास लागेल, तर तो किमानपक्षीं पांचशें साहाशें निरनिराळे जातिच्या घरोट्याचा शोध लावील; यांत कांहीं भ्रांती नाहीं. प्रत्येक घरोट्याची रचना मोठीच विस्मयकारक आहे. जरी कित्येक घरोटे बाहेरून नुसत्या काठ्या दिसतात. तरी आंतील रचना मोठी चमत्कारीक असती. त्यांत लहान पिल्यास राहण्याजोगती बेतवार जागा असती इतकेंच नाहीं; परंतु त्यांचा कोमळ अंगास त्रास होऊं नये. ह्मणून किती कुशळतेनें जागोजागीं त्यांस मृदुपणा आणणारीं द्रव्यें भरलेलीं असतात. त्यांचा तर्क तरी किती वर्णावा ? एकाद्या पक्ष्यानें घरोटा बांधला, आणि मग त्यापासून त्रास होऊं लागला म्हणून तो मोडून टाकिला असें आजपर्यंत कोठें अढळलें नाहीं, असा त्यांला ईश्वरानें साहजीक तर्क दिलेला आहे. यास कोणी अंगस्वभाव, प्रेरकबुद्धि, पशुज्ञान असेंही ह्मणतात.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

कोंकणांतील अरण्यांत अनेक जातीचे सुंदर पक्षी आहेत. त्यांत कित्येक असे सुंदर शब्द करणारे आहेत कीं, ते ऐकून अंतःकरण केवळ मोहित होऊन जातें. कित्येक असे कर्कश शब्द करितात कीं, त्यांचा ध्वनी कानीं पडला असतां मोठी भीति प्राप्त होती. इतका त्यांचा ध्वनी कर्कश असतो त्याच्या आकृतिही विलक्षण असतात. अंगुष्ठाएवढ्या लहान आकृतिपासून तीन चार हात लांब रुंद अशा आहेत. पक्ष्यांच्या जाति आणि आकृतिप्रमाणें त्यांचा भक्षही निराळाच असतो. कित्येक फळांवरच निर्वाह करितात. कित्येक झाडांचे पल्लवच खाऊन राहतात. कित्येक धान्यच खाऊन राहतात. कित्येक फुलांतील मकरंदच पिऊन असतात. कित्येक जीवजंतु खाऊन असतात. कित्येकांची उपजीविका मछांवरच होती; व कित्येक केवळ मांसभक्षकच आहेत. घार, गरूड पक्षी आणि कित्येक सर्वभक्षक आहेत. परंतु असे फारच थोडे. या जातींत, यांत कावळा व दुसऱ्या एक दोन जाति सांपडतील. जे फळाहारी आहेत ते उपासीं मेले तरी दुसरा भक्ष खायाचे नाहींत.

गोमंतकाकडेस भातकिली म्हणून एक पक्ष्यांची जाति आहे. हा पक्षी शेताच्या बाजूस किंवा माळावर जमिनींत पांच साहा, हात लांब बिळ खणून त्यांत आपला घरोटा बांधितो. ह्या बिळाचें छिद्र पक्ष्याचें शरीर आंत जाईएवढेंच असतें आणि या घरोट्याच्या शेवटास जाण्यास आडवे तिडवे मार्ग असतात. जर कोणी ह्मणेल कीं, बिळाचें तोंड दिसतें. तितकी जागा खणून पक्ष्याच्या घरोट्याचा माग लावीन तर तो कधीं लागायाचा नाहीं, परंतु जर तो ती जमीन औरस चौरस पांच साहा हात, व दीड हात ओंड खणील तरच ह्या पक्ष्यांची आंडीं किंवा पिलें त्यास सांपडतील. तींही मोठ्याच प्रयासानें. हे घरोटे जरीं जमिनींत केलेले असतात, तरी पिल्यांस बसायाची जी जागा असते ती फारच चतुराईनें केलेली असती. त्यांत कापूस, लोंकर, पिसें, असे उष्णता उत्पन्न करणारे पदार्थ असतात. पक्ष्यांस आपले घरोटे बांधायास फारच श्रम पडतात आणि जसी त्यांची आकृती, आणि रचना असेल त्याप्रमाणें पंधरा दिवसांपासून दोनतीन महिनेपर्यंत तो बांधायास काळ लागतो. पंधरा दिवसांचे आंत कोणी पक्ष्यानें घरोटा बांधून तयार केलेला आजपर्यंत कोठें अढळला नाहीं. त्यास घरोटा बांधायास प्रारंभ करायासच फार प्रयास पडतो. आणि तो एकदां सुरू झाला ह्मणजे मग लगोलग सामान गोळा करून तो पुरा करण्याच्या उद्योगांत असतो. दोन कामें त्यांला कठीण असतात, एक घरोटा बांधायास सोयवार जागा शोधून काढणें, आणि दुसरें घरोटा बांधायास प्रथमच सुर्वात करणें. त्यांस हात नसल्यामुळें सगळा उद्योग चोंचीनें करावा पडतो. त्यामुळें अनेक अडचणी पडतात; परंतु तितक्याही दूर करून ते आपले घरोटे नेमाप्रमाणें तयार करितात. कोणी अर्धा घरोटा बांधून तो वाईट झाला ह्मणून टाकून दिला किंवा त्यांत उष्णता कमी झाल्यामुळें तो सोडून गेला असें कोठें होत नाहीं.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

फारच विस्मय करण्याजोगे घरोटे माडाच्या व शिंदीच्या झांवळयास लोंबलेले बाटली-सारिखे लांब आकृतीचे आपल्या दृष्टीस वारंवार पडत असतात. हे घरोटे नाजूक गवताच्या पात्यांचे व झांवळयांचे बारीक तंतू काढून केलेले असून त्यांत चारपांच खण असतात. त्यांस कोणी कोणी खोल्या व माड्या असें ह्मणतात. ह्या घरोठ्यास खालून दार असतें. हे बारीक गवताचे तंतू, हे चिमणे पक्षी कोटून गोळा करितात व एकांत एक विणून त्याचा हात दीड हात लांब शिशीसारखा घरोटा कसा तयार करितात हें मोठेंच नवल आहे. हे एवढे मजबूत चिकटविलेले असतात कीं, मोठें वादळ झालें तरी ते तुटून पडत नाहींत. झोंपाळयासारिख्या त्यांस झोंपा मात्र लागतात. कितीही मोठा पाऊस पडला तरी त्यांत पाण्याचा बिंदूदेखील शिरत नाहीं. एवढे ते मजबूत असतात. वाऱ्याचे झपाट्यानें कदाचित् माडाचीं कवाळेंही तुटून पडतात. परंतु घरोट्यांस धक्का लागत नाहीं. एवढे ते पात्यांत घट्ट शिंवलेले असतात.

ह्या पक्षास इंग्रज लोक बाटल् बर्ड असें ह्मणतात. कारण हे आपला घरोटा बाटलीसारिखा बांधितात. कोकणांत ह्यास शेरकें असें म्हणतात. ह्यांची आकृती लहान साधारण चिमणीपेक्षां किंचित् मोठी असते. हे घरोटे दोनचार वर्षेपर्यंत या पक्ष्यांस उपयोगी पडतात; परंतु दुसरे पक्षी दरखेपेस नवे बांधीत असतात. कित्येक पक्ष्यांची अशी खोड आहे कीं, एकदां आंडीं घातलेल्या घरोट्यांस ते पुनः शिवत नाहींत. घरोटे बांधायास श्रम घेतात तसेंच आपल्या पिल्यांचें रक्षण करण्यांतही पक्षी फार काळजी वाहतात. त्यांचा एक गुण हा आहे कीं घरोटा बांधायास निर्भय स्थल असेल तें ते शोधून काढितात. बहुतकरून मनुष्याची वस्ती नसेल असी जागा ते पाहातात. एकाद्या झाडाच्या पानावर घरोटा बांधायाचा असला तर, जें पान मोठें, घट्ट असेल तें व देंठ गळून पडायास फार दिवस लागतील व त्याजवर घरोटा केला असतां एकाएकीं मनुष्याचा नजरेस येणार नाहीं इतक्या बारकाईनें तो बांधीत असतात. जरी ते इतकी सावधगिरी करितात, तरी दुष्ट लोक, त्यांचे असतील तेथून घरोटे शोधून काढून मोडून टांकितात व त्यांचीं आंडीं व पिलें घेतात. आणि त्यांचा नाश करितात. हा मनुष्यांचा किती निर्दयपणा आहे !

आमच्या घरासमोर अंगण्यांत एक बदामीचा वृक्ष आहे. त्याच्या शिखरावर एक कावळा आज सुमारें सातआठ वर्षांपासून पर्जन्यकाळ समीप आला म्हणजे कोटें बांधायास प्रारंभ करितो. यांत इतकी खुबी असती कीं, मृगाचा पाऊस पडायच्या-पूर्वीं हा घरोटा बांधून तयार होतो. पाऊस पडल्यानंतर घरोटा बांधायासाठीं कावळा काठ्या गोळा करतांना कोठें दृष्टीस पडत नाहीं, मृग जर वैशाखांत लागेल तर हा पक्षी आपलें कोठें फाल्गुन महिन्यांत बांधायास लागतो, ज्येष्ठांत लागेल तर चैत्रांत किंवा अखेरीस प्रारंभ करितो. हा घरोटा बांधायास सरासरी तीन महिन्याचा अवकाश लागतो.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

घरोट्याची सुर्वात करायास किंबहुना पाया घालायास त्यास सुमारें पंधरा दिवस लागतात. प्रथम तो दोनतीन डाहाळ्या एकमेकांच्या शेजारीं व एकमेकांस आधारभूत आहेत, असें पाहून त्यांवर काठ्या रचायास पाहातो. परंतु बहुधा असें होतें कीं, तो काठ्या आणून त्यांवर टांकीत जातो आणि त्या जाऊन खालीं जमिनीवर पडतात. असा तो आठ पंधरा दिवस-पर्यंत सूर्योदयापासून सूर्यास्त होईतोंपर्यंत त्या काठ्या डाहाळयांवर ठरवायास प्रयत्न करितो. यास तो आपल्या अनेक युक्ति लढवितो; कोठें केळींचीं सोपें आणून त्या डाहाळयांस गुंडाळितो; कोठें कोठें बारीक वेलीचे तुकडे आणून त्या डाहाळयांस अडकावितो. कोठें झाडाच्या सालीचे वांक आणून गुंडाळितो. अशा अनेक युक्ति काढून शेवटीं मोठ्या प्रयासानें तो आपलें कार्य सिद्धीस नेतो. जरी पंधरावीस दिवसपर्यंत त्याची एकही काठी त्या डहाळयांवर ठरत नसती तरी तो कंटाळून आपला उद्योग सोडून देत नाहीं, हें त्याचें धैर्य किती स्तुत्य आहे. वास्तविक हा त्याचा गुण मनुष्यांस ग्रहण करण्याजोगा आहे. एकादे समयीं मनुष्य कांहीं उद्योग करायास आरंभितो आणि त्यांत किंचित् अडचण प्राप्त झाली म्हणजे लागलाच घाबरून, तो सोडून देतो. यामध्यें त्याचा किती भित्रेपणा दिसून येतो ! ह्याप्रमाणें पंधरा वीस दिवसांत कावळा आपल्या कोठ्याचा पाया तयार करितो. मग ते उभयतां नर आणि मादी मिळून अनेक जातीच्या काड्या आणून त्या सोयवार पडतील तशा एकावर एक रचून दोन अडीच महिन्यांच्या अवकाशांत तें कोठें तयार करितात. कावळयाचें कोठें शुद्ध बारीक काड्यांचें असतें, परंतु तें मजबूत असून पिल्यांस आराम होण्याचीं सर्व साधनें त्यांत असतात. ह्या घरोट्याचा काठ्या पहाव्या तर त्यांत अनेक जातीच्या झाडीच्या काठ्या असतात. त्यांपैकीं काटेरी झाडीच्या, वांकड्यातिकड्या पुष्कळ असतात. त्यांत अनेक प्रकारचे दोर आडवे तिडवे गुंडाळलेले असतात. तेणेंकरून त्यांस मजबुती येते. मुंबई शहरासारख्या वस्तीच्या जाग्यांत, हे पक्षी अशा अनेक प्रकारच्या काठ्या कोठून जमा करून आणितात हें आश्चर्य वाटतें. घरोट्याचे सामानांतून एकादी काठी कोणी नेली असतां ते त्याचा शोक मानितात. सालमजकुरीं हा घरोटा बांधायास यानीं फाल्गुन महिन्यांत प्रारंभ केला. आणि पूर्ववत् त्यांस प्रथमच्या दोनतीन काठ्या अडकावयास सुमारें सोळासतरा दिवस लागले. प्रतिदिवशीं तो अनेक जातीच्या काठ्या आणी. आणि एक दिवस त्याणें बारीक सुंदर वेत आणिला, आणि तो वहिवाटी-प्रमाणें त्या डाहाळ्यांवर ठेविला. इतक्यांत तो खालीं पडला. तो मी उचलून ओटीवर [आणतों] इतक्यांत तो कावळा झाडावरून खालीं उतरून माझ्या मागें ओटीवर येऊन क्रूर दृष्टीनें मजकडे पाहायास लागला. आणि ती काठी मी परत द्यावी असें दर्शऊं लागला. कावळ्यांस चोरी करण्याची युक्ति समजती; इतकेंच नाहीं परंतु आपण चोरी करितों असेंही त्यांस समजतें असें दिसतें. एक वेळ एका कावळ्यानें कांहीं वस्तु चोरून

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आणून त्या घरोट्याच्या समोर जें घर आहे त्याचा छपरावर कवलांत ती दडवून ठेविली; आणि मग एक दोन घटिकांनीं आसपास कोणी नाहीं असें पाहून तें कऊल उचलून ती वस्तु घेऊन गेला.

तिगस्तां ह्या कावळ्यानें आपला घरोटा तयार केला होता. तो आमच्या चाकरानें आह्मांस न कळतां वर जाऊन कोसळून खालीं पाडिला. तो खालून अगदीं लहान व नुसत्या कांट्यासारिखा वाटे. परंतु खालीं पडला त्यावेळीं त्याची आकृति बरोबर लक्षांत आली. त्याची लांबी सुमारें दिड हात व रुंदी अर्धाच हात होती. आणि त्या काठ्या एकांत एक इतक्या गुंडाळिल्या होत्या कीं, जरी तो घरोटा इतक्या उंचीवरून टांकून दिला होता तरी तो अगदीं कोसळून गेला नाहीं. व त्याच्या काठ्या विस्कलित झाल्या नाहींत. ह्या सर्व सर्व कोठ्याचें वजन सुमारें तीन शेर होतें. अजमासें एकशेर तांदळांचा भात शिजेइतकें त्यांत सर्पण होतें. आणि त्यांत अनेक जातीच्या काठ्या होत्या. हा घरोटा खालीं पाडलेला पाहून त्या कावळ्यास जें दुःख झालें, त्याचें शांतवन करण्यास दोनतीनशें कावळे एकत्र जमून एकच कलकलाट करून टाकिला. ते सगळा दिवसभर त्या जाग्यावर बसून रडत असत. ज्या माणसानें तो घरोटा मोडून टाकिला त्यास पाहून तर ते फारच विलाप करीत. आणि तेव्हांपासून तो त्या झाडावर पानें पाडण्यास चढला कीं, कावळे येऊन त्यास चोचीनें बोचायास लागत. त्याप्रमाणें त्याणीं त्याचा पिछा घेतला, असे हे दीर्घद्वेषी आहेत. कावळा वर्षांतून एकदांच घरोटा बांधितो. व दरखेपेस तीन, चार किंवा पांच आंडीं घालितो, त्यांची आकृति पोफ [पोफळा ?] एवढी असून त्यांचा रंग अस्मानी असतो व त्यावर काळे टिपके असतात. जेव्हां घरोट्यांत पिलें किंवा आंडीं असतात तेव्हां जर कोणी त्या वृक्षावर चढायास लागेल तर त्यास तो टोचायास येतो, इतकेंच नाहीं परंतु शेंदोनशें कावळे त्याजवर तुटून पडतात. व मोठ्यानें ओरडूं लागतात. सालमजकुरीं हा घरोटा नुकताच तयार होत होता, इतक्यांत आमचा माणूस पानें काढायास चढल्यामुळें झाड हालून त्या घरोट्याच्या एकदोन काठ्या खालीं पडल्या, त्या वेळीं पांचपन्नास कावळे जमून मोठा कल्लोळ करून सोडिला. आणि कित्येक त्या माणसास चावायास आले. इतकी यांची जूट असती. जर आमचे भरतखंडस्थ लोक, कावळ्याचा हा गुण ग्रहण करून आपणामध्यें ऐक्य स्थापून परस्परांच्या स्नेहाची वृद्धि करतील तर ते आज किती सुखी होतील. सर्वदा खंडांतील लोक एकाचें दुःख तें सर्वांचें दुःख असें मानून, बांधवांप्रमाणें वागतील तर मग त्यांच्या योग्यतेस वाण नाहीं असें समजावें.

ज्ञानप्रसारक– पु. १२, अं. ३ (जून १८६१).

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

८

अचाट खाणें मसणांत जाणें.

सालमजकुरीं मुंबईंत पर्जन्य अतिशय पडल्यामुळें लोकांस आनंद झाला कीं, पेस्तर सालीं ईश्वर कृपेनें सर्व आबादानी होईल, परंतु ईश्वरी नियमाचा पार कोणास लागतो ! मनुष्याच्या कल्पनेपलीकडे त्याचे नियम आहेत. साधारण मान असें आहे कीं, कांहींतरी पुष्कळ असलें म्हणजे तो सुखी. पाहा ! लोकप्रचारांत असें आहे कीं, ज्याजवळ पुष्कळ द्रव्य आहे तो सुखी, ज्याला सुंदर स्त्री आहे तो पुण्यवान्, जो शरिरानें बळकट व निरोगी आहे तो धन्य; ज्याचें मोठें कुटुंब आहे तो दैववान्; ज्याच्या घरीं अतिशय गाई, म्हशी, गाड्या, घोडे, तो धनवान्; इत्यादि. परंतु सुखी होण्यास केवळ हे विषयच प्राधान्य आहेत असें म्हणवत नाहीं. कधीं कधीं असें होतें कीं या विषयांची अतिवृद्धिच दुःखास कारणभूत होती. कांहीं वर्षांमागें मुंबईंत एक गृहस्थ रहात होता. त्याच्या चार बायका, पांचसाहा मुलगे, सातआठ मोठमोठालीं टोलेजंग घरें आणि जवळ तीन चार लक्षांची माया होती. आणि घोडे, गाड्या आणि पालखी हीं बसायास होतीं, तथापि त्याजवर एकादा असा प्रसंग गुदरत असे कीं, दोन दोन दिवस चणे कुरमुरे फांकून काळ कंठावा पडे; कारण याचे घरांत निरंतर क्षुल्लक कारणावरून कलह होत असत. बायका, मुलगे, मुली, सुना, सासू, सासरा, बाप आणि लेंक यामध्यें हंमेशा भांडणें होत. त्यामुळें आल्या दिवसा घरांतील दोन चार माणसांस उपास काढावे पडत. ह्यावर असें म्हटलें आहे कीं, "जेवढा व्याप तेवढा संताप." आणि ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. मनुष्यास सुख उत्पन्न करणारा विषय म्हणून कांहीं निराळाच पदार्थ, या वस्तूंच्या पलिकडे आहे. असें सर्वांनीं लक्षांत आणिलें पाहिजे. आणि याविषयीं असा श्लोक आहे—

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

" अति रूपवती सीता अति गर्वेण रावणः ॥
अति दानं बलिर्दत्वा अति सर्वत्र वर्जयेत् ॥ १ ॥

कित्येकांस पुष्कळ द्रव्य मिळाल्यामुळेंच त्यांचा नाश झाला. यास रावणाचें उदाहरण. शिकंदर बादशाहा यांस प्राप्त झाल्यामुळेंच तो उन्मत्त होऊन आपला प्रतिस्पर्धी कोणी राहिला नाहीं म्हणून लहान मुलासारिखा रडायास लागला आणि बलांध होऊन अघोर कर्मे करायास लागला, त्यामुळेंच त्याचा नाश झाला. हेलन ही अतिसुंदर स्त्री होती आणि ती प्राप्त झाली ह्मणजे मी सुखी होईन असें मिनिलेअस ह्मणून यूनानी देशांत मोठा बलाढ्य राजा होता त्यास वाटलें होतें; परंतु ती प्राप्त झाल्यामुळेंच त्याच्या राज्याचा विध्वंस होऊन त्याची धूळधाणी झाली. अशीं उदाहरणें अर्वाचीन काळांतही पुष्कळ सांपडतात. कित्येक अतिबळकट असल्यामुळें आपल्या शरिरसंपत्तिच्या योगानें मदांध होऊन भलतेंच करितात, तेणेंकरून त्यांचा नाश होतो. यास उदाहरण सामसन. हा यहुदी लोकांच्या राजकुळांतील एक मोठा बळकट पुरुष होता, ह्मणूनच त्याला आपल्या नेत्रांचा बळी द्यावा पडला. आणि त्याणें आंगमस्तीनें एका मोठ्या वाड्यांत उभें राहून आपला जोर दाखवायासाठीं घराचे स्तंभ व भिंती धक्का मारून कोसळून टाकिल्या आणि लोकांबरोबर आपलाही नाश करून घेतला. अशीच गोष्ट उनाड लोकांची आहे. यास्तव सर्व गोष्टींत परिमित असलें पाहिजे व जें वैभव मनुष्यास प्राप्त होईल तें भोगायास ज्ञान व सहनशीलता पाहिजे ह्मणून असें ह्मटलें आहे—

भोगे रोगभयं सुखे क्षयभयं वित्तेषु राज्ञां भयं ।
विद्या वादभयं तपेंद्रियभयं रूपाद्भयं योषिता ॥
इष्टे शोकभयं रणे रिपुभयं काये कृतांताद्भयं ॥
इत्थं जन्म निरर्थकं क्षितितले विष्णोः पदं निर्भयम् ॥ १ ॥

या श्लोकांतील रहस्य इतकेंच घ्यावें कीं, विद्या, सौंदर्य, धन, राज्य, किंबहुना शरिरसंपत्तिदेखील नाशवंत आहेत. आणि अनादिसिद्ध जो ईश्वर त्याच्या चरणांवांचून कोणतेंच निर्भय स्थळ नाहीं. ह्मणून हीं प्राप्त झालीं असतां कोणी अहंकार बाळगूं नये.

पाहा! पाऊस यथास्थित पडला पाहिजे, तरच त्यापासून देश सुपीक होतो. आणि सर्वत्र आबादानी होती. तो अगदींच पडला नाहीं तर सुका दुष्काळ पडतो. आणि अतिशय पडला तर ओला दुष्काळ पडतो. म्हणून अगदीं न पडणें किंवा अतिशय पडणें क्षेत्रफळ सारिखेंच होतें. यास्तव मनुष्यास संतति, संपत्ति व आरोग्य वगैरे सर्व सुख देणारे विषय अतिशय नियमितच असले पाहिजेत. कोणतेही विषय अति असणें किंवा अगदींच नसणें हीं दोनही सारखींच होतात. ह्मणून एक साधू म्हणतोः—हे ईश्वरा, मला श्रीमंत करूं नको, अथवा अगदीं दरिद्री करूं नको. कारण संपत्ति अति झाली तर

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

मी उन्मत्त होऊन तुला विसरून जाईन, दुसरें अगदींच दरिद्री झालों तर तुझे आज्ञेचा भंग करून चोरी वगैरे कुकर्म करायास प्रवृत्त होईन.

कोणताही विषय अतिशय झाला ह्मणजे त्यापासून सुख होण्याबद्दल उलटी इजा होती, म्हणून " अति सर्वत्र वर्जयेत् " असें म्हटलें आहे. मिष्टान्न मिळालें म्हणून अधासी-पणानें पुष्कळ खाल्लें तर त्याचा परिणाम काय होतो हें सर्वांस माहितच आहे. त्याच-प्रमाणें सर्व गोष्टी आहेत. मनुष्यांस सुखी किंवा दुःखी करण्यास त्यांचें आचरणच कारण आहे, ईश्वरी नेमास अवलंबून चाललें असतां सुख होतें, आणि त्याचे उलट केलें ह्मणजे दुःख होतें. आणि याचें उदाहरण दाखविण्यासाठीं ईश्वर कधींकधीं सृष्टीमध्यें विपरीत प्रकार करून दाखवितो. ह्मणजे कधींकधीं अगदींच वृष्टी करीत नसतो, कधींकधीं अतिशय करितो आणि यापासून कसकसे परिणाम होतात, ते आमच्या दृष्टीस पाडितो.

हा प्रकार केवळ मनुष्यांमध्येंच किंबहुना प्राण्यांमध्येंच दिसतो असें नाहीं; परंतु वनस्पतिचाही प्रकार असाच असतो. ज्या वर्षी पाऊस अगदींच पडत नाहीं त्या वर्षी त्यांचा नाश होतो. ज्या वर्षी कमी पडतो त्या वर्षी त्यांची वृद्धीही कमी असते. ज्या वर्षी नियमित पडतो त्या वर्षी त्यांची आबादानी असती आणि ज्या वर्षी अतिशय पडतो त्या वर्षी त्यांचा अनेक प्रकारें नाश होतो. कित्येक मोठमोठाले वृक्ष उलथून पडतात. धान्यादिकांस अनेक रोग होऊन त्यांचा नाश होतो. केव्हां केव्हां एकाद्या वृक्षास फारच फळें लागल्यामुळें त्यांच्या भारानें त्याच्या डाहाळ्या तुटून पडतात. या प्रकारें अतिशयपणा झाला आणि सांवरायाचें सामर्थ्य नसलें ह्मणजे तोच नाशास कारणभूत होतों. तसाच प्रकार मनुष्यांमध्येंहि असतो, परंतु जर त्याच्या अंगीं विचाररूप टेंके असले तर मात्र त्याजवर कितीही भार पडला तरी तो सांवरून घेतो. परंतु कोणताही विषय अतिशय असण्याची इच्छा कोणी मुळींच धरूं नये.

मनुष्यांनीं केलेलें अनुमान किती खोटें ठरलें तें पहा. एक दिवस सतत पाऊस पडत होता, इतक्यांत कोंकणांतून एक ब्राह्मण आला. मग आगतस्वागत झाल्यावर यंदा पाऊस चांगला लागतो तर अर्थातच जिकडे तिकडे सुकाळ असेलच आणि पेस्तरसालीं तर तुमची घमंडीच आहे असें बोलणें झालें. त्यास ब्राह्मणानें असें उत्तर केलें, यंदा पाऊस पुष्कळ पडला इतकेंच, पण तो शेताभातास पाहिजे तसा नाहीं. यावरून कांहीं शेतेंदेखील बुडतील. हें त्याचें भाषण ऐकून मनास मोठा अचंबा वाटला आणि मनुष्यांच्या कल्पने-बाहेर ईश्वराचे नियम आहेत असें तोंडांतून निघालें हें किती वास्तविक आहे तें पाहा.

मनुष्यास सर्वकाळ सुख असणें हेंही त्याच्या नाशास कारण. पाणी हें सर्वांचें जीवन आणि वनस्पती तर सर्वकाळ त्यावर असती. परंतु तेंच जर नेमापेक्षां अधिक झालें तर मारक होतें. सुख हें मनुष्यास कल्याणकारक आहे परंतु तेंच अतिशय झालें

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

म्हणजे त्यास अपकारक होतें. म्हणूनच "सुखे क्षयभयं" असें म्हटलें आहे. पृथ्वीवर अनेक रोग, दुःखें, व्याधी, उपाधी किंबहुना मृत्यु हीं ईश्वरानें करून ठेविलीं आहेत, तीं मनुष्यास श्रेयस्करच आहेत. हीं जर नसतीं, तर मनुष्य पशुपेक्षां नीच स्थितींत पोंहचता, यांत संशय नाहीं. मनुष्याचें बोलणें, खाणें, पिणें, करणें, मागणें, तशाच सर्व त्याच्या इच्छा व वासना नियमित असल्या पाहिजेत. नियमाबाहेर गेल्या कीं, तो चौऱ्याशींच्या फेऱ्यांत पडला ह्मणून समजावें. ह्मणजे तो ईश्वरापासून भ्रष्ट होतो. तृप्ति हेंच ह्या पृथ्वीवर अमोलीक रत्न आहे असें एक चतुर मनुष्य म्हणतो आणि ज्याला तें सांपडतें तोच सुखी होतो. एक साधू सर्वकाळ संतोषवृत्तींत असून सर्वकाळ प्रसन्न वदन असे. अशी त्याची मुद्रा पाहून एका तरुण गृहस्थानें त्यास एक दिवस असें विचारिलें—वृद्ध-बावा, तुह्मी पाहावें तेव्हां इतके तृप्त दिसतां त्याचें काय कारण ? त्यास त्याणें असें उत्तर केलें,—बाबा ! ऐक. मी सर्वकाळ वर पाहतों आणि मनांत असें म्हणतों कीं, मी ह्या पृथ्वीवर केवळ प्रवासी आहें आणि माझें मुक्काम वर होणार तर मला तेथें राहाण्याची सामग्री केली पाहिजे. आणि जेव्हां मी पृथ्वीवरील सुखाच्या नाशवंतपणाकडे पाहातों तेव्हां मला पाहिजे त्यापेक्षां ईश्वरानें पुष्कळ दिलें आहे, असें माझ्या ध्यानांत येऊन मला संतोष होतो.

एक दिवस एका श्रीमंताचे बागेंत फिरायास गेलों होतों, तेथें एक सुंदर लहान पोपनीसाचें झाड होतें, आणि त्यावर पन्नास पाउणशें पिवळ्या व हिरव्या रंगाचीं पोपनसें लोंबत होती. परंतु शेवटीं असें झालें कीं, त्या पोपनसाच्या भारानें तें झाड अगदीं जमिनीवर पडून त्याचा नाश झाला हें पाहून मनांत आलें कीं, मनुष्यानें कोणत्याच प्रसंगीं अतितृष्णाच करूं नये म्हणून ईश्वर हीं उदाहरणें आम्हास दाखवितो, तीं पाहून जर आम्हीं शुद्धिवर आलों नाहीं तर आम्हास आमचे हित करितां कधीं येणार नाहीं.

"अतितृष्णा न कर्तव्या चक्रं भ्रमति मस्तके," असें एक वचन आहे त्याजकडे लक्ष देऊन वागावें.

ज्ञानप्रसारक पु. १२, अं. ९ (डिसेंबर १९६१).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

१

बळी तो कान पिळी.

ह्या लहानशा वाक्याचा अर्थ किती खोल आणि यांतून किती विचार उत्पन्न होतात पाहा ! बळ हें किती प्रकारचें आहे याची प्रथम कल्पना करूं. बाहुबळ, सत्ताबळ, संपत्तिबळ संततिबळ, विद्याबळ, ज्ञानबळ, तपबळ, स्नेहबळ, आणि ऐक्यबळ इतकीं हीं बळें आहेत. याचा जसजसा उपयोग करावा तसतसा यांपासून बरा किंवा वाईट परिणाम होतो. शहाण्या मनुष्याच्या अंगीं हीं बळें असलीं तर त्यांपासून अनंत कल्याण होतें. आणि हीं त्यास रत्नखचित भूषणापेक्षांही शतगुणीं विशेष शोभा देतात. यावरूनच आमचे लोक ह्मणतात कीं, वस्तूमध्यें किंवा जीवामध्यें साधारण क्रमापेक्षां विशेष गुण तो ईश्वराची विभूती. पिंपळ, वट, समुद्र, पर्वत, आकाश, पृथ्वी, सूर्य, चंद्र, ग्रह, राजे, धन, हत्ती, घोडे, इत्यादिकांची पूजा करण्याचा प्रघात पडण्याचें हेंच कारण झालें कीं, हे साधारण विषयांपेक्षां अधिक बळकट. कोणी पुष्कळ धनवान् असला ह्मणजे लोक त्यास पुण्यवान् मानून त्यास ईश्वरासारिखा मानितात. याचप्रमाणें एकादा योद्धा मोठाच पराक्रमी निघाला असतां लोक हा कोणी ईश्वरी अवतार आहे, असें समजून त्याचे अंकित होऊन जातात. तसेंच कोणास राज्य प्राप्त झालें ह्मणजे तो विष्णूचा अवतार मानितात. यावरूनच " ना विष्णुः पृथिवीपतिः " असें ह्मणतात.

बळी तो कानपिळी याचा अर्थ इतकाच कीं ज्याच्या अंगीं वर सांगितलेले विषय असतात त्याच्या स्वाधीन लोक होऊन तो सांगेल त्याप्रमाणें त्यांस वागणें भाग पडतें. मग तें बरें असो किंवा वाईट असो, खरें असो किंवा खोटें असो, हितावह असो किंवा हानिकर असो. त्याला आपल्या ज्ञानाचा व बुद्धीचा व शक्तीचा विचार केल्यावांचून निमुटपणी तें ग्रहण करणें भागच पडतें. ह्यासच सत्तेपुढें शहाणपण चालत

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

नाहीं असें ह्मणतात आणि बळी तो कान पिळी ह्यांतच ह्याचा भावार्थ येतो. शहाण्याच्या अंगीं असें सामर्थ्य येतें तेव्हां तो सारासार विचार करून जें उचित असेल तेंच लोकांकरवीं करवितो आणि तें करण्यास प्रत्येकाच्या मनाची मोकळीक देतो. ह्मणजे जरी लोक त्याचें सामर्थ्य पाहून आपले विचार एकिकडे ठेवून त्याच्याच विचारास अवलंबून राहातात, तरी तो त्यांस आपल्या बळाच्या दांडगेपणानें आपणाकडे ओढून घेतो असें त्यांस समजूं देत नाहीं. ह्यासच बुद्धिकौशल्य ह्मणतात. जे बुद्धिमान व सन्मार्गवर्ती असतात ते बसल्या ठिकाणींच स्वसंतोषानें लोकांचीं मनें आपणाकडे आकलन करून घेतात. ह्मणून त्यांच्या बळापासून दुसऱ्यास इजा होत नाहीं आणि जे उन्मत्त असतात ते आपल्या बळाच्या योगानें व जबरीनें लोकांचीं मनें हरण करितात, तेणेंकरून त्यांच्या बळाचा लोकांस तिरस्कार येतो, आणि त्याच्या आटोक्यांतून जितकी वेगळें पडायाची संधि सांपडेल तितकी शोधीत असतात. द्वाड लोकांच्या बळापासून लोकांस उपद्रव होऊं लागला आणि त्यांला आपल्या बुद्धीचा व ज्ञानाचा उपयोग करायास सांपडला नाहीं म्हणजे बळी तो कानपिळी असें ह्मणतात.

आतां हालमस्त आणि मालमस्त असे दोन प्रकारचे मस्त आहेत, ह्यांस माल अंध आणि हाल अंध असेंही ह्मणतात.

जे आपल्या बळामुळें किंवा ऐश्वर्यामुळें उन्मत्त होतात त्यांस मालमस्त असें म्हणतात आणि जे आपल्या विपत्तीची बेपरवा करून उन्मत्त होतात त्यांस हालमस्त असें ह्मणतात. ह्या दोन्ही प्रति पृथ्वीवर दृष्टीस पडतात.

जे आपल्या ऐश्वर्यामुळें उन्मत्त होतात त्यांस मदांध असें ह्मणतात. ह्मणजे ते आपल्याजवळ जें असतें त्यामुळें इतके गर्विष्ठ होतात कीं, त्यांस कांहीं दिसत नाहीसें होतें. असे विद्येच्या योगानें, द्रव्याच्या योगानें, बळाच्या योगानें, स्वरूपाच्या योगानें, व सत्तेच्या योगानें इतके अंध होऊन जातात कीं, त्यांस आपण कोण आणि करितों काय याचें भान नसतें. अशांची स्थिति जन्मांधापेक्षांही वाईट आहे. आणि असे जे आपल्या ऐश्वर्यामुळें अंध होऊन जातात त्यांजकडूनच दुसऱ्यांवर जुलूम होतो आणि असा जुलूम झाला ह्मणजे लोक "बळी तो कानपिळी" असी ह्मण ह्मणतात.

आतां हालमस्त हेही मालमस्तासारिखेच मस्ति करितात, परंतु त्यांच्या अंगीं सत्ता व एश्वर्य नसल्यामुळें त्यांच्यानें कांहीं होत नाहीं. व ते आपली वाचा हेंच आपलें सगळें भांडवल असें मनांत आणून "मुखमस्तीति वक्तव्यं" ह्या नेमानें दुसऱ्याची परवा न बाळगितां आपलें कार्य सिद्धीस गेलें, ह्मणजे पाहिजे तसे दुसऱ्यास दुरुत्तरें करून बोलत असतात. ते हालामुळें जिवावर उदार झालेले असतात. ह्मणून ते एकाद्या सत्ताधाऱ्यासदेखील अपशब्द बोलायास किंवा त्याच्या अंगावर सरसावून जाण्यास चुकणार नाहींत. त्या प्रतींत कित्येक तैलंग, भिक्षुक-ब्राह्मण, गोसांवी, फकीर, संन्यासी, इत्यादिक आहेत.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

एकवेळ असें दृष्टीस पडलें कीं, एका मोठ्या श्रीमंतास एक भिकारी त्याच्यासमक्ष अशीं दुरुत्तरें बोलला कीं, तीं जवळ होते त्यांच्यानीं ऐकवत नाहींतसीं झालीं, परंतु त्या बिचाऱ्या श्रीमंताच्यानें त्यास कांहींच करवत नाहींसें झालें. कारण तो मनुष्य एवढा निःसंग झाला होता कीं, शिपायास आणि कनिष्टेब्लासदेखील शिव्या देत सुटला आणि सांगे कीं, आपणास नेऊन तुरुंगांत घाला आणि शिक्षा करा. तुरुंगांत घातलें तर चार महिने खायास मिळेल. ह्यार्णे इतका कहर करायाचें कारण हें कीं, तो कैफ करायास एक पैसा मागत होता तो त्या भल्या गृहस्थानें दिला नाहीं :—हालमस्ताचे उपद्रव या प्रकारचे आहेत.

ह्याप्रमाणें हालमस्त आणि मालमस्त या दोघांहीकडून मनुष्यास उपद्रव होतो. ह्मणून ज्या मनुष्यास आपल्या ऐश्वर्याचा चांगला उपयोग घेतां येत नाहीं, त्यास ईश्वरानें मध्यम स्थितींत ठेवावें हें उत्तम आणि जे ज्ञानी व सदसद्विचारी असतात ते हीच अवस्था पसंत करितात. मनुष्याला कोणत्याही प्रकारचा अतिशयपणा प्राप्त झाला कीं त्याकडून आपल्या कर्त्तव्य कर्मांत गफलत होतीच. जर तो त्यापासून विरक्त असला तरच मात्र त्यापासून त्याची हानी होणार नाहीं. परंतु अशी अवस्था प्राप्त झाली असतां तिच्या अनुरोधाशिवाय चालणारे विरळा. केवळ सात्विक भाव असल्याशिवाय त्या मनुष्यास आपल्या ऐश्वर्यापासून विरक्त होणें महत् कठीण आहे. मनुष्याचें अंतःकरण स्वभावतः विषयासक्त आहे. आणि त्यास ह्याच्या संबंधाशिवाय वेगळें राहणें म्हणजे मोठें जड जातें.

मनुष्यास ह्या बळांपासून किती उपद्रव भोगावा लागतो याचा विचार न केला असतां त्याचा परिणाम चांगला होत नाहीं.

एकदां वर सांगितलेले विषय एकाद्यास प्राप्त झाले कीं, तो पहिल्यानें आसपास पाहातो आणि आपल्या बळाच्या आवाक्यांत सगळ्यांस आणायाचा प्रयत्न करितो. परंतु त्याचें बळ सगळ्यांवर सारिखें पोंहचत नाहीं. कारण हा एकला आणि बाकीचे पुष्कळ-आणि जरी त्यामध्यें थोडें थोडें सामर्थ्य असतें तरी त्यांचा पुष्कळ जमाव असल्यामुळें त्याचें एकट्याचें सामर्थ्य त्यांस पुरत नाहीं. ह्मणून तो आपल्या बरोबरीची एकदोन बळें जमवून त्यावर आपली सत्ता घालितो. मग त्याच्यापुढें कांहीं इलाज चालत नाहीं. परंतु सर्वांवर छाप पडणें ह्मटलें म्हणजे नुसत्या बळाशिवाय दुसरे सात्विक भावांतील गुण मनुष्यामध्यें असले ह्मणजे तो सर्वांचीं मनें आकलन करायास समर्थ होतो. बळानें किती प्रयत्न केला तरी त्यामध्यें मजबूतपणा नसतो. कारण केवळ सत्तेच्या बळानें अथवा कांहीं एक आमिषाच्या आस्थेनें ते त्याच्या जाळ्यांत सांपडतात, परंतु त्यांत किंचित् कमीपणा आला कीं लागलेच त्याला सोडून वेगळे पडतात. आणि ज्यांस ते पूर्वी देवाप्रमाणें मानीत असत त्यांस स्वतः दगड मारावयास उभे राहतात. ह्मणून मनुष्यानें आपल्या सात्विक उपयांनीं ह्मणजे दया, शांति, क्षमा,

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

औदार्य, प्रामाणिकपणा, लीनता, सत्य, शौच, परोपकार, ईश्वरभक्ति, ईहींकरून लोकांचीं मनें आपणाकडे वळिवलीं पाहिजेत. मोठमोठाले शककर्ते व साधु होऊन गेले त्यांणीं याच गुणांनीं पृथ्वी जिंकली आणि सर्व लोक आपलेसे केले. ईर्षामर्षानें लोकांचीं मनें जिंकीन ह्मटलें तर कधीं सिद्धीस जाणार नाहीं, हें पक्कें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

कोणी एक पराक्रमी आणि सत्ताधारी असला आणि त्याला इच्छा झाली कीं, शहरांतील बहुतेक लोक आपल्यास वश असावे व त्यांणीं स्वमतानुयायी व्हावें, तर प्रथम त्यास आपल्या सत्तेचा जोर एकीकडे ठेवून लीनता धरिली पाहिजे. नंतर निष्कृत्रिम भावानें त्यांजकडे नमून त्यांचीं मनें आपणाकडे साहजिक वळिवलीं पाहिजेत. जेणेंकरून त्यांस असें होईल कीं, याच्या मतास किंवा याच्या पक्षास अनुसरून असल्याशिवाय सुख वाटूंच नये. आतां यांत कोणास अशी इच्छा झाली कीं आपणांतील सर्व एक मत्तानें वागणारे असावे. तरी विरुद्ध मत्ताचे जे लोक असतील त्यांत हटवादी, दुराग्रही, स्वमताभिमानी असे जे असतील त्यांचीं मनें आकलन करण्यास प्रथम प्रयत्न करावा आणि असे लोक स्नेहाच्या योगानें, आर्जवाच्या योगानें, प्रीतीनें आपणाकडे वळले असें झालें ह्मणजे दुसऱ्यांस आपणाकडे ओढण्यास प्रयत्न करावे. परंतु जर कोणी दुसरा नाहीं व अभिमानी लोकांचा तिरस्कार करून आपल्याच आंगमस्तीनें एकादी गोष्ट प्रतिपादन करीन ह्मणेल तर ती सिद्धीस जाणार नाहीं. कारण जे दुराग्रही आहेत ते, जे साधेभोळे असतील त्यांसही आपल्या मताकडे नेऊन जिकडे तिकडे औदासीन्य आणि फुटाफूट पडे असें करून कोणतेंच कार्य सिद्धीस जाऊं देणार नाहींत, कोणतेंही कृत्य आंगमस्तीनें केलेलें चिरकाळ टिकत नाहीं. “बळी तो कान पिळी” याचा अर्थ इतकाच कीं, जोंपर्यंत त्यास सामर्थ्य असतें तंवपर्यंत त्याचें चालतें. मग तें थोडें थोडें कमी होत चाललें ह्मणजे तेच उलटे त्याचा उपमर्द करावयास प्रवृत्त होतात ह्मणून अशा ऐश्वर्यावर भरवसा ठेवून एकादें मोठें कृत्य करायास कोणी एकाएकीं पुढें होऊं नये. आपल्या शांति, दया आणि परोपकारबुद्धीच्या बळानें व स्वसंतोषानें जितकें होईल तितकें करावें, तेंच हळू हळू वृद्धीस पावून सुखावह होतें.

मनुष्यें सर्पास मारायास उद्योग करितात परंतु गांडुळास मारायाचा कोणी उद्योग करित नाहीं. सर्पास मारिल्यानें लोकांचें कल्याण होतें. तसाच प्रकार हट, दुराग्रह, इत्यादि मनुष्याच्या आंगीं सर्परूप दुर्गुण आहेत आणि अशा दुर्गुणांची ज्या मनुष्यामध्यें वृद्धी असती ते जें करितील त्याचा परिणाम सर्पदंशासारिखाच होईल, ह्मणून त्यांचे ते विषाचे दांत काढिल्याशिवाय जें करणें तें व्यर्थ. एथें इतकेंच सांगायाचें कीं, जर कोणास एखादी नवीन उलटापालट करायाची असली तर ज्या मोठ्या अडचणी असतील त्या प्रथम दूर करण्यास प्रथम उद्योग करावे.

ज्ञानप्रसारक-पु. १३, अं.१ (एप्रिल १८६२).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

१०

भरतखण्डांतील कारागिर*

साम्प्रत इङ्ग्लंड देशानें आमचा लोकांचीं मनें इतकीं वेधिलीं आहेत, कीं विलायतेशिवाय दुसऱ्या देशांतील कितीहि चांगली वस्तु असली तरी तिजवर त्यांची भक्ति बसायाचीच नाहीं. कांहीं चांगली वस्तु पाहिली ह्मणजे ती विलायती! देश कोणता चांगला? विलायत! उत्तम प्रकारचा वस्तु कोठून येतात? विलायतेहून? वनस्पति चांगल्या कोठें होतात? विलायतेंत! शहाणे लोक कोठें राहतात? विलायतेंत! विद्येचें स्थान कोठें? विलायत! कारीगर कोठें असतात? विलायतेंत! चांगल्या औषधी कोठें उत्पन्न होतात? विलायतेंत! याप्रमाणें कोणत्याहि पदार्थास विलायतेचें विशेषण लावलें ह्मणजे त्यास योग्यता आली व त्याची किम्मत वाढली, मग तेथें विचार करणेंच नलगे. त्याचा स्पर्श परिसासारिखा अमोलिक झाला आहे. अहो, या विलायतेचें माहात्म्य काय सांगावें? आमचा देशांतील रानझाडांसदेखील इंग्रेज लोकांचा हात लागला, ह्मणजे त्यांची किम्मत स्वर्गीय पुष्पासारिखी होती; मग त्यापासून फूल, फळ, किंवा सुगंध येवो किंवा न येवो, फक्त विलायती या नावावरूनच तें राजमान्य होतें! आतां असें कां होतें? विलायतेंतील लोक देव आहेत? किंवा त्यांणीं चेटक साधन केलें आहे? नाहीं. तर मग ह्यांचा एवढा अद्‌भुत प्रकार कसा होतो? व्यवहारचातुर्यानें. त्यांचें सर्व चेटक, दोन :—उद्योग आणि सारासार विचार; दुसरें कांहीं नाहीं.

कांहीं वर्षांमागें एका इंग्रेजानें एक बाग तयार केला होता आणि त्यांमध्यें खंडाळें, खोपवली, ठाणें, अलिबाग, वाळकेश्वर इत्यादि ठिकाणचा डोंगरांतील व रानांतील

---

* स. १८६२, माहे मार्चमध्यें दिलेल्या व्याख्यानाचा सारांश.

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

साधारण छायावृक्ष, व दुसरीं रानझाडें आणून कोंड्यांत लाविलीं; आणि त्यांजवर टिकिटा वगैरे मारून जिकडे तिकडे चाखचोख करून त्यांची पाण्याची वगैरे नीट सोय ठेविली. मग काय विचारतां! महिन्या दोन महिन्यांनीं हीं झाडें विलायतीच बनून गेलीं! श्रीमंत लोक तीं पाहावयास जाऊं लागले. तीं आपल्या बागांत असावीं अशी इच्छा बडे लोकांस झाली. विलासी लोक त्यांस दुप्पट तिप्पट किम्मत देण्यास तयार झाले. मग जो तो त्याचा बागांतून शेंकडों रुपये खर्चून विलायतेचा नावावर तीं झाडें खरेदी करूं लागला. जीं झाडें पूर्वीं ते आपल्या गाडीखालींदेखील तुडवायास कांकूं करित नसत, तींच आतां देवावर चढूं लागलीं! याप्रमाणें विलायतेचा नावावर आज गार, हिऱ्याचा मोलानें खपत्ये. हें कां म्हणाल, तर त्या लोकांचा उद्योग व व्यवहारचातुर्य; दुसरें कांहीं नाहीं.

भरतखंडांतील पूर्वींचे लोक शिल्पशास्त्रामध्यें व दुसऱ्या कलाकौशल्यामध्यें मोठे प्रवीण होते, याविषयीं आह्मांस पुष्कळ प्रमाणें सांपडतात; परंतु आम्हांस त्यांचें अगत्यच नाहीं. आमचा लोकांनीं केलेलीं कृत्यें पाहाण्याची तरी आह्मांस हौस कोठें आहे? त्यापुढें दुसऱ्याचा इलाज नाहीं. अहो, मुंबईचा आसपास कालें, घारापुरी व दुसऱ्या ठिकाणीं पुरातन लोकांनीं पोखरलेलीं देवालयें व सुंदर कोरींव मूर्ति पडलेल्या आहेत, त्यांचा शोध करावयाची आह्मांस कधीं इच्छा उत्पन्न होत्ये काय? आजपर्यंत या प्रकरणीं जें काय केलें तें इंग्रेज लोकांनीं आणि त्यांणींच काय ते हल्लीं आमचा लोकांचे थोडेसे डोळे उघडिले आहेत. सुज्ञ इंग्रेज लोक आमचा लोकांचे हस्त-कौशल्य व चातुर्य पाहून माना डोलवितात, आणि आम्ही विचार न करितां आमचा लोकांचा जा त्या गोष्टींत उपहास करायास मात्र पुढें सरसावतों. आमची भाषा निरुपयोगी, आमचे विद्वान् मूर्ख, आमचे कारीगर अडाणी, आमचे व्यापारी लबाड, आणि आमचे लोक आळशी, इतकें म्हणायास मात्र आम्हांला समजतें. परंतु ते कोणत्या गोष्टींत आळशी आणि कोणत्यांत उद्योगी, याचा विचार करण्याचा खटपटींत आम्ही पडत नाहीं, ही किती दुःखाची गोष्ट आहे! आम्हांला आमचा पायांखालचा वस्तु दिसत नाहींत; म्हणूनच इंग्रेज लोक आम्हांस हसतात. जेव्हां आम्हांस आमचा देशांत बरें काय आणि वाईट काय आहे, हें दृष्टीस पडेल, तेव्हांच आमचे आंगीं पोक्तपणा येईल आणि आम्ही सुखी होऊं.

एक ख्रिस्ती मित्र गतवर्षीं आबूचा पाहाडावर गेला होता. तो तेथील चमत्काराविषयीं असें लिहितो:— हिंदू लोक म्हणजे एवढे बुद्धिमान्, कुशल आणि उद्योगी आहेत, याविषयीं आजपर्यंत मला भ्रांतीच होती, परंतु जेव्हां मी आबू पाहाडावरील देवालयें व त्यांतील कांतीव व कोरींव कामें पाहिलीं तेव्हां माझी खातरि झाली, कीं हिंदु हे पूर्वीं कुशल व बुद्धिमान होते, इतकेंच नाहीं, परंतु ते मोठीं अचाट कृत्यें करण्यांत पुढारी होते. हें देवालय उंच पाहाडावर बांधिलें असून त्याची रचना मोठ्या चमत्कारिक रीतीनें

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

केली आहे. त्यांत तो दुसरे असें लिहतो, कीं हिंदु लोकांनीं अशा ठिकाणीं जाऊन असे चमत्कार पाहावे, ह्मणजे त्यांस आपल्या पूर्वजांचीं कृत्यें दृष्टीस पडतील; आणि कदाचित् तीं पाहून त्यांस उत्तेजन येईल; परंतु हा उगीच खोटा समज. आमचा लोकांनीं तें एकदा सोडून हजार वेळां पाहिलें तरी, उपयोग काय ? आबू पाहाडावर यात्रा करून आलेले एथें शेंकडों लोक आहेत, परंतु उपड्या घड्यावर पाणी. आजपर्यन्त याप्रकारचें या स्थळाचें वर्णन केलेला हिंदूंमधील कोणीच अढळला नाहीं. या गोष्टी त्यांचा मनांत भरायाचाच नाहींत आणि त्यांला त्याची गरजहि नाहीं. ते अद्यापि कुंभकर्णी निद्रेंतच आहेत. विलायती धुराचा दिव्यांनीं त्यांचे डोळे दिपून गेल्यामुळें, त्यांस आपल्या स्वदेशांतील हिरे हे, कांचेचे तुकडे दिसत आहेत.

कपतान सिली याणें "वेरुळांतील चमत्कार" या नावाचा एक सुरस ग्रंथ रचिला आहे. त्यांत तो हिंदु लोकांचा कुशलतेविषयीं पराकाष्ठेची स्तुति करतो, आणि असें ह्मणतो, कीं वेरुळामध्यें जें देवालय आहे तें वास्तविक अद्भुत कृत्य असून एथील चमत्कार अवर्णनीय आहेत. दुसरें तो असें ह्मणतो, कीं ब्रूससाहेब जेव्हां प्रथमच मिसर देशांत गेले होते तेव्हां त्यांस नील नदीचें पात्र व तिची अचाट गति पाहून जो विस्मय झाला, तो यापुढें कांहींच नाहीं. पृथ्वीवर पुष्कळ चमत्कारिक कृत्यें आहेत, परंतु यास लागण्याजोगतें कोठें अढळत नाहीं. इङ्लंड देशांत मोठमोठाले कवि होऊन गेले, त्यांणीं कित्येक नामाङ्कित स्थलांचें वर्णन मोठ्या तारतम्यानें केलें आहे, परंतु या देवालयाची रचना पाहिली असतां, त्यांची मति कुंठित होईल, यांत कांहीं संशय नाहीं; आणि त्याजकडूनहि या स्थलाचें वर्णन यथातथ्य होणार नाहीं. या स्थलाचें नाव कैलास आहे आणि वास्तविक हें कैलासच आहे ! पुढें तो स्पष्ट असें ह्मणतो, कीं जा वेळीं आमचे (इंग्रेज) लोक केवळ रानटी स्थितींत होते, त्या वेळीं हिंदु हे या प्रकारचा सुधारणुकेचा शिखरास पोंहचले होते. हें किती नवल मानण्याजोगें आहे !

अहो, इंग्रेजी पदार्थ कोणते चांगले आणि कोणते वाईट, याचा कोणी विचार करितात काय ? नाहीं. विलायती नाव पडलें ह्मणजे झालें. मग त्या वस्तु कशाहि असल्या तरी चालतात. जेव्हां गायनकला शिकलेले इंग्रेज इंग्रेजी वाद्यें वाजवितात, तेव्हां त्यांचा नाद मनोहारक असतो. त्यांत अनेक सूर असतात; त्या त्या प्रमाणें तीं वाजविलीं म्हणजे त्यांपासून सुस्वर उत्पन्न होऊन मन संतुष्ट होतें. आतां काय विचारतां ? कशींही आबडधोबड वाद्यें असोत आणि तीं वाजविणारे खलाशी किंवा रस्त्यावरील हेलकरी, ह्मार किंवा चांभार असोत, त्यांचा आंगीं इंग्रेजी पोशाक चढला व हातांत इंग्रेजी बाजा असला, ह्मणजे लग्न, मुंज किंबहुना देवालयाची अर्चा करितेवेळींदेखील चालतो; त्यापुढें आमचें स्वरमंडळ, जलतरंग, रुद्रवीणा, सतार, ब्रह्मवीणा, सुरसोट, वीणा, सारंगी,

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

पखवाज, करताल, सनई, सूर, चौघडा इत्यादि सुस्वर वाजवणारा मूर्ख ठरतो, आणि आमचीं हीं वाद्यें केवळ कुतऱ्याचा भुंकण्यासारिखीं अप्रयोजक होतात. अर्थात,—

समर्था घरींचें श्वान ॥ त्यास देती सर्वहि मान ॥
काकविष्ठेचा पिंपळ ॥ त्यास निंद्य कोण ह्मणे ॥ १ ॥

(व्यंकटेशस्तोत्र)

अहो, इङ्ग्लण्ड देशाचा भाग्योदयाचें किती वर्णन करावें ! त्यांणीं हातांत माती धरिली, तरी तिचें सोनें होतें, आणि आमचा प्रकार केवळ उलटा होतो. पाहा, इङ्ग्लण्ड देशांतून लूसर्न नावाचा एका वनस्पतीचें बीज आणून एथें तिचे मळे लावितात, आणि विलायती गवत या नावानें हा पाला रुपया सवा रुपया मण विकतात. अहो, जा आमचा देशांत उत्तम प्रकारचा वनस्पती उत्पन्न होतात, त्यांत घोड्यांस खायास गवत नाहीं काय ? ज्या देशांत उत्तम प्रकारचे आरबी घोडे होतात, त्या देशांत ईश्वरानें त्यांचा खाण्याची सोय केली नाहीं ह्मटलें, तर किती हसण्याजोगी गोष्ट ! अर्थात् त्या देशाची आज सद्दी आहे. दुसरें कांहीं नाहीं. विलायत ह्मटलें ह्मणजे आमचा लोकांचा एक स्वर्गच आहे. हीं सर्व तेथील लोकांचा व्यवहारचतुर्याचीं फळें, दुसरें कांहीं नाहीं.

आमचा खण्डांत एक एक असे धुरंधर कारीगर आहेत, कीं त्यांणीं एकादी वस्तु तयार केलेली पाहून मन चकित होतें, परंतु असें असतांही अलीकडे आमचे कित्येक लोक स्वदेशांत उत्पन्न झालेल्या वस्तु ह्मटल्या ह्मणजे त्यांजकडे तोंड मुरडितात. हें किती नवल आहे ! भरतखण्डांतील साध्याभोळ्या व रानटी कारीगरांची कुशलता कित्येक कामांत युरोपखण्डांतील सुधारलेल्या व यंत्रांवर वस्तु तयार करणाऱ्या कारीगरांचा कुशलतेस मागें पाडित्ये. आपल्या बुद्धीबळानें दुसऱ्याचें न पाहतां एखादी उत्कृष्ट वस्तु उत्पन्न करण्याची शक्ति ईश्वर कोणत्या देशांत, कोणास, कोणत्या काळीं देईल, याचें अनुमान करवत नाहीं. स्वतः आपल्या कल्पनेनें कांहीं वस्तु तयार करण्याची शक्ति ईश्वरानें आमचा देशांतील कित्येक कारीगरांस दिली आहे. त्यांचा आह्मी अनादर करूं नये. परस्परांस उत्तेजन देण्याचा गुण जर आह्मांमध्यें असता, तर आज आमची अशी दशा झाली नसती. विलायतेंतील लोक गुणग्राही असून ते ज्ञानवृद्धि होण्यासाठीं परस्परांस मदत करितात ह्मणून त्यांचा विद्या व कला हीं उत्तरोत्तर वाढत जातात; दुसरें कांहीं नाहीं.

आतां युरोपखण्डांतील लोक यांत्रिक विद्येमध्यें निपुण आहेत. त्यांणीं अनेक तऱ्हेचीं यंत्रें व शस्त्रें तयार करून कलाकौशल्य वाढविलें आहे व अनेक देश फिरून दुसऱ्यांचा युक्ति घेऊन आपल्या वाढविल्या आहेत. देशोदेशींचा कारीगरांचे हुंनर पाहून ते आपली विद्या वाढवितात; कारण ते आपल्या आयुष्याचें सार्थक्य अशा कृत्यांनीं होतें असें समजतात. ते भरतखण्डांतील कारीगरांपेक्षां युक्ति वाढविण्याचा कामांत प्रमुख आहेत, हें

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

कोणीही कबूल करीलच. परंतु साहजिक प्राप्त झालेली बुद्धि, जीस आमचे लोक प्रासादिक गुण किंवा ईश्वरदत्त बुद्धि म्हणतात, ती असणारे पुरुष आम्हांमध्यें पुष्कळ आहेत. इतकेंच कीं त्यांचा गुणांचा उपभोग करणारे आम्हामध्यें विरळा. त्यामुळें त्यांचा बुद्धि उदयास येत नाहींत, व त्यांस त्या वाढविण्याचीं साधनें नसल्यामुळें त्यांचा परिणाम लाचार व दरिद्री स्थितींतच होतो मग सहजच उदासीनपणा उत्पन्न होऊन जिकडे तिकडे आळसाची वृद्धि होती. कोणत्याहि उद्योगास उत्तेजन येण्यास योग्य गृहस्थांकडून त्याची प्रशंसा झाली पाहिजे, व त्यापासून त्याला बरीच द्रव्यप्राप्ति झाली पाहिजे, नाहींतर मनुष्याचा हिरमोड होऊन त्याचा प्रासादिक गुणांतदेखील न्यूनता येती. मनांतील कल्पना काढावयास आरोग्य आणि संतोष वृत्ति, हीं असलीं पाहिजे; या दोनहि गोष्टींचा अभाव असल्यामुळें भरतखण्डस्थ बुद्धिमान् लोकांची ही अशी अवस्था झाली आहे.

आतां प्रासादिक बुद्धि कोणत्या ज्ञातींत, कोणत्या पुरुषास प्राप्त होईल, हें सांगवत नाहीं. कोणी ह्मणेल, कीं उद्योगी, चपल, शुचिर्भूत व नेमनिष्ठेनें राहणारे आहेत त्यांसच ही प्रासादिक बुद्धि प्राप्त होत असती; तर अशी कोणी आशा धरूं नये. ही बुद्धि प्राप्त होणें जातीचा श्रेष्ठपणाकडे, शरीराचा सुरेखपणावर किंवा निर्मळपणाकडे नाहीं. ती एकाद्यास अनायासें विलक्षण स्थितींत असतांनाहि प्राप्त होती. कधीं ब्राह्मणांमध्यें, कधीं क्षत्रियांमध्यें, कधीं वैश्यांमध्यें, कधीं शूद्रांमध्यें, किंवा कधीं अतिशूद्र व चाण्डालांमध्येंहि असती. अर्थात् ही बुद्धि ब्राह्मणापासून अतिशूद्रापर्यंत एकसारिखी असती. एकादे समयीं ह्मार व चांभार प्रासादिक बुद्धीचे इतके योग्य पात्र असतात कीं, एकाद्या कुशल ब्राह्मणानें आपलें आयुष्य खर्चिलें तरी ती त्यास साध्य होत नाहीं.

इतर सर्व पृथ्वीचा भागांत जसे चमत्कारिक पदार्थ होतात तसे कमी किंवा जास्त मानानें आपल्या खंडांत होतात. यावरून असें वाटतें, कीं परखण्डांशीं सहवास न ठेविला असतांहि मनुष्याचा उपजीविकेस, सुखास, किंवा सुधारणेस, जीं जीं साधनें असावीं तीं तीं या खण्डांत उपलब्ध आहेत. एथें इतकेंच सुचवायाचें, कीं भरतखण्डांत अनेक तऱ्हेचे विषय उत्पन्न करण्याजोगे साहजिक बुद्धि प्राप्त झालेले पुरुष होऊन गेले, व सद्यःहि आहेत, आणि ईश्वरानें त्यांस त्या प्रकारचीं साधनेंहि करून ठेविलीं आहेत. चीन देशांत जें बिलोरी काम होतें त्या प्रतीचें एथेंहि तयार झालें असतें, परंतु असे उद्योग केले असतां, ते सफळ होणें कठीण. आमचा लोकांकडून त्यांस आश्रय मिळायाचा नाहीं. सुमारें दोन महिन्यांवर पुण्यांतून एक ब्राह्मण आला होता. त्याणें कांहीं महिने उद्योग करून चिनी लोकांसारिखीं हुबहु दोन बाहुलीं व लहान भांडीं तयार केलीं आहेत, त्यांवरील गिलावा वगैरे पाहिल्यावरून त्यांत कांहीं फरक दिसत नाहीं. पण त्यास बराबर आश्रय नसल्यामुळें तें काम त्यास लवकरच सोडावें लागेल.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

पेशव्यांचा कारकीर्दीत एतद्देशीय कारीगर लोकांस कांहीं उत्तेजन मिळत असे, त्यामुळें त्या वेळीं कित्येक उत्तम प्रकारच्या वस्तु होत असत. असें सांगतात, कीं कोणी एका कुशल साळव्यानें श्रीमंतांसाठीं एक सवाशे हात चंदेरी पागोटें, दोन अंगुळें रुंद आणि हातभर लांब नळकांड्यांत भरून फर्मास पाठविलें होतें. तसाच एक दुपेटा आंब्याचा बाठ्यांत भरून पाठविला होता. ही कदाचित् अतिशयोक्ति असेल, परंतु आमचा देशांत उत्तम प्रकारचें बारिक व नाजूक वस्त्र होतें, हें वास्तविक आहे. अस्तु, परंतु नाना फडनविसाचा कारकीर्दीत एका कारीगरानें खडीसाकरेचा खड्याची आंगठी घडून त्या साकरेचा खड्यास उत्तम प्रतीचा हिऱ्याची योग्यता आणून पुण्यांतील जवाहिऱ्यांची मति कुंठित केली, अशी जाची गोष्ट आम्हीं ऐकतों त्या कारीगराची कुशलता कोणत्या प्रकारची असेल बरें ? किती हो हें सामर्थ्य ! खडीसाकरेचा खड्यास अमोलिक हिऱ्याची योग्यता आणणें, हें काय साधारण चातुर्य ! मला वाटत नाहीं, कीं युरोपखण्डांत असा कोणी कारीगर सांपडेल ?

जा खोतानें तुळापूर एथें औरंगजेब याचा हत्तीस तराफ्यावर चढवून त्याचें बराबर वजन सांगितलें त्याची कल्पना किती बारीक असावी ! त्या गृहस्थाचा चातुर्यावरूनच बादशाह त्यास प्रसन्न होऊन बक्षीस दिलें, आणि त्या शहराचें नाव तुळापूर असें ठेविलें. परंतु ही त्याची कल्पना इतक्यानेंच स्तब्ध कां राहिली ? जर त्याणें ती वाढवून आपला तर्क व बुद्धीचा ओघ दुसऱ्या उपयुक्त ज्ञानाकडे लाविला असता तर तो आज मोठ्या तत्त्ववेत्त्यांत गणला गेला असता.

पाहा, एथें उत्तम प्रकारचीं वस्त्रें, शाली, दुपेटे, साड्या, धोतरजोडे इत्यादि तयार होतात; त्या पाहून कोणास असें वाटतें, कीं अशा अमोलिक वस्तु तयार करायास त्या करणारांकडे उत्तम प्रकारचीं यंत्रें व शस्त्रें असतील, तर तींहि नाहींत. अशा वस्तु तयार करण्याचीं त्यांचीं साधनें ह्मटलीं ह्मणजे केवळ साधीं व आबडधोबड असतात. तर, यांची बुद्धि किती वर्णनीय आहे ! पाहा, धाका एथें उत्तम प्रकारचें बारीक वस्त्र तयार होतें त्या प्रतीचें इङ्ग्लण्ड देशांतसुद्धां यंत्रावर होत नाहीं. हें पाहून एक इंग्रेज हिंदुस्थानांतील कारीगराचा स्तुतिपर असें ह्मणतो—"काय हो चमत्कार ! धाका एथील साळवी लोक आबडधोबड व साध्या आवतांनीं लांकडाचा चातीवर दोहों बोटांचा आंत कापसाची गुंडी धरून इतकें बारीक सूत काढितात कीं, तें पाहून त्यांचा कुशलतेविषयीं मोठाच आचंबा वाटतो. अहो, हे वायूचे तंतू काढून दोर वळविल्याप्रमाणें नाजूक सूत तयार करितात. किती हो यांची अचाट बुद्धि ! हे साळवी लोक ह्मटलें म्हणजे केवळ अशिक्षित व बहुधा कंगाल असतात; परंतु त्यांची कुशलता इतकी आहे, कीं जें कापड यंत्रावर युरोपांत तयार होतें. तें त्यांचा कापडाचा बरोबरीस येत नाहीं.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

थोडक्याच दिवसांवर एक कंगाल, लंगोटी नेसलेला व आंगावर पांचपंचवीस ठिगळ्यांची मळकट बंडी घातलेला असा एक मनुष्य दारांत उभा राहून अशा हाका मारूं लागला, "बाई, कोणाचा जुन्या फण्या नीट करायाचा असल्या तर आणा ! नीट करून देतों. कांहीं जुनें धोतर, चोळी, असली तर द्या. तुमचा नावावर चार दिवस वापरीन. आणा, बाई कांहीं असलें तर गरीबाचा पोटाची सोय करा." असे त्याचे दीनवाणे शब्द कानीं पडतांच, मी दारापाशीं गेलों; तों, त्या बुभुक्षित जरत्कारु कारीगराचा विलक्षण चेहरा व अति मळिण वस्त्रें दृष्टीस पडलीं. तें पाहून मनांत असें आलें कीं हा काय फण्या नीट करणार ! परंतु त्याची प्रचीत पाहावी, ह्मणून घरांतून एक मोडकी हस्तिदंती फणी आणून त्यास दाखविली, आणि सांगितलें कीं जर ही तूं नीट करून देशील तर तुला कांहीं फाटकें चिरगुट देईन. तेव्हां तो ओटीवर आपलें घोंगडें ठेवून बसला, आणि त्याणें आपलीं विलक्षण आयुधें बाहेर काढिलीं; तीं अशीं:-सुमारें दोन वीति लांब व साहा अंगुळें रुंद असे दोन फळ्यांचे तुकडे ते आंतून गुळगुळीत होते, परंतु बाहेरून केवळ खडबडीत होते. ते एकावर एक ठेवून त्यास सुमारें चार हात लांब व करांगळीएवढी जाड अशी काथ्याची दोरी बांधिली होती. दुसरी एक हात लांब वांकलेली झाडाची डाहाळी : ही सुमारें उंसाचा कांड्या-एवढी जाड होती, आणि सुमारें दीड वीत लांब अशी एक ओबडधोबड आकृतीची करवत, ही लोखंडाचा पातीची किंवा जुन्या मोडक्या सुरीस बारीक दांते घालून घरींच तयार केलेली होती. ती पाहणारास लोखंडी पत्र्याचा चिरोटीसारिखी दिसे; परंतु त्यावरून हात फिरविला म्हणजे त्याचे बारीक बारीक दांते लागत. हीं सर्व आउतें त्याणें घरींच तयार केलीं असावीं. हीं आउतें घेऊन तो उद्योगास लागला. प्रथम त्याणें ती फणी त्या दोन फळ्यांचे आंत घट्ट जशी चिमट्यानें धरितात तशी बसविली; मग लांकडाचा तुकड्यांत बसविलेलें तासणीसारिखें हत्यार काढून त्या फणीचे सर्व जुने दांते काढून टाकिले आणि चार पांच मिनिटांत त्या हत्यारानें घांसून ती स्वच्छ व तुळतुळीत केली. नंतर ती विलक्षण रीतीनें तयार केलेली करवत काढून झपाझप दांते मारीत गेला. त्याणें ती फणी मोठ्या कुशलतेनें व युक्तीनें तयार केली ती तयार झाली, तेव्हां केवळ नवीच दिसूं लागली. इंग्रेज कारीगर हे असलीं ओबडधोबड हत्यारें आपल्या दृष्टीसमोरदेखील ठेवणार नाहींत; मग तीं हातीं घेऊन काम करायास बसणें कठीणच. अशा हत्यारांनीं आमचे लोक एखादी वस्तु तयार करितात, तेव्हां त्यांचें हस्तकौशल्य कांहीं अंशीं इंग्रेज कारीगरांपेक्षां विशेष आहे असें वाटतें. इंग्रेज लोक यांत्रिक विद्येमध्यें निपुण असल्यामुळें त्यांजकडून जा वस्तु निघतात त्या उत्कृष्ट असतात; यांत नवल नाहीं. याशिवाय त्यांस श्रीमान् व इतर लोकांकडून आश्रय व उत्तेजन मिळतें. जी फणी आमचा भिकारी कारीगरानें तयार केली, ती जर एकाद्या इंग्रेज कारीगरानें केली असती तर तिची किम्मत रुपया दीढ रुपया झाली असती. पाहा ! गरीबास आह्मी एक फाटका धोतराचा तुकडा दिला आणि त्या-

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

विषयीं तरी त्यास आमचें किती आर्जव करावें लागलें! आमचा लोकांचें औदार्य व उद्योगी आणि कुशल लोकांस मदत करण्याचा प्रकार असाच आहे! विलायतेहून केवळ हाडांचा व शिंगाचा फण्या येतात त्यांची ते चाखचोख रीतीनें बतावणी करितात, त्यांस सुंदर पेटींत घालून त्याजवर छाप वगैरे मारितात आणि त्यांस विशेष शोभा आणितात, ती पाहून आम्ही दुप्पट दाम देऊन संतोषानें सांगेल त्या किंमतीस त्या विकत घेतों. हा आमचा भिकारी फणी करणारा इङ्ग्लण्ड देशांत असता, तर त्याची योग्यता वाढून कदाचित् तो महिन्या पोटीं किमानपक्ष दोन तीनशें रुपये कमाविता; तस्मात् आमचा देशांत गुणाचें वास्तविक रूप होत नाहीं. दरिद्र्याचें दैव दरिद्रि असें म्हणतात तें वास्तविकच. बाहेरगावांत कोणी गरीब कारीगर सुंदर करंडे, फण्या, व मुलांचीं खेळणीं घेऊन दारोदार फिरतात, आणि शेर टिपरी दाणा दिला असतां रुपया दोन रुपयांचा माल देतात, तरी आमचे लोक संतुष्ट होत नाहींत. त्याणें मापटेंभर तांदूळ मागितले, तर त्याचा हातांस मारामार करून अर्धे मापटें लावितात.

कांहीं वर्षांमागें अमदाबादेहून एका मित्रानें एक चंदनाचा पंखा पाठविला होता त्याचें काम मोठ्या कुशलतेनें केलें होतें. चंदनाचा खोडांची बांबूचा बिळासारिखी बारीक बिळें काढून त्या बिळांनीं तो सुंदर पंखा विणला होता, आणि त्यांत सोनेरी बूट जडविले होते. त्या पंख्याचें काम पाहून तर मी फारच चकित झालों. अशा उत्तम प्रकारचा अनेक वस्तु करणारे या देशांत कोनाकोंपऱ्यास किती पडले असतील ते कोणास ठाऊक! त्यांची कोणी वास्तपुस्त करीत नाहीं. हस्तकौशल्याचे मासले दाखविण्याजोगे पदार्थ आमचा देशांत हजारों ठिकाणीं सांपडतील. सिंध, करांची, हैदराबाद, अहमदाबाद सुरत, गोकाक, व दुसऱ्या ठिकाणांहून अनेक तऱ्हेचा वस्तु येतात; त्या तर हुबहु खऱ्या पदार्थांसारिख्या दिसतात. एका गृहस्थाचा घरीं अशा प्रतीचा लांकडाचा एक गोकाक एथें तयार केलेला केळ्यांचा फणा टांगून ठेविला होता, तो पाहून एक मुलगा तीं तोडून खाण्यासाठीं धांवला. अशींच दुसरीं फळें केलेलीं असतात.

कांहीं महिन्यांवर गोव्यांहून एका गृहस्थानें एक बांबूची हांतरी पाठविली ती पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें, कीं गोव्यांतील ह्मार. जे बहुधा मळीण व कंगाल आणि अडाणी असतात, ते इतके कुशळ आहेत काय? ही हांतरी बांबूचा बेळांची आहे खरी, परंतु हिचीं बेळें बारीक असून सफाईदार आहेत. ह्याशिवाय हिचें काम मोठ्या करामतीनें केलें आहे. विणकामांत तऱ्हेतऱ्हेचा आकृति दाखविल्या आहेत. हे ह्मार केवळ रानटी स्थितींत असतात; ते अति दरिद्री व त्यांचा खाण्यापिण्याचेदेखील हाल असतात. त्यांणीं केलेल्या वस्तु लोक फार स्वस्थ मागतात, ह्मणून त्यांस उत्तेजन येत नाहीं. जी हांतरी इङ्ग्लंड देशांतून आणली असतां रुपया दोन रुपयांस खपेल, तीस आमचे

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

लोक दोन चार पैसे, किंवा सात आठ वडे, दोन तीन लाडू, किंवा पांच सहा पोळ्या देऊन घेतात; व कदाचित् एकादी फाटकी चोळी देतात. मग त्यांचें दरिद्र विछिन्न होऊन ते उदयास कसे येतील ? आमचा देशांतील कारीगरांस आम्हांकडून याच प्रकारचा आश्रय मिळतो, आणि आमचे लोक आपली विद्या वाढवित नाहींत ह्मणून आह्मी त्यांस ठपका देतों. या आमचा शहाणपणास काय ह्मणावें ?

मुंबईत तरी कारीगर लोक बरेच आहेत. पारशी लोकांनीं तयार केलेलीं तिर्कटी तारवें पाहून इंग्रेज लोक तोंडांत बोट घालितात. एक एक गाडी विलायतेंतील गाडीचा तोडीची तयार करितात; परंतु इतकेंच, तिला विलायतेचा छापा बसल्याशिवाय किम्मत बराबर येत नाहीं. मुलतानी लोक नकशीचा पेट्या करितात तशा युरोपखण्डांतदेखील होत नाहींत. तसेंच एथें गुजराथी लोक लांकडी कांतीव काम उत्कृष्ट तऱ्हेचें करितात. एकादे वेळीं एकादी नकृशी खुर्चांचीच जोडी तयार करून सातशें-आठशें रुपयांस विकतात; अशी त्यांचा अंगीं कुशलता आहे. कांहीं वर्षांमागें मुंबईत एक दोघे मातीचीं चित्रें करणारे होते. त्यांचे ते पुतळे कोरण्याची कुशलता व त्यांजवर रंग देण्याची सफाई व वर्ख लावण्याची करामत पाहून इंग्रेज लोकदेखील चकित होत. त्यांणीं केलेलीं एक दोन चित्रें हजार हजार रुपयांस खरीद करून विलायतेस पाठवून दिलीं होतीं. मुंबईत, कारीगरांची योग्यता एकादे वेळीं थोडी बहुत प्रसिद्धीस येती, व त्यांस समयानुसार द्रव्यहि मिळतें; परंतु इतर ठिकाणीं त्यांचें कलाकौशल्य मातीचा मोलानें खपतें.

ज्या देशांत उद्योगाची प्रशंसा, कुशलतेची चिकित्सा, बुद्धीची प्रतिष्ठा, गुणाची स्तुति, विद्येस भूषण आणि श्रमाचें सार्थक होऊन मनुष्यास योग्यतेनुसार सत्कार आणि द्रव्य प्राप्त होतें, त्या देशांत विद्या, कला, कौशल्य, यांची उत्तरोत्तर वृद्धि होऊन तो देश मोठ्या वैभवास चढतो, आणि ज्या देशांत लोक कृपण असतात, आणि लोकांचा श्रमांचें फळ त्यांस उदारपणीं भोगायास देत नाहींत, तो देश दरिद्री होऊन लोकांचा दुःखाची मात्र वृद्धि होती. प्रोफेसर रायल हिंदुस्थानांतील कलाकौशल्य, कारखाने, व दुसऱ्या पदार्थांविषयीं असें ह्मणतो, कीं जेव्हां सर्वपदार्थप्रदर्शन झालें, तेव्हां सन १८५१ [सालीं] लंडन शहरांत इतर देशांतून अनेक चमत्कारिक पदार्थ आणिले होते, त्यांत भरतखंडांतून जे पदाथ आणिले होते ते उत्तम प्रतीचे असून असंख्य होते. तो दुसरें असें ह्मणतो, कीं आमचे (ह्म. इंग्रेजी) कारीगर लोक वृथा अभिमान बाळगितात कीं आह्मी पृथ्वीवरील कारीगारांत प्रमुख आहों, परंतु त्यांगीं हें लक्षांत धरिलें पाहिजे कीं, भरतखंडांतील कारीगर आज हजारों वर्षें प्रख्यात असून त्यांचा तोडीचीं कांहीं कामें आमचा लोकांकडून अद्यापि होत नाहींत.

ज्ञानप्रसारक—पु. १३, अं. ५, ६, (ऑगस्ट, सप्टेंबर १८६२).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

११

आत्मशिक्षण.

आपणच आपली बुद्धि स्वसत्तेनें वर्त्तवून ज्ञान संपादन करणें असें जें आत्मशिक्षण, त्याविषयीं आज आपण कांहीं बोलूं. अशा विषयावर विचार करणें हें आमचा संभाषणांचा उद्देशास अनुसरत असून जा वयोवस्थेंत आमचे मुख्य श्रोते आहेत असें आमचा बुद्धीस वाटतें, त्यांला तें अगत्याचें आहे. आई, बाप व गुरु यांकडून विद्या व व्यवहारज्ञान हीं प्राप्त व्हावीं; अशी जी बाल्यावस्था ती आतां उजळली, व तो वसंत समय जाऊन आतां पौष्टिमान शरत्काल समीप आला आहे. हे सुज्ञजन हो! तुह्मी आजपर्यंत किती ज्ञान जोडिलें असेल व कोणत्या विद्या प्राप्त करून घेतल्या असतील आणि कोणते सद्‌गुण संपादन केले असतील त्याचें आमचानें एथें अनुमान करवत नाहीं. हें तुमचा अंतःकरणालाच ठाऊक. अस्तु. जर तुह्माला अजून ज्ञान संपादन करून घेण्याचें आहे, तर त्याला दुसरेच उपाय योजिले पाहिजेत. बऱ्यावाईटाचे जबाबदार आतां तुमचे तुह्मीच. आईबापांचा मदतीनें ज्ञान प्राप्त करून घेण्याचा काळ मागें राहिला. आतां जें विहित तें आचरायास व जें अविहित त्याचा त्याग करायास तुह्मी समर्थ आहां. तुमचा मनांत जर अजून आपली बुद्धि वाढवून सद्‌गुणांची वृद्धि करण्याचें आहे, तर त्यास आत्मशिक्षणावांचून दुसरा उपाय नाहीं.

यास्तव आत्मशिक्षण करणें हा मनुष्याचा धर्मच कीं काय? व तें तुह्मास साम्प्रतचा अवस्थेंत साध्य होण्याजोगें आहे कीं काय? आणि जर तें तसें आहे, तर त्यास कोणते उपाय योजावे याचाच पहिल्यानें विचार करूं.

आत्मशिक्षण संपादन करणें, हा एक मनुष्याचा धर्मच आहे; असें सिद्ध करून दाखविण्यास फार खटपट करणें नलगे.

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

जसेजसे आह्मी वाढतों तसतशा आमचा संवया वाढून त्यांचा योगानें अंतःकरणामध्यें जो स्वभावरूप गुण उत्पन्न होऊन वृद्धि पावतो, त्याचा आमचानें एकाएकीं अटकाव करवत नाहीं. तो वाढत जाईल आणि जा विषयांचा व जा मनुष्यांचा आम्हाला सहवास घडेल त्याप्रमाणें त्याचें रूपांतर होईल, अशा तऱ्हेनें उद्भवास आलेला गुण चांगला निघाला तर मोठें भाग्य, पण बहुधा वाईटच निघतो. यास्तव आपोआप जो वाईट किंवा चांगला गुण आम्हास प्राप्त होईल तो होवो असें म्हणून स्वस्थ बसावें. बुद्धि आणि यत्न यांचा बळानें एकादी युक्ति शोधून काढून तिचा योगानें हा प्रपंचसागर तरून जाण्यास पुढें व्हावें; याजविषयींच काय तो विचार करूं.

हें एवढें काम आह्माला साध्य होणें दुर्घट असें कदाचित् कित्येकांला वाटेल आणि त्यांचा मनांत अशा कल्पना येत असतील.—आमचें पूर्ववय व्यर्थ गेलें, आईबापांकडून कांहीं मदत झाली नाहीं व विद्याहि धड येत नाहीं, तर आतां अशा उद्योगांत पडून फुकट श्रम कां करून घ्यावे असें जर कोणी ह्मणतील, तर त्याला आमचें एवढेंच सांगणें आहे, कीं त्यांणीं त्याविषयीं किमपि निरापेक्ष होऊं नये.

ज्ञानरूप बीज पेरण्याचा समय होऊन गेला हें वास्तविक आहे, परंतु अद्यापि प्रयत्न केला असतां दाणे असाध्य नाहीं. प्रापंचिक व्यवहार सुरळीत चालविण्यास एका आत्मशिक्षणावांचून इतर सोई व्यर्थ आहेत. धैर्य धरून प्रयत्न केला असतां फळ प्राप्त झाल्याविना राहणारच नाहीं, हें आम्हास पक्कें ध्यानांत ठेविलें पाहिजे. याविषयीं खातरी करून देण्यास पुष्कळ गोष्टी सांगितल्या असत्या, परंतु उगाच पाल्हाळ कशाला? दोन अर्वाचीन इङ्ग्रेज विद्वानांविषयीं सांगतों.

डाक्तर फ्रांक्लीन् याचा वृत्तांत तुह्मा सर्वांला माहीत असेलच. त्याणें कोठें पाठशाळेंत जाऊन अभ्यास केला होता? असें असतांहि तो न्यायशास्त्रांत ह्मणा, राजनीतींत ह्मणा, ग्रंथ रचण्यांत ह्मणा, जांत त्यांत पराकाष्ठेचा हुशार झाला. तें सारें त्याणें प्रौढ वयांत संपादन केलें. डाक्तर फ्रांक्लीन् यांचे ग्रंथ पाहून लार्ड जेफ्री याणें असें म्हटलें आहे, "चांगली बुद्धि असून तिचा जर चांगला उपयोग केला, तर त्यापुढें अध्ययनादि खटपट कांहींच नाहीं. पंडितपणाचा डौल मिरविण्याची काडीमात्र इच्छा न बाळगितां पंडितांचीसुद्धां मति जांत कुंठित होत असे, ते विषय डाक्तर फ्रांक्लीन् याणीं अवगत करून घेतले. पाठशाळा कांहीं कामाचा नाहींत असें आमचें ह्मणणें नाहीं, परंतु पाठशाळांतील पंडित लोक जो अहंपणा वागवित असतात, तो व्यर्थ आहे असें दाखविण्यासाठीं मात्र एवढें बोलणें लागलें. ज्ञान संपादन करण्यास केवळ पाठशाळांतच जाऊन पढलें पाहिजे, असें नाहीं; ह्मणून जर आम्ही त्या पंडितांला समजावून दिलें तर तें त्यांला फारच कडू लागेल. परंतु या औषधानें त्यांचा अहंकाररूप रोग जाऊन त्यांला आराम प्राप्त होईल. विद्यारूप इमारत पुढें कशी बांधावी याचा पाया

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

घालून घेण्यास पाठशाळा फार उपयोगाची आहे. परंतु जें कांहीं अध्ययन आहे तें पाठशाळेंतच होतें, असें कोणी समजूं नये. प्रौढ वय होऊन बुद्धि प्रफुल्लीत झाल्याशिवाय विद्येची गोडी लागत नाहीं परंतु त्याला पूर्ववयांत व्यासंग मात्र लागला पाहिजे. आतां तुह्माला मिस्तर ह्यु० मिलर याची गोष्ट सांगतों. तो शाळेमध्यें होता, तेव्हां त्याणें अध्ययनासाठीं फारसे श्रम केले नाहीं. क्रामर्टि एथील समुद्राचा कांठावरील मोठमोठे कडे व गुहा यांमध्येंच फिरण्यांत त्याला आनंद वाटत असे. लहानपणीं तो स्वभावानें शान्त होता, परंतु पुढें दिवसेंदिवस द्वाड होत चालला. या प्रसंगीं त्याचा आप्तवर्गांनीं जर त्याजविषयीं खबरदारी राखिली नसती, तर त्याला पुढें सदोदित दुःख भोगावें लागलें असतें. मिस्तर मिलर स्वतः आपणाविषयीं असें लिहितो, “बाळपणांत विद्या संपादन करण्यास मला जा सोई होत्या त्यांचा जर चांगला उपयोग केला असता, तर मी पंचवीस वर्षांचा होण्यापूर्वीं मोठा पंडित झालों असतों, व अमोलिक तारुण्यांत दाहा वर्षें जीं हलक्या उद्योगामध्यें घालविलीं, त्यांचा चांगल्या रीतीनें व्यय केला असता.” असें असतांहि मिस्तर मिलर हा आपल्या उत्तरवयांत भूगर्भशास्त्रांत पराकाष्ठेचा निपुण होऊन मोठ्या अबरूस पोंचला.

मिस्तर मिलर हा धोंडफोड्या होता आणि फ्रांक्लीन् हा अमेरिकेंत फिलाडेल्फिया एथें छापखान्यामध्यें अक्षरें जोडण्याचा कामावर होता. या दोघांतून उत्तम कोण आणि कनिष्ठ कोण, याचा बराबर निर्णय करतां येत नाहीं. फ्रांक्लीन् याणें इलेक्ट्रिसिटिविषयीं जसे शोध केले आहेत, तसेच मिलर याणेंहि भूगर्भशास्त्राविषयीं केले आहेत. दोघांचीहि लिहिण्याची पद्धति चांगली, परंतु मिलर याची फ्रांक्लीन् याचापेक्षां कांहीं अंशीं उत्कृष्ट म्हटली असतां चिंता नाहीं. मिलर हा विपत्तींत असतां अभ्यासाचा क्रम कसा चालवीत होता, तें दाखविण्यासाठीं याणेंच आपल्या ग्रंथांत उद्योगाची स्तुति याप्रमाणें केली आहे, “हे कुलीना हे पवित्रा हे विरक्ता उद्योगा! तूं केवढा गुणी व योग्य आहेस हें जाला समजेल, तो तुझे हात कठीण लागतात व तूं वल्कलें धारण करितोस व तूं हलका धंदा करितोस व तूं पर्णकुटिकेंत वास करितोस व तृणशय्येवर पहुडतोस व भाजीपाला खाऊन उदरनिर्वाह करितोस ह्मणून सहसा तुझा धिक्कार करणार नाहीं.”

हीं जीं उदाहरणें सांगितलीं तीं केवळ परदेशस्थ आहेत. आम्हामध्यें असे कोणी झाले नाहींत, असें कोणीं समजूं नये. मला वाटतें, कीं वाल्मीक, कालिदास, लोलिंबराज हे केवळ आत्मशिक्षणावरूनच कवींचा व पंडितांचा योग्यतेस चढले. वाल्मिकाविषयीं तर असें सांगतात, कीं तो तीस पस्तीस वर्षांचा होईपर्यंत केवळ कोळ्याचा स्थितींत असे. त्याचप्रमाणें कालिदासहि प्रौढवयांत येईतोंपर्यंत अशिक्षितच होता आणि जिकडे तिकडे भटकत असे; त्याला कोणी गुरु नव्हता, तो आपण स्वतः उद्योग करून शिकला. तेव्हां त्याला देवीनें प्रसन्न होऊन विद्या दिली, असें लोक म्हणूं लागले.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

या उदाहरणावरून आत्मशिक्षण अद्यापि तुह्मास साध्य होईल असें स्पष्ट समजून येईल. तारुण्यपणामध्यें पाहिजे तें करितां येतें. कदाचित् मागील सोई तुह्मी फुकट घालविल्या असतील, तथापि चिंता नाहीं. लार्ड बेकन् ह्मणतो कीं "बाळपणामध्यें आपला काळ फुकट घालविला नाहीं, असे मनुष्य विरला सांपडतील. कारण बाळपणामध्यें मनुष्याला शहाणपण नसतें." बुद्धि असून कोणत्या मार्गानें विद्या संपादन करावी, हें ठाऊक नाहीं असा एकादा तरी पुरुष या सभेंत असेल. अशा मनुष्यास जर उत्तेजन देऊन मार्गावर आणिला, तर तो उदयास येण्यास कांहीं कठीण नाहीं.

आत्मशिक्षण कोणालाच असाध्य नाहीं असें या गोष्टीवरून तुम्हाला पक्कें समजून येईल, असा मला भरवसा आहे. या वयांत तुम्हाला सर्व गोष्टी अनुकूल आहेत; पहा, सध्या तुम्हाला कोणत्याच गोष्टीची अडचण नाहीं. कांहीं वर्षांनीं घरसंसार तुमचा पाठीमागें लागेल आणि तेणेंकरून तुम्हाला अभ्यास करण्याला अगदीं सवड सांपडणार नाहीं. या वयांत जर बुद्धीचें घर्षण केलें नाहीं, तर मग ती उत्तरोत्तर मंद होत जाईल आणि यथाकाळीं जर तिचें घर्षण केलें तर तिची शक्ति उत्तरोत्तर वाढत जाईल. ही सवड घालविली, म्हणजे मग तुमची बुद्धि अगदीं निष्फळ होऊन जाईल आणि शेवटीं तुम्हांला पश्चात्ताप होईल. तुकाराम जरी साधारण प्रतीचा कवि होता, तरी त्याला कविता करण्याचें ज्ञान प्रौढ वयांतच स्वतः श्रम करून प्राप्त झालें असेल.

भागवतांत एक व्याधाविषयीं अशी गोष्ट आहे.—द्रोणाचार्य, एक विचारी मनुष्य असें ह्मणतो, कीं ज्याचें प्रौढ वय ख्यालीखुशालींत व वृथा भाषण करण्यांत गेलें आणि या समयीं त्याला ज्ञान संपादन करून घेण्याची जिज्ञासा प्राप्त झाली नाहीं तर मग त्याचें म्हातारपण लोकांबरोबर भांडण्यांत व कुटुंबांतील मनुष्यांस दुःख देण्यांत व त्याचा जन्माचा पशुप्रमाणें परिणाम होतो.

तारुण्यांत कोणताहि गुण ग्रहण करण्यास सुलभ. यास्तव पंडित लोक बुद्धीला टांकशाळेंतील यंत्रांची उपमा देत असतात. जा धातूचें नाणे करायाचें आहे, ती धातु इतकी मऊ असली पाहिजे, कीं तिजवर ठसा बसेल व ती इतकी कठिण असली पाहिजे कीं जो ठसा मारला तो तिजवर अचल राहील. बाळपणापासून तुम्ही सध्या मुक्त झाले आहां. प्रौढवयांतील उपाधींपासून अंमळ दूर आहां. अशा वयांत मनुष्याची बुद्धि इतकी कोमळ व निर्मळ असती, कीं तिजवर पाहिजे तो ठसा सुलभ रीतीनें उठवितां येतो व प्रौढावस्था जवळ असल्यानें तिचा अंगीं इतकी दार्ढ्यता येती, कीं जो ठसा तिजवर बसेल तो जन्मभर अचल राहतो. शास्त्रादि गहन विषयांचें अध्ययन करणें असल्यास प्रौढावस्थाच प्राधान्य धरिली आहे.

याशिवाय या काळीं बुद्धि आपल्या शक्तीचा भरांत असल्यामुळें जावर प्रयोग करितां येईल अशा वस्तूची तिला अपेक्षा उत्पन्न होती. विचारवंत लोक मोठमोठ्या

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

कृत्यांचा पाया काय तो याच वयांत घालीत असतात. याविषयीं लार्ड बेकन् म्हणतो, " जे अगाध कृत्यें करावयास इच्छितात, त्यांचानें आपल्या पूर्ववयापासून मुक्त झाल्याविना त्या कृत्यांला हात घालवत नाहीं. ही गोष्ट खरी आहे, कीं आजपर्यंत कीर्तिमान् पुरुषांनीं जीं जीं मोठीं कृत्यें केलीं आहेत तीं सर्व त्यांणीं आपआपल्या उत्तरवयांत म्हणजे बुद्धि पक्कदशेस आल्यानंतरच केलीं आहेत. पण तीं कृत्यें करण्याची इच्छा मात्र त्यांचा मनांत पूर्ववयापासून वसत होती."

याप्रमाणें तारुण्यांत अनेक सोई असतात.

शरीरसंपत्ति मिळविणें हाहि एक आपला धर्म आहे. यद्यपि या विषयांचा एथें सविस्तर वर्णन करण्याचा आमचा मानस नाहीं तथापि तत्सम्बन्धीं एक दोन गोष्टी सांगणें आवश्यक आहेत. शरीरसंपत्ति म्हटली म्हणजे त्यांत शरीराचें आरोग्य आणि पोषण यांचा समावेश होतो. बहुतकरून बाळपणांत मुलांचें शरीरसंपत्तीकडे दुर्लक्ष असतें. यामुळें त्यांला अनेक रोग उत्पन्न होऊन जन्मभर क्लेश भोगावे लागतात. दुराचरणापासून मनुष्याला कसे क्लेश भोगावे लागतात, ते तुम्हाला सांगितले पाहिजेत असें नाहीं; दुसरें.—निषिद्ध कर्मांचाच मात्र बंध ठेवावा लागतो, इतकेंच नाहीं पण कित्येक निर्दोषी किंबहुना स्तुत्यहि कर्मांकडेहि तो बंध ठेविजे. आपलें शरीरसामर्थ्य तेलाचा स्थानीं योजून आणि आपल्या आशांची वात जाळून टाकिली असे कर्कवैट व दुसरे कित्येक विद्यार्थी जे सरस्वतीप्रीत्यर्थ आपल्या आयुर्धनाचें हवन करून शरीरसंपत्ति आणि विद्या, या दोहोंलाहि मुकले त्यांसारिखें जर केलें, तर त्या विद्येपासून काय फायदा आहे ? विद्या संपादन करण्याविषयीं मी तुम्हाला बोध करित आहें खरा, पण तुम्ही इतकें ध्यानांत ठेविलें पाहिजे, कीं आरोग्य आणि व्यायाम यांवांचून विद्या होणार नाहीं.

श्लोक.

पुरातन लोक "सुपुष्टदेहेधिषणापिपुष्टा", ज्याचें शरीर बळकट त्याची बुद्धीहि बळकट असल्ये, असें जें ह्मणत होते तें खरें आहे. कुशाग्रबुद्धि असे जे ग्रीक म्हणजे प्राचीन काळचे यवन त्यांणींसुद्धां शरीरास व्यायाम पाहिजे म्हणून जीं रंगांगणें बांधिलीं होतीं, त्यांवरून असें दिसून येतें, कीं शरीरसंपत्तीचें आणि बुद्धीचें वर्धन याचा परस्पर निकट संबंध आहे. कविता आदिकरून कल्पनाजन्य विषयांपुढें इतर सर्व तुच्छ मानीत असत, असे जे यवन लोक तेसुद्धां शरीरसंपत्तीकडे फार लक्ष देत होते; म्हणूनच फिदियस आदिकरून यवनी शिल्पिकारांनीं निर्मिलेल्या मूर्ति अशा सुरेख व पौष्टिमान् दिसतात, कीं त्या पाहून लोक अद्यापि विस्मित होत असतात.

" नास्ति मेघसमं तोयं नास्तिचात्मसमं बलम् ॥
नास्ति चक्षुःसमं तेजो नास्ति धान्यसमं प्रियम् " ॥ १ ॥

असे पूर्वींचा लोकांचे विचार होते.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आणखी एक असें म्हणतो, "आरोग्यमेव संपत्ति." मन आणि शरीर या दोघांचा एवढा निकट संबंध आहे, कीं एकाचा नाश केला तर दुसऱ्याचा सहज नाश होतो. पाहा, ज्वरानें व दुसऱ्या व्याधीनें शरीर ग्रस्त झालें असतां मनाचे व्यापार कसे बद्ध होतात हें सर्वांस बहुतकरून माहितच असेल. प्रातःस्नान करून सूर्यास नमस्कार घातलेच पाहिजेत व ब्राह्मणांनीं गाय बाळगिलीच पाहिजे, ती त्यांचें दैवत आहे. याचा अर्थ त्याणें सकाळीं कसरत करावी व कसरत केल्यानंतर दूध तूप दहीं खावयास पाहिजे. तें त्यास गाईपासून प्राप्त होईल.

घटिकाद्वयशिष्टायां स्नानं कुर्यात् यथाविधि ॥
अन्यथा नरकं याति यावच्चन्द्रदिवाकरौ ॥ १ ॥

"पुस्तकं वनिता वित्तं" याचाहि अर्थ हाच आहे.

शरीरसंपत्तीविषयीं एवढेंच सांगून आतां त्यापेक्षां विशेष मौल्यवान् अशी जी विद्यासंपत्ति तिजविषयीं कांहीं सांगतों.

अनेक तऱ्हेचा विषयांवरचे ग्रंथ वाचण्याची लोकांला जी हल्लीं चटक लागली आहे, तेणेंकरून विद्या संपादन होत नाहीं, तें अध्ययन नव्हे. सध्यां या काळांत जीं वेळोवेळ वर्तमानपत्रें व दुसरीं कित्येक मनोरंजक पुस्तकें निघतात तेणेंकरून लोकांला विद्येची गोडी लागली आहे खरी, परंतु आमचें मत असें आहे, कीं अध्ययन जें लोकांला नकोसें झालें आहे, त्याचेंहि कारण हेंच असावें.

रसनेंद्रियग्राही पदार्थांप्रमाणें पुस्तकांमध्येंहि लेह्य, पेय्य, खाद्य, इत्यादि प्रकार आहेत. म्हणजे कित्येक ग्रंथ क्वचित् कोठें कोठें वाचावे व कित्येक वरचेवर नुस्ते अवलोकन करून सांडावे व कांहीं एकचित्तानें साद्यंत वाचावे अशा निरनिराळ्या योग्यतांचे ग्रंथ असतात. हल्लीं छापणे सुलभ झाल्यावरून पुष्कळ मनोरंजक ग्रंथ निघाले आहेत. यामुळें लोकांला गहन विषय आवडत नाहींसे झाले आहेत; यास्तव आमचें म्हणणें असें आहे, कीं तुम्हीं हे सर्व टाकून काव्य, नाटक शास्त्र इत्यादिकांवर जे उत्कृष्ट प्रतीचे ग्रंथ आहेत, तेच मात्र वाचीत जावे.

कित्येकांचा असा समज असतो, कीं ज्याला प्राचीन संस्कृत, लातीन व ग्रीक आदिकरून भाषांची माहिती नाहीं, त्याला व्युत्पत्तीचें पूर्ण ज्ञान होणार नाहीं. अशा खोट्या समजुतीमुळें बुद्धिमान् व उद्योगी लोकांचा मात्र तेजोभंग होतो. संस्कृत, लातीन व मुख्यत्वेंकरून ग्रीक या भाषांचे माधुर्यादि गुण फार वर्णनीय आहेत. जा जा कल्पना मनामध्यें उद्भवतील त्याला यथायोग्य शब्द जसे त्यांमध्यें सांपडतील, त्यापेक्षां सरस दुसऱ्या कोणत्याच भाषेंत सांपडणार नाहींत, हें आम्ही कबूल करितों; परंतु युरोपियन् लोकांचा अर्वाचीन भाषा व मुख्यत्वेंकरून इंग्लिश व मराठी या कांहीं कमी नाहींत.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

इंग्लिश भाषेंतहि तऱ्हेतऱ्हेची शब्दसामग्री आहे. याशिवाय कित्येक गहण विचार जसे आमचा ग्रंथांत सांपडतात, तसे पुरातन रोमी किंवा यवन या लोकांचा ग्रंथांमध्यें सांपडत नाहींत सध्या ज्या विद्या वाढल्या आहेत त्या त्यांचा योगानें कल्पनारूप जें सुवासिक धान्य उत्पन्न झालें त्याचा व्यय या अर्वाचीन भाषांचा द्वारानें होऊन गेल्यामुळें या भाषा संपूर्ण सुगंधित होऊन राहिल्या आहेत यास्तव आम्हांस असें वाटतें, कीं ज्याला आपली बुद्धि वाढवायाची असेल त्याला इंग्लिश भाषा पढणें आवश्यक आहे. घडून आली असतां लातीन, ग्रीक, संस्कृत, जर्मन इत्यादि भाषांचें पूर्ण ज्ञान करून घेण्यांत पुष्कळ फायदा आहे; परंतु त्या भाषांचें उगाच तांत्रिक ज्ञान करून घेण्यापेक्षां इंग्रेजीचा व तसाच मराठीचा जर पुर्ता अभ्यास केला तर तेणेंकरून विशेष लाभ आहे. मला असें वाटतें, कीं कोणताहि एक बुद्धिमान् विद्यार्थी, ज्याला इंग्रजीवांचून दुसरी भाषाच माहित नाहीं तो युनिवरसिटींत (ह्म० पाठशाळांत) जे ग्रीक, लातीन इत्यादि भाषा शिकलेले आहेत त्यांसारिखा प्रवीण होण्यास हरकत नाहीं. बेकन्, मिलटन्, लाक, कडवर्थ अशां अशांचे ग्रंथ ज्या भाषेंत रचिलेले आहेत तिची प्रौढी साधारण असेल काय? एडमंद बर्क आणि हालाम यांचा ग्रंथांवरून राजनीतीचा जो बोध होतो; त्यापेक्षां सरस दुसऱ्या भाषांतील ग्रंथांवरून होईल काय? तसाच इतिहासाचा अभ्यास करणें झाल्यास राबर्टसन् ह्युम, मकाली आणि गीबन् यांचे ग्रंथ सर्वोत्कृष्ट आहेत. तसेच पारमार्थिक विषयावर हुकर, अवन्, चामरस्, हाल, फास्टर यांचे ग्रंथ फार प्रख्यात आहेत.

उदाहरणार्थ एथें कित्येक दाखले दिले असते पण त्यांची गरज नाहीं. मागें जीं आत्मशिक्षणाविषयीं उदाहरणें दिलीं आहेत तेवढीं पुरे. लार्ड जेफ्री हा डाक्तर फ्रांक्लीन् याविषयीं काय बोलतो तें मी तुम्हास सांगितलेंच आहे. मिस्तर मिलर याविषयीं आणखी इतकेंच सांगतों, कीं त्याणें जो स्वतां आपला वृत्तान्त लिहिला आहे, तो तुम्ही वाचून पाहवा म्हणजे त्याणें कोणत्या तऱ्हेनें विद्या संपादन केली तें तुमचा ध्यानांत येईल. जुन्या काळचे जे इंग्रजी ग्रंथ आहेत, त्यांचेंच अध्ययन करून तो एवढा निपुण झाला. त्याची लिहिण्याची पद्धति, चातुर्य इत्यादि चमत्कारिक गुण पाहिले असतां इंग्रजी विद्येचें महत्त्व सहज समजून येईल.

यास्तव मी तुम्हाला खरोखर सांगतों, कीं इंग्रजी विद्येचा अभ्यास केल्यानें तुमचें पुष्कळ कल्याण होईल. पाहिजे तो विषय त्यामध्यें तुह्माला सांपडेल. तुमचा बुद्धीमध्यें कोठें कांहीं जी न्यूनता असेल तीहि या विद्येचा अभ्यासेंकरून पूर्ण करितां येईल. ज्या विषयाचा अभ्यास कराल तो पुर्तेपणी अवगत झाल्याविना मात्र दुसऱ्या विषयास हात घालूं नये. कित्येक लोक नुस्त्या गोष्टी सांगायास पाहिजेत म्हणून ग्रंथावलोकन करितात कित्येक लोक ग्रंथकारांची हेळणा करायासाठीं वाचितात व कित्येकांचे यापरीस विलक्षण हेतु असतात. तुम्ही तसें करूं नये; तुम्ही जें वाचाल त्याचें मनन करून ग्रंथकार म्हणतो

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

तें खरें आहे, किंवा खोटें आहे याचा विचार करावा. असें न केल्यामुळें कित्येक लोक फसतात आणि अर्धकचे राहून नास्तिक मताला अनुसरतात. केवळ आमचाच बोलण्यावर तुह्मी विश्वास ठेवून राहवें असा आमचा अभिप्राय नाहीं. शोधकबुद्धि धरा ह्मणजे ती सूर्यकिरणांसारिखी कुतर्कनदीची केवढी खोली आहे ती तत्काळ दाखवील.

व्युत्पत्ति पूर्ण होण्यास चांगल्या ग्रंथांचें लक्षपूर्वक अध्ययन केलें म्हणजे झालें असें नाहीं. परंतु याशिवाय दुसरीं कित्येक साधनें आहेत, तींहि तरुण पुरुषांनीं अवश्य केलीं पाहिजेत. ग्रंथावलोकन केल्यानें मनुष्य पंडिताचे योग्यतेस चढतो, व संवाद केल्यानें त्याचा अंगीं समयसूचकता येत्ये आणि लेखन केल्यानें (स्वकपोलकल्पित कांहीं ग्रंथादि लिहिल्यानें) खरे विचार कोणते व खोटे विचार कोणते यांचा बोध होतो, असें जें बेकन याणें म्हटलें आहे, त्याची तुम्हाला आठवण असेलच.

यास्तव नुस्ते ग्रंथच वाचले ह्मणून झालें नाहीं; पण ज्या विषयावरचे ग्रंथ वाचाल, त्याविषयीं स्वतः कांहीं तरी लिहावें ह्मणजे तेणेंकरून भाषाभेद ध्यानांत येऊन ग्राह्यविचार कोणते व त्याज्य कोणते हेंहि समजून येईल. प्रथमतः कदाचित् तुमचा कल्पनानुरूप तुम्हाला शब्द न सांपडला म्हणून चिंता नाहीं. डाक्तर जानसनासारिख्यांलादेखील स्वबुद्धीनें कांहीं लिहावें लागे, तेव्हां फार श्रम पडत असत. एकच विषय पुनः पुनः काय म्हणून घेऊन बसावा असें म्हणून उबग मानूं नये. मोठमोठे सर्वमान्य असे जे ग्रंथ आहेत ते कांहीं थोड्या श्रमानें झाले आहेत, असें नाहीं; त्यांचा कर्त्यांनीं ते पुनः पुनः सुधारून समाप्त केले आहेत. कोणी एक कवि असें म्हणतो, कीं तो जेव्हां पहिल्यानेंच कविता करित होता तेव्हां त्याला दिवसास एक चरण प्राप्त झाला म्हणजे पुरे असें वाटत होतें. यावरून मनुष्याला विद्येविषयीं किती आळस आहे, तें दिसून येतें.

एकाद्या चांगल्या विषयाची सभेंत बसून चर्चा करणें हेंहि तुह्मला फार उपयोगाचें आहे. “ वादे वादे जायते तत्वबोधः ” असेंहि ग्रंथांतरीं म्हटलें आहे. वाद करणाऱ्यांला मात्र न्याय, अलंकार इत्यादि शास्त्रांची यत्किंचित् तरी माहिती असली पाहिजे.

शास्त्रयुक्त वाद कसा करावा, हें समजून घेण्याचें असल्यास बर्क याचीं भाषणें वाचून पाहवीं. डाक्तर व्हेटली इत्यादिकांचे तर्कशास्त्रावर ग्रंथ आहेत तेहि वाचावे. त्यांहींकरून खोट्या वादसूत्रांची झटदिशीं परीक्षा करितां येईल. चार पांचशें वर्षांमागील पंडित लोकांस वादविवाद करण्याचा जसा हर्ष वाटत असे, तसा हल्लींचा पंडितांस वाटत नाहीं. वादविवाद करण्यानें बुद्धीचा शक्तींचें घर्षण होऊन त्या निरंतर जागृत राहतात.

याप्रसंगीं मी तुह्मला आणखी एक गोष्ट सांगून ठेवितों ती ही, कीं प्रत्येक विद्यार्थ्यानें कोणत्याहि एका तरी विषयाचें पूर्ण ज्ञान करून घ्यावें. विद्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. यास्तव ती सर्व संगोपंगन एका मनुष्याला अवगत असणे अशक्य आहे. जें

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आपल्याला येत नाहीं त्याविषयीं दुसऱ्याचें सहाय्य घेतां येईल. पण केवळ तेवढ्या विद्येविषयीं सर्व लोक जर असेंच करूं लागले तर मग कोणतीच विद्या कोणाला धड येत नाहींशी होऊन तिची वृद्धि होण्यास हरकत पडेल. कोणतीहि विद्या वाढवायाची झाल्यास मागें जे विद्वान् होऊन गेले त्यांणीं तिला कोठपर्यंत पोंचविलें आहे, हें पाहून समजून घेतलें पाहिजे. फ्रांक्लीन् आणि मिलर यांचे जे वृत्तान्त मागें कथन केले आहेत त्यांवरून या माझ्या बोलण्याचा अभिप्राय तुमच्या ध्यानांत येईल. फ्रांक्लीन् आणि मिलर यांणीं पुष्कळ विषयांवर चांगलेच ग्रंथ केले आहेत; पण त्यांणीं जर स्वतां कांहीं नवे शोध केले नसते तर ते एवढ्या लौकिकास चढले नसते. पाहा फ्रांक्लीन् याणें विद्युल्लतेविषयीं जो शोध लाविला आहे, त्याचा योगानें किती चमत्कारिक कृत्यें हाल्लीं घडत असतात ?

मि० मिलर याणेहि तसेंच केलें; तो आपलें धोंडफोड्याचें काम चालवायाचें तें चालवून सृष्टींतील पदार्थांवरहि लक्ष देत असे. याप्रमाणें त्याणें भूगर्भशास्त्रसंबंधीं पुष्कळ ज्ञान संपादन केलें. केलेल्या शोधांची विस्मृति पडूं नये, या कारणास्तव त्याला शास्त्राभ्यास करणें जरूर पडलें आणि ही गोष्ट खरी आहे, कीं कोणत्याहि विषयाचा पूर्वीं प्रत्यक्ष अनुभव घेऊन नंतर हळुहळु त्या विषयावरचें शास्त्र शिकणें जसें सुलभ आहे, तसें पूर्वीं शास्त्र शिकून नन्तर अनुभव घ्यावयास जाणें हें सुलभ नाहीं. ज्याला प्रत्यक्ष अनुभव नाहीं त्याला शास्त्र काय उपयोगाचें आहे ?

आतां रसज्ञता सम्पादन करणे हीहि एक विद्याच आहे.

रसज्ञता म्हणजे काय व तिचें मूळ बीज काय आहे, हें सांगण्याचे खटपटींत न पडतां मी तुम्हाला इतकेंच मात्र दर्शवितों, कीं जनामध्यें तिला फारच मान आहे. गीत, वाद्य, नृत्य, शिल्प इत्यादिकांत जे निरनिराळे रस आहेत, ते सर्व लहानमोठ्यांला प्रिय असतात आणि मला वाटतें, कीं त्या रसांचा चांगला उपभोग केला तर त्यांत कांहीं दोष नाहीं याविषयीं प्रमाण हेंच, कीं भगवंतानें जा चमत्कारिक व मनोहारि वस्तु या सृष्टींत पदोपदीं करून ठेविल्या आहेत त्या जर सदोष असत्या तर त्याणें त्या निर्मिल्याच नसत्या. मिलटन असें म्हणतो, कीं रसज्ञतायुक्त जी कल्पनाशक्ती तिचा योगानें मनुष्याचा अंतःकरणांत सद्गुणांची वृद्धि होत्ये आणि सर्व उपाधि दूर होऊन चित्त भगवद्गुणानुवादाकडे लागतें.

यावरून रसज्ञता ही संपादन करणें मनुष्याला आवश्यक आहे, असें सिद्ध होतें. रसज्ञतेपासून जें सुख प्राप्त होतें, त्याचा उपभोग घेण्यांत किमपि दोष नाहीं म्हणून मी पूर्वींच सांगितलें आहे. यास्तव, रसज्ञता ही मनुष्याला जात्याच असली पाहिजे, किंवा ती प्रयत्नेंकरूनहि संपादन करितां येत्ये, याचाच काय तो विचार करूं. मनुष्यामध्यें जेवढे गुण आहेत ते सर्व स्वल्प प्रयत्नेंकरून वृद्धिंगत होण्याजोगे आहेत. सर जोशुआ

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

रेनाल्डस् या नावाचा एक प्रख्यात चित्रकार असें म्हणतो, कीं मी जेव्हां रोम शहरास जाऊन मैकल इत्यादि चित्रकाराग्रणी यांणीं काढलेलीं चित्रें पहिल्यानेंच पाहिलीं, तेव्हां त्या चित्रांमध्यें जो कांहीं चमत्कार होता, तो माझ्या ध्यानांत किमपि आला नाहीं; पण जेव्हां तीं चित्रें पाहतां पाहतां कांहीं दिवस लोटले, तेव्हां त्यांमध्यें जी खुबी होती ती हळुहळु मनांत येऊं लागली. यावरून रसज्ञता ही स्वाभाविक नसून अभ्यासानेंच प्राप्त होती असें समजूं नका; अभ्यासाच्या योगानें तिची पूर्णता मात्र होती.

याप्रमाणें रसज्ञता संपादन करण्याचें काम निर्दोषी असून यशस्कर आहे; परंतु काय सांगावें! कित्येक बुद्धिमान व रसिक पुरुषांच्या ग्रंथांच्या प्रकाशानें पृथ्वीमध्यें सद्‌गुणरूप वल्लीची वृद्धि व्हावी ती एकीकडे राहून उलटा त्यांच्या ज्वालांनीं तिचा नाश मात्र झाला, हें पाहून आम्हाला फार खेद वाटतो. यास्तव सूज्ञांनीं अशा तऱ्हेच्या ग्रंथांचें अध्ययन करत्येवेळीं आपला सदाचार लोपून जाऊं नये म्हणून फार जपत असावें. मिलर, स्पेन्सर, हर्बर्ट, आडिसन्, यंग, कोलरिज, वर्डस्वर्थ, कौपर, पालाक्, क्राब्, अशांच्या ग्रंथांपासून तर कांहीं हानि व्हावयाची नाहीं, पण शेक्स्पिअर व बहुतकरून बैरन्, मूर, बर्नस् इत्यादिकांच्या ग्रंथांचें अध्ययन करित्येवेळीं मनुष्यानें सावध असलें पाहिजे. एखादा अजाणता असेल, तर तो कदाचित् त्या ग्रंथांचा गुण टाकून दुर्गुण ग्रहण करील.

हल्लीं लोक मनोरंजनासाठीं कल्पितकथांचे जे ग्रंथ निघतात ते वाचल्यानें कोठपर्यंत फायदा आहे त्याचा विचार करूं.

अशा तऱ्हेच्या ग्रंथांत मोठमोठ्या चातुर्याच्या गोष्टी सांपडतात, हें तर आम्ही नाकबूल करीत नाहीं. परंतु जे केवळ गोष्टीच समजून घेण्यासाठीं ते ग्रंथ वाचितात त्यांला त्या ग्रंथांचें आंतील मर्म समजत नाहीं; कारण मर्माचा बोध होण्यास त्या विषयाचें कांहीं वेळ मनन केलें पाहिजे. स्काट, वारन, थाकरी, डिकन्स, इत्यादिकांनीं जे या विषयावर ग्रंथ रचिले आहेत, ते जो वाचील त्याचे श्रम व्यर्थ जाणार नाहींत; हें आम्ही कबूल करितों. याशिवाय या विषयावर जे इतर पंडितांचे ग्रंथ आहेत ते बहुधा अरसिक असून दुर्गुणप्रवर्तक असतात. असंभाव्य गोष्टी, अविचार, अघोर दुष्कर्में यांहीं-करूनच बहुधा ते ग्रंथ भरलेले असतात. इङ्लंडामध्यें तर अशा तऱ्हेच्या ग्रंथांपासून पुष्कळ खराबी झाली आहे; तशाच, फ्रान्स व जर्मनी या देशांतीलहि रीति अशा ग्रंथां-पासून बिघडल्या आहेत असें कित्येक चांगले विद्वान् म्हणतात. यास्तव मी तुम्हांला असें सांगतों, कीं अशा ग्रंथांचा जितका थोडा परिचय ठेवाल तितकें चांगलें. तेणेंकरून केवळ तुमचे सद्‌गुणच मात्र नाश पावतील इतकेंच नव्हे, परंतु तुम्हाला रसज्ञताहि साध्य होणार नाहीं. याजकरितां तुम्ही हे क्षुल्लक विषय टाकून आपली बुद्धि गहन विषयांकडे लावीत जावी.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

दुसरें :—आत्मशिक्षणापासून मनुष्याला सद्बुद्धि व सद्गुण लागतात, हा एक त्यापासून सर्वोत्कृष्ट लाभ होतो. सद्‌गुणाचे प्राप्तीसाठीं मनुष्यानें सर्व प्रकारें झटावें हें योग्य असें सर्व कबूल करितील. प्रापंचिक सुखाचा लाभासाठींदेखील सद्गुणाची अवश्यकता आहे; आणि जर परलोक म्हणून आहे, व जें बाईट किंवा बरें आचरण या लोकीं आम्ही करितों त्याप्रमाणें परलोकीं अनंत काळ दुःख किंवा सुखप्राप्ती होईल असें आहे, तर मग सद्गुण जोडणे हें किती अगत्याचें आहे हें सांगावयासच नको.

सद्गुण प्राप्त होण्यासाठीं विद्याभ्यास हेंच एक मुख्य साधन होय, असें जे कोणी म्हणतात तीहि गोष्ट कांहीं खोटी नव्हे. कारण विद्येचा योगानें मनाची सुधारणा होती; चित्त विचार करण्याकडे लागतें; अनुमानाचें ताडण करून पाहण्याची सवय होती; व सत्यावर मनाची प्रीती बसती. यांहींकरून मनुष्याचा आळशीपणा जाऊन अंतःकरण दुराचरणाकडे जात नाहीं; परंतु कितीहि विद्या सम्पादन केली, तथापि तेणेंकरून मनुष्याची पापवासना निःशेष जाऊन तो सन्मार्गाला लागेल हें आमचानें सहसा कबूल करवत नाहीं. केवळ विद्येचा बळानें कासोटा मारून सदाचरणरूप दुस्तर सागर तरायास आजपर्यंत जे निघाले त्यांची पाह, काय दुर्दशा झाली ! त्यांचे अंगीं विद्येचा भार अनिवार झाला, त्यामुळें ते त्या भाराखालीं बुडून गेले.

आमचा मतें सद्गुणांचें बीज काय तें एक धर्म आहे, धर्मावांचून दीक्षा व नीतिज्ञान हीं सर्व व्यर्थ आहेत. याजकरितां ग्रंथान्तरीं असें म्हटलें आहे, कीं ज्ञानाचा योगानें मनुष्याचा अंतःकरणाची शुद्धि होते,—पण ती शुद्धि जसा कोणी एक मनुष्य फार वेळ स्वप्नावस्थेंत असून अवचित जागा होतो आणि आपण स्वप्नांतील मिथ्या सुखांत व्यर्थ एवढा वेळपर्यंत फसलों गेलों असें पाहतो, तद्वत् समजावी. याप्रमाणें जो जागृत होऊन एकाएकीं नूतन अशी जी प्रबुद्धावस्था ती पावून रात्रीचा शेवटीं सावधगिरीनें वर्तणूक करायास लागतो. परंतु ही अवस्था कितीहि जरी झाली तथापि कच्ची जाणावी, कारण तेणेंकरून कर्माकर्माचा भेद मात्र समजतो, आणि त्याचा भेद समजल्यानें अंतःकरणाला सर्वांशीं शुद्ध करणारी अशी जी ईश्वरास जाणण्याची अवस्था तिचा सीमेजवळ मात्र मनुष्य येऊन पोंचतो.

परमार्थसाधनाचा पाया घालण्याचा काय तो हाच समय. सद्‌गुण झाले, तरी ते एकाएकी लागत नाहींत. पहिल्यानें त्यांचा संचार हळुहळु होतो; [ते] वाढवावयाचे असल्यास एकनिष्ठेनें त्या उद्योगास लागलें पाहिजे. आला दिवस अंतःकरणचतुष्टय म्हणजे मन, बुद्धि, चित्त, अहंकार, हीं सर्व त्या कामास उद्युक्त असलीं पाहिजेत. सारासार विचार आणि दृढ निश्चय यांचीहि आवश्यकता आहे. जे उपाय या कामाला लागतील ते सर्व उत्साहपूर्वक केले पाहिजेत. ईश्वरोक्त धर्म कोठचा, याविषयीं प्रयत्नपूर्वक शोध

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

केला पाहिजे. अंतःकरण निःशेष शोधून ईश्वरी महत्त्व, न्यायीपणा, पवित्रता व दया यांस अनुसरून वागविलें पाहिजे. मनुष्य जात्या पापबुद्धि असतो. हिंदुशास्त्रांत असें आहे, "पापोऽहं पापकर्माणां पापात्मा पापसंभवः." त्याला सद्बुद्धि प्राप्त होण्यास ख्रिस्तिशास्त्रांत असें आहे, "मी तुमचें पाषाणाचें हृदय काढून तुह्माला मासाचें हृदय देईन." म्हणून ईश्वरी पुरुष जो त्याला शरण रिघालें पाहिजे. अशा नूतन हृदयाची मनुष्यास केवढी आवश्यकता आहे याविषयीं कोण्या एका पंडितानें वर्णन केलें आहे तें असें, कीं,–एकादें घर अशा खराबीस आलें आहे, कीं त्याचा सर्व भिंती वीथविथीचा अंतरानें वरून खालपर्यंत एकसारिख्या भेतलल्या आहेत व त्याचें छपर इतकें जीर्ण झालें आहे, कीं तें केव्हां खालीं कोसळून पडेल याचा भरवसा नाहीं, अशास केवढाहि कुशल मेस्त्री असला तथापि तो काय करील ? अथवा एकादें घड्याळ हातांतून घसरून जमीनीवर पडून इतकें बिघडून गेलें आहे, कीं त्यामध्यें दुरुस्त करायासारिखें कांहींच राहिलें नाहीं; तर मग त्याला केवढाहि हुशार शिल्पी असला, तथापि काय बरें करील ? त्याला त्यांतील जुनीं यंत्रें काढून त्यांचा जागीं दुसरीं नवीन घातलींच पाहिजेत. या प्रकारचें अंतःकरणाचें रूपान्तर जें होत चाललें आहे, ती कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. आजपर्यंत भूमंडळामध्यें अनेक उलटापालटी झाल्या त्यापेक्षांहि ही गोष्ट विशेष आहे. जेणेंकरून मनुष्याची पापबुद्धि इत्यादि जाऊन अधोगति चुकती, ती गोष्ट कांहीं सामान्य आहे काय ? अंतःकरणरूप पृथ्वीवर जो पापरूप राजा बलात्कारें करून राज्य करीत होता, तो येणेंकरून पराभव पावून स्थानभ्रष्ट झाल्यामुळें तें राज्य त्याचा खरा मालक जो परमात्मा त्याचे हातीं आलें आहे.

न्याय, गणित, रसायन, इत्यादि शास्त्रांचें अध्ययन करणें हेंच एक अंतःकरण शुद्ध करण्याचें साधन आहे, असें सहसा समजूं नका. धर्मावांचून इतर कोणत्याच उपायानें हें काम साध्य होणार नाहीं. पण पाहा हो ! तुम्ही शास्त्रीय विषयांचें अध्ययन करूं नये, असा कांहीं आमचा अभिप्राय नाहीं. शास्त्रांचें अध्ययन जर योग्य रीतीनें केलें, तर तुम्हास धर्मसंबंधीं विचारांतदेखील कामास येईल. शास्त्रांचा अध्ययनेंकरून बुद्धीला नम्रतेनें सत्याचा शोध करण्याची व शोधाचे अंतीं जें सांपडेल, त्याचें सद्भावपूर्वक ग्रहण करण्याची जी सवय होत्ये, ती तर ईश्वरी ज्ञानाचे प्राप्तीविषयीं अतिशय उपयोगाची आहे. शास्त्रांची उत्पत्ति कशी झाली, व त्यांची वृद्धि कशी होत गेली याविषयींचा इतिहास वाचून पाहाल, तर लागलेंच तुमचा ध्यानांत येईल, कीं जोंपर्यंत मनुष्यानें अविचारी गोष्टींचा त्याग केला नाहीं, तोंपर्यंत त्याला वास्तविक शास्त्रांचीहि माहिती झाली नाहीं. कार्यावरून कारणाचें अनुमान करण्याची जी रीति तिचा योगानें सृष्टींतील अनेक नियमांचा जो शोध लागला आहे, व आणखीहि उत्तरोत्तर अधिक लागेल असा जो संभव आहे यावरून असें समजून येतें, कीं ईश्वर कांहीं गुप्त ठेवित नाहीं. यास्तव, जर तुम्ही अंतःकरणपूर्वक

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

शुद्ध भावानें ईश्वरसंबंधीं ज्ञानाचा शोध कराल, तर तो दयाळु तुमची ती मनकामना तृप्त केल्याविना राहणार नाहीं. आम्हाला असें वाटतें, कीं वर सांगितलेल्या रीतीनें जर आपल्या मानसिक व्यापारांविषयीं मनुष्य विचार करायास लागेल, तर तेणेंकरून पापाचा कर्ताकरविता ईश्वर असें मानणें इत्यादि सर्व दोषजनक जीं पाखंडी मतें त्यांचा उच्छेद होऊन सर्वेश्वर जो भगवान् त्याचे सेवेस तो लागेल. कारण तेणेंकरून पापपुण्यवर्तक जीं इंद्रियें तीं आमचे स्वाधीन वर्ततात किंवा नाहीं, याचा त्वरित बोध होईल, व अशा तऱ्हेनें जो बोध होतो, त्याचा खरेपणाविषयीं जर विकल्प घ्याल तर मग ही सर्व सृष्टि व सर्व संशयछेदक अशीं जीं शास्त्रें तीं तरी खरीं असें कशावरून म्हणाल ?

यास्तव वर सांगितलेल्या रीतीनें जर विचार करून पाहिलें, तर आपण पापपुण्याचे स्वतंत्र प्रवर्तक आहों असें शेवटीं सिद्ध होतें. सृष्टींतील नियम उघड करून दाखविणारीं अशीं जीं शास्त्रें, त्यांचा योगानेंहि ईश्वर अनन्य असून न्यायी, सर्वज्ञ आणि अवितर्क्य आहे असेंच सिद्ध होतें. सद्गुणांची वृद्धि करणें हें फार आवश्यक आहे, व जरूर आहे, असें तुम्हाला दाखविण्यासाठीं आणखीं विशेष सांगणें नलगे. यास्तव हा विषय मी आतां समाप्त करितों. सद्गुणांची वृद्धि करणें हें जरूर आहे, असें आजपर्यंत सर्व सुशील लोक मानीत गेले आहेत, व त्यांणीं तत्प्राप्त्यर्थ परिश्रमहि केले आहेत. हें कार्य सिद्धीस नेण्यास धर्मावांचून इतर साधनें कांहींच कामाचीं नाहींत. धर्माचा जर बराबर विचार कराल तरच अंतःकरणाची स्वस्थता, इंद्रियदमनशक्ति आणि जन्माचें साफल्य हीं प्राप्त होतील; यास्तव सुज्ञजन हो ! समस्त सुखाचें आदिकारण असें जें आत्मशिक्षण त्याविषयीं जे तुम्हीं प्रयत्न कराल, ते सुफळ होऊन तुम्हाला उभय लोक साध्य होवोत, अशी माझी ईश्वरापाशीं विनंती आहे.

ज्ञानप्रसारक—पु. १३, अं. ८, ९ व पु. १४, अं. १
(नोव्हेंबर, डिसेंबर १८६२ व जानेवारी १९६३).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

१२

कापूस

हा पदार्थ प्राचीन काळापासून भरतखंडाचा कोनाकोपऱ्यांतदेखील विपुल उत्पन्न होतो. आणि सांप्रत तो बहुत करून पृथ्वीवरील सर्व भागांतील लोकांचें आच्छादन असून व्यापाराची खाण झाला आहे. या देशांत कापूस कोणत्या काळापासून प्रख्यातीस आला व आमचे लोक केव्हांपासून याचा उपयोग करूं लागले, याचें मूळ शोधून काढणें फार अगत्याचें आहे खरें, परंतु तें हिमालयाचा शिखराचा शोध लावण्याचा प्रयत्नापेक्षांही दुर्गम आहे. कारण आमचा लोकांस कापसाचें वस्त्र परिधान करणें व त्याचे अनेक उपयोग करणें हें चिरकाळापासून माहीत आहे. पुराणें व दोनतीन हजार वर्षांमागील संस्कृत ग्रंथ काढून पाहिले तर त्यांत कापसाचें वर्णन असायाचेंच. वस्त्र, पितांबर, यांचें जिकडे तिकडे वर्णन आहेच. आतां पूर्वकाळांतील ऋषि वल्कलें परिधान करीत होते असें कोठें कोठें अढळतें. परंतु ते तपश्चर्या करण्यास अरण्यांत जात तेव्हां, किंवा सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेत तेव्हांच वल्कलें परिधान करीत; असा लेख सांपडतो. रामचंद्र वनवासास जाण्याचा पूर्वी उंच वस्त्रें परिधान करी, परंतु वनवासास जायाचा वेळीं त्यानें वस्त्र, अलंकार टाकून वल्कलें ग्रहण केलीं, असें रामायणांत वर्णन आहे. यावरून मूळस्थितींत पूर्वी आमचे पूर्वज वल्कलें केव्हां धारण करीत होते व वस्त्रांचा केव्हां उपयोग करूं लागले याचा बराबर शोध लागत नाहीं. ब्रह्मदेवदेखील कवेती कांठी धोतरजोडे नेसत असे असें सांगणार सांपडतात. विश्वामित्रानें आपला पंचा आकाशांत फेकून सूर्यास लोपवून टाकिलें असा लेख सांपडतो. बरें, खिस्ती धर्मशास्त्र काढून पाहिलें तरी त्यावरूनही याचा शोध लागत नाहीं. त्यांत असा लेख सांपडतो कीं, सुमारें ५८६३ वर्षांमागें ईश्वरानें सृष्टि उत्पन्न केली त्या वेळीं आदाम

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आणि इव्हा या दोन मूळ पुरुषांस उत्पन्न केलें. तीं कांहीं काळपर्यंत आपली काया अंजिराचा पानानीं झांकीत, परंतु पुढें त्यांस वस्त्रें केव्हां मिळालीं याविषयीं कांहीं सांपडत नाहीं, परंतु भरतखंडस्थ लोक वस्त्राचा उपयोग करून किमान पक्ष तीनचार हजार वर्षें होतील असें अनुमान होतें. आणखी दुसरी अशी गोष्ट आहे, कीं शास्त्रीपंडित, पुराणीक, व वैदिक, यांस जर असा प्रश्न केला, "शास्त्रीबावा, आमचे लोक कापसाचा उपयोग केव्हांपासून करूं लागले?" तर हा प्रश्न ऐकून त्यांस मोठी चीड येत्ये, आणि उलट असा प्रश्न करितात, "काय हो, याचा अर्थ आमचा लक्षांत येत नाहीं. कारण कापूस हा पदार्थ अनादिसिद्ध आहे. व देवदेखील प्राचीन काळापासून वस्त्रें परिधान करित आले आहेत. इंग्रजी शिकायास लागल्यापासून या लोकांस सर्वच गोष्टींची भ्रांति पडूं लागली आहे." आणि वास्तविकच आहे कीं, इंग्रजी शिकला म्हणजे मनुष्यास आपल्या ज्ञानाचा उपयोग करणें भाग पडतें. केवळ "बाबा वाक्यं प्रमाणं" यावरच विश्वास ठेवून राहावत नाहीं. असें जेव्हां पंडितांकडून उत्तर मिळतें तेव्हां शोध करणारा काय शोध करील? युरोपियन, अमेरिकन्, चिनी, आरब वगैरे पृथ्वीचा पाठीवरील लोकानीं कोणकोणत्या काळापासून या अमोलिक पदार्थाचा उपयोग केला, व कोणकोणत्या प्रकाराचा युक्ति करून तो त्यानीं आपल्या देशांत नेऊन लागवड करूं लागले, याचा सर्व इतिहास सांपडतो. परंतु भरतखंडस्थ लोकांत कोणत्या काळापासून याची प्रवृत्ति झाली याचा कांहीं थांग लागत नाहीं.

आमचा लोकांचे दृष्टीस कापूस म्हणजे केवळ कसपटासारिखा वाटत असतो, अर्थात् "अतिपरिचियादवज्ञा." परंतु सन १८६२ पासून भरतखंडस्थ किंबहुना मुंबापुरस्थ लोकांस कापूस म्हणजे किती अमोलिक पदार्थ आहे तें समजूं लागलें. अमेरिकेंतील कापूस इंग्लंड देशांत जात असे तो या वर्षी बंद झाल्यामुळें त्याची धारण इतकी वाढली, कीं जो कापूस दीडदोन रुपये मण होता तो पंचरावीस रुपये मण विकूं लागला. या वर्षी कित्येक व्यापारी कुबेरच होऊन गेले. अस्तु, याविषयीं पुढें कारणपरत्वें बोलण्यांत येईल.

परखंडस्थ लोकांनीं जेव्हां कापूस प्रथमच पाहिला तेव्हां त्यांस हा जीव कोटींतील किंवा वनस्पति कोटींतील पदार्थ असावा अशी भ्रांति पडली. आणि जेव्हां त्यांस याचा उपभोग घेण्यास सांपडला तेव्हां आपणास संजीवनीच सांपडली असें वाटलें.

उत्तरोत्तर ज्ञान वृद्धिंगत करण्याचा मनुष्याचा स्वभाव आहे हें आमचे लोक कबूल करित नाहींत. पूर्वकालापेक्षां मनुष्याचें ज्ञान अर्वाचीन काळीं विशेष वाढलें आहे म्हणून जर त्यांस सांगितलें तर त्यांची समजूत पडायाची नाहीं; इतकेंच नव्हे परंतु उलटे चिडीस जातात. यामुळेंच आम्हाकडून नव्या कल्पना निघत नाहींत. आमचा

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

लोकांनी चार युगें कल्पिलीं आहेत, आणि हीं युगें अनादिसिद्ध असें मानितात. आजपर्यंत हीं किती होऊन गेलीं त्यास पारच नाहीं. तसेच सहस्रावधि या पृथ्वीवर मनु व शककर्ते होऊन गेले. आणि प्रत्येक युगांत त्या त्या मनूंचीं मन्वंतरें होऊन त्यांची पूर्ववत् घडामोड होत जाती. मनुष्याचा ज्ञानाची व सृष्टीची रचना ईश्वरानें एकदां करून ठेविली आहे, त्याप्रमाणें वहिवाट होते व पुढेंही तशीच चालेल, त्यांत तिळमात्रही इकडचें तिकडे व्हावयाचे नाहीं, मनुष्याचानें नूतन कांहींच करवत नाहीं, ही किती विलक्षण कल्पना! जसे आतां आह्मी आहों तसे मागील कलियुगांत होतों; त्यांतही एलफिन्स्तन् विद्यालय होतें; व ज्ञानप्रसारक सभा होती, तीचे अध्यक्ष भाऊ दाजी होते व रावसाहेब महादेव गोविंद शास्त्री तेथें भाषण करीत असत. त्या वेळीं रेलवे, सुताचीं यंत्रें, मिशनरी, बैबल सोसैटी, ट्राक्ट सोसैटी हीं सर्व होतीं. किंबहुना, विद्यमानी जें कांहीं पृथ्वीवर आहे तें मागील जीं कलियुगें होऊन गेलीं त्यामध्येंही होतें; आणि पुढें येणाऱ्या कलियुगांतही असेल. किती हो नवल मानण्याजोगी गोष्ट! तर या युगचक्रामध्यें आह्मी भ्रमण करित आहों त्यांतून जेव्हां सुटूं त्यावेळीं आह्मास नव्या कल्पना सुचतील व आह्माला नवे नवे शोध करण्याची उमेद येईल. पाहा, हजार वर्षांमागें आह्मामध्यें कापड विणण्याचें जें साहित्य होतें तें अद्यापि आहे. मनूनें जे कायदे करून ठेविले होते तेच प्रस्तुत चालू आहेत. त्यांत ह्मणून अणुरेणुदेखील फेरफार करण्याचा खटपटींत कोणी पडलेच नाहींत. त्यांस कोणी नवीन कल्पना सांगितली तर त्यास हें उत्तर "आमचे वडील काय मूर्ख होते! आणि आह्मी आतां शाहणे टिकोजीपंत झालों! चाललें आहे तें ठीक आहे. काळ आला ह्मणजे व्हावयाचें तें आपोआप होईल."

कापूस, ताग, लोंकर, व रेशीम या चार पदार्थांपासून वस्त्रें होतात. हे चारही पदार्थ एकाच देशांत सांपडतात असें नाहीं; परंतु यांची मूळ उत्पत्ति, लागवड व यांचा उपयोग हीं बहुतकरून एशिया खंडातच. तागांचें बीं मुळीं मिसर देशांतून बाहेर पडलें असें कित्येकांचें मत आहे. मेंढरें, जांपासून लोंकर होती त्यांची उत्पत्ति मुळीं एशिया मधील पर्वतांवरच असावी असा कूव्हियर याचा सिद्धांत आहे. रेशमी किड्यांची उत्पत्ति चीन देशांत, व कापसाची भरतखंडांत; आफ्रिका आणि अमेरिका एथें तो चिरकाळापासून रानझाडांतच खपत असे. यावरून या द्वीपांत पूर्वींपासून कापसाची लागवड होती असें ह्मणवत नाहीं. कारण अमेरिकेंतून कापूस आलिकडेसच इंग्लंडास जाऊं लागला आणि ग्रंथांतरीं असा लेख सांपडतो कीं, कापसाची लागवड करणें व त्याजपासून अनेक तऱ्हेचीं वस्त्रें करून त्यांच्या उपभोग घेणें ही कल्पना प्रथम एशियाखंडांतून किंबहुना भरतखंडांतूनच बाहेर पडली.

हिराडाटस् या नांवाचा एका युनानी इतिहासकर्त्यानें खिस्ती शकापूर्वीं ४४५ (ह्मणजे सुमारें २३०७ वर्षांमागें) एक ग्रंथ लिहिला होता, त्यांत त्यानें कापसाविषयीं

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

कांहीं वर्णन केलें आहे. त्याचा पूर्वीं पश्चिम देशस्थ ग्रंथकारानीं कापसाविषयीं कोणीच कांहीं लिहिलेलें आढळत नाहीं. तो असें ह्मणतो, "भरतखंडांत एके प्रतीचें झाड आहे त्याला फळाचे जागीं लोंकर पिकत्ये. ती लोंकर मेंढरांचा लोंकरी-पेक्षां सरस व नाजूक आहे, व त्या देशचे लोक तिचीं वस्त्रें करित असतात." दुसऱ्या एका ठिकाणीं त्याच ग्रंथकारानें कापसाला झाडाची लोंकर ह्मटली आहे. जर्मन लोक कापसाला "बामवाल" असें ह्मणतात. त्या शब्दाचाही अर्थ तसाच होतो. त्यानंतर सुमारें शंभर वर्षें गुजरल्यावर कापसाची उत्पत्ति पश्चिम देशांतही हळू हळू व्हावयास लागली. त्या वेळचा एक ग्रंथकार तेवोफ्रातस्त असें लिहितो, "इराणाचे खाडींत तिलोस या नांवाचें एक बेट आहे, तेथें पुष्कळ कापूस पिकतो, व तेथचे लोक त्याचीं वस्त्रें करित असतात आणि कापसाचा वस्त्रांचा उपयोग केवळ हिंदुलोकच करीत आहेत असें नाहीं; परंतु आरबस्थानचे लोकही करीत आहेत." आरब लोक पुष्कळ वर्षांपासून भरतखंडाशीं व्यापार करीत, आणि एथून कापूस व कापड घेऊन जात. सुमारें दोन हजार वर्षांमागें कल्याण ही मोठी व्यापाराची पेंठ होती. तेथें द्वीपांतरील लोक पूर्वीं व्यापारासाठीं येत, व अनेक जातीचा माल नेत व आणीत. या व्यापाराचा संबंधानें एथून कापसाचें बीं द्वीपांतरी गेलें. प्रथम तें इराणांत व मिसर देशांत गेलें. सन १६७२ रांत डाक्टर जोयर युरोपखंडांतून भरतखंडांत देशाटण करायास आला होता, तो जुन्नरास मुसलमान बादशाहास भेटायास जात असतां कल्याणावरून गेला, तो कल्याणाविषयीं असें लिहितो, "या शहरांतील मोडकळीस आलेल्या इमारती व स्थळें पाहून त्याचा पूर्वींचा वैभवाचें अनुमान होतें. यावरून एथें पूर्वीं किती व्यापार होतसे, हें ध्यानांत येईल."

कापसाविषयीं दुसरा लेख काय तो अरियन याचा ग्रंथांत सांपडतो. हा ग्रंथ ख्रिस्ती शकाचा पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांत झाला, ह्मणजे यास सुमारें १७०० वर्षें झालीं हिंदुस्थान व आरबस्थान एथील लोक समुद्राचा किनाऱ्यावरचे गांव फिरून कापसाची घडामोड कोठें, कशी करीत होते तें सर्व याणें लिहिलें आहे. ख्रिस्ती शकाचा पहिल्या शतकापासून जरी कापूस मिसरदेश व इराण एथें पिकत असे, तथापि तो विपुळ ह्मणाया-जोगा पिकत नव्हता, असें वाटतें. कारण मिसर देशांतून इटाली देशांत पुष्कळ विका-याला जात असे, परंतु रोम् सरकारानें जा वस्तूंवर जकात बसविली होती, त्यांत कापसाचें नांवदेखील सांपडत नाहीं. सन ५२७ सांत (१३३५ वर्षांपूर्वीं) जस्तिनियन् राजाचे कारकिर्दींत कांस्तातिनोपल् (इस्तबूल) एथें हिंदुस्थानचा कापूस जात असे, तथापि थोडाच.

तार्तरी लोकानीं चीन घेतल्यानंतर सुमारें इसवी सन १३५८ नांत त्या देशांत कापसाचीं वस्त्रें करायास लागले. त्यापूर्वीं तेथें लहानथोर सर्व रेशमी वस्त्रें नेसत असत आणि अद्यापि झालें तरी तेथील बडे लोक रेशमी वस्त्रें वापरतात.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

चिनांत जीं कापसाचीं वस्त्रें होतात त्यांहींचकरून तेथील लोकांचा निर्वाह होतो असें नाहीं. मुंबई, सुरत व इतर कित्येक हिंदुस्थानांतील शहरांतून तेथें वस्त्रें जात आहेत. जपान, जावा, बोर्निओ, व इतर दुसरीं बेटें आहेत त्यामध्यें बहुधा कापसाचीं वस्त्रें वापरीत असतात. चीन देशांत जेव्हां प्रथमच कापसाचें वस्त्र नेलें तेव्हां तेथील लोक नेणाराचा द्वेष करूं लागले व कापसाचा प्रवेश देशांत न व्हावा म्हणून कुभांड रचूं लागले. त्यांस एवढी भीति प्राप्त झाली, कीं पुढें आपला रेशमाचा धंदा बुडेल.

इंग्लांडामध्यें आफ्रिकेंतील लोकानीं केलेलें कापसाचें वस्त्र पहिल्यानें १५९० दांत नेलें. आफ्रिका देशांत जे फिरून आले आहेत, ते असें सांगतात कीं, तेथें सिनेगाल, गाम्बिया, नैजर, या नद्यांचा कांठीं कापूस विपुळ पिकत असतो व त्या देशांत उत्तरे-कडेस तऱ्हेतऱ्हेचीं लोंकरीचीं वस्त्रें होत आहेत.

जार्जिया एथें जो चांगला कापूस होतो त्याचें मुळचें बीं स्मर्ना एथून नेलें होतें. आणि तेथें तें भरतखंडांतून नेलें होतें. असें अनुमान होतें. अमेरिकेंत एक दुसऱ्या तऱ्हेचा कापूस होतो खरा, परंतु तो तादृश चांगला नाहीं. सन १४९४ वांमध्यें कोलंबसानें अमेरिकेचा शोध लाविला त्या वेळीं त्यास तेथें रानकापसाचीं झाडें दृष्टीस पडलीं होतीं, असें तो आपल्या पर्यटनांत लिहितो. तें कांहीं असो, परंतु कापसाची लागवड, वस्त्र करण्याची कृति परखंडस्थ लोकानीं एथूनच नेली, ही निर्विवाद गोष्ट आहे.

स्पेन देशांत मुसलमानाचें राज्य झाल्यावर त्यांनीं तेथें कापूस नेला. युरोपांत पहिल्यानें या पदार्थांची माहिती काय ती हीच.

इंग्लंडांत कापसाचा प्रवेश केव्हां झाला हें कांहीं बराबर समजत नाहीं. परंतु यार्कशायरचा एका मठांतील चोपडीवरील लेखावरून असें दिसून येतें कीं, सन १२९८ वांत इंग्लांडांत कापसाचा वाती मात्र करीत असत. त्या पूर्वीं तेथें कापसाचा वस्त्राची माहिती नव्हती.

कापसाचा किती जाति आहेत, यांचीं झाडें कोणत्या प्रकारचीं असतात, व तीं लावण्याची कृति कशी असते, याचा आतां कांहीं विचार करूं.

कापूस सुमारें तीस चाळीस निरनिराळ्या प्रतींचा असतो. अनेक तऱ्हेचें बीं एकत्र मिसळून लाविल्यानें या एवढ्या जाति झाल्या, दुसरें कांहीं नाहीं. मूळचा कापसाचा पांच सहा जाति होत्या. चांगला आणि वाईट एके ठिकाणीं लाविला ह्मणजे एकमेकांचा संबंधानें विजातीय कापूस हलक्या प्रतीचा उत्पन्न होतो. आणि या दुर्लक्षामुळें कापसाचा जाति वाढत गेल्या आहेत. पाहा, सृष्टीचा क्रम किती चमत्कारिक आहे तो; मनुष्यास चांगले गुण होण्यास संगत प्रधान आहे. विद्वज्जनाचा संगतीं असला ह्मणजे तो योग्यतेस चढतो, आणि वाईटाचा संगतीं शिरला ह्मणजे

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

वाईट होतो, तसा प्रकार वनस्पतीचा नाहीं. उत्तम प्रतीचें झाड वाईट प्रतीचांत मिसळलें असतां तें वाईटाचा गुण घेतें; जसा एक वाईट मनुष्य हजार बऱ्या मनुष्यांस नासायास समर्थ असतो. परंतु हजार चांगल्या मनुष्यांचानें एका दुष्ट मनुष्यास सुधारवणार नाहीं. यास्तव मनुष्यास तसेंच झाडासदेखील वाईट संगतीपासून रक्षण केलें पाहिजे. एक एक जातीचें बीं वेगळेंच काढून लाविलें पाहिजे, ह्मणजे त्यापासून एक जातीचा एकसारिखा चांगला कापूस पिकतो. यांतही मुख्य जाति निराळ्या आहेत, त्यांजकडे लक्ष पोंचविलें पाहिजे. लिनियस नामक वनस्पतिशास्त्रवेत्ता कापसाचा ५ मुख्य जाति कल्पितो. ल्यामार्क ८ कल्पितो, कानिलीस आणि विल्डिनो हे दाहा कल्पितात. आतां या सर्वांत तीन मुख्य जाति आहेत त्या येणेंप्रमाणें :—

१. रोप्याचा कापूस २. झाडीचा कापूस. ३. वृक्षाचा कापूस.

रोप्याचा, हा प्रतिवर्षीं लावितात. हा लावल्यापासून सुमारें ८ महिन्यांनीं तयार होतो. याचीं झाडें दोन अडीच हात उंच वाढतात व यास आडव्या तिडव्या डाहाळ्या फार येत नाहींत. गुजराथेंत, घाटावर, व द्वीपांतरीं याची लागवड फार आहे आणि या कापसाचें उत्पन्न फार.

अमेरिकेंत कापसाची लागवड युरोपियन् लोकानीं सुरू केली आणि आपल्या अप्रतिम उद्योगानें तो उत्तम प्रतीस आणिला, इतकेंच नाहीं, परंतु जा देशांत मूळ सुधारणा झाली त्या देशास मागें पाडिलें. अमेरिकेंतून पूर्वीं सुमारें सन १७८० त प्रथम दोनतीन कापसाचे गठे इंग्लंडांत आले होते, हें काय तें त्या वेळचें पीक. परंतु सध्या प्रतिवर्षीं देशास पुरा पडून एथून तीस कोटी रुपयांचा कच्चा कापूस बाहेर जातो. याशिवाय वस्त्र जात असेल तें खेरीज. तेथें कापडाचे शेंकडों कारखाने आहेत व कापसाचे हजारों मळे आहेत.

हे लोक प्रतिवर्षीं जमीन पालटून कापूस लावून पहातात. अशा लागवडीस आलेल्या कापसास पुष्कळ पीक आलें ह्मणजे तितक्यानेंच उगें रहात नाहींत, परंतु प्रत्येक जातीचा कापसाचें सूत काढून पहातात आणि जा कापसाचें सूत एकसारिखें, सरसरीत, स्वच्छ व पांढरें निघतें तो उत्तम प्रतीचा असें मानून त्याप्रमाणें तो लावण्याची तरतुद ठेवितात.

युरोपखंडांत कापूस केव्हां जाऊं लागला याचा कांहीं विचार करूं. इसवी सनाचा बाराव्या शतकापर्यंत सिसिली व इटाली एथें रेशमी व लोंकरीचीं व तागाचींच वस्त्रें उपयोगांत आणित. ग्रीस देशांत तर तागाचा वस्त्राचाच फार खप असे, आणि हा पदार्थ त्यानीं मिसर देशांतून नेला होता. कापसाचा प्रवेश प्रथम स्पेन देशांत झाला. जा वेळीं सर्व युरोप अज्ञानावस्थेंत होता त्या वेळीं या देशांत कलाकौशल्यांचा

Digitized by Google		Original from UNIVERSITY OF MICHIGAN

प्रसार होत चालला होता आणि तें एथें कोठून आलें ह्मणाल तर मुसलमान खलीफ लोकांचा कारकिर्दीत सन ९१२ पासून सन ९६१ पर्यंत तिसरा अबडरहाम ज्यास महंत असें नांव दिलें होतें त्याचा कारकिर्दीत पूर्वेकडील देशांतून पुष्कळ माल तेथें जाई, व कित्येक वनस्पतीचें बीं एथून नेलें होतें. यांत मुख्यत्वेंकरून कापूस, ऊंस, भात, तुतीचीं झाडें (रेशमी किड्यांचा प्रसार करण्यासाठीं.) एशियाखंडांत आरब व युरोपखंडांत वलंदेजी लोक (डच) या दोन लोकांकडून प्राचीन काळापासून व्यापाराची उलाढाली फार झाली. याचाच योगानें बहुतकरून पूर्वीपासून युरोप व एशियांतील मालाची अदलाबदली होऊं लागली आणि यांजकडूनच द्वीपांतर वस्तूचा प्रसार पृथ्वीवर झाला.

इंग्लंड देशांत कापसाचे कारखाने केव्हां चालू झाले हें बराबर सांगवत नाहीं, परंतु यार्कशायर एथील बोटणच्या मठामध्यें सन १२९८ त जिनोआ देशांतून कापूस आला असा लेख सांपडतो, परंतु सन १६४५ पर्यंत तेथें कापड करण्याचे कारखाने किंवा कापडाविषयीं कांहीं लेख सांपडत नाहीं. स्पेन देशांतील एक पुरातन इतिहासकर्ता मर्डु असें लिहितो कीं, मुसलमान बादशाहानें सन ८६५ मध्यें फ्रान्स देशाचा राजा चार्लस बाल्ड् यास एक वस्त्र पाठविलें होतें.

कलिकोट, बऱ्हाणपूर, भडोच, खंबायत, नागपूर, शापूर, मसलीपट्टण, धोका, बनारस, या स्थळांत प्राचीन काळापासून कापसाचीं उंच वस्त्रें होत असत अशी त्यांची प्रख्याति आहे, परंतु कोणत्या काळापासून ते हें काम करायास लागले हें मात्र समजणें कठीण.

कापूस पिकण्याचीं स्थानें. सुरत, भडोच, खंबायत, किंबहुना सगळा गुजराथ प्रांत, करनाटक देश, बेळगांव, धारवाड, कुमटें, महू, नागपूर, धुळें, खानदेश, आणि वास्तविक ह्मटलें तर एशिया खंडाचा सर्व भागांत पुरातन काळापासून कापूस कमजास्त अशा मानानें पिकतो. सांप्रत तो सर्व खंडांत थोडाबहुत पिकतो.

झाडीचा कापूस; हें झाड तीन चार हात उंच वाढून त्यास आडव्यातिडव्या फांद्याही फुटतात. हीं झाडें उष्ण देशांत दोन अडीच वर्षेपर्यंत वांचतात, त्यांपासून बहुधा बारमाही कापूस उत्पन्न होतो; परंतु पावसाळ्यांत एक दोन महिनेपर्यंत यांस फारसें बोंड येत नाहीं. या जातीचा कापूस रोप्याचा कापसासारिखा सर्वत्र सांपडतो. जा देशांत हवा समशीतोष्ण आहे त्या देशांत हें झाड पांच साहा वर्षेपर्यंत वांचतें आणि जर त्याची बराबर वेळीं खच्ची केली, तर तें चार वर्षें अधिक वांचून कापूसही चांगला पिकतो. यामध्यें दुसरी एक जाति अशी आहे कीं, ती वेलीसारिखी

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

जमिनीवर पसरलेली असती, परंतु ती जाति या देशांत कोठें फार आढळत नाहीं. ही जाति द्वीपांतरीं आहे असा लेख सांपडतो.

तिसरी एक विलक्षण जाति कापसाची आहे. तिची उत्पत्ति दक्षिण अमेरिकेंत होती असें अनुमान होतें. परंतु आमच्या देशांत बोरबोन बेटांतून आली. असें सांगतात कीं, अमेरिकेंतून मोरीस एथें कांहीं कापसाचें बीं पाठविलें होतें, त्यांत हें बीं सांपडलें. या कापसास आमचे लोक देवकापूस असें ह्मणतात. हें झाड चार पांच हात उंच वाढून त्याचा विस्तार फार होत नाहीं. परंतु त्याचें बोंड सुमारें मुठेल्या केळ्याएवढें मोठें असून त्यास तीन पाकळ्या असतात. दर पाकळीस एकेक मोठी सरकी असती, तीवर कापसाचें वेष्टन असतें. या सरक्या दर बोंडांत तीन चार असतात. आणि ती सुमारें करांगळीएवढी लांब असून त्यास दुसऱ्या आठ दाहा सरक्या चिकटलेल्या असतात. ही सरकी जमिनींत रोंविली ह्मणजे तींत जितक्या सरक्या असतील तितक्या रोप्यांचा गुच्छ एकदम बाहेर पडतो; मग ते रोपे वेगवेगळे करून दुसऱ्या ठिकाणीं लावावे, किंवा तसेच राहूं दिले तर एकच ठिकाणीं सातआठ रोप्यांचें झुडूप वाढतें परंतु सगळे रोपे वांचत नाहींत; कित्येक आंतचा आंत चेंगरून मरतात. एक एक बोंडांत सुमारें दोनअडीच तोळे कापूस पिकतो. आणि तो उत्तम प्रकारचा असून यापासून एकसारिखें सरळ सूत निघून गोळी राहात नाहीं; परंतु हें झाड दोन तीन वर्षांवर वांचत नाहीं, याचें पीक फार थोडें होतें कारण आमचे लोक हा कापूस फार लावीत नाहींत; याचीं जानवीं व देवाजवळ जाळायास वाती करितात.

झाडाचा कापूस; हें झाड सात आठ हात उंच वाढून याचा विस्तार बराच होतो. हीं झाडें आफ्रिकाखंडांत फार आहेत व अमेरिका व एशियाखंडांतही हीं बहुत सांपडतात भरतखंडांत या जातीचा कापूस थोडा पिकतो. हें झाड दहापंधरा वर्षेपर्यंत टिकतें. परंतु एकदोन वर्षांनीं याची खची केली पाहिजे, म्हणजे कापूस चांगला पिकतो. या झाडावर जो कापूस पिकतो तो उंच प्रतीचा असून याचें सूत सरळ निघतें व याला गोळी राहात नाहीं. परंतु हें झाड जेव्हां तारुण्यावस्थेंत असतें तेव्हां त्याचा कापूस उत्तम प्रकारचा असतो आणि म्हातारें होत चाललें म्हणजे कापसाचें तेज कमी होत जातें. झाडाचा कापूस लोक फार लावित नाहींत, याचें कारण हें झाड एकदां लावलें ह्मणजे ती जमीन अडून राहते, तेथें दुसरें कांहीं लावण्याचा उपाय चालत नाहीं आणि रोप्याचा लाविला ह्मणजे त्या शेतांत चार पांच महिने दुसरें धान्य पिकविण्याची सोय असती.

कापसाचा जाति त्याचा सरक्यांवरून ठरवितात. कांहीं सरक्या कापसास एवढ्या चिकटलेल्या असतात कीं, यांपासून कापसास मोकळा करायास

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

फार श्रम पडतात. या सरक्यांचा रंग बहुधा पांढसर असतो; कांहीं हिरवट असून त्या कापसापासून लागल्याच निरनिराळ्या पडतात. कांहीं काळ्या असतात. दुसऱ्या अशा आहेत कीं, फारच नाजूक असून कापसांतून दूर करतेवेळींच त्या फुटून जातात. हा कापूस उंच प्रतीचा.

आमचा लोकांस शेतकीचें काम पुष्कळ काळापासून माहीत असून त्यांत त्यांची मतिही बरीच चालत्ये. परंतु आपलें ज्ञान उत्तरोत्तर नव्या नव्या युक्ति काढून वाढवावें, अथवा जमीन नव्या युक्तीनें कमावून त्यांत नव्या नव्या प्रकारचें धान्य व वनस्पति उत्पन्न करावी असी त्यांची वहिवाट नाहीं; त्यामुळें त्यांचे उद्योग उदयास येत नाहींत.

अमेरिकन व युरोपियन् लोकानीं या कापसाचा उत्पत्तीवर आज दिवसपर्यंत शेंकडों शोध केले व हजारों रुपये खर्च करून यावर ग्रंथ छापले आहेत.

येणेंकरून त्याणीं कापसाचें पीक उत्तम प्रतीचे होई असे मार्ग शोधून काढिले व याची लागवड इतकी वाढविली कीं या उद्योगांत तर ते अमीर होऊन गेले. आमचे शेतकरी व कुणबी ह्मणजे गरीब आणि जें ते उत्पन्न करितात त्यापासून त्यांस फारसा नफा होत नाहीं. जे त्यांपासून खरेदी करतात ते सुखी होतात. अमेरिका व युरोपखंडांत जे श्रीमंत ते शेतकीचें काम करितात आणि त्यांजकडे या कामास लावावयास पाहिजे तेवढें द्रव्य असल्यामुळें ते महस्रावधि युक्तीनें हें काम वाढवितात, तेणेंकरून त्यांस द्रव्यही पुष्कळ मिळतें.

कापसाचें बीं फार जतनेनें ठेवावें पडतें, व तें लावायाचा पूर्वीं त्यावर कापसाचे तंतु अगदीं ठेविले न पाहिजेत. त्याजवर जे बारीक बारीक तंतु असतात ते हलक्या हातानें काढिले पाहिजेत. त्याचा तेलकटपणा जावा म्हणून तें स्वच्छ रेतींत हलक्या हातानें चोळून ठेविलें पाहिजे; त्याचप्रमाणें जमीन तयार करून लाविलें पाहिजे. अमेरिकेंतील कापूस उंच प्रतीचा होण्यास एक यांची युक्ति, दुसरें तेथील हवा या झाडांस माफक पडती, आणि तेथील जमीन उत्तम प्रकारची असत्ये.

दक्षिण व उत्तर अमेरिका एथिल कापसाचें सूत जसें निघतें तसें हिंदुस्थानांतील कापसाचें निघत नाहीं. याचें कारण असें कीं, या देशांत त्याची चांगली मरामत होत नाहीं. बीं घेऊन तें शेतामध्यें फेंकून देतात ह्मणजे झालें. एकदां हें काम झालें, म्हणजे मग त्याची जतन करीत नाहींत. गुरेंढोरें खातील ह्मणून मात्र कांहीं आड व वयी करितात तेवढेंच. आणि जा शेताचें बीं त्याच शेतांत पेरीत असतात, पालटीत नाहींत बरें. तो पिकला म्हणजे गोळा करायाची रीति ही अव्यवस्थित. बियांचे तेलकट तुकडेही कापसांत राहूं देतात, तेणेंकरून त्याचा रंग जाऊन त्याला मळकटपणा येतो. मग पुढें

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

तो फत्तेमाऱ्यावरून दुसऱ्या देशांत पाठवून देतात, त्या फत्तेमाऱ्याही तशाच प्रकारचा. कापूस भिजूं नये ह्मणून त्यावर छपरदेखील केलेलें नसतें. उत्कृष्ट तऱ्हेचा कापूस असला तऱ्ही तो अशा अव्यवस्थेमुळें बिघडून जातो; असें असतांही भरतखंडांतील कापूस उत्तम प्रतीचा असून त्याजवर अनेक रंग चांगले चढतात. याचें वस्त्र टिकण्यांतही मजबूत असें पुष्कळ व्यापाऱ्यांचें मत आहे.

एके प्रतीचा कापूस समुद्राजवळच्या गांवांत चांगला होतो. दुसरे जातीचा असतो, त्याला समुद्राचा वासदेखील सोसत नाहीं. ब्राजिलांत उत्कृष्ट कापूस ह्मटला ह्मणजे पर्नाबुकाचा, या कापसास समुद्राचा वारा अगदीं मानत नाहीं. यामुळें कापूस पिकिवणारे आहेत ते दरवर्षास कांहीं कोश समुद्रापासून मागेंच जात असतात. खारा वारा जेवढा दूर राहील तेवढा हा कापूस अधिक सरस निघतो. बीं लावण्याची कृति असी आहे कीं, पेरायाचे पूर्वीं त्यावरचा अगदींच कापूस काढून टाकितात. नंतर पाण्यांत तें कांहीं वेळ भिजत ठेवितात. नंतर ते दाणे एकमेकांला चिकटूं नयेत म्हणून रेतीमध्यें लोळवितात. कित्येक गांवांत झाडांची खची करितात. कोठें तीन तीन वर्षांनींही करितात. कापसाचें बीं ठेविलें तर एक दोन वर्षेंपर्यंत उपयोगी पडतें.

कापसाचे कारखाने

कापूस लावण्याचा व दुसऱ्या लोककल्याणाचा युक्ति काढण्याबद्दल आमचे लोक एकादें भलतें खूळ उभारून त्यांत आपण कृतकृत्य झालों असें समजतील. सालगुदस्तां एका बाईनें कापसाचा वाती करून देवाजवळ जाळिल्या आणि ती या कापसाचा सरक्या एके गाईस नेऊन घाली, आणि यांत आपण मोठें सत्कर्म केलें असें समजे. शेवटीं कांहीं दिवसांनीं तीणें या व्रताचें उद्यापन करून ब्राह्मणभोजन घातलें, व त्या गाईस आच्छादनाकरितां एक वस्त्र दिलें. अशा प्रकारचा आमचा लोकांचा नव्या कल्पना.

अमेरिकेंत या बिया जनावरांस घालितात, व यांचें शेंकडो खंडी तेल काढितात, तें अनेक उपयोगांस पडतें.

फलेषु मे व्यरोचन्ते कार्पासस्य फलानि वै ॥
येषां गुणमयं जन्म परेषां गुह्यगुप्तये ॥ १ ॥

ज्ञानप्रसारक—पु. १४, अं. ६ (जून १८६३).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

१३

" यत्नेन किं दुर्लभम् ? "

हें एका प्रौढ आणि दूरदृष्टि अनुभूत कवीचें वाक्य आहे. याकडे पाहणाऱ्याचा निश्चय व भरवसा जाप्रमाणें असतो त्याचप्रमाणें त्याला हें फलद्रूप होईल, यांत कांहीं संशय नाहीं. मनुष्य या वचनावरच विश्वास ठेवून सप्तसागरांपलीकडचा रत्नाचा खाणी हस्तगत करील, आणि तसेंच पक्षांतरीं, याकडे दुर्लक्ष केल्यानें तोच मनुष्य होनाचा पावसांतूनही कोरडा जाऊन पोटासाठीं त्यास श्वानवृत्ति आचरावी लागेल. वरील वाक्याचा यथार्थ पहातां, यत्नानें कोणतेंच दुर्लभ नाहीं, असा होतो. यावरून एकाद्या सामान्य बाह्यदृष्टी मनुष्यास सहजच शंका येईल, कीं जर यत्नानें सर्व साध्य आहे, तर मनुष्यें आकाशांतून पक्ष्यांप्रमाणें कां जात नाहींत, नौका पाण्यांतच कां चालतात, डोंगरावरून कशा चालत नाहींत ? व हिंदुस्थानांतून अमेरिकेंत जाण्याकरितां महासमुद्रावर पूल बांधून कां सोडीत नाहींत ? इत्यादिक सहस्रशः शंका, यद्यपि अशा शंका करणाऱ्यांप्रमाणें स्थूलबुद्धींस दुर्निवार्य, अलंघ्य किंवा अतर्क्य वाटल्या, तथापि वास्तविक ज्ञानलव ज्यामध्यें असेल, त्यास त्या तशा भयंकर दिसणार नाहींत. क्षणमात्र विचार केल्यानें ध्यानांत येईल, कीं वरील व्याघ्रमुख संशयाचा खंडनास तीक्ष्णज्ञानखड्गाघातांची जरूर नाहीं, परंतु सूक्ष्मज्ञानतंतुजाल अनायासानें पसरलें असतां लौकिक क्षुल्लक कार्यरूप हरणें व जांकडे पाहतांच लोक गर्भगळित, हतवीर्य व भ्रांतिवायूनें घूर्णित होऊन शंकासागरांत निमग्न होतात, असे अघोरकृत्यकारीही एकाच माळेंत येतात. ह्मणजे जसें कोणतेंहि सुखसाध्य कार्य करण्यास कांहीं आयास लागतो तसाच कोणतेंही महत्कृत्य करण्यास आयास करावा लागतो. साध्य-

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

दुःसाध्य गोष्टींत इतकाच भेद कीं, पहिली अल्पायाससाध्य, व दुसरी महत्प्रयत्नसाध्य. एवंच उद्योगी पुरुषाचा दृष्टीनें असाध्य शब्दास चारितार्थ्यच नाहीं ह्मटल्यास चालेल.

आतां लौकिक दृष्टीनें सहस्रशः कर्में असंभाव्य दिसतात, परंतु तीं सर्व द्वितीय साध्यकोटींत संग्रहीत होतात. परंतु मनुष्यमात्रानें इतकें नेहमी ध्यानांत ठेविलें पाहिजे, कीं कोणतीही एक गोष्ट सिद्धीस नेण्याचा इराद्यानें ती करण्यास आरंभ केला, तर करणाराचें ज्ञान, शक्ति, परिश्रम यांचाप्रमाणें सत्वर किंवा किंचित् कालांतरानें किंवा महत्कालांतरानें तरी ती सिद्धीस जाईलच जाईल. आलेक्झांडर दि ग्रेट यानें यावत् ज्ञात पृथ्वीचें आधिपत्य मिळविलें, तें आपल्या श्रमानें, सायासानें, शौर्य व शेवटचें साधन निश्चय, यांचाच बळावर मिळविलें; त्याला अन्य साधनें कांहीं नव्हतीं. सैन्य, तोफखाना, आरमार, शूर सरदार व इतर पाठबळ देणारे राजेही सर्व त्याला वाटेवर भेटलेले स्नेही आहेत. जा वेळीं दिग्विजय करावा ही गोष्ट त्याचा मनांत आली असेल, तेव्हां केवळ त्याचा स्वतांचा निश्चय व शौर्य आणि सर्व पृथ्वी पादाक्रांत करीन असा मनोरथ, एवढ्यावांचून त्याला काडीमात्र अन्य बल नव्हतें. आणि अशा निश्चयानें तो निघाला असतां त्याला मार्गांत सहस्रशः विघ्नें आलीं, परंतु तीं सर्व यत्नानें दूर करून आलेक्झांडर याचा मनोरथ अकुंठितगति सिद्धिस्थानास पोंचला, हें सर्वांस श्रतपूर्व आहेच. परंतु यावरून कोणीही आलेक्झांडर राजाप्रमाणें भगीरथ प्रयत्न केल्यास तो आलेक्झांडर होईल, असें होणें नाहीं. कदाचित् तितक्याच परिश्रमानें त्यापेक्षांही कांहीं अद्वितीय गोष्टी करूं शकेल आणि कदाचित् तेवढ्याच परिश्रमापासून स्वल्प कार्य होईल, तथापि यत्नानें सर्व साध्य आहे या नियमास अपवाद येणें नाहीं. आतां एक सारख्याच श्रमानें अधिक उणें कार्य होणें हें परिश्रम करणाराचें स्वरूप, रीति, कार्यांत येणारीं अधिक उणीं संकटें यावर सर्वथा असतें. केवळ क्षुल्लक कार्यांत जर विघ्नें येऊं लागलीं, तर हजारों येऊन तीं आरंभ करणाऱ्यास व्यामोहित करून दुर्निवार्य भ्रांतिचक्रांत पाडितात, परंतु अशा प्रसंगीं तत्पराधीन न होतां स्वकार्यावर अचल दृष्टि ठेवून यत्नाचा जोरावर सहज अशा पाशांतून मनुष्य सुटूं शकेल. आणि जो एकादा पुरुष कोणतेंही कार्य तडीस नेण्याचा इराद्यानें त्यास हात घालतो त्याणें त्यांत सहस्रशः विघ्नें आलीं अगर तें करण्याकरितां दुःखें सोसावीं लागलीं, तर तें कार्य अर्धेंच न टाकणें हाच त्याचा पुरुषार्थ होय. आणि असा जाचा निश्चय त्याचाच हातून एकादें कार्य पूर्ण होऊं शकेल. म्हणूनच भर्तृहरीनें ह्मटलें आहे कीं:—

"मनस्वी कार्यार्थी न गणयति दुःखं न च सुखं"

मनुष्यास साधारण चार घटकांच काम करणें असल्यासही तें तडीस नेण्याचा इराद्यानें त्यानें त्यास आरंभ करावा. साधारण स्थूल दृष्टि मनुष्य आपल्या शक्तीचा बाहे-

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

रही कर्म आरंभण्यास उद्युक्त होईल, परंतु यत्किंचित विघ्नदर्शनानें त्याची निवृत्ति होते. कोणी मनुष्य साधारण विघ्नास दाद न देतां तसेंच पुढें घोडें ढकलून चालतो, परंतु पुढें चालतां चालतां अर्ध्या वाटेवर त्याचे पाय थकतात. तर अशा दोनही प्रकारचा मनुष्यांचा हातून कांहीं एक स्तुत्य कृत्य होणार नाहीं. परंतु जो धीर धरून आरंभलेलें काम शेवटास पोंचवितो त्यासच कार्यकर्ता व उद्योगी पुरुष म्हणणें शोभतें, याविषयीं एका कवीचें वाक्य आहे.

"आरभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः।
प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः॥
विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः।
प्रारभ्य चोत्तमजना न परित्यजन्ति" ॥ १ ॥

मनुष्यास कदाचित् वाटेल, कीं द्रव्यादिकांचें साधन असल्यास मात्र मनुष्याचा हातून कांहीं कृत्य होईल, इतर मनुष्याचा हातून कांहीं होणार नाहीं. तर असें मनांत आणणें हें मौर्ख्य होय, असें म्हटल्यास दोष नाहीं. कारण कीं, कार्य करणारा साधनें उभीं करतो, परंतु सर्व साधनें एकत्र झालीं असतां त्यांचा हातून कार्यकर्ता उभा करवत नाहीं. तेव्हां अर्थात् सहस्र साधनांनीं स्वतः कांहीं होणें नाहीं, मनुष्य पाहिजे तशीं साधनें उभीं करतो.

आतां विद्यासाधनास व सतत तिचा अनुधावनास द्रव्य असलें पाहिजे ही गोष्ट केवळ गौण साधनाची होय, तेव्हां अर्थात् तदभावी निश्चयानें विद्यामार्गास लागलेल्या पुरुषास धन हें आद्य साधन नव्हे, तर त्याचा निश्चय व यत्न हींच आद्य साधनें होत. आतां कदाचित् धनाची सुगमता असल्यास द्रव्यवान उद्योग्यास निर्द्रव्य उद्योग्यापेक्षां अधिक गौण साधनें आहेत, असें ह्मणतां येईल. परंतु त्यामध्यें उद्योगाचा न्यूनांश असल्यानें त्या न्यूनत्वाचा पूर्ततेस द्रव्यासारखीं आणखी अनेक साधनें बस नाहींत.

मनुष्य कोणतेंही कृत्य करूं लागेल त्यास संकटें येणार हा निरपवाद नियम ह्मटल्यास शोभण्यासारखा आहे, तसेंच कोणतेंही कृत्य असाध्य नाहीं, हाही नियम तज्जातीय होय आणि असें आहे तर मनुष्यानें कार्य करण्यास निघाल्यावर त्याला विघ्न येणार नाहीं असा असंभवच आहे. तेव्हां अर्थात् जीं कामें निर्विघ्न तीं करणाऱ्याचा इरादा धरणारास कार्य करण्याचा प्रसंग येणें नाहीं, व जे विघ्नदर्शनानेंच परावृत्त होतात त्यांचा हातून कांहीं होणें दुर्लभच. आरंभ करून अर्ध्यावर सोडणारे लोकांपासून कांहीं एक तडीस जाणारें कृत्य होणें कोठून? एवंच अशा कडेस पोहणारां-कडून काडीमात्र कार्यभाग होणें नाहीं, परंतु कार्योद्योगाचा वेळेस अजरामरवत् स्वतांस मानून व अन्य साधनाची विशेष वाट न पाहातां जो उद्योगी पुरुष दृढ निश्चयानें कार्यास उद्युक्त होतो त्याचा हातास यश येईल, यांत संशय नाहीं.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

जा मनुष्यांस साधारण हस्तपादादि अवयव व मन आणि नेत्र इत्यादि बुद्धींद्रियें ईश्वरानें दिलीं आहेत त्यांस मनुष्यानें यथायोग्य कार्यास लावावीं हेंच त्या इंद्रियाचें वास्तव काम व मनुष्याचें कर्तव्य होय. मनुष्यानें इंद्रियांस उचित कार्यभागाकडे न लाविल्यानें तीं स्वेच्छाविहारी होतात; स्वेच्छाविहारापासून विपरीत कार्यासक्त होतात; व अशीं झाल्यानें अशा अव्यवसायी मनुष्यास स्वसत्तेंत ठेवून, तो मनुष्य केवळ तत्पराधीन होऊन जातो. आतां अशा स्थितीस पोंचलेल्या मनुष्यास व्याधि, संकटें, विपत्ति हीं तत्काल गांठितात. तेव्हां अशा मनुष्याचा स्थिति लेखानें स्पष्ट करण्यास कोण समर्थ आहे ! असा मनुष्य पाहण्यास दूर देशांतरीं जावें लागणार नाहीं. असे स्वघातकी स्वशत्रु सर्वत्र आहेत. तात्पर्य मनुष्यास व्यापार आवश्यक होय.

वर लिहिलेल्या गोष्टीवरून सहज ध्यानांत येईल, कीं मनुष्यांनें व्यवसाय न केल्यानें केवळ व्यवसायसाध्य फल प्राप्त होत नाहीं, एवढेंच नाहीं, परंतु उलट अव्यवसायापासून त्याचा सर्वतः नाशच आहे तर यावत् मनुष्यानें यथाकाल व यथाशक्ति व्यवसाय करणें हें त्याचा नेहेमीचा आहारविहारादि अवश्य गोष्टींतीलच कृत्य आहे असें समजावें.

मनुष्य एकादी गोष्ट इर्ईनें करील तर बहुधा त्याचा इच्छेपेक्षांही कदाचित् जास्ती कार्य होईल. ही पुढील गोष्ट वाचल्यानें ध्यानांत येईल; कीं सर्वांशीं साहित्याचा अभाव असतांही एका निश्चयानेंच महत्कार्य होतें. जर वाचणारांस ही सूचना लागू असेल, त्याणीं केवळ ही गोष्ट वाचावी एवढीच विनंती नाहीं, तर तदनुसार कृति करण्यास यथाशक्ति यत्न करावा.

निकोलस् सांडर्सन् यांचा संक्षिप्त इतिहास*

जानीं काव्य व्युत्पत्ति व इतर शास्त्रीय विषयांवर अति व्यासंग करून आपलीं नावें गाजविलीं व जे विद्वज्जनशिखामणिपदप्राप्तीस आडवीं येणाऱ्या सहस्रशः विघ्नांतून पार पडून गेले आहेत अशांचे ओळींत येण्यास जानीं भगीरथ प्रयत्न केले, त्यांत जन्मान्धपणाचे दुःखसागरांत निमग्न असूनही पुढें सांगितलेल्या पुरुषाप्रमाणें कोणीच परिश्रम केले नसतील, आणि यापेक्षां अधिक विस्मय होण्यासारखें व समजण्यास लायक उदाहरण घडून आलें नसेल. जे दृगिंद्रियोपहत पुरुष आहेत त्यांचें बुद्धिचांचल्य व लौकिकपरिज्ञान यांजकडे पाहून जें आश्चर्य होत आहे त्याप्रमाणें आश्चर्यास्पद दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं. जा वस्तूंचा बाह्य गुणाचें परिज्ञान दर्शनानें

---

* सांडर्सन यांच्या संदर्भांतील ख्रिस्ताब्द देतांना मूळ लेखांत जे मुद्रणदोष झाले होते, ते 'दि एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'च्या अकराव्या आवृत्तीवरून दुरुस्त करून छापले आहेत. — संपादक.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

मात्र होणारें अशा वस्तूंचे गुणाचें व धर्माचें यथार्थ विवरण मनरूप जें धींद्रिय याच्या योगानेंच ते करतात. त्यांची वाणी रसभरित आणि अस्खलित असल्ये. यावरून एका इंद्रियाचा नाश झाला असतां दुसऱ्यास विशेष जोर येऊन त्या अंगवैकल्याची पूर्तता करण्याची योजना अशा पुरुषांचे अंगीं चित्स्वरूप विश्वंभरानें करूनच ठेवलेली असते, असें दिसतें. ह्मणून दृगिंद्रिय नाश पावतें तेव्हां स्पर्शेंद्रिय व श्रोत्रेंद्रिय हीं अधिक सूक्ष्म व तीक्ष्ण होतात. आणि दृष्टिनाशापासून विचारशक्तीचा ठायीं अति गूढ आणि अगाध विचार करण्याचें सामर्थ्य येतें. तशीच तार्किक शक्ति जागृत होऊन विशेष प्रखर होत्ये.

प्राचीन काळीं विद्वच्छ्रेणींत बसणारे जन्मान्ध पुरुष पुष्कळ होऊन गेले, त्यांत डिमाक्रिटस याणें आपल्या अंतःकरणांतील विचारशक्तीस विशेष दाढर्य व प्रागल्भ्य यावें या हेतूनें बुद्धिपुरःसर डोळे काढून टाकिले असें सांगतात. अगदीं आंधळे असून जांनीं कलाकौशल्यांत व शास्त्रांत कीर्ति मिळविल्या आहेत असे पुरुष जर्मनी, इटाली, फ्रान्स, इंग्लंड् व युरोप महाद्विपांतील इतर देशांत होऊन गेले, त्यांतीलच एक वर्णनीय महाविद्वानाचें हें पुढील वर्णन आहे.

सन १६८२ त यार्कशायर प्रांतीं थर्लस्टन् परगण्यांतील एका गांवांत निकोलस सांडर्सन् याचा जन्म झाला. एथें याचे बापास जकातीचे खात्यांत चाकरी असून घरदार व शिवाय थोडा जमीनजुमल्यानिशीं तो राहत होता. सांडर्सन् सुमारें १२ महिन्याचा झाल्यावर देवींचा योगानें त्याचे डोळे गेले इतकेंच नाहीं, पण बुबुळसुद्धां नाहींसे होऊन अगदीं खांचा होऊन गेल्या. तेव्हां उजेड किंवा रंग यांची कल्पना त्यास नाहींशी होऊन त्याची जन्मांधाप्रमाणें अवस्था झाली. शाळेंत जाऊन विद्याभ्यासाकडे चित्त वेधून जाण्यास या बिचाऱ्या दुर्दैव्यास बहुतकरून याचा आंधळेपणाच कारण होय, आणि याची बरी अवस्था असती तर याची इतकी प्रखर बुद्धि झाली नसती व इतके परिश्रमही त्याजकडून झाले नसते असें दिसतें. याचे गांवाजवळच पेनिस्टन् एथें एक धर्मार्थ शाळा होती. त्या शाळेंत याच्या बापानें यास लहानपणींच पाठविलें. जा लाटिन् व ग्रीक् भाषांचें ज्ञान संपादन करून व जांत तो उत्तरोत्तर इतका प्रवीण झाला, कीं युक्लिडसारख्यांचे लेख मूळ ग्रंथांतून एक वेळ वाचले असतां त्यास समजावे अशा भाषाज्ञानाचा, या शाळेंत असतांच याणें पाया घातला ह्मटल्यास चालेल.

वरचा शाळेंतील याचें सर्व शिकणें झाल्यावर याचे बापानें यास बेरीज, वजाबाकी वगैरे अंकगणित विषय शिकवण्यास आरंभ केला. याचा बाप जा उद्योगांत होता त्यासंबंधानें त्यास गणित बरेंच अवगत होतें. या ठिकाणीं सांडर्सन्

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

यांचे बुद्धीचा प्रकार प्रथमच दिसून आला. साधारण प्रश्नांचीं उत्तरें त्यास लौकरच देतां येऊं लागलीं; मोठे मोठे गुणाकार, भागाकार तो मनाचे मनांत करूं लागला; आणि नवें शिकणारांस नफा न होतां उलट त्यांचा जांपासून घोंटाळा होतो अशा नव्या नव्या रीति, उदाहरण लवकर सोडवितां यावें ह्मणून त्याणें आपल्याकरितां बसविल्या. सांडर्सन् अठरा वर्षांचे वयाचा झाल्यावर रिचर्ड् वेस्ट नांवाचा अंडार्बीक एथील सुखवस्तु गृहस्थ होता त्याचा याचा परिचय झाला. हा गृहस्थ मोठा संपन्न असून गणितविद्येचा भक्त होता; यानें सांडर्सन् याचे आंगचें असें विलक्षण सामर्थ्य पाहून भूमिति व बीजगणिताचीं मूलतत्वें त्यास शिकविण्याचे श्रम केले, आणि या विषयांत सांडर्सन् यानें व्यासंग करावा एतदर्थ याला शक्त्यनुसार उत्तेजनही दिलें. पुढें थोडक्यांतच डाक्टर नेटल्टन् याचीही ओळख झाली. या गृहस्थानेंही तसेच श्रम केले, आणि गणितविषयांत आरंभींचे विषयशिक्षणाविषयीं सांडर्सन् हा या दोन गृहस्थांचा ऋणी होय. त्यांनीं त्यास जे जे ग्रंथ लागले ते दिले व ते नेहमी त्यास वाचून दाखवीत व समजून सांगत. परंतु फार दिवस गेले नाहींत तोंच सांडर्सन् हा त्यांपाशीं शिकण्यापेक्षां त्यांसच शिकविण्यास योग्य झाला.

तो वाढत गेला तसतसें त्याचें विद्याव्यसनही वाढलें, आणि याचे बापानें या कामांत सांडर्सन् यास भर देऊन शेफील्ड् शहराजवळ आट्क्लिफ् ह्मणून विद्यालय आहे, त्यांत पाठविलें. या विद्यालयांत अलंकार व तर्कशास्त्र यांचाच विशेष भर होता. उपमा उत्प्रेक्षादि अलंकार व उक्ति इत्यादिकांचाच वादविवाद अलंकारशास्त्रांत आहे, आणि न्यायशास्त्रांत घटत्व, पटत्व इत्यादिक इंद्रियग्राह्य धर्मावर पांडित्य होय, यास्तव अशा या शुष्क विषयांकडे सांडर्सन् याचें मन आसक्त होईना, ह्मणून थोड्यांतच तो तेथून निघाला आणि आपल्या घरीं बसून कोणाचे सहाय्यावांचून व संमतावांचून आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणेंच अभ्यास करीत राहिला व तो आपल्या बुद्धिबलानें सर्व संकटें दूर करण्यास समर्थ झाला होता, सबब वास्तविक रीतीनें एकादा चांगला ग्रंथ व कोणीतरी तो वाचणारा, या दोहोंवांचून तिसऱ्याची त्याला अगदीं जरूर नव्हती. आजपर्यंत याचे विद्येबद्दलचा खर्च याचा बापच चालवीत होता; परंतु त्याचें कुटुंब मोठें होतें, सबब या खर्चाचे ओझानें तो दिलगीर झाला. या कारणास्तव सांडर्सन् याची कांहीं उद्योगांत संस्था करून, जेणें त्याचा त्याणें खर्च वटवावा अशाविषयीं त्याचे स्नेही विचार करूं लागले. केम्ब्रिज् विद्यालयांत जाण्याचा सांडर्सन् याचा फार हेतु होता, परंतु तेथील खर्चाचें संकट येऊन पडलें; त्यावर कांहीं उपायच नव्हता. शेवटीं असें ठरलें कीं, केम्ब्रिज् एथेंच काहीं एक विलक्षण रीतीनें दैवाची परीक्षा पाहवी. ती अशी, कीं विद्यार्थी न होतां शिक्षक व्हावें, कारण त्याचे अंगीं दुसऱ्यास विषय समजून देण्याची अलौकिक हतोटी होती. ह्मणून त्याचे स्नेह्यांस

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

अशी आशा होती, कीं युनिव्हर्सिटीसारख्या ठिकाणींदेखील हा कीर्ति मिळवून आपलें हित करून घेईल. कदाचित् या कामांत यश न आल्यास लंडन शहरांत याकरितां एक नवी शाळा स्थापन करूं, असें त्याचे स्नेह्यांनीं त्यास वचनही दिलें होतें.

वरचा ठरावाप्रमाणें जाशुडन् ह्मणून क्राइस्ट विद्यालयांतील एक नवीनच विद्यार्थी होता, त्याबरोबर सांडर्सन् हा सन १७०७ त केम्ब्रिज् एथें येऊन आपल्या स्नेह्याचेच घरीं राहिला, परंतु विद्यालयांत मेम्बर रूपानें याचा प्रवेश झाला नाहीं. असा हा अद्वितीय नवीन आलेला पुरुष पाहून विद्यालयांतील मंडळीस फार आनंद वाटला आणि त्यांणीं या गृहस्थास अभ्यासाकरितां एक स्वतंत्र खोली देऊन व विद्यालयांतील पुस्तकें घेण्याची परवानगी देऊन, शिवाय जेणेंकरून त्याचें हित होईल अशा सर्व त्यांचे शक्त्यनुसार त्यांणीं तजविजी केल्या, परंतु एथें त्याला स्नेहीसंबंधी कोणी नाहींत, खर्चास द्रव्य नाहीं, स्वतः शिकलेला नसून जा ठिकाणीं पदार्थविज्ञानशास्त्रादिक परिपक्कदशेस आलेलीं अशा ठिकाणीं आपण शिक्षक होणें, इत्यादिक सहस्रशः अडचणी त्याचे बेतामध्यें येऊन पडल्या. या वेळेस सर आयुझाक् न्यूटन याचेमागें गणितशास्त्रांत अध्यक्षस्थानापन्न व्हिस्टन् म्हणून एक विद्वान गृहस्थ होता. सांडर्सन् याणें या गृहस्थास एक व्याख्यान देण्याची युक्ति सांगितली. त्याअन्वयें त्याणें व्याख्यानें दिलीं; परंतु व्याख्यान देण्याचा व युक्तिप्रयुक्ति करण्याचा सर्वथा या गृहस्थाचा हक्क असून त्यानें सांडर्सन् याचे युक्तीस अनुसरणें हें सांडर्सन् यास आपली पायरी उल्लंघन करण्याप्रमाणें होय, तत्रापि तो गृहस्थ मोठा सत्वशील व विद्यावृद्धीचा उत्तेजक होता, म्हणून सांडर्सन् याचे हितार्थ त्याचे स्नेह्यांनीं अर्ज केला होता तो या गृहस्थानें तत्काल मान्य केला. मिस्तर डन् याणेंही सांडर्सन्‌ची सर्वत्र प्रसिद्धि करण्याकरितां पुष्कळ उद्योग केला. त्या विद्यालयांत सांडर्सन् याची लौकरच कीर्ति झाली. विद्वान् आणि जिज्ञासु यांस सांडर्सन् याचे ओळखीची स्पर्द्धा व ईषक उत्पन्न होऊन त्याणें व्याख्यानें देण्यास आरंभ केल्यावर शेंकडो लोक येऊन गर्दी होऊं लागली. प्रिन्सिपिया माथामाटिका "गणितशास्त्रावर न्यूटनकृत विख्यात ग्रंथ", दर्शनानुशासन आणि 'न्यूटनकृत अंकगणित" या विषयांसच अनुलक्षून त्यांचीं व्याख्यानें असत. आणि येणेंकरून आपलें बुद्धिकौशल्य प्रदर्शित करण्यास सांडर्सन् यास यथायोग्य प्रसंग आला. दर्शनानुशासन, रंग आणि किरण यांचा स्वभावजन्य गुणांचें विवेचन, दर्शनोपपत्तीवर व्याख्या, कांचेंतून आरपार किरण जाऊं दिल्यापासून होणारे चमत्कारिक परिणाम, इंद्रधनुष्याची अद्भुत रचना आणि शिवाय दुसरे दृग्गोचर पदार्थ इत्यादि प्रौढ शास्त्रीय विषयांवर या अंधानें व्याख्यानें द्यावीं अशाकडे पाहून पुष्कळ लोकांस आश्चर्य वाटेल. परंतु कोणी प्रश्न करील कीं, वरचे विषय केवळ रेखागणितानें स्पष्टीकरणार्ह आणि भूमितिप्रमाणशास्त्रांतर्गत होत, तर अशा विषयाचें

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

व्याख्यान अंधास कसें साध्य आहे, तर यावरून इतकें सहज ध्यानांत येईल, कीं असें असूनही या विषयांत तो निष्णातच होता.

त्या विद्यालयांतील विद्यार्थ्यांस न्यूटनकृत पदार्थविज्ञानशास्त्रांतील मूलतत्त्वें शिकवीत असतां थोडक्यांतच त्या अप्रतीम ग्रंथकाराची व सांडर्सन् याची ओळख झाली. या पूर्वींच पुष्कळ दिवस न्यूटन याणें विद्यालय सोडलें होतें. न्यूटनकृत ग्रंथांतील कठिन विषयांवर नेहमीं न्यूटन व सांडर्सन् यांचे संवाद होत. हाली, कोट्स्, डिमाइव्हरी आदिकरून त्या काळचे महान् महान् विद्वान गणितशास्त्रज्ञ यांशींही त्याणें स्नेह ठेविला होता. व्हिस्टन् हा गणितशास्त्रांतील अध्यक्षस्थानावरून निघाल्यावर त्या जाग्याविषयीं जितके उमेदवार होते त्यांत सांडर्सन् याचे बरोबरीचा कोणी नाहीं, अशी त्याची कीर्ती झाली होती; सबब त्याला गणितशास्त्रांत भट्ट हें नाव मिळावें एतदर्थ एक विलक्षण पक्ष लोकांनीं उचलला. कारण कीं, भट्ट ही पदवी मिळाल्यावांचून ती जागा कोणास मिळावयाची नाहीं. त्या विद्यालयांतील मुख्यांनीं ड्यूक आफ् सामर्सेट यास अर्ज़ी केली. नंतर राज्यकर्त्री राणीचा कृपेनें सांडर्सन् यास, ए. एम्. ही पदवी सन १७११ त मिळाली. सर आयझाक न्यूटन हाही या कामांत सांडर्सन् याचा हितेच्छु होता. याप्रमाणें अध्यक्षस्थानापन्न झाल्यावर टूली, व्हर्जिल, होरेस् यांचे ग्रंथ त्यास साद्यंत अवगत असल्यामुळें सांडर्सन् यानें सुरस लाटीन् भाषेंत व्याख्यानें करण्यास आरंभ केला; त्याची वक्तृत्वशक्ति खरोखर सिसरोप्रमाणें सांडर्सन् आपल्या विद्यार्थ्यांस पढविण्यांत व व्याख्यानें देण्यांत सर्व कालक्षेप करी. सन १७२३ पावेतों विद्यालयांतच राहून पुढें केम्ब्रिज् एथें एक घर भाड्यानें घेऊन नंतर थोड्याच दिवसांत त्याणें गृहस्थाश्रम घेतला. सन १७२८ त २ रा जार्ज राजा तें विद्यालय पाहण्याकरितां आला होता त्या वेळेस त्याणें अशा अद्वितीय पुरुषाची कीर्ति ऐकून त्याचा भेटीची इच्छा प्रदर्शित केल्यावरून सांडर्सन् याणें सेनेट् दरबारांत राजाची भेट घेतली. त्या वेळेस राजकृपेनें त्यास् एल्. डी. ही पदवी मिळाली.

सांडर्सन् याचा शरीराचा बांधा दृढ असून तो निरोगी होता. परंतु नेहमी घरांत बसून बसून त्याची प्रकृति बिघडून त्याचें शरीर रोगग्रस्त झालें. पुष्कळ वर्षेंपावेतों त्याचा शरीराचा संधि दुखत असतां असतां शेवटीं त्याचा एक पाय गेला. पुढें उत्तरोत्तर त्याचा अंगांतील रक्त दूषित होऊन औषधादिकांचा उपाय थकला. शेवटीं त्याचा सत्तावन्नाव्या वर्षीं ह्मणजे सन १७३९ त अंत झाला.

सांडर्सन् याची समयोचित बुद्धि व ईर्ष्या यांचा योगेंकरून त्याचाशीं सहवास

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

सर्वांस आवडत असे. त्याचेजवळ सत्यास मोठा मान असून आणि, सर्व व्यवहारांत सत्यवादी असणें हें आपलें कर्तव्य आहे, असें मानणाऱ्या पुरुषांविषयीं स्वमत, कोणाची स्तुति किंवा निंदा, कोणाशीं स्नेहभाव किंवा दुर्भाव हीं सर्व निःपक्षपातानें प्रदर्शित करी. आणि वस्तुतः हेच गुण मनुष्यास शत्रुत्व व धिक्कार यांपासून अलिप्त ठेवतात. मरणसमय जवळ आला, त्या वेळेस हा न गडबडतां व धैर्य न सोडतां स्वस्थ राहून पुनः सावध झाल्यावरून नेहमींप्रमाणें बोलूं लागला व मरणापूर्वी फार थोडा वेळ मात्र बोलला नाहीं.

हा जात्या आंधळा असून महान् महान् गणितशास्त्रज्ञ विद्वानांत मिळून गेला, या गोष्टीकडे पाहून मनास मोठा आचंबा होत आहे व या गोष्टीविषयीं कांहीं कल्पना चालत नाहीं. याजकडे पाहून सर्व लोकांस विलक्षण आश्चर्य होत आहे, जर आपण मनांत आणलें, कीं रेखागणित विषयाचें ज्ञान असें दर्शनानें होतें, तसेंच स्पर्शानेंही होण्याचा संभव आहे आणि दृढाभ्यास हेंच मुख्य साधन आहे, तर ज्या अर्थी अंध मनुष्यांची चित्तवृत्ति इतरांप्रमाणें स्वस्थानभ्रष्ट नसत्ये, त्या अर्थी गणितशास्त्राभ्यास हाच अंध मनुष्यास यथायोग्य व्यापार होय असें दिसतें. प्रथमतः स्पर्शानेंच सांडर्सन् याणें सर्व कल्पना बांधल्या, आणि बहुधा अंध मनुष्यांचा देणगीप्रमाणें सांडर्सन् याचें, स्पर्शेंद्रिय फारच तीक्ष्ण होतें. असें होतें याचें कारण ईश्वरच तशी तजवीज करतो अगर त्यांना मुख्यसाधनाभावीं असें आवश्यक होणें जरूर पडतें हें समजत नाहीं. परंतु द्वितीय विशेष युक्तिसिद्ध दिसतें. कांहीं लोक समजतात त्याप्रमाणें त्याला रंग ओळखवत नसे. त्याणें रंग ओळखण्याविषयीं पुष्कळ वेळ यत्न करून म्हणाला, कीं आंधळ्यास रंग ओळखतां येईल असें म्हणणें असंभाव्यास संभाव्य म्हणणें आहे. एवढें खरें कीं, एकाद्या पदार्थावर किंचित् कमजास्त सफाई असली तर तो ती तत्काळ ओळखी. अशी एकवेळ गोष्ट झाली, कीं एक जडावाचा डागिना असा कृत्रिमानें बनवला होता कीं, जडावाचा तो खरोखर रत्नपारख्याचा डोळ्यांसमुद्धां छकवून गेला, परंतु सांडर्सन् याणें केवळ आपल्या स्पर्शानेंच तो कृत्रिम डागिना ओळखिला. हवेंत कमजास्त झालें असतां त्यास तत्काल समजे. सूर्याकडे पाहून ढग सूर्याचे आड आले गेले त्यास बरोबर समजत. हवा शांत असतां तो एकाद्या झाडाजवळून गेला तर त्याला झाड जवळ आहे असें ज्ञान होई, किंवा त्याचा तोंडासमोर जवळ एकादी वस्तु धरली असतां ती त्यास समजत असे. या सर्व पूर्वोक्त गोष्टी त्याचा तोंडावर झालेल्या वाय्वाघातानें तो ओळखी. त्याचें कर्णेंद्रियहि त्याचा स्पर्शेंद्रियापेक्षां कमी सूक्ष्म नव्हतें. गायन व तंतुवाद्य यांमध्येंही तो गणितशास्त्राप्रमाणेंच प्रवीण होता. कोणी मनुष्य त्याबरोबर एकवेळ बोललेला असून पुनः त्याची कितीही काळानें गांठ पडली असतां त्यास ओळखी; इतकेंच नाहीं, पण ज्या ठिकाणीं त्याला एकवेळ नेलें असेल त्या जाग्यावर पुनः नेलें असतां तो समजे;

एकादे खोलींत त्याला नेलें असतां त्या खोलीची लांबी-रुंदी तो सांगे; तो उभा असेल त्या ठिकाणापासून भिंत किती दूर आहे हें ओळखी; आणि जर एकाद्या फरसबंदीवर किंवा अंगण्यांत त्याला नेलेलें असून पुनः नेलें असतां केवळ पायांचा प्रतिध्वनीनें तो कोणत्या ठिकाणीं मी आहें हें अचुक सांगे.

गणितशास्त्रांत असा विषयच राहिला नवता, कीं जावर त्याणें आपल्या विद्यार्थ्यांकरितां ग्रंथ रचिला नाहीं. परंतु त्याचे स्नेही त्याला ते ग्रंथ छापण्याविषयीं अतिशय आग्रह करीतपर्यंत त्याची ते छापण्याची इच्छा नव्हती. शेवटीं त्याणें स० १७३३ त "भूमितीचीं मूलतत्वें" ह्मणून एक ग्रंथ तयार केला, परंतु त्याचा मरणानंतर तो छापला गेला. न्यूटनकृत प्रिन्सीपिया या नावाचा जगद्विख्यात ग्रंथावरही सांडर्सन् याणें व्याख्यान लिहिलें.

या वरील इतिहासांतील उद्योगशूर अंधाकडे व त्याचा महत्कृत्यांकडे पाहिलें असतां अव्यवसायी डोळसांचे मनांत थोडीबहुत तरी उद्योगाची ईषक येईल अशी आशा आहे.

ज्ञानप्रसारक—पु. १४, अं. १० (ऑक्टोबर १८६३).

१४

"द्रव्येण सर्वे वशाः"

सोपपत्तिक किंवा निदान ऐकून तरी सर्व जनांस माहीत असेल कीं, द्रव्य मिळाल्यानें अगर जवळ असल्यानें जरी त्यास अलौकिक मोठेपणा येत नाहीं, तथापि या जगांतील सर्व पुरुषार्थ द्रव्यवानाचा घरीं चालून येतात. जी गोष्ट द्रव्यानें दुर्मिळ ती मिळविण्यास समर्थ कोणीही नाहीं. द्रव्य बाळगणारा पुरुष कीर्तिमान्, शहाणा, विद्वान् असा समजला जातो. द्रव्यवान् पुरुष जिकडे जिकडे जातो, तेथें तेथें त्यास मानप्रतिष्ठेस कांहीं तोटा नाहीं. म्हणून भर्तृहरीनें असें म्हटलें आहे :—

" यस्याऽस्ति वित्तं स नरःकुलीनः स पंडितः स श्रुतवान् गुणज्ञः
स एव वक्ता स च दर्शनीयः सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ति "

अर्थ—ज्यापाशीं द्रव्य तो पुरुष कुलीन, पंडित, वेदवेत्ता, गुण जाणणारा, वक्ता, व दर्शनास योग्य होय. तात्पर्य, सर्व गुण सोन्याचा आश्रय करतात.

आतां जरी केवळ पदांचा अर्थ वर सांगितल्याप्रमाणें होतो तथापि वस्तुतः ही व्याजोक्ति होय. आणि याचा इतका स्पष्ट हेतु होय कीं, लोकांत पैशास जसा मान आहे तसा दुसऱ्यास नाहीं. मूर्ख असून जर त्यावर लक्ष्मीची कृपा होईल, तर तत्काल त्यास लोक मान देऊं लागतात, विद्वानांत त्याची गणना होत्ये, सारांश सर्वत्र तो पूज्य होतो.

भर्तृहरि हा मूळचा राजा असून कांहीं एक कारणानें त्याला संसारापासून विरक्ति होऊन तो पुढें साधु बनून गेला होता, त्याणें नीतिपर पुष्कळ श्लोक केले आहेत

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

त्यांतीलच हा वरील आहे. या पुरुषास होऊन गेल्यास निदान १७०० वर्षें होऊन गेलीं आहेत. तथापि त्या वेळचा लोकांत पैशास किती अयोग्य मान होता, हें स्पष्ट दिसत आहे.

त्या वेळचा लौकिकी स्थितीकडे पाहतां वेदांती, सारासारविचारज्ञ, विद्वान् पुष्कळ असावे व त्यांत विद्येसही मोठा मान होता व विद्येचें व्यसन फार लोकांस होतें असें इतिहासावरून व इतर प्रत्यक्ष प्रमाणांवरून उघड दिसून येतें; आणि असें असूनही द्रव्यास मोठा मान होता हें खरें आहे.

आतां प्राचीन काळींही यद्यपि द्रव्यास लौकिकीदृष्टया विशेष मान होता हें खरें आहे, तथापि जांस विद्या म्हणून काय आहे, याची प्रतीति झाली होती, त्यांणीं द्रव्य म्हणजे केराप्रमाणें मोजिलें होतें. कारण कीं,—

" विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमम्. "

जा पुरुषांनीं वास्तविक रीतीनें द्रव्याची व विद्येची तुलना करून पाहिली व विद्यासंपादनाचे श्रम व तीपासून अलौकिक सुख व आनंद यांचीं यथार्थ स्वरूपें जांचा मनांत येऊन चुकलीं त्यांचें असें म्हणणें आहे कीं :—

" अधिगतपरमार्थान् पंडितान्माऽवमंस्थाः
तृणमिव लघुलक्ष्मीर्नैव तान्संरुणद्धि. "

जांचा बुद्धीनें द्रव्यास विशेष मान नाहीं, ज्ञान हीच काय ती जगांत उच्च वस्तु होय असे जरी पुरुष होऊन गेले, तथापि अशा पुरुषांचा लक्षपटीनें जास्ति द्रव्याचे भक्त व जांस द्रव्यावांचून दुसऱ्या कोणत्याही पुरुषार्थाची जरूर नव्हती, असेही होऊन गेले आहेत. यावरून पाहतां लक्ष मनुष्यांतून द्रव्यास तुच्छ मानणारा निर्लोभी एकादा असला तर असेल, असो याप्रमाणें आजतागायत स्थिती आहे. परंतु हल्लीं यांत कांहीं भेद पडला आहे कीं काय ? आणि याचीं कारणें काय असावीं याचा थोडाबहुत विचार करणें आहे.

द्रव्यास विशेष मान देण्यास अनेक कारणें आहेत, त्यांत द्रव्याचा योगानें सर्व सुखें प्राप्त करून घेतां येतात. पुष्कळ दिवसपावेतों कोणत्याही प्रकारें त्यास इजा न होतां तें टिकतें, व पाहिजे त्या वेळेस व पाहिजे त्या देशांत तें घेऊन त्याबद्दल हरएक वस्तु देणारे लोक सांपडतात. सांप्रत काळींही द्रव्य हें सर्व वस्तूंत उत्तम वस्तु आहे हें सर्व कबूल करतील, आणि अर्थातच अशी सर्व सुखांस हेतुभूत वस्तु जापाशीं आहे, त्यास सर्वांहून अधिक मान मिळेल हेंही स्पष्ट रीतीनें उपलब्ध होत आहे, व अनुभवही तसाच आहे.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

हल्लींचा राज्यांत द्रव्य हेंच सर्व मनुष्याचें, सर्व उद्योगांचें व विद्यासंपादनादि सर्व परिश्रमांचें लक्ष्यस्थान झालें आहे. कदाचित् कांहीं पुरुष केवळ पारलौकिकहितार्थ विद्या संपादन करीत असतील, परंतु असे फारच थोडे; विद्या संपादन करून तीपासून द्रव्य मिळवून इहलोकींच सौख्योपभोग करावा, ही बहुधा शंभरांपैकीं नव्याण्णवांची इच्छा असत्ये. बाकी एक राहिला तो या नियामास अपवाद समजतां येईल. सांप्रत काळीं द्रव्यासारखें बलवत्तर साधन दुसरें कांहीं नाहीं. जा पुरुषाचें अन्य सहस्र साधनांनीं दर्शन होणें कठीण, त्याचें दर्शन द्रव्यद्वारानें क्षणमात्रांत होऊं शकतें. द्रव्य पुढें केलें ह्मणजे त्याचा पुढें नकाराचा लोप होतो; द्रव्यवान् लोक जांस अप्रिय आहेत असे थोडे, द्रव्यमदानें जाचें मन यत्किंचित्ही भ्रांति पावत नाहीं असा पुरुष दुर्मीळ; तात्पर्य द्रव्य सर्व कार्यसिद्धि करतें.

द्रव्याचा अंगीं अशी बलवत्तर शक्ति आहे कीं, द्रव्यवान् मनुष्याचा आंगचे अवगुण सुगुणाप्रमाणें विकले जातात. महा मूर्ख द्रव्यवान् असल्यास त्याला लोक भोळा शंभूचा अवतार ह्मणतात, धनिक लोभ्यास भाग्यशाली, उधळ्यास कर्ण, लोकापासून अन्यायानें पैसा काढणारास द्रव्यदृष्टि, बडबड्यास निष्कपटी, व निर्लज्जास निर्गर्व, हीं नावें प्राप्त होतात. तस्मात् द्रव्य असणें हें सर्वशक्तिमताप्रमाणें होय. द्रव्यास कोणीही शत्रु नाहीं, सर्व मित्रच. द्रव्यवानास लहानमोठ्यांकडे, गरीबश्रीमंताकडे, राजेराजवाड्यांत, अर्थात् सर्वत्र मान आहे.

द्रव्य हें वर्तमानकाळचा दारिद्र्यरोगास सिद्धौषध, द्रव्यदृष्टींस सिद्धांजन, व निर्द्रव्यास संजीवनी होय. धन हें निष्कुलीनास कुलीन करतें, व सहस्रावधि संकटसमुद्रांतून पार जाण्यास हें नौकारूप होय, व धनासारखा वेळेस हाक देणारा दुसरा बंधु नाहीं. ह्मणूनच एका कवीनें म्हटलें आहे,

> " धनैर्निष्कुलीनाः कुलीना भवंति धनैरापदं मानवा निस्तरन्ति ॥
> धनभ्यो परो बांधवो नास्ति लोके धनान्यर्जयध्वं धनान्यर्जयध्वम् ॥

तात्पर्य, धन हें या जगांत सर्व शक्तिमान्, सर्व जनाचें प्रेरक व सर्व सुखांचें कारणीभूत होय. धन मिळविण्यासाठीं या पृथ्वीवर राहून कोणी उद्योग करीत नसेल असें नाहीं.

शेकडों वर्षांमागचा लोकांकडे कोणीही जरी पाहील, तरी तेथें हल्लींचाच नियम लागू होता असें दिसून येईल. तस्मात् सर्व लोकांत व सर्वकाल द्रव्यास महत्त्व मिळत आलें आहे, असें सिद्ध होतें. तेव्हां अर्थात् एक द्रव्य मिळालें, म्हणजे त्या बरोबर बत्तीस गुण एकसमयावच्छेदेंकरून येतात; व जा दिवशीं द्रव्य जाईल त्या दिवशीं द्रव्याबरोबर

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आलेले व शिवाय त्या मनुष्याचा आंगचे सर्व गुण जाऊन तो केवळ मूर्खांतील मूर्ख होऊन जातो. जा मनुष्याच्या हातून द्रव्य गेलें, तो आपले आईबाप, बंधु, स्नेही, सोयरेधायरे, यांस मुकला असें समजलें पाहिजे व त्याची विद्या, कीर्ति व गुण हींही त्यास तत्काल सोडतात. निर्द्रव्यास आपल्या घरीं बरा शब्द मिळत नाहीं; स्नेह्यांत गेल्यास त्याला मान नाहीं. साधारणतः निर्द्रव्यास घरांत अगर बाहेर कांहीं एक योग्यता नाहीं अशी अवस्था होत्ये, याचीं उदाहरणें सर्वत्र आहेतच; तस्मात् एथें लिहिण्याची विशेष जरूर नाहीं. परंतु दरिद्रापासून गुणाची हानि होत्ये, म्हणूनच एका कवीनें म्हटलें आहे कीं,

" दरिद्रदोषो गुणराशिनाशी "

आणि एका दरिद्रानें सर्व गुण लुप्त केल्यावर अशा दारिद्र्यरोग्याचें जिणेंही व्यर्थ आहे कारण कीं,

" वरं वनं व्याघ्रगजेंद्रसेवितं द्रुमालयं पत्रफलांबुभोजनम् ॥
तृणानि शय्या वसनानि वल्कलं न बंधुमध्ये धनहीनजीवनम् "

ज्ञानप्रसारक— पु. १५, अं. ४ (एप्रिल १८६४)

*

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

१५

अति सर्वत्र वर्जयेत्

कोणत्याही गोष्टींत अतिशय करूं नये, अशीही वरील ह्मण आपल्या लोकांत आहे, परंतु सर्वत्र लहानमोठ्या ज्ञानी किंवा अज्ञान, आणि सुधारलेल्या किंवा रानटी लोकांत याचा विरुद्ध उदाहरणांस तोटा नाहीं. त्यांत भेद इतकाच एकत्र एक प्रकारचें आधिक्य अन्यत्र दुसऱ्या प्रकारचें; मिळून दोघांचें परिणामीं स्वरूप एकच.

बहुधा सर्व देशांची अभिरुचि व व्यसनें भिन्न भिन्न, पूर्वी कांहीं लोक इतके ऐषारामी होऊन गेले आहेत कीं, त्यांस ऐषारामांत कालक्षेप करणें हेंच ऐहिक कार्य होय असें वाटून त्यांनीं दुसऱ्या आवश्यक व्यवहारावांचून कांहींच केलेलें दिसत नाहीं. अशा स्थितीचा काळांत लोकांनीं जे काय परस्परांपेक्षां श्रेष्ठत्व संपादण्यास यत्न केले, तेही जाची लोकांस अभिरुचि, त्याचीच विशेष सुधारणा करण्यांत किंवा त्याचा उपभोगांचे सुलभ उपाय योजण्यांकडेसच परिणामित झाले हें स्पष्टच आहे. व जांची बुद्धि लोकांचा त्या त्या काळचा व्यसनास (तें सुव्यसन किंवा दुर्व्यसन असो.) अधिकाधिक वाढविण्यास साधनें योजिते अथवा वृद्धिंगत झालेल्या व्यसनास रम्य स्थलें शोधून काढते, त्यांसच बहुधा त्या काळीं मान मिळतो, अन्यास मिळत नाहीं.

जा लोकांस अफु खाण्याचें व्यसन लागलेलें असतें, त्यांस तद्विरुद्ध उपदेश करून सन्मार्गास लावणारा शत्रु भासतो. तेव्हां अर्थात् त्याला त्या लोकांत मानप्रतिष्ठेची आशा नको. पण जर दुसरा मनुष्य त्यांचें व्यसन वाढविण्यास उपाय करील किंवा त्याचा वाढलेल्या व्यसनांस संतृप्त करण्याचा युक्ति काढील तर तोच त्या वेळचा व त्या लोकांत पंडित श्रेष्ठ होतो. व तोच लोकप्रिय, तोच स्तुत्य आणि सर्व तोच.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

जा लोकांस व्यापाराचा शोक, त्यांस व्यापार करण्यास सुलभ साधनें करणारा व व्यापाराचे नवे नवे जिन्नस उत्पन्न करण्याविषयीं प्रयत्न करणारा मनुष्य श्रेष्ठ व पूज्य होतो. कारण व्यापार करून द्रव्यसंग्रहाचा व्यसनांत पडलेल्या मनुष्याचा व्यसनाची तृप्ति अशा मनुष्याचा हातून होत्ये ह्मणून. याच रीतीनें पाहिलें असतां विद्वान् विद्वानास, दुर्व्यसनी पुरुषास दुर्व्यसनी, श्रीमानास श्रीयमान् व गरिबास गरीब प्रिय होण्यास कारण एकच.

परंतु यावत् पृथ्वींतील सर्व प्राणिमात्रांचीं भिन्न भिन्न व्यसनें अत्यंत अवस्थेस पोचलीं नसतीं तर त्यापासून परस्पर व्यसनी लोकांस इजा न होतां जो तो आपआपल्या नियत व्यसनांत निमग्न राहून सुखानें कालातिक्रम करिता. परंतु या पृथ्वींतील सर्व घोंटाळे स्वकीय व्यसन लोकांनीं अत्युच्च स्थितीस पोचल्यापासून झाले आहेत. जर सर्व मनुष्यमात्र आपल्या व्यसनास अप्रतिबंध न सोडतां कार्यापुरत्या प्राप्तीनें त्यास तृप्त करता तर ते सर्व चुकले असते.

आलेक्झांडर दी ग्रेट यानें आपलें इच्छारूप व्यसन इतकें अमर्याद वाढूं दिलें कीं, सर्व ज्ञात जगांतील राजे पदच्युत करून लक्षावधि प्राण्यांस मृत्युपंथास पाठवून शेवटीं त्याची इच्छा तृप्त झाली नाहीं, आणि पुढें त्याचा इच्छेस कांहींच बाकी स्थान न राहिल्यावरून त्यास अति वाईट वाटून त्यानें अश्रु टाकिले असें सांगतात.

याच रीतीनें दुर्व्यसनी पुरुष त्या त्या व्यसनांत स्वतः मरून जातात व त्यापासून इतरांसही अनेक प्रकारचीं दुःखें व संकटें भोगण्यास लावितात. मद्यपी होतां होतां आपलेंच व्यसन आपणास इतकें दुर्जय करून सोडतो कीं, तो त्या व्यसनाचा स्वाधीन होऊन चोऱ्या, चहाड्या सहस्रावधि प्रकारचा करून, व्यसनाची जसजशी अधिक तृप्ति करण्यास जातो, तसतशें त्याचें व्यसन वाढतें, कमी होत नाहीं. मनुष्य मूळचा दरिद्री असून पुढें तो द्रव्यवान् झाला, तरी त्याची तृप्ति होत नाहीं. शंभर रुपयांचा मालक झाला ह्मणजे हजारांची इच्छा करतो, हजाराचा लक्षाची इच्छा करतो. पण या भावानें पुढें जातां जातां इच्छेस पार लागत नाहीं व असा व्यसनी अतृप्तावस्थेंतच मरतो. याप्रमाणें यावत् व्यसनी लोकांचा अंत अतृप्तींत होतो.

परंतु सुव्यसनी पुरुषांची काय स्थिति आहे ही पहावी. आतां एथें सुव्यसन म्हणजे जा व्यसनापासून अन्यास इजा किंवा दुःख किंवा हरएक प्रकारचा तोटा होत नाहीं, त्यास आम्ही सुव्यसन ह्मणतों. विद्याव्यसन हें आमचा लक्षणाप्रमाणें सुव्यसन होय. पण विचाराअंतीं सुव्यसनी मनुष्यही स्वव्यसन तो उत्तरोत्तर वाढूं देऊन परिणामी तो इतका व्यसनपरतंत्र होतो कीं, दुर्व्यसनी पुरुषाप्रमाणेंच त्याचें इतर कर्तव्य रहातें. साधारण गोष्टी तर एकीकडेच पण दैहिक अन्नपाण्यादिकांची आवश्यकताही तो विसरतो. विद्याभ्यसन

Digitized by Google	Original from UNIVERSITY OF MICHIGAN

ल्गून जे तल्लीन झाले आहेत, त्यांस वेळचा वेळेस अन्न नको, निद्रा नको व ऐषाराम तर नकोतच. हें कशानें होतें, याचा विचार केल्यास आपलें व्यसन अत्यंत वाढविल्यानें होतें, हें स्पष्ट दिसेल.

यावरून बऱ्यावाईट कोणत्याही व्यापारांत निमग्न झालेल्या मनुष्यानें दोन्ही गोष्टींतहीं अति दूर जाऊं नये एतदर्थ "अति सर्वत्र वर्जयेत्" हा उपदेश आहे. बहुधा राग, लोभ इतर यांचे सजातीय याचा चक्रांत सांपडलेल्या जीवास तर आशाच नाहीं; परंतु एतद्भिन्न उत्तम व्यसनांत गुंतलेल्या मनुष्यासही हा शास्त्रार्थ कांहीं उपयोगी पडत नाहीं. आपली तृष्णा अति दूर पोंचविल्याशिवाय मनुष्यास रहावत नाहीं, हा मनुष्याचा स्वभावच दिसतो. ह्मणून स्वभावाविरुद्ध त्याचें वर्तन कधींही होणें नाहीं आणि याच हेतूस्तव "अति सर्वत्र वर्जयेत्" याचा विशेष उपयोग होणें असंभाव्यच दिसतें.

परंतु आपलें व्यसन आपल्या ताब्यांत रहात नाहीं. एवढ्याच कारणावरून मनुष्यानें आपलीं व्यसनें अमर्याद सोडावीं हें योग्य नाहीं. मनुष्य जें करीन म्हणेल तें बहुधा त्यास अशक्य नाहीं, दीर्घ किंवा स्वल्प कालांतरानें तें साध्य होय. आणि एवढेंच काय, पण यापेक्षां हजार पटींनें दुःसाध्य गोष्टी मनुष्यानें आपल्या आज्ञेखालीं ठेवलेल्या आहेत. जा मनुष्यानें व्याघ्रसिंहासारखे प्राणी, मांजराप्रमाणें गरीब दीन करून टाकिले आहेत, त्यास स्वव्यसन आपल्या आज्ञेंत ठेववत नाहीं, असें असल्यास ही मोठी अचिंत्य गोष्ट होय. तस्मात् हें यत्न केल्यास साध्य आहे. आणि ह्मणूनच वरील वाक्य कोणी पंडितानें योजलेलें आहे.

ज्ञानप्रसारक—पु. १५, अं. ९ (सप्टेंबर १८६४).

*

Digitized by Google   Original from UNIVERSITY OF MICHIGAN

१६

मादक पदार्थ*

आज आपण एथें जमण्याचें कारण बहुतेकांस माहीतच असेल; परंतु तें सर्वांस जाहीरपणीं येथें कळविणें हें योग्य आहे ह्मणून सांगतों. दारू व इतर जातीचे कैफ करून कित्येक लोक आपली हानी करून घेतात, त्यांस सुमार्गाकडे लावावें म्हणून "टेंपरन्स-यूनियन" या नावाची एक सभा इंग्रज लोकानीं काढलेली आहे आणि मादक पदार्थांचा जेवढा प्रतिबंध होईल तेवढा करण्यास ते महत्प्रयास करितात हें त्यांचें काम मोठें स्तुत्य आहे. त्या सभेची मराठी शाखा आजची सभा आहे यास्तव आम्ही सर्वांनी सर्व प्रकारच्या अमली पदार्थांचा आपल्या देशांत प्रसार न होण्यास अवश्य झटलें पाहिजे.

सर्व मादक पदार्थांत दारू ही अति निंद्य आणि सर्वस्वी हानी करणारी आहे. ती-ही हिंदु शास्त्रांत अपवित्र आणि नरकास नेणारी आहे असी मानलेली आहे. आतां कोणी असें ह्मणेल कीं दारू ही इतकी अमंगळ पदार्थ मानण्याचें कारण काय? झटलें असतां ती कोंबडीच्या आंड्यापासून होत नाहीं किंवा बकऱ्याच्या हाडांचा अर्क नाहीं अथवा गुरांच्या चरबीपासून काढत नाहींत; परंतु तांदूळ, ऊस, खजूर, नारळ, जव, काजु, द्राक्ष अशा पवित्र मानलेल्या धान्यापासून किंवा फलांपासून काढितात, तर अशा पदार्थांपासून काढलेली दारू निंद्य कसी झाली, याविषयीं कित्येकांस अचंबा वाटतो. तर हा दोष ज्या पदार्थांपासून ती काढतात, त्याजकडे किंवा जी दारू त्या पदार्थांपासून निघती तिजकडे नाहीं. परंतु दारू सेवन केल्यानंतर जे तिच्या योगानें अघोर परिणाम घडून येतात त्यांजकडे तो दोष आहे. दारूस स्पर्श केला किंवा

---

* अमलवर्जकसभेपुढें केलेलें भाषण.

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

कांहीं उपद्रव झाला असतां शरिरास किंबहुना वैद्यलोकांनीं ती औषधांस मिश्रित करून तें आपणास दिलें असतां जरी तें आपण पिलें तर, दोष होत नाहीं.

मादक पदार्थ मनुष्यानी सेवन करूं नये, अशी शास्त्राज्ञा आहे. याचें कारण हेंच कीं मनुष्य अमल करूं लागला ह्मणजे त्याची बुद्धी, ज्ञान, आणि शक्ती यांचा समूळ नाश होतो, हें तर सर्वांस माहितच आहे, ह्मणून त्याजविषयीं अधिकोत्तर बोलणें जरूर नाहीं. अम्मल केल्यानें मनुष्य आपला कर्ता जो ईश्वर त्यास अगदीं विसरून जातो. त्याला आपलें देहभान राहात नाहीं, सुह्रदय-संबंधी याची ओळख राहत नाहीं; अशी अवस्था जर आपण आपल्या हातानें करून घेतली तर आपण परम दयाळू भगवंताचे किती अपराधी आहों याचें अनुमान कोणाच्यानें करवेल ? अमली पदार्थ खाल्यानेंच मनुष्य असी अवस्था करून घेतो असें नाहीं. परंतु कोणतेहि पदार्थ नेमाबाहेर अधासीपणानें खाल्ले असतां शरिरास समांद्य येऊन तो मनुष्य सुस्त होतो. याप्रमाणें पुष्कळच पदार्थ खाऊन मनुष्य शरीर किंवा मानसीक उद्योग करायास अप्रयोजक होतो, तोहि मनुष्य दोषी आहे. मनुष्यानें कोणताहि उद्योग करायास सर्व काळ हुशार असलें पाहिजे. कित्येक लोक दुसरे कांहीं अंमल करीत नाहींत, परंतु एखादे वेळेस जेवणसमारंभास गेले आणि तेथें खीर, आंबरस, अथवा दुसरीं मिष्टान्नें असलीं ह्मणजे आपला सुमार न पाहातां खाऊन आंगीं येवढी सुस्ती आणितात कीं जेऊन आल्यावर साहा तासपर्यंत त्यांच्यानें कांहींच उद्योग करवेनासें होतें. असें करून घेणेंहि दोष आहे. यापासून शरीरास भलतीच व्याधी होऊन ते अल्पायुषी होतात. आणि त्यांजवर आत्महत्येचा अरोप येतो. मी एक असी गोष्ट पाहिली कीं एक शास्त्री समाराधनेस जेवून आल्यावर इतका निरुपयोगी होऊन गेला कीं, त्याच्यानें दोनचार तासपर्यंत कांहींच उपयोग होत नाहींसा झाला, ह्मणून तो अंगवस्त्र टाकून ओट्यावर लोळत होता. त्याचा शिष्या त्याजकडे येऊन त्यास भागवतांतील एक श्लोक काढून त्याचा अर्थ सांगण्यासाठीं त्याजपाशीं मोठें अर्जव करीत होता त्यास त्यानें असें उत्तर केलें कीं, "बाबा आज तर माझ्यानें एक अक्षर वांचवत नाहीं तर श्लोकाचा अर्थ मी तुला कसा सांगूं ?" याप्रमाणें लोक अधाशीपणानेंदेखील आपल्या बुद्धीची आणि शरीराची हानी करून घेतात, आणि अज्ञानाचे दोषी ठरतात.

जे लोक अम्मलरूप दुर्व्यसनाच्या उचंबळीत झालेल्या समुद्रांत गचकळ्या खातात त्यांस सुबोधरूप रक्षकनौकेमध्यें बसवून सत्मार्गरूप देशांत उतरण्यासाठीं हे आमचे प्रयत्न आहेत. यास्तव वास्तविक ह्मटलें असतां आज मद्यपी, गांजा, गोळी, व चंडोल पिणारे लोक असतील त्यांस एथें बलावून सुबोध करावा. परंतु एकाएकीं असें हें करणें दुर्घट आहे. कारण जर आपण त्यांस एथें येण्यास आज आमंत्रण केलें तर ते येणार नाहींत; आणि जर यदाकदाचित तें

झाले तर ह्या सभेंत बसण्याची त्यांच्या अंगीं योग्यता नाहीं, व जो बोध आपण त्यांस एथें करूं तो ग्रहण करण्याचीहि शक्ति नाहीं. यास्तव त्यांच्या सध्याच्या स्थिती बदलल्या पाहिजेत. ह्मणून स्थलांतर करण्यास स्थित्यंतर करणें अवश्यक आहे.

आतां ज्या लोकांस एथें बलवायाचें त्यांस न बोलावितां श्रीमंत, विद्वान, सत्ताधारी व सुशील अशा लोकांस बलावण्याचें कारण काय असें कोणाला वाटल्यावांचून राहाणार नाहीं. यास्तव तें स्पष्ट करून एथें सांगतों. सुज्ञ लोकांस एथें बलावून श्रम देण्याचें हेंच कारण कीं आपले देशबांधव दुरापास्त अवस्थेंत पडले आहेत त्यांस हस्तेंपरहस्तें प्रयत्न करून सुमार्गास लावावें आणि हें महत्कार्य सिद्धीस नेण्यास ज्यास जसी युक्ती सुचेल ती त्यानें एथें प्रसंगीं करावी. आपल्या लोकांचें कल्याण करण्याचा हा उपोद्घात आहे. कित्येकांच्या मनांत देशाची सुधारणूक करणें आणि ज्यावरून मोठालेच फेरफार करण्यास इच्छितात, कोणी जातिभेद मोडण्यासाठीं प्रयत्न करितात, कोणी मुलींचें बाळपणीं लग्न न करावें ह्मणून निबंध लिहितात, कोणी वाईट रिती, भाति काढून टाकण्याविषयीं आपला मनोदय दाखवितात. हे त्यांचे सर्व प्रयत्न स्तुत्य आहेत. परंतु ते भगीरथ असल्यामुळें त्यांतील एकहि आजपर्यंत सिद्धीस गेला नाहीं. आमच्या लोकांचें बहुधा अशा प्रकरणीं पोकळ पांडित्य आहे. आपण कोणते वेळेस दूरवर विचार करीत नाहीं म्हणून आमचें सर्व कृत्य उपहासास्पद होतें.

सुधारणुकेविषयीं ज्या गोष्टी वर सांगीतल्या तसी ही नाहीं. कारण त्यांतील बहुतेक गोष्टी हिंदुधर्माविरुद्ध असल्यामुळें लोकांस तो स्वीकारावयास धैर्य येत नाहीं, व तो सिद्धीस जाण्यास बहुतेक लोकांचें सम्मत पाहिजे; परंतु कैफाचा प्रतिबंध करण्यास मदत करणें हें शास्त्रोक्त असून कल्याणकारक आहे. हें काम केल्यानें कित्येकांस जीवदान दिल्हेंसें होईल. यास्तव दुसऱ्या गोष्टींत आपण दुर्लक्ष करितों तसें एथें करूं नये आणि जर आपण या कामांत लागलें तर पुष्कळ लोक मदत करतील. आपल्या लोकांस देशाभिमान ह्मणून काय आहे हें स्वप्नींदेखील ठाऊक नाहीं. मी आणि माझा बाब्या सुखी असले ह्मणजे झालें बाकीचे लोक मरोत किंवा उरोत, त्याची कोणास काळजी नाहीं. अशा समजावरून लोकांची अशी दुर्दशा झाली. आमच्या सभेंत बोलणें, देशाभिमान दाखिवणें, सुधारणुकेविषयीं वर्तमानपत्रांत आपलें मत प्रगट करणें हीं सर्व स्मशानवैराग्यासारिखीं आहेत.

कोणी असा प्रश्न करील कीं श्रीमंत व सुज्ञ लोकानी आपले धंदे रोजगार सोडून देऊन सर्व दिवसभर कैफी लोकांस बोध करीतच सुटावें. तर असें नाहीं. ज्यास जसा अवकाश सांपडेल त्याप्रमाणें या कामास झटावें. दिवसास, किंवा आठवड्यांत एक तास, व महिन्यांतून एक तासदेखील या कामांत प्रत्येकानें मन घातलें तर ह्या गोष्टी सहज घडून येतील. शेजारीं, रस्त्यावर, फिरायास जातों तिकडे, असें जेथें जावें तेथें आपणास

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

अगोधर्णी कैफी लोकांची गांठ पडती, तर जसजसी संधी सांपडेल त्याप्रमाणें त्यांस सयुक्तिक बोध करून मृत्यूच्या व दुर्दशेच्या जबड्यांतून काढण्याचे श्रम घ्यावे.

दारू व इतर कैफांत लोक किती निमग्न आहेत हें सांगून मी माझें बोलणें संपवितों.

पांच साहा दिवसांवर शेजारच्या वाडीचा चर उपसायासाठीं ह्मार लोक लाविले होते. त्यांजकडे मी सहज पाहत होतों. इतक्यांत त्यांतून एक जण आपल्या सोबत्यास बोलला, झपझप काम कर. लवकरच मिळेल तितकें खाऊन चालते होऊं. तें ऐकतांच मी त्यांस विचारलें, कायरे, आजच्या दिवसाची सर्व मजूरी काय दारू पिण्यांत खर्च करून घरीं जाल, मग तुमची अवस्था कशी होईल? त्यानीं उत्तर केलें, तर काय, मेहेनत करून जें मिळेल तें खाऊन टाकावें ह्मणजे झालें! उद्यां मेलों गेलों तर दारू पियास कोठें मिळेल. अडु लोकांत अशा प्रकारचीं हजारों उदाहरणें आपल्या आढळण्यांत येतात. मग त्या ह्मारांस मी पुष्कळ उपदेश केला. त्यांचें माझें जें संभाषण झालें तें सांगायास लागलों तर हें भाषण फारच वाढेल ह्मणून मी आतां इतक्यावर संपवितों.

ज्ञानोदय—पु. १५, अं. १६ व १७ (१५ ऑगस्ट व १ सप्टेंबर १८५६).

*

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

१७

" मराठींत 'सर्वसंग्रह' नामक ग्रंथ असावा."*

प्रिय सभासद आणि इतर गृहस्थहो,

आज आपल्या सभेचे बहुतेक सभासद एथें मिळाले आहेत, ही एक मोठीच आनंदाची गोष्ट आहे. असा हा हर्षकारक समाज जमलेला आहे, ह्या संधीस मी तुह्मापासीं विनय आणि आदरपूर्वक एक विनंती करितों, ती कृपा करून ऐकून घ्यावी. ह्या सभेचें नांव ज्ञानप्रसारकसभा असें आहे तर हें नांव कोणास द्यावें ? हें नांव ह्या स्थानास द्यावें ? किंवा ह्या टेबलास, किंवा खुर्चीस द्यावें ? हे निर्जीव पडले, म्हणून अर्थातच हें नांव त्यांस देववत नाहीं; तर हें नांव केवळ सर्व सभासद एकत्र जमल्यानें सिद्ध होतें. बरें, जर आपण एकेक सभासद वेगळे पडलों, तर एका सभासदासच ज्ञानप्रसारकसभा असें कोणी ह्मणेल काय ? नाहीं. आणखी वस्तुतः हें नांव त्याला शोभणार नाहीं. कारण सभा हा शब्द समुच्चयवाचक असून, प्रत्येक सभासदाकडून त्याच्या स्वरूपाची रचना झाली आहे. जसें मस्तक, डोळे, तोंड, हात, पोट, पाय, बोटें, नखें, हीं एकत्र जमून मनुष्याच्या शरीराची रचना झाली आहे, तसीच आह्मी सर्व सभासद मिळून, ज्ञानप्रसारकसभेचें स्वरूप सिद्ध झालें आहे. आतां जसा शरीरामध्यें एखादा अवयव व्यंग पडला असतां त्यास कुरूपपणा येतो, तसाच सभेचे सर्व सभासद हजर नसल्यामुळें तिचें स्वरूप, बळ, तेज, आणि गंभीरपणा, यांस मांद्य येऊन तिच्या उद्देशांत विक्षेप येतो, आणि तिचीं कृत्यें उपहासास्पद होतात.

आतां ह्या सभेचीं मुख्य अंगें कोणतीं, तीं सांगतों. ज्या विद्वान् लोकांनीं

* ज्ञानप्रसारकसभेपुढें केलेलें भाषण.

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आपल्या विद्येच्या योगानें ह्या भरतखंडांत, किंबहुना युरोपखंडांतदेखील लौकिक मिळविला आहे ते. त्यांचीं नांवें, रा. विनायकराव वासुदेवजी, रा. नारायण दिनानाथजी, डा. भाऊ दाजी, डा. आत्माराम पांडुरंगजी, रा. विनायकराव जगन्नाथजी, आणि रावसाहेब विश्वनाथ नारायण, इत्यादि. हे आमचे सभेचे शिरोभाग असल्यामुळें, तिचें सौंदर्य आणि तेज त्यांजकडे आहे. ते आमचे नेत्रच, असें ह्मटलें असतां चिंता नाहीं. याचप्रमाणें दुसरे सभासदही त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें ह्या सभेचे उपयोगी अवयव आहेत. शरीरास जसे केंसापासून अंगुष्ठाच्या नखापर्यंत सर्व अवयव अगत्याचे असून शोभा आणणारे आहेत, तसाच आपल्या सभेचा प्रत्येक सभासद सभेस आवश्यक आणि भूषणकारक आहे; ह्मणून माझी सर्वांपासीं असी प्रार्थना आहे कीं, ज्याअर्थीं ज्ञानाचा प्रसार करण्याचा आम्ही विडा उचलला आहे, त्याअर्थीं नेमलेल्या दिवसीं एथें जमून नांवासारिखें कांहीं तरी करावें. नाहीं तर "नाम बडा, और मुशारा थोडा" या ह्मणीप्रमाणें वर्तणूक ठेवूं नये. सभेचे दिवसीं जर एकादा सभासद हजीर नसला, तर सभेची तितकीच तेजहानि होते. हें लक्षांत धरून सर्वांनीं एथें नेमलेल्या वेळीं येण्याकडे लक्ष पुरवावें. आजपर्यंत सर्व सभासद जमून सर्वांचें सावयव शुद्ध स्वरूप लोकांच्या दृष्टीस पुरतें पडलेंच नाहीं; आणखी लोकांचीं मनें ज्ञानवृद्धीकडे वळत नाहींत, ते अशा सभेंत येत नाहींत, ह्मणून कुरकुरणें ही आमची मोठी चूक आहे. आह्मी सभासद असून स्वइच्छेनें स्वीकारलेल्या गोष्टीकडे एवढें दुर्लक्ष करितों, तर ज्यांस ह्या गोष्टी माहीत नाहींत, त्यांच्या उदासीनपणाविषयीं त्यांस कां दोष लावावा बरें?

आपल्या सभेची कीर्ति स्वदेशीय लोकांतच पसरली आहे असें केवळ नाहीं, तर नामदार कोर्ट आफ् डीरेक्टरपर्यंत हीचें नांव महशूर आहे. तर इतक्या लौकिकास चढलेल्या सभेकडून कांहींतरी नांवासारिखें कृत्य घडून यावें, असें माझें ह्मणणें आहे. ह्या सभेकडून मराठी भाषेची सुधारणूक होऊन, तींत अनेक तऱ्हेचे ग्रंथ व्हावे. मराठी भाषेंत सर्वसंग्रह नांवाचा एक ग्रंथ असावा, ज्यास इंग्रजीमध्यें "सायक्लोपीडिया" ह्मणतात. असे ग्रंथ आपल्या भाषेंत नसल्यामुळें ती भाषा पूर्णतेस आली नाहीं. हें काम सिद्धीस नेण्यास जर आमचे सभासद मनावर घेऊन किमानपक्ष वर्षांतून एकेक विषयावर निबंध लिहून तयार करितील, तर हें कार्य सहज सिद्धीस जाईल. ह्या कार्यास राजश्री भाऊ महाजन, ज्ञानदर्शनाचे कर्ते, यांची व ह्यांसारिख्या दुसऱ्या विद्वानांची मदत घ्यावी. ह्याप्रीत्यर्थ कांहीं द्रव्य खर्चावें लागेल खरें, परंतु ईश्वरकृपेनें आमच्या सभासदांत कित्येक इतके श्रीमंत आहेत कीं, जर त्यांची इच्छा झाली, तर या कामांत पांच दाहा हजार रुपयेदेखील खर्चायास ते समर्थ आहेत. हें त्यांनीं मनावर मात्र घेतलें पाहिजे.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

कित्येक गृहस्थ केवळ नामांकित विद्वज्जनांचीं सभेच्या पटांत नांवें पाहूनच सभासद झाले आहेत. जेव्हां त्यांनीं पाहिलें कीं, मोठमोठाले विद्वान् ह्या सभेचे सभासद आहेत, तर आह्मीहि व्हावें, ह्मणजे त्यांच्या विद्यामृताचा एकादा तरी थेंब आपल्या तोंडांत पडेल; आणि यदाकदाचित् असें घडून आलें नाहीं, तरी ज्या ठिकाणीं विद्वज्जन बसलेले असतात, तेथें आपणहि बसतों, असें पाहून तरी संतोष पावूं; ह्या हेतूनें सभासद होऊन सभेंत येऊन हा प्रसंग केव्हां घडेल, अशी चातकासारिखी मार्गप्रतीक्षा करीत असतात. परंतु सभेचे सर्व सभासद एकत्र जमून ही त्यांची इच्छा तृप्त होत नाहींसी होती. मग ते हळूहळू सभेंत येणें सोडितात, कारण त्यांचा असा समज होतो कीं, ह्या सभेचा सभासद होणें ह्मणजे पटांत आपलें नांव घालून वर्गणी द्यावी, ह्मणजे सार्थक झालें. अशा ह्या अव्यवस्थेवरून सभेची फारच हानि झाली आहे. पाहा, जर आह्मी केवळ अजागळासारिखे ह्या सभेचे सभासद झालों, तर सभेचीं महात्कार्यें कशीं सिद्धीस जातील ? इतर लोकांस एथें येण्यास उत्तेजन कोठून येईल ? आणि आपला हेतु कसा सिद्धीस जाईल ?

पाहा, मोठे लोक ह्या सभेचे सभासद आहेत, असें ऐकूनच कित्येक सभासद होतात; यास्तव जर ते प्रतिसभेस प्रत्यक्ष येऊन बसले, तर किती सभासद वाढतील ? व दर खेपेस दुसरे श्रीमंत लोक एथें किती जमतील, याचें अनुमान पांच वर्षांचें मूलदेखील करील. सभेकडे आमची अनास्था पाहून, दुसरे लोकहि तदनुसार वागतात. आणि प्राकृतांत असी एक ह्मण आहे कीं, "बापास जर मूल नको, तर आजास नातु कशास पाहिजे ?" असी अवस्था होती; आतां सभासदांपासीं माझी एवढीच विनंती आहे कीं, सर्व सभासदांनीं हरप्रयत्न करून दरसभेस एथें यावें; म्हणजे दुसरे शेंकडो गृहस्थ येथें जमतील, यांत संशय नाहीं. आतां जे सभासद मोठ्या हुद्यांवर आहेत, त्यांस उद्योगाच्या गर्दीमुळें नेहमी येण्यास बनत नसलें, तर त्यांनीं महिन्यांतून, तीन महिन्यांनीं, साहा महिन्यांनीं, किंबहुना वर्षांतून एक वेळ तरी येऊन सभेस उत्तेजन द्यावें. हेंहि जर न घडलें, तर मग सभेचा उर्जितकाळ इच्छिणें, हें आरशांतील धन घेऊन युरोपखंडांत जाऊन व्यापार करण्याची इच्छा केल्याप्रमाणें आहे.

एथें बोलण्यास मला फारच आनंद होतो कीं, रा. नारायण दिनानाथजी, आपले योग्य अध्यक्ष, हे ह्या सभेचा अद्यापि अभिमान बाळगितात, आणि फुरसद सांपडेल, त्याप्रमाणें सभेंत येऊन सभासदांस उत्तेजन देतात. याचप्रमाणें, डाक्तर आत्माराम

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

पांडुरंग व रा. हरिशंकर बाळकृष्णजी व दुसरे कित्येक सभासद सभेच्या कल्याणाविषयीं काळजी बाळगितात, ह्मणूनच ही सभा आजपर्यंत जीव धरून राहिली आहे.

शेवटीं माझें भाषण संपवायाच्या पूर्वी मी इतकेंच सुचवितों, कीं जर आपण अशा सभांचा अनादर केला, तर आपल्या देशाचा उत्कर्ष होण्याचा समय येणें दुर्लभ, असें पक्कें समजावें. माझ्या सर्व भाषणाचा आशय हाच कीं, जे जे ह्या सभेचे सभासद झाले आहेत, त्यांनीं तिच्या आयुष्यवृद्धीकडे व तिजकरितां लौकिक संपादण्याकडे दृष्टि ठेवावी, हे विनंती.

ज्ञानप्रसारक—पु. ७, अं. ७, ८ (ऑक्टोबर, नोव्हेंबर १८५६).

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

१८

" स्वभाषा प्रज्वलित ठेवावी "*

हे प्रिय तरुण मित्रहो—

चिटणिसांनीं जो आतां या सभेचा मागील वर्षाचा वृत्तांत वाचला त्याजवरून असें समजतें कीं, कित्येक तरुण सभासद शाळा सोडून कांहीं उद्योगावर व कित्येक दुसऱ्या शाळेंत गेले. शाळा सोडिली असतां सभेचाहि संबंध सोडून टाकणें आणि तिजविषयीं केवळ निःकाळजी होणें ही मोठी नवल मानण्याजोगी गोष्ट आहे. पाहा, जर आपण एक घर सोडून दुसऱ्या घरांत गेलों तर नव्या घरांत गेलों ह्मणून स्वयंपाक करणें, अंघूळ करणें, जेवणें, निजणें, व दुसरीं कर्त्तव्यकर्में सोडून दिलीं तर कसें चालेल. तसेंच दुसऱ्या शाळेंत गेलों किंवा हापिसांत गेलों, किंवा दुसरा कोणताहि उद्योग करायास लागलों असतां ज्या स्थानापासून विद्येचे झरे फुटतात त्यांतून उदक ग्रहण न केलें तर विद्यारूप बिजाचें जें आपल्या अंतःकरणांत रोंपण केलें आहे त्याची वृद्धि कशी होईल ? अशा स्थानाची जर आपण उपेक्षा केली तर विद्येच्या अंकुराचा आंतच्या आंत नाश होईल. मग तिची वृद्धि होणें दुर्लभ आहे. ज्यांनीं ही सभा सोडिली त्यांस कदाचित् असें वाटलें असेल कीं अशा लाहानशा सभेपासून आपली बुद्धी कोठून वाढणार आहे; किंवा जें आह्मांस सद्यः येतें तें पुष्कळ आहे. जर त्याची असी समजूत झाली असेल तर त्यांची मोठी चूक आहे

---

* जनरल असेंब्लीच्या शाळेंत केलेलें भाषण.

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

असें समजावें. कोणाहिपाशीं चांगलें भाषण केलें असतां लाभ न होईल असें नाहीं, मग तो आठ वर्षांचा अज्ञान मुलगा असो किंवा पन्नास वर्षांचा अशिक्षित कुणबी असो. आतां विद्वान सुशिक्षित लोकांसीं भाषण केलें असतां अधिक लाभ होतात ही गोष्ट उघडच आहे. याविषयीं आमचें कांहीं ह्मणणें नाहीं परंतु प्रत्येक मनुष्यामध्यें कोणकोणते गुण आहेत हें समजून घेणें मनुष्यास योग्य आहे. अनेक जनाच्या बुद्धीचें रहस्य जेव्हां आह्मास कळूं लागतें तेव्हांच सृष्टींतील गोष्टींचा अनुभव येतो. " पिंडे पिंडे मतिर्भिन्नः " असें वाक्य आहे. सर वाल्टर स्काट, एक नामांकित विद्वान ज्याचें नांवदेखील घेण्यास मला भिती वाटती, तो असें ह्मणतो कीं, एक दिवस मी सहज माझ्या घोडेवाल्यासीं बोलत होतों त्या वेळीं त्याचे तोंडांतून कांहीं वाक्यें इतकीं चांगलीं निघालीं कीं, त्यांजपासून मला बराच लाभ झाला. सलेमोन नामक एक सूज्ञ गृहस्थ आळशी लोकांस असा उपदेश करितो कीं, हे आळशी मनुष्या, तुं मुंगीपाशीं जाऊन उद्योग कसा करावा तें शिक. यांत तो एवढेंच सांगतो कीं, कोणताही प्राणी, कसा असला तरी त्याचे चांगले गुण आहेत ते ग्रहण करावे, कोणाचा तिरस्कार करूं नये. पुराणांतरीं दत्तात्रयानी वीस गुरू केले ह्मणून आह्मी ऐकतों. त्याचा अर्थ हाच कीं ज्यामध्यें जो गुण चांगला अढळला तो त्यानी ग्रहण केला. यास्तव ज्या ठिकाणीं विद्यावृद्धीच्या नावानें सभा तेथें जाण्यास आपण किमपि आळस करूं नये.

आतां भरतखंडांत विद्येचा प्रसार होत चालला आहे व तिची उत्तरोत्तर वृद्धी होत आहे असा जो आमचा समज झाला आहे तो केवळ भ्रमच असें आज माझे बुद्धीस वाटतें. जर विद्येकडे आमच्या लोकांचीं मनें खरोखर वळलीं असतीं तर आज या सभेमध्यें दोनशें चारशें तरी मुलांचा समाज सहज जमला असता. ज्याअर्थीं त्यांला एथें येण्याची अभिरुची अजून झाली नाहीं त्याअर्थीं विद्येचें बीजारोपण अद्याप आपल्या देशांत झालेंच नाहीं असें ह्मटलें असतांही चिंता नाहीं. राजश्री सखाराम सदाशिव यानी आतां विद्येवर सुरस रूपक करून भाषण केलें त्यांत त्यानी आह्मास असें सांगितलें कीं आपल्या देशांत विद्येच्या बीजाची नुकतीच पेरणी चालली आहे. तर ही गोष्ट वास्तविक आहे अणखी असेंही ह्मटलें असतां चालेल कीं विद्येचें बीज लावण्याकरितां आमच्या लोकानी नुकताच जमीन नांगरायास प्रारंभ केला आहे. अजून बीं लावायाचें पुढें आहेच. आमच्या लोकांमध्यें दूरदृष्टी, देशाभिमान हीं कमी असल्यामुळें विद्येचा प्रसार होण्यास प्रतिबंध होतो. पाहा, माजी गवरनर नेकनामदार लार्ड एल्फिनष्टन यानीं महत्प्रयास करून परोपकार बुद्धीनें सन १८२२ सालीं एल्फिनष्टन इन्स्टिटयूशन हें नामांकित आमच्या लोकांस उदयास

Digitized by Google	Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आणणारें विद्यालय स्थापन केलें. त्या वेळीं त्या विद्यालयाचें नेटीव एज्युकेशन सोसायटी असें नांव होतें. त्या वेळापासून जर आमचे लोक विद्यावृद्धीचे कामांत व देश सुधारण्याकडे लक्ष देते तर आजपर्यंत या भरतखंडांत बरेच विद्वान झाले असते. परंतु ज्या वेळीं हें प्रख्यात विद्यालय उपस्थित केलें त्या वेळीं आमच्या लोकानी भलतेच कुतर्क काढून कित्येक लोक आपलीं मुलें त्या शाळेंत पाठवीत नसत. त्या वेळीं या शाळेंत सरासरी शंभर मुलांची हजिरी होतांना मुष्कील पडे, त्यामुळें विद्येच्या कामांत फारच विपर्यास पडला. हल्लीं पंधरा वीस वर्षांपासून मात्र मोठे लोकांचीं मुलें तेथें जाऊन मुलांची संख्या वाढत चालली ही गोष्ट वास्तविक आनंदाची आहे. अद्याप तरी विद्येचें तारतम्य ठेवावें तितकें आमचे लोक ठेवितात असें ह्मणवत नाहीं. पाहा, एल्फिनष्टन विद्यालय सरकारानें आह्मासाठीं बांधिलें. तसेंच फ्रिचर्च विद्यालय, जनरल असेंब्लीचें विद्यालय व मनिविद्यालय, हीं चारही नामांकित विद्यालयें आह्मांसाठीं इंग्रज लोकानी श्रम करून बांधिलीं; परंतु आमच्या लोकानी उद्योग करून एखादी साधारण मराठी शाळा बांधिली आहे तर दाखवा. आतां तुह्मी म्हणाल कीं एल्फिनष्टन विद्यालय आमच्या लोकानींच वर्गणी देऊन तयार केलें, तर ही गोष्ट खरी आहे कीं त्यांत तुमच्या वडिलांचे पुष्कळ द्रव्य आहे परंतु जर हें कृत्य नामदार एल्फिनष्टन यानीं उदार बुद्धीनें उपस्थित केलें नसतें, आणि या कामांत बडे लोकाकडून हजारो रुपये जमा केले नसते तर ही गोष्ट आमच्या लोकांच्या स्वप्नींदेखील आली नसती. आणि आम्हांस पाटीवर धूळ घालून अद्याप श्रीगणेशा गिरवीत बसावें लागलें असतें.

आमच्या कित्येक लोकांस इंग्रजी भाषेंत निपुण होऊन विद्वान व्हावयाची अलिकडे बरीच इर्षा उत्पन्न झाली आहे, आणि हा त्यांचा गुण स्तुतीस योग्य आहे, परंतु त्या भाषेचें परिज्ञान होण्यास जीं साधनें पाहिजेत त्यांजकडे दुर्लक्ष करितात. स्वभाषा चांगली आल्याशिवाय परभाषेचें मर्म समजणें कठीणच आहे. पाहा, कित्येक कल्पना आह्मास स्वभाषेंतच स्पष्ट करून दाखविण्यास किती कठीण पडतें. तर ज्या कल्पनांचा उद्भव स्वभाषेंत झाला त्यांचा परभाषेच्या तारतम्यानें त्यांस उघड करून सांगणें किती दुर्घट पडेल याचा तुह्मी विचार करा. एतद्देशीय लोकांच्या इंग्रजी भाषेस युरोपियन लोक हसतात याचें कारण बहुधा हेंच आहे कीं आमच्या कल्पना स्वभाषेंत परिपक्क झालेल्या नसतात ह्मणून अर्थातच परभाषेंत त्या उघड करून दाखवायास लागलों ह्मणजे त्यांत कोमळपणा दिसतो. ज्या संस्कृत, मराठी, गुजराथी भाषांचा आह्मी तिरस्कार करितों त्या शिकायास इंग्रज लोक हजारो रुपये खर्च करितात. सर बुलियम जोन्स जो सन १७८३ मध्यें कलकत्यामध्यें

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

नामांकित मुख्य न्यायाधीश होऊन गेला त्यानें एतद्देशीय भाषा शिकण्याकरितां तर असंख्यात द्रव्य खर्च केलें. फक्त संस्कृत शिकायास त्यानें जो पंडित ठेविला होता त्यास तो दरमाहां पांचशें रुपये देत होता, ह्मणजे दर दिवसास सुमारे १६, १७ रुपये पडले. आणि ही विद्या तुह्मास पैका खर्च केल्याशिवाय मिळत असतां तुह्मी तिचा अव्हेर करितां ही वाईट गोष्ट आहे. जर तुह्माला स्वदेशाचें कल्याण करायाचें असलें तर स्वभाषाच चांगली आली पाहिजे. कारण आमचा सर्व स्वदेशीय बंधूजनाशीं व्यवहार आपापल्या स्वभाषेंत होतो, आणि त्यांच्या कल्याणाची गोष्ट त्यांच्या मनांत भरवायाची असली तर परभाषेनें त्यांचा कसा निर्वाह होईल? परभाषेच्या योगानें त्यांचें कल्याण करीन ह्मटलें ह्मणजे आमचे चाकर, चुकर, तेली, वाणी, माळी, मारवाडी, या सर्वांस ती भाषा चांगली शिकवावी पडेल, तर अशी गोष्ट होणें कठीण आहे. यास्तव आपली स्वभाषा प्रज्वलित ठेवावी. याजवर तुह्मास एक नामांकित वक्त्याची गोष्ट सांगून माझें भाषण संपवितों. युनानी देशांत डिमास्थिनीस नांवांचा एक मोठा धुरंधर वक्ता होऊन गेला. त्याची वक्तृत्वशक्ती इतकी असे कीं, रोगी, अशक्त, वृद्ध, बाल अशांच्या कानांत त्याचे शब्द पडले असतां त्यांच्या आंगांत शौर्य येत असे. कित्येक लोक जेवायास बसले असतांदेखील त्याचें भाषण ऐकायासाठीं जेवण टाकून उठून जात. याच्या वक्तत्वशक्तीनें लोकांमध्यें धैर्य आणून फिलीप बादशाहास पांचसाहा खेपा मार्गे हटविलें. असी त्याची शक्ती पाहून बादशाह युनानी देशाच्या लष्करापेक्षां ह्या एका देशाभिमानी, परोपकारी आणि सूज्ञ वक्त्यास भीत असे. याप्रमाणें स्वभाषा चांगली आली असतां देशाचें कल्याण करायास आपणास साधन सांपडतें. आजपर्यंत युरोपखंडांत पुरातन व आर्वाचीन पुष्कळ वक्ते होऊन गेले, तरी याच्या तोडीचा अद्याप कोणी झाला नाहीं असें सांगतात. अशा ह्या विद्वान लोकांचीं नावेंदेखील घेण्याची आह्मामध्यें अजून योग्यता आली नाहीं. आमच्या सभेंत पुष्कळ लोक जमत नाहींत ह्मणून आम्ही वारंवार कुरकुर करितों. याचें कारण हेंच आहे कीं, सुरस भाषण करून आपल्या वक्तृत्वशक्तीनें लोकांचीं मनें आपणाकडे आकर्षण करून घेण्याचें सामर्थ्य आह्मामध्यें अजून नाहीं. जर आमच्या भाषणाची त्यांस गोडी लागली असती तर आज एथें बोलाविल्याशिवाय शेकडों लोक जमले असते यांत संशय नाहीं; यास्तव आपणास स्वभाषेचें ज्ञान परिपूर्ण असलें पाहिजे.

आतां इंग्रजी भाषा शिकायाची जी अभिरुची आमच्या लोकांस झाली आहे हा त्यांचा स्तुत्य गुण आहे. अनेक भाषा शिकून त्या त्या भाषेंत काय रहस्य आहे हें पाहून त्यांतील चांगल्या गोष्टींच्या द्वारें स्वदेशाचें कल्याण करणें हें मनुष्यमात्रास उचित आहे

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आणि इतकें हें करण्यास स्वभाषा चांगली आली पाहिजे हेंच प्रधान आहे, इतकेंच माझें तुह्मास सांगणें. विद्या संपादन करायास शरीरश्रम आणि द्रव्याचा व्यय केला पाहिजे. यास्तव विद्या प्राप्त करून घेण्यास तुह्मी द्रव्याचा व्यय केला पाहिजे. यास्तव विद्या प्राप्त करून घेण्यास तुह्मी द्रव्याची आणि श्रमाची कसर करूं नये. आपल्या शक्त्यनुसार द्रव्य वेचून विद्या संपादन करावी त्यांत अधिक भूषण आहे. आपणास शक्ती असल्यास फुकट विद्या संपादन करीन अशी कधीं आस्था धरूं नये.

ज्ञानोदय—पु. १५, अं. २२ (१७–११–१८५६).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

१९

" ज्ञानप्रसारकसभेची सभासदांस विनंती "*

हे सुज्ञ गृहस्थहो,

आज आपल्या सभेचा वाढदिवस आहे, आणि हा उच्छाह करितेवेळीं आपल्यास प्रथम दोन गोष्टी स्वीकारिल्या पाहिजेत. त्या कोणत्या ह्मणाल, तर एक आजपर्यंत ही सभा कायम राखून आबादान ठेविली आहे; आणि दुसरी, चालत्या वर्षांत ह्या सभेची उत्तरोत्तर वृद्धि होऊन हिचें आयुष्य वाढावें, याविषयीं आपण सर्वांनीं ईश्वराची प्रार्थना करावी.

आतां सन १८५७ चें साल प्राप्त झालें असतां, ज्ञानप्रसारक सभा उत्सुक होऊन मोठ्या आस्तेनें तुह्माकडे पाहाते, आणि तुह्मापासीं विनंती करिते, कीं हे माझे आश्रयदाते हो, जेव्हां मी बाल्यावस्थेंत होत्यें, तेव्हांपासून आजपर्यंत तुह्मी माझें पालनपोषण केलें, आणि तुह्मी मला ह्या सध्याच्या स्थितींत आणिलें. तर आतां लोकांमध्यें पूर्णपणें प्रगट होण्याचा माझा समय आला आहे; यास्तव तुह्मी सर्वांनीं मिळून माझ्या लौकिकाचें रक्षण केलें पाहिजे. आजपर्यंत मी पूर्ववयांत होत्यें, तेव्हां निबंध, व्याख्यानें, आणि अनेक तऱ्हेचें सुरस भाषणरूप जें अन्न मला खावविलें, व वस्त्रें लेववलीं, तेणेंकरून मी अतृप्त झाल्यें असें नाहीं. परंतु आतां मी मोठी झाल्यें असतां अर्थांतच माझा आहार वाढला; व मला उंचीं वस्त्रें पाहिजेत, कारण तुह्मी मला तशाच योग्यतेस आणिलें आहे. त्याचा तुह्मी विचार ठेवावा.

* २ जानेवारी १८५७ रोजीं ज्ञानप्रसारकसभेपुढें केलेलें भाषण.

Digitized by Google · Original from UNIVERSITY OF MICHIGAN

या वर्षासाठीं किमानपक्ष साहा तरी व्याख्यानें देणाऱ्यांची योजना करावी. तसेंच निबंध लिहिण्याविषयीं प्रत्येक सभासदानें वर्षांतून एकतरी निबंध लिहून माझें अंग झांकावें; व सर्वांनीं आपआपल्या शक्त्यनुसार प्रत्येक सभेमध्यें कांहींतरी भाषण करून माझे गुणदोष मला समजवावे. ह्मणजे तुम्ही माझें कोड पुरविलें असें मी समजेन, आणि आपला बंदोबस्त ठेवीन.

आतां सभेविषयीं माझ्या मनांत कांहीं बोलायचें आहे. तें कृपा करून ऐकून घ्यावें. सभेचा उर्जित काळ होऊन तिचें नाव चीरकाळ राहावें असी जर तुमची इच्छा असली, तर तिच्याकरितां आपल्या सुखाचा कांही तरी वांटा अर्पण करा. केवळ वाऱ्यावर गहूं दळून मांडे खाईन म्हटलें तर कसें होईल ? सभेचें आज आपण पोषण केलें, तर ती आमचें किंबहुना आमच्या मुलांबाळांचें पालन करील. विचार करून पाहिलें असतां, या सभेच्या हिताकडे जेवढा वेळ द्यावा तेवढा आपण देत नाहीं. यामुळें तिची जेवढी कीर्ति व्हावी तेवढी झाली नाहीं. तर पुढें तरी आपण सावध असलें पाहिजे, नाहींतर आपलें नासें आणि जगाचें हसें या ह्मणीप्रमाणें होईल. ह्या सभेचा भरभराट होण्याचा हाच प्रसंग आहे. आतां इजकडून कांहीं तरी खंबीर कृत्य घडलें पाहिजे. म्या मागें एकवेळ तुम्हाला सुचविलें होतें, कीं मराठी भाषेंत सर्वसंग्रह नामाचा ग्रंथ नाहीं. तर त्याचा पाया या सभेकडून पडावा. या गोष्टीवर तुह्मी उदार दृष्टीनें लक्ष पुरवाल अशी माझी खात्री आहे. सन १८५७ सालापासून आमच्या सुज्ञ सभासदांनीं या कामाची तरतूद ठेवावी. ह्मणजे तेणेंकरून ही सभा प्रौढवयांत आली असें लोकांस प्रत्यक्ष समजेल.

मराठी ज्ञानप्रसारक हें पुस्तक या सभेकडून निघतें, आणि त्यापासून लोकांस किती फायदा होतो हें जर मी तुह्मास सांगायास लागलों, तर आपल्या तोंडानेंच आपली स्तुति केली असें होईल. ह्मणून या प्रकरणीं एथें कांहीं फारसें बोलत नाहीं. एथें जे कोणी लोक जमले असतील, त्यांणीं कृपा करून त्याजविषयीं बरें किंवा वाईट कांहींतरी बोलावयाचें असेल तें बोलावें. या पुस्तकाविषयीं मला एवढेंच सांगायाचें कीं, इतःपर प्रत्येक सभासदानें वर्षांतून एक तरी विषयावर लिहून त्यास मदत करावी. बहुतकरून नूतन विषय असावा; भाषांतर करून पाठविणें हा गौण पक्ष आहे. असें केल्यानें ह्या पुस्तकाचे वर्गणीदार वाढतील, व तें पुस्तक वाचण्यांत लोक आनंद पावतील.

आमचे बंधु पारशी यांजमध्यें अलिकडे जी विद्येची अभिरुची उत्पन्न झाली आहे, तिचा दशमांशदेखील आह्मामध्यें नाहीं असें ह्मटलें असतां चिंता नाहीं. गेल्या महिन्याच्या ६ व्या तारिखेस गुजराथी ज्ञानप्रसारक सभा भरली होती, तेवेळीं शेट डोसाभाई फ्रामजी यांणीं "शहरांतील मनुष्यगणती केल्यानें काय लाभ आहेत" या

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

विषयावर सुरस निबंध लिहिला तो वाचला. या प्रसंगीं विद्वान्, श्रीमंत, आणि विद्यार्थी लोकांचा थाट जमला होता, तो पाहून मी केवळ चकित झालों. ती सभा याच जागीं भरली होती. लोकांची गर्दी इतकी होऊन गेली होती कीं, कित्येक संभावित गृहस्थ जागेच्या संकोचामुळें जवळ उभे राहून मोठ्या उच्छुकतेनें ऐकत राहिले होते. आपल्या सभेचा पाया म्हटलें असतां बऱ्याच संभावित गृहस्थांकडून घातला गेला. प्रथम वर्षी ह्या सभेचे व्यवस्थापक विनायकराव वासुदेवजी इस्कोयर, राव बाहादुर दादोबा पांडुरंगजी, रावसाहेब माहादेवशास्त्री, व दुसरे नामांकित विद्वज्जन होते. आणि ईश्वरकृपेंकरून हल्लीं जरी त्यांला मोठ्या हुद्याचीं सरकारी कामें मिळालीं आहेत, तरी त्यांणीं ह्या सभेचा संबंध सोडून दिला नाहीं. ही गोष्ट खरी आहे कीं, ह्या गृहस्थांच्या नेमणुका स्थलांतरीं झाल्यावरून व जे एथें आहेत त्यांच्या हातांत मोठीं नाजूक कामें असल्यामुळें व कांहीं अडचणीमुळें व्यवस्थापकाचें काम त्यांच्यानें स्वीकारवत नाहीं. आतां ज्या सभेचा उगम अशा गृहस्थांकडून झाला, त्यांच्या नावासारिखें कांहीं तरी आह्मास केलें पाहिजे, नाहीं तर एवढा परिश्रम करून चीरकाळ टिकण्याच्या हेतूनें ज्ञानरूप इमला बांधायास जो त्याणीं गहन व मजबूद पाया घातला होता तो आम्हीं खणून टाकिला असें होईल. आणि जर ही सभा लौकिकास आणण्याची मेहेनत आज आपण घेतली नाहीं, तर अपेशाचे मात्र आह्मी धनी होऊं. तर ह्या आरोपाचे आह्मी विभागी होऊं नये. आणि ज्याणीं ही सभा उपस्थित केली, त्यांच्या श्रेयाचा वांटा आह्मास मिळावा ह्मणून चालत्या वर्षी आपण उद्योग करावा. माझी खातरी आहे कीं जर आह्मी या कामास झटलों तर खरोखर आमच्या इच्छा ईश्वर सफल करील.

डाकतर भाऊ दाजी, विनायकराव वासुदेवजी इस्कोयर, इत्यादि गृहस्थ अलिकडे सभेस येत नाहींत, ह्मणून कित्येकांस असें वाटत असेल कीं, ते ह्या सभेची अनास्था करितात, तर ही त्यांची चूक आहे. कारण ह्या गृहस्थांपाशीं माझें सभेविषयीं भाषण झालें, त्यावरून असें स्पष्ट दिसून आलें कीं ते ह्या सभेचें निरंतर कल्याण इच्छितात. यावरून जरी ते शरीरद्वारें एथें नसतात, तरी अंतःकरणद्वारें एथें असतात असें अनुमान करण्यास कांहीं भय नाहीं.

राजश्री नारायण दिनानाथजी हे सदरीं सांगितलेल्या गृहस्थांच्या कोटींतील असून, यांजकडे जस्टिस आफ धी पीस ह्या हुद्याचें, सुप्रीम कोर्टांतील मुख्य ट्रानस्लेटरचें व म्युनिसिपल फंडाचे मेंबरचें काम आहे. इतके हुद्दे संभाळून आपल्या सभेच्या अध्यक्षाचें काम आज सुमारें सातआठ वर्षें ते सतत चालिवतात. या त्यांच्या परोपकारी विचारावरून एथें त्यांची स्तुति केली तेवढी थोडीच आहे.

ज्ञानप्रसारक—पु. ७, अं. ११ (फेब्रुवारी १८५७).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

२०

स्वभाषेस प्रौढी कशी येईल ?*

मित्रहो,

कोणत्याहि सभेची वार्षिक हकीगत सभेपुढें प्रसिद्धपणीं वाचून दाखवणें यांत इतका आशय असतो कीं, जें वर्ष गुदरलें त्यांत ज्या गोष्टी व्हाव्या असा पूर्वी कृतनिश्चय होता त्या सिद्धीस गेल्या किंवा नाहींत हें सर्व सभासदांस जाहीरपणीं कळवावें. मग सभासदांनीं त्याविषयीं विचार करून आपआपला मनोदय प्रगट करवा. जर आपले सर्व उद्देश सिद्धीस गेले असें दिसून आलें, तर त्याविषयीं आनंद प्रदर्शित करावा, आणि आपले मनोरथ पूर्ण न जहाले असें दिसून आल्यास खिन्नता दाखवावी. नंतर जीं कृत्यें व्हावीं असा पूर्वसंकेत असतां तीं कां सिद्धीस न गेलीं याचा विचार करून पुढच्या वर्षी आपले सर्व हेतु सिद्धीस जातील असे उपाय योजावे.

आमच्या चिटणिसांनीं गतवर्षीच्या सभेचा वृत्तांत वाचून दाखविला त्यावरून आह्मास असें समजतें कीं, गतवर्षी ज्ञानप्रसारक सभेच्या सोळा सभा भरल्या, त्यांत कित्येक सभासदांनीं निबंध वाचले व व्याख्यानें दिलीं. आतां सभेच्या नेमाप्रमाणें ह्मटलें असतां आपल्या सभा वर्षांतून २४ भराव्या त्या मानानें एक तृतीयांश कमी भरल्या. दुसरें, ह्या सभांपैकीं दोनतीन सभांत मात्र दोनशेंपासून तीनशेंपर्यंत गृहस्थ जमले होते आणि

---

* १८ डिसेंबर १८५७ रोजीं भरलेल्या ज्ञानप्रसारकमंडळीचा वार्षिक सभेंत करण्यासाठीं योजिलेलें भाषण.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

बाकीच्यांत विशेष सांगायाजोगा समाज जमला नाहीं असें सांगितलें, परंतु प्रत्येक सभेमध्यें खुद्द सभासद किती हजीर होते हें कळविलें नाहीं. मला वाटे कीं, वार्षीक सभेपुढें दरसभेंत सभासद किती येत असतात, हें कळविणें जरूर आहे. आजचा वृत्तांत ऐकिल्यावरून असें दिसतें कीं, सभेच्या कृत्याकडे सभासद केवळ दुर्लक्ष करितात असें नाहीं, परंतु ज्या रीतीनें उद्योग करावे त्या रीतीनें करायास सर्व सभासद झटत नाहींत. जरी आपण प्रत्येक सभासदांनी वर्षाच्या २१९०० घटिकांतून चार घटका सभेकडे खर्चिल्या तरी सभेचा भरभराट होण्यास कांहीं अश्लाघ्य नाहीं. पाहा, सभेच्या पटांत सुमारें ऐशीं गृहस्थांचीं नावें आहेत त्यांतील दर एकानें वर्षांतून जरी एकच निबंध लिहिला, किंवा एकच व्याख्यान दिलें, तर जी सभा सध्या महिना पंध्रा दिवसांनीं भरत असते ती दर आठवड्यास भरणें जरूर पडेल यांत संशय नाहीं. आतां प्रत्येक सभासदापाशीं माझी एवढीच विनंति आहे कीं, त्याणें आपआपल्या अंतःकरणास असा प्रश्न करून पाहावा, मी सभेचें काम मन लावून करितों कीं काय? मग आमचेंच अंतःकरण आह्मी कसें वर्ततों याचा पुरावा करून देईल. याविषयीं मी अधिकोत्तर बोलावें असें नाहीं. तुह्मी सुज्ञ आहा आणि माझी पूर्ण खातरी आहे कीं, या गोष्टीवर तुह्मी आपलें लक्ष पुरवाल.

आतां कोणी ह्मणेल कीं, ह्या सभेंत मोठे विद्वान् ते येतात किती आणि आह्मास त्यांजपासून फायदा तो किती होईल? तर त्याणीं असें ह्मणूं नये. सर्व विद्वान् जमतात तेथेंच आपणास लाभ होतो आणि दुसरे ठिकाणीं होत नाहीं असें नाहीं. ज्ञान प्राप्त करण्याची मात्र अह्मास युक्ति माहीत असली पाहिजे, ह्मणजे तें कोठेंहि प्राप्त होतें.

एका विद्वान् इंग्रज ग्रंथकर्त्यांची गोष्ट एथें तुह्मास सांगतों. त्यावरून तुमच्या अनुभवास येईल कीं, अज्ञानी मानलेल्या लोकांकडूनही आपणास ज्ञान प्राप्त होतें. सदर्हु ग्रंथकर्ता ग्रंथ रचून तो बालबोध व सर्व प्रतीच्या लोकांस समजे असा व्हावा ह्मणून त्याची एक अशिक्षित कुळंबीण होती तिजकडे जाऊन वाची, आणि तिला तो समजला तर छापायास पाठवीत असे. एक वेळ त्याणें एक सुरस नाटक रचिलें आणि तें त्या दासीकडे वाचिलें, तेव्हां ती ह्मणाली कीं हें मी बराबर समजल्यें नाहीं. मग त्याणें तें रद्द करून अधिक श्रम घेऊन दुसरें एक तसेंच रचिलें तें तिणें कबूल केलें. मग तें उत्कृष्ट होऊन अद्याप सर्व लोकांस मान्य आहे असें सांगतात.

ही एक गोष्ट तुह्मापुढें प्रगट करावी असा माझा मनोदय आहे, आणि त्याजवर आह्मी सर्वांनीं लक्ष द्यावें असी मी इच्छा धरितों. अलीकडे आह्मामध्यें कित्येक तरुण विद्यार्थी आपण इंग्रेजी भाषेचे मर्मज्ञ असें ह्मणविण्याची इच्छा धरून त्या भाषेशिवाय दुसरीकडे लक्ष देत नाहींत, त्यामुळें त्यांची अवस्था "इदंच नास्ति" आणि "परं न लभ्यते" या ह्मणीप्रमाणें होती. कित्येक आपणास इंग्रजी चांगलें येतें असें ह्मणविणाऱ्या

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

लोकांचा असा समज पडून गेला आहे कीं, जसा एकादा मजूर जेवढ्या खेपा हेल वाहतो तितका त्याला पैसा अधिक मिळतो, तसेंच जेवढीं इंग्रजी पुस्तकें अधिक वाचून टाकावीं तितकें त्यांस अधिक विद्वान् ह्मणतील, असें मनांत आणून मोठमोठाल्या ग्रंथांच्या बेधडक आवृत्ति करीत असतात, आणखी असी फुशारी मिरवितात कीं, आह्मी इतकीं पुस्तकें वाचलीं, आतां आह्माला दुसरें काय पाहिजे; पुस्तकांच्या नावावरूनच आह्मी विद्वानांत खपूं. आणि हें त्यांचें काम सिद्धीस नेण्यास अलीकडे पुस्तकालयांचाहि जिकडे तिकडे सुकाळ झाला आहे, परंतु असें केल्यानें आपण केवळ पुस्तकांचा उपयोग करावा तसा केला असें समजूं नये. एक सुज्ञ विद्वान् असें ह्मणतो कीं, जो पुष्कळ खातो तो अधिक बळकट होत नाहीं, तसेंच जो केवळ पुस्तकें वाचितो तो विद्वान् होतो असें नाहीं. कारण जो फार पुस्तकें वाचतो त्याची बुद्धि गोंधळून जाती आणि पुढें काय करावें हें त्यास समजत नाहीं. परंतु जो थोडें वाचतो आणि त्याजवर विचार करून तें स्वभाषेंत लोकांत प्रगट करितो त्याचें ज्ञान बळकट होऊन तो योग्यतेस पोंहचतो. यावर तो विद्वान् असें उदाहरण देतो कीं, पुरातन गाल (फ्रान्स) देशांतील शिपाई लोकांनीं लढण्यांत प्रवीण व्हावें ह्मणून त्यांस अनेक तऱ्हांचीं आयुधें देत असत, परंतु त्यांचा भार त्यांला इतका होत असे कीं ते लढाईच्या कामास अगदीं निरुपयोगी होत असत. तसेंच पुष्कळ वाचित गेले आणि त्याचा बराबर उपयोग न केला ह्मणजे त्या मनुष्याचा घोटाळा होतो. "वाचावें थोडें आणि लिहावें पुष्कळ." जें आपण वाचतों त्यावर आपला तर्क घालवून स्वभाषेंत समजवितां यावें. या प्रकारचें जें वाचणें तें मात्र उपयोगीं पडतें. तर पुढें आह्मीं या गोष्टीवर लक्ष देवून आमचें ज्ञान योग्य रीतीनें वाढविण्याचे प्रयत्न करावे.

कित्येकांस वाटतें कीं, मोठा तत्ववेत्ता आणि ज्ञानी होण्यास इंग्रजी भाषाच पाहिजे, तीवांचून तत्ववेत्ता हें पद मिळणें कठीण. तर ज्यांचे असे समज आहेत त्यांस तत्ववेत्ता ह्मणजे काय हें समजलेंच नाहीं असें समजावें. ज्ञानी होणें हें आपल्या बुद्धीकडे आणि परिश्रमाकडे आहे, भाषेकडे नाहीं. आतां संस्कृत भाषेस एवढी प्रौढी येण्याचें कारण हेंच आहे कीं, त्या वेळीं मोठे ज्ञाते झाले त्यांणीं आपल्या बुद्धीच्या बळानें त्या भाषेंत न्यायशास्त्र, व्याकरण, कविता व वैद्यशास्त्र, भागवत, भारत, रामायण, अनेक नाटकें व दुसरे ग्रंथ लिहिल्यामुळें त्या भाषेस प्रौढी येऊन ती भाषा सुरस व विद्वज्जनग्राह्य झाली.

ब्रिटी म्हणून एक स्काटलंडांत नीतिशास्त्रवेत्ता होऊन गेला. तो असें सांगतो, कीं इटाली, स्पेन आणि इंग्लंड देशांतील कित्येक विद्वानांस असें वाटत असे कीं, ज्ञान ह्मणून जी काय वस्तु आहे ती हिब्री, लातीन आणि युनानी भाषांत आहे. आपली

स्वभाषा इंग्लिश, स्पानिश व इतालियन ह्या कांहींच नाहींत, आणि त्यांवर फार परिश्रम करून कांहीं उपयोग नाहीं. अशा समजुतीमुळें ते परभाषा शिकून विद्वान् होण्यासाठीं परिश्रम करीत व त्यांमध्यें ग्रंथहि रचीत; परंतु जोंवर त्यांला स्वभाषा चांगली आली नव्हती तोंवर ते मोठ्या विद्वानांच्या योग्यतेस चढलेच नाहींत व त्याणीं परभाषेंत केलेले ग्रंथ चिरकाळ टिकले नाहींत. इंग्रजी व इतालियन या भाषांस प्रौढी येण्याचीं कारणें तो असीं सांगतो. कांहीं वर्षांमागें इंग्लंड देशांत आडिसन नावाचा एक नामांकित ग्रंथकर्ता होऊन गेला, त्याणें त्या वेळीं प्रतिदिवसीं, आदित्यवार वर्ज करून, एक लाहान निबंध, सुरस बालबोध असून विद्वज्जनास मान्य असा छापावा. त्याचे ते प्रौढ आणि रसिक निबंध वाचून कित्येकांची खातरी झाली कीं स्वभाषेंतहि विद्वान् व तत्ववेत्ते होणें अश्लाध्य नाहीं. ज्ञानी होण्यास कोणतीच भाषा कारण नाहीं असी त्यांची खातरी होऊन, तेव्हांपासून ते स्वभाषेवर मेहेनत घेऊं लागले, तेणेंकरून त्यांची भाषा विद्वज्जनांस मान्य होऊन त्या भाषेंत लक्षावधि ग्रंथ झाले.

स्पेन देशांत कांहीं वर्षांमागें स्वभाषेचा इतका तिरस्कार करीत असत कीं, एकादे सभेमध्यें स्वभाषेंत भाषण करायासदेखील लाजत, आणि जी भाषा विद्वानांस योग्य ती लतीन, हिब्रो, किंवा युनानी असें त्यांला वाटत असे. पुढें इसवी सन् १६०४ मध्यें सरवांतिस या नावाच्या एका कवीनें डॉन् क्वुयूझोट नांवाचें एक सुरेख नाटक रचिलें. त्याची रचना, व भाषेचा गंभीरपणा पाहून आणि त्यांत दुर्गुणाचें स्पष्टीकरण केलेलें होतें तें वाचून, स्पेनदेशस्थ लोकांचा त्या ग्रंथावर इतका प्रेमा बसला, कीं तेंच त्यांची स्वभाषा सुधारण्यास कारण होऊन मग उत्तरोत्तर ते तीमध्यें अनेक ग्रंथ रचूं लागले.

इटाली देशांतहि पांचसाहाशें वर्षांपासून ह्मणजे जेव्हां तेथील लोकांनीं स्वभाषेवर लक्ष दिलें, तेव्हां ते विद्वान् झाले. त्यांमध्यें प्रथम दांती आणि पिट्राक हे आद्य कवि होऊन गेले. मराठी भाषेचाहि पाया सुमारें पांचशें वर्षांपासून घातला आहे. त्यामध्यें वामनपंडित, जगन्नाथराय, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, मोरोपंत यांसारिखे पंडित काव्यकर्ते मराठी भाषेंत प्रख्यात होऊन गेले. परंतु त्या काळीं त्याणीं जें केलें तें आह्मांकडून वाढविलें जावें तें तर एकीकडेच राहिलें, परंतु उलटें आपण उत्तरोत्तर त्याचें अवलोकन करणेंहि सोडून दिलें; इतकेंच नाहीं, परंतु आह्मास तिचा तिरस्कार येऊं लागला, त्यामुळें आमच्या ज्ञानाचा व बुद्धीचा लोप होत चालला आहे.

मयत बाळ गंगाधर शास्त्री यांचें इंग्रेजी भाषेंत उत्कृष्टच गम्य होतें याविषयीं कित्येक विद्वान् इंग्रज लोकहि त्यांची स्तुति करितात. याचें कारण त्यांला संस्कृत व मराठी ह्या स्वभाषा पूर्ण येत असत. आणि जर आपण तसें केलें तर आह्मी तशा योग्यतेस चढूं यांत संशय नाहीं.

ज्ञानप्रसारक—पु. ८, अं. १० (जानेवारी १८५८).

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

२१

प्रार्थना*

हे भक्तवत्सला, दीनदयाला, करुणासागरा, देवाधिदेवा, मायबापा, तुझ्या अनंत कृपेचे आम्ही बालकांनीं किती वर्णन करावें! प्रतिदिवशीं तूं आह्मांवर असंख्यात उपकार करून आमचें रक्षण करितोस. तुझ्या कृपेनें आह्मी या जगांत येतों, आमचें रक्षण होतें, आणि आह्मी अनेक व्यापार करितों. तूं सर्वज्ञ, सर्वसाक्षी आणि सर्वव्यापक आहेस, ह्मणून आमचीं सर्व कर्में व मनोगत तुला ठाऊक आहेत, तुझ्या आज्ञेवांचून झाडाचें एक पानदेखील हालूं शकणार नाहीं. ज्या त्वां इच्छामात्रेंकरून ही सृष्टि उत्पन्न केली त्या तुझें गौरव आमच्यानें किती वर्णवेल! परंतु तुझें असें वचन आहे कीं, "माझ्या नांवानें जेथें पांच दहा सभ्य गृहस्थ जमतात, तेथें मी आहें," आणि प्राकृतजनांतहि अशी ह्मण आहे कीं, "पांचा मुखीं परमेश्वर" तर आह्मी एथें शक्त्यनुसार तुझा स्तव करून प्रार्थना करावी अशा हेतूनें आज जमलों आहों. तर त्वां ह्या कृत्यास आशीर्वाद देऊन आमचा मनोरथ सिद्धीस जाई असें करावें. तुझ्या कृपेवांचून आह्मी एकहि शब्द बोलायास असमर्थ आहों. कारण आमचे श्वासोछ्वास तुझ्या स्वाधीन आहेत, तुझा अतिपवित्रपणा, निष्कलंक न्याय, आणि अपार दया यांचें जेव्हां आह्मास स्मरण होतें, तेव्हां आह्मा दीनांची प्रार्थना तूं ऐकून घेशील अशी आमची खात्री होते.

---

* २८ जुलै १८९५ रोजीं सरकारी आदेशानुसार केलेली प्रार्थना.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आज दोन वर्षें ह्या भारतखंडांत फार धुमाळी चालली होती; तेणेंकरून लक्षावधि मनुष्यांचा नाश झाला. कित्येक स्त्रिया पतिहीन झाल्या व कित्येक बालकें मातापितरांवांचून निराश्रित पडलीं व भरतखंडस्थ लोकांस अनेक दुःखें प्राप्त झालीं. हे जगदोद्धारका, आमची पूर्ण खात्री आहे कीं, जर या प्रसंगीं तुझी कृपा आह्मावर नसती, तर अशा दुःखांतून आमचें रक्षण झालें नसतें. जर इंग्रज सरकारसारखा आह्मावर प्रभु नसता, तर अशा बंडांतून आमचा बचाव झाला नसता. तर अशा समर्थ आणि प्रजापालक प्रभूची आह्मावर तूं योजना केलीस, हे तुझे उपकार आम्ही कोठवर स्मरावे! मुलानें अपराध केला असतां बाप त्याला शासन करून सुधारतो, त्याचप्रमाणें जेव्हां आह्मी तुला विसरतों, तेव्हां आह्मास शुद्धीवर आणण्यासाठीं तूं अनेक दुःखें आह्मांवर घालतोस आणि तेणेंकरून आमचें कल्याण करितोस. आज दोन वर्षें जे अनेक तऱ्हेचे उत्पात व अनर्थ घडून आले, त्यांवरून आह्मास तुझें क्षणोक्षणीं स्मरण होऊं लागलें. कारण राज्यामध्यें बंडें, महामारी, अवर्दंडें व अनेक तऱ्हेचे उत्पात, हीं तुझ्या क्रोधाचीं चिह्नें आहेत. तरी आह्मी तुझी कृपा पूर्णपणीं संपादन करायास प्रयत्न करीत नाहीं, ह्या आमच्या अज्ञानास धिक्कार असो. परंतु तुला आमची दया येऊन त्वां शत्रूचा विध्वंस केला, राज्यामध्यें जिकडे तिकडे स्वस्थता केली, आमच्या लक्षावधि बंधुजनांचा नाश झाला असता तो बंद केला, बंडाचें भय नाहींसें केलें, दुष्काळ पडेल या काळजींत आह्मी पडलों होतों तें आमचें भय दूर केलें, यथाकाळीं विपूळ पर्जन्यवृष्टि करून, त्वां आपल्या कृपेचें चिह्न आह्मास दर्शविलें. तर हे कृपासागरा, जो आतां त्वां राज्यांत स्वस्थपणा आणला आहे, तो तसाच सर्वकाळ राहीसा कर; आमचीं अंतःकरणें निर्मळ राख; मत्सर, द्वेष, लोभ, अहंकार, कुवासना, जीं बंडें, लढाया, व अनेक विघ्नें राज्यांत उत्पन्न होण्यास कारणभूत, तीं ह्या पृथ्वीवरून नाहींसीं कर; आणि सर्व शत्रु महाराणीस शरण येत असें कर; हे जगन्नियंत्या विश्वपालका, या पृथ्वीवर सर्वत्र शांती व्हावी, आमच्या देशाचें कल्याण व्हावें, आमचीं मनें तुझ्या ठिकाणीं लागावीं. महाराणीनें आह्मावर चिरकाळ दयायुक्त न्यायानें राज्य करावें, आणि तिचें व तिच्या कुटुंबाचें, व तिच्या राज्यांतील सर्व अधिकाऱ्यांचें कल्याण व्हावें आणि सर्व लोकांनीं तुझ्या इच्छेप्रमाणें वागून तुझें नांव सर्वकाळ गाजवावें, असें कर, इतकेंच तुजपाशीं या प्रसंगीं आमचें मागणें आहे. तथास्तु.

ज्ञानप्रसारक—पु. १०, अं. ५ (ऑगस्ट १८५९).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

२२

" आह्मांमध्यें स्वतंत्रपणा कधीं येईल ? "*

आमच्या सुज्ञ अध्यक्षांनीं आतां तंत्रशास्त्रावर जें व्याख्यान दिलें, तें ऐकून सर्व मंडळीचें समाधान झालें असेल, याविषयीं संशय नाहीं. परंतु आजचा समारंभ पाहून मला जो संतोष झाला त्याचा समावेश माझ्या मनांत होत नाहीं, यास्तव या स्थळीं तो प्रगट करण्यास मी तुमची परवानगी घेतों.

ही सभा स्थापन झाल्यापासून पुष्कळ गृहस्थ हिचे सभासद व व्यवस्थापक होऊन गले; परंतु त्यांत आस्थापूर्वक सभेच्या कल्याणाकडे चिरकालपर्यंत झटणारे असे थोडेच अढळले. मला एथें सांगावयास मोठा संकोच वाटतो कीं, कित्येक माजी सभासदांस ज्ञानप्रसारकसभा या नांवाची मंडळी कांहीं वर्षांमागें या मुंबई मुक्कामीं होती, व प्रस्तुत आहे याविषयींची भ्रांतिच आहे. कित्येकांस मोठाले रोजगार मिळाल्यामुळें सभेचा विसर पडला. कित्येकांस परदेशांत जाणें पडल्यामुळें सभेकडे पाठ फिरवून तिचें नांव आपल्या स्मृतींतून काढून टाकणें प्राप्त जाहालें. कित्येकांस संसारासंबंधी उपाधीमुळें सभेची अनास्था करणें जरूर जाहालें, व कित्येकांस शरीरप्रकृति नीट नसल्यामुळें सभेच्या हिताविषयीं झटण्यास आळस करावा लागला. याप्रमाणें प्रत्येक सभासदास सभेस न येण्याचें व तिजप्रीत्यर्थ उद्योग न करण्याचें कांहींना कांहीं तरी कारण आहे. परंतु हीं कारणें शेंकडा दाहा वास्तविक आहेत असें मानायास मला संकोच वाटतो. सभेची

---

* १९ ऑगस्ट १८५९ रोजीं ज्ञानप्रसारकसभेंत केलेलें भाषण.—ह्यांत थोडा फारफेर केला आहे. –गो. ना.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

अनास्था करण्यास वर सांगितलेलीं सबळ कारणें आहेत असें एकाएकीं ह्मणवत नाहीं; कारण कितीही मोठा हुद्दा प्राप्त झाला व हजारो कोशांवर दूर गेलों, तरी (जर आमच्या मनांत असलें तर) सभेचें कल्याण करण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं. " मन आहे तेथें सर्व आहे " असें वडिलांचें वाक्य आहे.

पाहा, इंग्रज व दुसरे युरोपियन लोक मोठमोठाले सरकारी हुद्यांवर असतात, व हजारों कोश दूर देशांत जातात, परंतु त्यांचा कल उपयुक्त ज्ञान प्राप्त करून घेण्याकडे व ज्या सभेचे ते सभासद असतील तिचें महत्व वाढविण्याकडे असतो, ह्मणूनच ते विद्वान् होतात आणि त्यांणीं उपस्थित केलेल्या सभा शेंकडो वर्षें सुरक्षितपणें चालतात, अशीं उदाहरणें आपणांस हजारो सांपडतील. एक साधारण गोष्ट मी एथें सांगतों, चार पांच वर्षांमागें आमच्या देशाचें कल्याण इच्छिणारे मेजर जनरल जेकब हे शरीरप्रकृति बिघडल्यामुळें एक वर्षाची रजा घेऊन सिंगापुर व आस्त्रेलिया एथें गेले होते. त्याणीं तेथें जाऊन अनेक शोध केले. तद्देशीय लोकांच्या धर्माचीं पुस्तकें मिळविलीं. व तेथील चमत्कारिक प्राण्यांचे व दुसऱ्या वस्तूंचे शोध केले व एथें आल्यानंतर " ज्योग्राफिकल सोसायटी " आणि " रायल एशियाटिक सोसायटी " या सभांत दोनचार सुरस व्याख्यानें दिलीं, तेणेंकरून बहुतेक गोष्टींची सभासदांस माहिती जाहाली. त्याणीं कित्येक चमत्कारिक लहान प्राणी वाळवून आणिले होते, ते पाहून त्यांची शोधक बुद्धि व लक्षपूर्वक अवलोकन करण्याचा तारतम्याविषयीं सभासदांनीं माना डोलविल्या. या प्रकारचे किंवा त्याच्या खालोखाल कांही तरी उद्योग आमच्या सभासदांतून कोणाकडून तरी घडून आले असले तर सांगावे जेव्हां आह्माकडून असे उद्योग होतील तेव्हांच लोकांचीं मनें आमच्याकडे वळतील, आणखी ते आह्मी सांगितलेलें ऐकतील व त्यांस ज्ञानाची अभिरुचि लागेल.

राजश्री नारायण दिनानाथजी हे सरकारी मोठा हुद्दा बजावीत असून दुसरीं सरकारी नाजूक कामेंहि करितात, व त्यांस जस्टिस् आफ् धि पीस हा किताब मिळाला आहे. इंग्रज सरकारांतून एतद्देशीय विद्वान लोकांस उत्तम प्रकारचें सरकारी काम मिळण्यास योग्य तें त्यांस सध्या मिळालें आहे. असें असतांहि ते आज किती वर्षांपासून सभेच्या अध्यक्षाचें काम सतत चालवितात; अवकाश सांपडेल त्या दिवशीं येऊन सभास्थान सुशोभित करितात, व सभेच्या कल्याणाकडे आपला अमोलिक वेळ खर्चितात; तर त्यांच्या ह्या स्तुत्य कृत्यांविषयीं सभेनें त्यांचे उपकार मानणें हें योग्य आहे.

आतां कित्येक विद्वज्जनापाशीं माझी इतकीच विनंति आहे कीं, जसे राजश्री नारायण दिनानाथजी सभेचा दर्द बाळगितात, तसाच त्याणींहि बाळगावा आणि प्रतिवर्षीं दर

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

एकानें एकेक, इच्छेस वाटेल त्या विषयावर, व्याख्यान द्यावें. असें केलें असतां सभेचा उर्जितकाळ येण्यास विलंब लागणार नाहीं. आजच्या समारंभावरून माझी पूर्ण खातरी होते कीं, आमचे विद्वान् गृहस्थ हें मनावर घेतील तर पुष्कळ गोष्टी साध्य होतील, व लोक त्यांचे उपकारहि मानितील. कित्येक लोक असें ह्मणतात कीं, आमच्या लोकांचें कल्याण करायास पुढारी होणें कांहीं उपयोगाचें नाहीं, ते कधीं हिताची गोष्ट ऐकून घेणार नाहींत, "आंधळ्यापुढें नाचणें आणि बहिऱ्यापुढें गाणें" अशी त्यांची अवस्था आहे. ह्मणून त्यांचें बरें किंवा वाईट करण्याचे खटपटींत आपण मुळींच पडूं नये. आपलें हित आपण करून घ्यावें ह्मणजे झालें. या विषयावर मागें फार वेळ भाषण झालें आहे, ह्मणून आतां एथें त्याविषयीं फार बोलत नाहीं, उगीच पिष्टपेषण करून फळ नाहीं; परंतु मला असें वाटतें कीं, जर आमचे विद्वान् आणि मोठे लोक आपल्या सर्व कृत्यांत किंचित् उदारपणा दाखवितील, तर ते लोकांचीं मनें सहज आकलन करूं शकतील, मग देशाची सुधारणूक होण्यास कांहींच प्रयास पडणार नाहीं. कोणी ह्मणतात कीं आमच्या देशांत अनेक जातिभेद आहेत ह्मणोन कोणी कोणाच्या हिताकडे लक्ष देण्यास झटत नाहींत. परंतु ही गोष्ट वास्तविक नाहीं, कारण असें वचन आहे कीं, "सुजनो न याति वैरं."

कित्येक लोकांची वर्तणूक केवळ "ताकापुरतें रामायण" या ह्मणीप्रमाणें आहे. शाळेच्या संबंधानें व दुसऱ्या कोणत्याहि नात्यानें ते कधीं सभेस येतात, आणि तिच्या कल्याणाविषयीं कांहीं बोलतात, परंतु शाळेचा जिना उतरले ह्मणजे ती गोष्ट लागलीच विसरतात, यामुळें, सभेची बढती होत नाहीं. याचप्रमाणें दुसरे कित्येक एकदोन वर्षांनीं दूर देशांतून येतात तेव्हां कांहीं कारणपरत्वें संधि सांपडल्यास एखादे वेळेस सभेस येतात आणि तिची अव्यवस्था पाहून फार कळवळा दाखवितात, परंतु तें केवळ क्षणिक आहे, त्यांची वर्तणूक कुणब्यांच्या ह्या ह्मणीप्रमाणें आहे, "दिसे मडें येई रडें." आतां माझें मागणें इतकेंच आहे कीं, असी वहिवाट कोणीच ठेवूं नये. कोणताहि हुद्दा प्राप्त जाहाला व कितीहि दूर जावें लागलें तरी सभेच्या कल्याणाकडे दृष्टि ठेवावी, ह्मणजे आपलें व देशाचें हित होईल, लोकांस स्वभाषेची अभिरुचि लागेल आणि ते उपयुक्त ज्ञान संपादन करितील.

मला एथें सांगायास मोठा हर्ष वाटतो कीं रावसाहेब भास्कर दामोदर, रावसाहेब विश्वनाथ नारायण व रावसाहेब नारायण भाई, आणि दुसरे किती एक सभासद जसे पूर्वी सभेचा उत्कर्ष होण्यास प्रयत्न करीत असत तसेच सध्याहि करितात. हे आणि राजश्री नारायण दीनानाथजी सभेचा अभिमान बाळगतात, ह्मणूनच ही सभा अद्याप

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

चालली आहे. याप्रमाणें जर सर्व सभासद वागतील तर सभेचा भरभराट होणें अशक्य नाहीं असें माझ्या बुद्धीस वाटतें.

कोणी मजजवळ असें बोलिले कीं, ह्या सभेंत बहुतकरून अल्पवयस्क विद्यार्थी असतात ह्मणून संभावित गृहस्थ येण्यास फारसे धजत नाहींत, परंतु ही गोष्ट मला खरी वाटत नाहीं; कारण संभावित आणि विद्वान् लोकांच्या मनांत अशी शंका येणारच नाहीं, कोणाची बुद्धि कशी आहे यांचें भान कोणाच्यानें करवत नाहीं ह्मणून विद्वज्जन कोणाचाच तिरस्कार करीत नाहींत. याजवर इंग्रजी ग्रंथांत मी एक गोष्ट वाचली तिचा सारांश एथें सांगतों. लंडन शहरांतील एक विद्वान्, व सुज्ञ मानकरी त्या शहरांतील पाठशाळेची परीक्षा घेण्याकरितां गेला, तेव्हां तेथील शिक्षागुरूनें वरच्या वर्गांतील चांगले चांगले विद्यार्थी शोधून त्याजपुढें उभे केले. त्यांची परीक्षा घेतल्यावर तो गृहस्थ ह्मणाला, शाळेंतील सर्व लहान थोर मुलांची परीक्षा घेण्याची माझी इच्छा आहे. त्यावेळीं त्या शिक्षागुरूनें त्यास असें उत्तर केलें कीं, ते विद्यार्थी अजून आपल्यासारख्यानें परीक्षा घ्यावी अशा योग्यतेस आले नाहींत. हे त्याचे शब्द ऐकून त्या श्रीमान् पुरुषानें असें उत्तर केलें कीं, कांहो ! असें तुह्मी कां सांगतां ! मी तर या मुलांमध्यें कोणी न्यूटन[४], कोणी मिलटन[१], कोणी शेक्सपीयर[१], कोणी डिमास्थिनीस[२] व कोणी सर राबर्ट पील[३], असे पाहातों. असें ह्मणून त्याणें त्या सर्व मुलांची परीक्षा घेतली आणि मोठ्या संतोषानें घरीं गेला. विद्वान् लोकांची अशी वर्तणूक आहे.

एका गोष्टीविषयीं मी थोडेंसें बोलून आपलें भाषण समाप्त करितों. आमच्या लोकांचा स्वभाव खुशामती आणि कृपण होऊन गेला आहे, त्याजवर त्याणीं कांहीं लक्ष द्यावें. कोणी त्यांस रानटी, बेसमजुती, अज्ञानी व मनुष्याच्या योग्यतेस चढणारे नव्हत असीं अनेक दूषणें देतात, तरी तीं आह्मी सर्व निमुटपणें ऐकून घेतों; परंतु आपल्या बुद्धीचा व्यय करून नवीन शोध करणें व यांत्रिक विद्येमध्यें आपली मति चालवून लोकांस चमत्कार दाखवून जो रानटीपणाचा आळ आह्मावर आला आहे तो दूर करण्याच्या खटपटींत कोणीच पडत नाहीं. शेंदोनशें रुपयांचा रोजगार मिळाला आणि आपलें काम झालें ह्मणजे झालें. मग ते रानटी ह्मणोत किंवा काफ्री ह्मणोत, त्याविषयीं त्यांना कांहीं दुःख नाहीं. "रांड बिंड ह्मणा आणि पोटभर वाडा" अशी एक नायकांची ह्मण आहे, त्याप्रमाणें आमची अवस्था झाली आहे. आह्माला बुद्धि आहे, ज्ञान आहे, शक्ति आहे आणि संपत्तिहि आहे,

---

१. इंग्रेजी महाकवि. २. एक ग्रीक वक्ता. ३. एक इंग्लिश प्रधान. ४. इंग्लिश गणितशास्त्रज्ञ.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

परंतु त्यांचा बराबर व्यय करितां येत नाहीं; त्यामुळें आमचा स्वभाव अति आर्जवी होऊन गेला आहे. आह्मास असें वाटतें कीं, दुसऱ्याची खुशामत करणें हेंच आमच्या सुखाचें साधन. हा स्वभाव आमचे लोक सोडून देतील आणि विद्येच्या मागें लागतील, तेव्हांच, ते राजमान्य व खरे सुखी होतील.

हाल्लीं आह्मास चाकरी करण्याचा नाद फार लागला आहे, त्यामुळें आह्मास भित्रेपणा जडला आहे. मोठा असो किंवा गरीब असो, जो उठला तो चाकरी करायास धांवतो. जे गरीब आहेत त्याणीं मात्र चाकरी करावी हें योग्य आहे; परंतु जे श्रीमंत आहेत त्याणीं आपआपल्या मुलांस अनेक प्रकारचे धंदे शिकवावे. जेव्हां आह्मांमध्यें पुष्कळ व्यापारी, देशपर्यटण करणारे, कलाकौशल्य शिकणारे, व शेतकीच्या कामांत मन घालणारे, असे होतील तेव्हांच आह्मांमध्यें स्वतंत्रपणा येईल.

आजच्या व्याख्यानावरून किती कल्याणाच्या गोष्टी निष्पन्न झाल्या, पहा. आजदिवसपर्यंत कित्येकांचा भक्तांवर, धुताऱ्यांवर, अवसरांवर, भुताड्यांवर व दुसरे प्रकारच्या धंतरमंतरांवर जो देवभोळेपणा होता, त्याचा आतां खुलासा झाला. मला वाटतें कीं आज बहुतेकांची खातरी झाली असेल कीं, औसर, उतारे काढणें हें सर्व ढोंग आहे, यांत कांहीं दैविक उपचार नाहींत. याचप्रमाणें डाक्तर भाऊ दाजी व दुसरे विद्वज्जन एखाद्या उपयोगी विषयावर व्याख्यानें देतील तर आमच्या लोकांचें अज्ञान दूर होऊन त्यांस ज्ञानाची अभिरुचि उत्पन्न होईल यांत कांहीं संशय नाहीं.

ज्ञानप्रसारक—पु. १०, अं. ६ (सप्टेंबर १८५९).

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

परिशिष्ट क्र. (१)

माडगांवकरांच्या गद्याचीं भाषिक वैशिष्ट्यें

पाश्चात्य ज्ञानविज्ञानाच्या प्रथम परिचयानें प्रभावित होऊनहि आत्मविस्मृत न झालेले अव्वल इंग्रजींतील पहिल्या पिढींतले मराठी गद्यलेखक, असें कै. गो. ना. माडगांवकर यांचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. जें जें आपणांस नव्यानें ठावें होत आहे, तें तें मराठीमधून स्वकीयांस विवरावें, ही त्या काळाची निकडीची गरज होती. या गरजेंतूनच नियतकालिकी मराठी निबंधाचा अवतार झाला. माडगांवकर हे त्याचे एक आघाडीचे शिल्पकार.

माडगांवकरांचें 'मुंबईचें वर्णन' विचक्षण बहुश्रुतपणामुळें मोठें चटकदार उतरलेलें आहे. त्यांच्या निबंधांतून ही चमक अधूनमधून आढळली, तरी ते 'मुंबईच्या वर्णना'-इतके रोचक वाटत नाहींत. या निबंधांचे विषय प्रायः उपयुक्त ज्ञान देणारे, व्यावहारिक स्वरूपाचे आहेत. 'आत्मशिक्षण', 'द्रव्येण सर्वे वशाः', 'यत्नेन किं दुर्लभम्' यांसारख्या तात्त्विक निबंधांत त्यांनीं भाषेला संस्कृतप्राचुर्यानें नटविण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. तरीसुद्धां एकंदरींत त्यांच्या या निबंधांची शैली धोपटमार्गी आणि बोलभाषेशीं नातें सांगणारी आहे.

सार्वत्रिक शिक्षण सुरू होऊन क्रमिक पुस्तकांच्या द्वारें भाषाशिक्षणाला प्रमाणित स्वरूप प्राप्त होण्यापूर्वींचा तो काळ होता. शिवाय तत्कालीन पत्रव्यवहार वा अन्य व्यावहारिक गद्यलेखन मोडी लिपींतच होत असे. परिणामीं तत्कालीन गद्यलेखनपद्धतींत एकविधतेपेक्षां एक प्रकारचें अराजकच आढळून येतें. या संधिकाळांत व्याकरणशुद्धतेचीं कांटेकोर बंधनें पाळलीं जात नसल्यास त्यांत नवल नाहीं. तरीसुद्धां पेशानें शिक्षक असल्यानें माडगांवकरांचें गद्यलेखन पुष्कळ शुद्ध आहे. त्यांच्या लेखनांत आजच्या प्रमाणलेखनपद्धतीपेक्षां जे वेगळे अंश आढळतात, त्यांतले कांहीं व्यक्तिसापेक्ष असले तरी बरेचसे कालसापेक्ष आहेत. माडगांवकर हे एक प्रतिनिधीभूत गद्यलेखक आणि बोलभाषेशीं निगडित असें लेखन करणारे, तेव्हां त्यांच्या गद्याचें भाषिक स्वरूप पाहिल्यास अव्वल इंग्रजींतील मराठी भाषेच्या स्वरूपावरच प्रकाश पडण्यासारखा आहे.

वैकल्पिकता

गद्यलेखनाला एकसांची प्रमाणभूतता आलेली नसल्यामुळें माडगांवकरांच्या लेखनांत वैकल्पिक रूपें फार मोठ्या प्रमाणावर आढळतात.* उदा :—

---

* उदाहरणांपुढें दिलेले आंकडे पृष्ठांचे आहेत.

Digitized by Google — Original from UNIVERSITY OF MICHIGAN

तालव्य ज्या आणि च्या :

चा : तिचा योगानें ७३, पांच रुपयांचा सहा धावळ्या २७, खुर्चांचीच ६१, उंसाचा कांड्याएवढी ५९, मनुष्याचा अंतःकरणाची ७२.

च्याः ' च्या ' असें प्रमाणमराठी लेखन फार मोठ्या प्रमाणावर आहे. कांहीं उदाहरणें : आमच्या १२३; १२७, त्यांच्या ११७, शरिरसंपत्तीच्या ४६, ज्याच्या १२२ इ०

जाः जा वयोवस्थेंत ६२, जा खोतानें ५८, जा देशांत २१.

ज्याः प्रमाणमराठीसारखें 'ज्या' असें लेखन अधिक प्रमाणांत आहे. उदा० ज्या त्वां १२२, ज्याणीं ११७, ज्याच्या १२२ इ०

ही उभयविधता कृदन्तें आणि क्रियापदाचीं रूपें यांच्या बाबतींतहि आढळून येते. उदा. :—

ऊन प्रत्ययान्त कृदन्त : येऊन २८, जाऊन १०८, देऊन ११२–जावून २८, देवून १२०.

णें–कृदन्त : करण्याची ४, करण्याचा २, पाहाण्याची ५४, पिकविण्याचीं–वाढाववाचे ७२, घ्याववयास २७, करावयाची ५४ या प्रचलित प्रमाणमराठींतील रूपांबरोबरच उपसायासाठीं १०५, ठरायाची ४, लावायाची ३, मारायास ५४, भरायाचा ५५, खायास ५६ अशींहि रूपें मोठ्या प्रमाणावर आढळतात; किंबहुना तो अव्वल इंग्रजी काळांतील मराठीचा खास विशेषच म्हणावा लागेल.

इकारागमाच्या स्थानांत बदल : चालिवतात ११७, पिकिवणारे ८४, पिकिवण्याची ८२, दाखवितात १२६, दाखिवण्यासाठीं २१४ असा इकाराचा वर्ण-विपर्यय केलेला कांहीं वेळां आढळतो. मात्र दाखवितात १०४ सारखीं प्रमाणरूपेंच अधिक प्रमाणावर आहेत.

शब्दरूपें : अर्थात ९६-अर्थात् ९७; ९९, अवश्यकता ७३–आवश्यकता ७३, अह्मास, ११९–आह्मास ५४–आह्मांस ५४, अवसर १२८–औसर १२८, अशी ५२–असी १२०; १२१, इंग्रजी ६८–इंग्रेजी ६८, ईग्लंड ७९–ईग्लांड ७९, एकादा १२-एखादी ५२, करनाटक ८१–कर्नाटक ७, करतेवेळीं ११५–करित्येवेळीं ५५, गृहण ११–ग्रहण ३९, चिरकाळ १२१; १२३–चीरकाळ ११६; ११७, टेब्लावर ३६–टेब्लास १०६, डाकतर ११७–डाक्तर ६९–डाक्टर ७८, तशी ५९-तर्सी १२०, देशाटण ७८–पर्यटनांत ७९, नकशी ६१–नकशी ६१, पळस ३७–फळस ३७, पहा ३४–पाहे ७०; ७२–पाहा ५८, पुरत्या १००–पुर्ते ६८, पोपनसांच्या ४८-पोपनीसाचे ४८, प्रित्यर्थ ४–प्रीत्यर्थ १२४, बादशाह ९–बादशाहा २, बोलावणें ११३–बलावणें १०३; १०४, मोलवान १२–कीर्तिमान ९५, ह्मणून १२६–ह्मणोन १२६,

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

राहवें ६९–राहावत ७६, वर्ततात ७४–वर्त्तवून १२८, विद्वान १८–विद्वान् १२१, विरला ६५–विरळा ५७, समाराधन ३८– समाराधना ३६.

उच्चारप्रक्रिया

स्वरप्रक्रिया

आद्यस्थानीं

अ–आ : आचंबा ५८, आंडें ४०; ४२; ४४; १०२, आबू (अबू) ५५, आरबस्थान ७८, आलिबाग ४, आलेक्झांडर ८६, दाहा २६, पाहाड ५४, माहाजन १०७, माहादेवशास्त्री १०७, साहा ८, हाल्लीं २२; १२८.—ही प्रक्रिया अव्वल इंग्रजीचा विशेष म्हटला पाहिजे.

अ–ओ : पोपनस; पोपनीस ४८.–मराठीच्या गोमंतकी बोलीचा हा प्रभाव दिसतो.

आ–अ : अंगठी ५८, अंगण्यांत ४२, अढळणें (आढळणें) ४०; ५५; ७५, अबालवृद्ध ३; ८, अर्जव १०३, अवश्यकता ७३, अह्मास ११९.–ही प्रक्रियाहि अव्वल इंग्रजींतील मराठी भाषेचा विशेष म्हणतां येईल.

इ–ई : चीरकाळ ११६; ११७, तीचे ७७, तीणें ८४.

ई–इ : क्षिर (क्षीर) ३९, दिड ४४, पितांबर ७५, प्रित्यर्थ ४.–यांतील पितांबर' या शब्दांतील ह्रस्वीकरण उच्चारानुसारी दिसतें.

उ–ओ : कोंडी (कुंडी) ५४.

ऊ–उ : मुळचे ७९, शुद्रांची १७.–अन्त्य दीर्घामुळें मागील उच्चाराचें ह्रस्वीकरण करण्याची मराठीची तऱ्हा येथें प्रभावी दिसते.

ओ–अ : बलावणें ९; १४.–न. चिं. केळकरप्रभृति जुन्या मंडळीच्या तोंडीं हा उच्चार परवांपरवांपर्यंत होता.

ओ–आ : आबडधोबड ५५; ५८.–स्वरविषमीकरणाची छटा जाणवते.

औ–ओ : मोलवान (मौल्यवान) १२.

औ–अऊ : कऊल ४४.

औ–अव : कवलांत ४४.

औ–आव : आवतांनीं (औतांनीं) ५८.

आद्येतरस्थानीं

अ–आ : करांगळी ८२, संघाटण ६,–'करांगळी' हे रूप संस्कृत 'कराङ्गुलि' आणि प्रचलित 'करंगळी' यांच्या दरम्यानचें दिसतें.

अ–इ : घटिका ९, सारिखा ४४; ११७. –घटिका हें मूळ तत्समरूप कायम होतें. 'सारिखा' हें आजच्या 'सारखा' चें इकारागमयुक्त पूर्वरूप होय.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

अ-ई : हजीर ११२.-‘ हाजीर ’ या मूळ रूपाशीं जवळ असणारें आजच्या “ हजर ” चें पूर्वरूप.

अ–ओ : घरोटा (घर°) ४०. -अ–ओ करण्याची गोमंतकी बोलीची लकब.

इ–अ : धरत्रीस ५.-स्वरविषमीकरणाची छटा.

इ-ई : अप्रतीम ९२, चमत्कारीक ४०, दुर्मीळ ९७, पुराणीक ७६, प्रफुल्लीत ६४, मळीण ६०, साहजीक ४०.—पहिला शब्द सोडून बाकीचे शब्द इल, इन, इत, इ० लागून सिद्ध झालेले आहेत. अन्त्य ह्रस्वामुळें उपान्त्य दीर्घ करण्याची मराठीची उच्चारसरणी येथें प्रभावी दिसते.

ई–इ : एथिल ८३, हाजिरी ११२.–पहिल्या प्रकारचें रूप अपवादभूत दिसतें; तो मुद्रणदोषहि असेल. दुसऱ्या शब्दांतील दीर्घान्तामुळें उपान्त्य ह्रस्व झालेला दिसतो.

उ–अ : चेटक ५३, हळखंड २८.–‘ घातक–घातुक ’ सारख्या शब्दांत स्वरविषमीकरण होऊन मराठींत ‘ अ–उ ’ होतो. परंतु येथें ‘ चेट + क ’ आणि ‘ हरिद्रा+खंड ’ हीं मूळस्वरूपें ध्यानांत घेतलीं तर येथें स्वरविषमीकरण न होतां मूळचा अकार कायम होता, असें म्हणतां येईल.

उ–आ : शास्त्रीबावा (शास्त्रीबुवा) २६.

उ–ऊ : चतूर ३, नाजूक ११७, मधूर १०, विपूळ १२३.–उपान्त्य दीर्घ उच्चारसरणीनुसार प्रचलित मराठींतसुद्धां हे उच्चार असेच दिसून येतात.

ऊ-ओ : म्हणोन १२६.–असें जु. रूप क्वचितच आहे.

ओ–आ : बराबर ५८; ७९; १२८.—ही लकब केळकरांदि जुन्या मंडळीच्या तोंडीं दिसून येई.

ओ–ऊ : अंघूळ ११०.—बोलींत ही प्रक्रिया आढळते.

अर्धस्वर

य > ए : एथिल ८३, एथून ८०, एथें ५२; ११७.–येथें आद्य-व्यंजनलोपाची (Aphoeresis) प्रक्रिया आहे असें म्हणतां येणार नाहीं. ‘ सं. अत्र>प्रा. एत्थ ’ अशी पूर्वपीठिका असल्यानें हें प्रचलिताचें पूर्वरूप म्हणावें लागेल.

य–इ, ई : गाइकवाड २६, सोई २७.—संप्रसारण.

अन्त्यस्वरागम : विद्वान (विद्वान्) १८; २९.

स्वरभक्ति : अबरू ६४, करनाटक ८१, कसपट ७६, कातरी ३८, कुतऱ्याचा ५६, खातरी ५४; १२६, खालल्यानें १०, धंतरमंतर (यंत्रमंत्र) १२८, नकशी ६१, परवा ५०, शडशास्त्र ३५, शांतवन (सांत्वन) ४४, सरानसरी ११२, सवदा (सौदा) ३३.—पुढील इंग्रजी शब्दांतील स्वरभक्ति लक्षणीय आहे :—कपतान ५५, गलासें ३६, डाकतर ११७, रेलवे ७७.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

मध्यस्वरलोप (Syncope): अमदाबाद ६०, नुस्ते ६९, पंध्रा ११९, पुर्तेपर्णी ६८, ह्मार ६०, मुशारा १०७, शापूर ८१, सुर्वात ४१; ४३.

अनुस्वारलोप

(अ) अनेकवचनी सामान्यरूपांवरील अनुस्वारांचा लोप करण्याची लकब फार मोठ्या प्रमाणावर दिसते. उदा०–आह्मामध्यें ७७, आह्मास ७७, आह्माला ७७, ग्रंथकारानीं ७८, तुह्माकडे ११५, त्याणीं २२, त्यानीं ७६, पानानीं ७६, फत्तेमान्यावरून ८४, मुसलमानाचें (मुसलमानांचें) ७९, रंगाचीं (रंगांचीं) ४८, लोकानीं ७८; ७९, विद्वज्जनापाशीं (विद्वज्जनांपाशीं) १२५, विद्वज्जनास (विद्वज्जनांस) १२१.

(आ) विभक्ति प्रत्ययांतील अनुस्वारांचा लोप :—कोठे कोठे (कोठें कोठें) २३, तदभावी (तदभावीं) ८७, द्वीपांतरी (द्वीपांतरीं) ७८, पुर्तेपणी (पुर्तेपर्णी) ६८, म्या (म्यां) ११६, सध्या (सध्यां) ८०.

(इ) शब्दांतील अनुस्वारांचा लोप :—नाव (नांव) ११७, भरवसा (भरंवसा) ५२; ६५; ८५, मास (मांस) ७, सवय (संवय) ७२; ७३.–हे अनुस्वार अनुच्चारिततेकडे झुकणारे आहेत, हें स्पष्टच आहे.

अनुस्वारागम : वृथा अनुस्वारागम करण्याची कोंकणी तऱ्हा पुढील स्थळीं आढळते :—करांची (कराची–नगरनाम) ६०, कोरींव ५४, घोंटाळे १००, टांकणे (टाकणे) ४२; ४३; ४४, ठिकांणीं (ठिकाणीं) १७, नेंमास (नेमास) ४७, पेंठ ७८, रोंपण ११०, वांयां (वायां) ३८, शहाणें (शहाणे) ७०.

'पुस्तकी विद्या' या वाक्प्रचारांतील 'ई' या उत्तरोसर्गाचा 'ईं' या सप्तमीच्या प्रत्ययाशीं साम्याभास होऊन 'पुस्तकीं' २६ असें रूप बनलेलें आढळतें.

विसर्ग : प्रमाणभाषेपेक्षां वेगळीं वाटणारीं विसर्गयुक्त रूपें येणेंप्रमाणें :—निः काळजी (निष्काळजी) ११०, सद्यः (सध्यां) ११०, सद्यः हि ५७.

व्यंजनप्रक्रिया

महाप्राणागम

ट्–ठ् : कोठें (कोटर) ४३, मिष्ठान्नें १२५.

ड्–ढ् : दीढ (द्व्यर्ध) ५९.–येथें मूळ शब्दांतील महाप्राण त्या काळीं चालू होता आणि प्रचलित मराठींत तो गेला आहे, असें म्हणावें लागेल.

त्–थ् : अस्थित्व ६, भरथ २, वीथवीथीची (वितीवितीची) ७३.
–शेवटच्या शब्दाची 'सं. वितस्ति > प्रा. विहत्थि' ही प्रक्रिया ध्यानांत घेतल्यास त्यांत महाप्राण कायम होता असें म्हणतां येईल.

प्–फ् : फळस (पलाश) ३७.–येथें अंत्याक्षरांतील 'श्–स' या प्रक्रियेमुळें मागें महाप्राणागम झालेला दिसतो.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

र्–ऱ्ह : तऱ्ही (तरी) ८४.–मूळरूपांतला महाप्राण कायम.

ल्–ल्ह् : दिल्हें ५, दिल्हा १४.–' दत्त–दिण्ह ' या प्राकृतप्रक्रियेंत महाप्राण होताच. ' दिन्हलें > दिल्हें ' असें हें रूप उत्क्रान्त झालेलें दिसतें.

महाप्राणलोप

ख्–क् : खडीसाकर ५८, पोशाक २४.-या दोन्ही शब्दांत मूळरूपाशीं जवळीक दिसते.

ठ्–ट् : गर्विष्ट ३३.

ढ्–ड् : वाडा (वाढा) १२७, वाडलें (वाढलें) ७, मडें. (मृतकम् > मडअ > मढें) १२६.—शेवटच्या शब्दाच्या प्राकृतपायरीवर महाप्राण नव्हता, त्या रूपाशीं जवळचेंच हें रूप आहे.

थ्–त् : अतीत (अतिथि) ५, आस्तेनें ११५, सत्वस्त १०, स्वस्त (स्वस्थ)६०.

न्ह्–न् : उनापासून २४.

ल्ह्–ल् : कोलापूर १७.

ल्ह्–ळ् : कल्लोळ ४४. —मूळ सं. शब्द ' कल्लोल ' असाच आहे.

व्ह–व् : नवता (प्र. रू. नव्हता) ९४.

मध्यस्वरासहित महाप्राणलोप : अमदाबाद ६०, मुशारा १०७, शापूर ८१.

मूर्धन्यीकरण

न्–ण् : गहण ६८, त्याणें १७, मळीण ६०, याणें ७०, याणीं ७०, संघाटण ६.

ल्–ळ् : अनुकूळ ३५, अमंगळ १, कुशळता ३७, कोमळ ४०, मळीण ६०, विपुळ ७८ ; ७९, विपूळ १२३.

मूर्धन्याचें दन्त्य :

ड्–ध् : धाका (डाका) ५८, धोका (डाका) ८१.

ण्–न् फडनविस ५८, कठिन ९२. —पण हीं मूळरूपाशीं जवळ असणारीं रूपें होत.

ळ्–ल् : दयालु ७४, दीनदयाला ११२, विरला ६५, विस्कलित ४४. मूळ संस्कृताशीं जवळ असणारीं हीं रूपें आहेत.

इतर स्पर्श व्यंजनें.

ज्–द् : गुदरणें (गुजरणें) ११८.

त्–द् : जकाद ४, फुरसद १०८, मजबूद ११७.

द्–त् : भेतलेल्या (भेदलेल्या) ७३, शरत् काळ ६२.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

ऊष्मे

श्‌–स्‌ : अधासीपणानें १०३, असी ७६, असीं १२१, तसींच १२०, दिवसीं १२१, फारसीं २१.–प्राकृतप्रक्रियेशीं ही लकब जवळची आहे.

ष्‌–श्‌ : शडशास्त्र ३५.

स्‌–श्‌ : कोश (क्रोश) १२५, विध्वंश १२, शिमा (सीमा) २६.–पहिला शब्द मूळरूपाशीं जवळचा आहे.

संयुक्तव्यंजनें

द्वित्वलोप : क्क्‌ : छकेपंजे २७. च्छ्‌ : पिछा ४४, श्वासोछ्वास १२१, त्त : खलबत्यांत १, तत्ववेत्ता १२०, सत्वस्त १०. द्द : हुद्याची ११७, ल्ल : किल्यामध्यें ३० व्व : सवा २३. स्स : हिसा १४.–यांपैकीं पिछा, श्वासोछवास, तत्ववेत्ता आणि सत्वस्त हे शब्द वगळतां बाकीचे शब्द मूळरूपांशीं जवळचे आहेत; प्रचलित मराठींत ते द्वित्वयुक्त झालेले आहेत असें म्हणतां येईल.

द्वित्वागम : त्त : इतिहासकर्त्यांनें ७७, कर्त्तव्य ५१, कर्त्यांनीं ६९, मत्ताच ५२, मत्तानें ५२, वर्त्तणूक १२७, वर्त्तवून ६२. द्ध : स्पर्द्धा ९१. ल्ल : अकल्ल्याण १.

द्वित्वविषयक अन्य प्रक्रिया : च्छ–स : मसलीपट्टण ८१, द्भ–द : उद्भिद ८, व्व – ं व : नंवद २४, न्न – ं न : हुंनर ५६.

ऊष्मेयुक्त संयुक्तव्यंजनें : त्स–च्छ : अन्नचिकिच्छक (अन्नचिकित्सक) ११, उच्छाह (उत्सव) ११५, उच्छुकतेनें (उत्सुकतेनें) ११७.

तालव्य + य : च्या–चा : मनुष्याचानें ७७, ज्या–जा : जांत ६३, झ्या–झा : ओझानें (ओझ्यानें) ९७, माझा ध्यानांत (माझ्या ध्यानांत) ७१.–तालव्य उच्चारांत 'य्‌' काराची छटा असल्यानें 'च्या', 'ज्या' आणि 'झ्या' या सामान्यरूपांचें लेखन अव्वल इंग्रजींत 'य्‌' लुप्त करूनहि केलें जात असे.

अन्य कांहीं संयुक्तव्यंजनें : ग्र–गृ : गृहण (ग्रहण) ११, क्ष्य-क्षः भक्ष ७, द्य–द्र : दारिद्र ४, र्ज्य–र्ज : वर्ज १२१.

अन्त्यव्यंजनलोप : हुबहु (प्र० म० हुबेहुब) ५७; ६०.=हे मूळ यावनी भाषेंतील रूपाशीं जवळचें रूप आहे. प्रचलित मराठींतील 'हुबेहूब'मध्यें समाक्षरागम झाला आहे असें म्हटलें पाहिजे.

मध्यव्यंजनागम : कंबर (कमर) ३८, कुळंबीण (कुणबीण) ३९, सरानसरी (सरासरी) १२, मोह्याच्या (मोहाच्या) ३, श्रीयमान्‌ (श्रीमान्‌) १००.–शेवटच्या शब्दांत मुद्रणदोष असण्याची शक्यता आहे.

वर्णव्यत्यास : कारीगर ५३.—वास्तविक प्र. म. मध्यें व्यत्यास आहे. तत्कालीन रूप मुळाशीं जवळ आहे.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

साम्याभास : पुढील शब्दप्रयोगांच्या घडणींत 'साम्याभासा' ची (False analogy) झांक दिसते.

पांढसर ८३ :–काळसर, पिवळसर या धर्तीवर.

चारितार्थ्य ८६ : सामर्थ्य, वैय्यर्थ्य या धर्तीवर.

भक्षणीय १—रक्षणीयच्या धर्तीवर.

सार्थक्य ५६—आधिक्य, वार्धक्य या धर्तीवर.

संगोपंगन—या शब्दांतहि साम्याभासाची छटा आहे.

व्याकरण

नामविभक्ति, आख्यातविभक्ति आणि अन्य शब्दरूपें ह्यांच्या बाबतींत जे वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग त्या काळीं रूढ होते, त्यांची आतां नोंद घेऊं.

लिंग

नपुं० ऐवजीं पु० : चेटक (अ० व०) ५३, भक्ष ४१, प्रेमा (प्रेम) १२१.

स्त्री० ,, पु० : त्या वेळापासून ११२, त्यांच्या जाग्यावर ९, सभेचा भरभराट ११६; ११९; १२७.

नपुं० ऐवजीं स्त्री० : जतन ८३, टिकिटा (अ० व०) ५४, पागोटी (ए० व०) २४.

पु० ऐवजीं स्त्री० : मध ३३ (मध ह्मटली ह्मणजे).

पु० ,, नपुं० : ईश्वराचें गौरव १४, तुझें गौरव १२२.

प्रेमा (पु० ए० व०) १२१ आणि शिष्या (पु० ए० व०) १०३.– हीं आकारान्त रूपें त्या काळीं अवशिष्ट राहिलेलीं दिसतात.

वचन

(अ) अ० व० ऐवजीं ए० व० : हे (अहो) सुज्ञ गृहस्थहो ६.

(आ) द्व्यक्षरी ह्रस्व इकारान्त तत्सम शब्दांचीं अ० व० मूळरूप ठेविलीं जातात : जाति ८०, प्रति ५०, बुद्धि ५७, युक्ति ५६.

(इ) कांहीं वैशिष्ट्यपूर्ण अ० व० : मनुर्ष्ये ९; ८५, संवया ६३, विति (वितस्ति–विहत्थि–वीत) ५०.

विभक्ति :

तृतीया

सर्वनामरूपें : पुरुषवाचक : म्या ११६, त्वां १२२.–हीं प्रार्थनेंतील प्रत्यक्ष भाषणांतच आढळलीं.

ने–ऐवजी णे–प्रत्ययान्त रूपें : ज्याणीं ११९, तिणें ११९, त्याणें १७, त्याणीं ११९, याणे ७०, याणीं ७०.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

द्विरुक्त तृतीया : [प्रत्यय + शब्दयोगी] अभ्यासेंकरून ६८, इच्छामात्रेंकरून १२२, ईहींकरून ५२, जेणेंकरून ७३, तेणेंकरून ७४, त्याहींच करून ७९, बलत्कारें-करून ७३, येणेंकरून ३; ७३.

ए० व० ऐवजीं अ० व० : जाहीरपणीं ११८, पूर्णपणीं १२३.

अ० व० ,, ए० व० : सहस्रावधि युक्तीनें ८३.

चतुर्थी :

प्रचलित ना ऐवजीं ला : त्यांला ३३; ४०; ५५; ७१, कित्येकांला ६३.

कडे ऐवजीं कडेस हें सप्रत्यय शब्दयोगी अ० : आलीकडेसच ७७, उद्योगा-कडेसच २, परमार्थाकडेस १५.

सामान्यरूप

दीर्घीकरणाऐवजीं मूळरूप :

आ–अ : ईश्वरसंबंधी ७४, धर्मसंबंधी ७३, भूगर्भसंबंधी ७०, एक (जातीचें) ८०, एक (जातीचा) ८०, एक (व्याधाविषयीं) ६५.

ई–इ : जातिच्या ४०, भ्रांतिच १२४, मतिही ८३, वनस्पतिच्याही ४७, संपत्तिच्या ४६.

ऊ–उ : गहुंच ७, पशुप्रमाणें ६५.

अन्य वैशिष्ट्यपूर्ण सामान्यरूपें :

अ–आ : कल्याणाविषयीं; कल्याणावरून (कल्याण हें ग्रामनाम) ७८.

आ–या : ठिगळ्यांची ५९, बाळ्यांत ५८, पिल्यांस ४३.

इ–मूळरूप : उंच (वस्त्रें) २८, उंच (प्रतीचे) २३ पश्चिम (देशांतही) ७८.

या–ए : ते (वेळीं) ११६, तेथचे (तेथेंच) ३, मोठे (लोकांची) ११२.

वाल्मीकाविषयीं ६४ :—येथें ‘ ई–आ ’ ही प्रक्रिया मानण्याऐवजीं ‘ वाल्मीक ’ असा अकारान्त मूळ शब्द मानणें युक्त.

दारिद्राचा ४:—येथें ‘ या–आ ’ ही प्रक्रिया मानण्याऐवजीं ‘ दारिद्र ’ हा अन्यत्र आढळणारा अकारान्त मूळ शब्द मानणें युक्त.

डोकीवर १ :—येथें ‘ या–इ ’ ही प्रक्रिया मानण्याऐवजीं ‘डोकी’ हें स्त्री० मूळरूप मानावें.

क्रियावाचक रूपें

चरम प्रत्ययांचा लोप

अ. व. ऐवजीं ए. व. प्रत्यय : ‘ त ’चा लोप : दाणे असाध्य नाहीं (दाणे असाध्य नाहींत) ६३, हीं असलीं पाहिजे (हीं असलीं पाहिजेत) ५७, फारसे श्रम केले नाहीं (फारसे श्रम केले नाहींत) ६४.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

'ल–ईल' यांचा लोप : शिजेइतकें (शिजेलइतकें) ४४, फाटाफूट पडे असें (फाटाफूट पडेल असें) ५२, मनोरथ सिद्धीस जाई असें करावें (मनोरथ सिद्धीस जाईल असें करावें) १२२, सर्व शत्रु शरण येत असें कर (सर्व शत्रु शरण येतील असें कर) १२३, लोकांस समजे असा व्हावा (लोकांस समजेल असा व्हावा) ११९, तसाच सर्व काळ राहीसा कर (तसाच सर्व काळ राहील असा कर) १२३.

'स' चा लोप : त्वां शत्रूचा विध्वंस केला १२३, त्वां बंडाचें भय नाहींसें केलें १२३.–येथें द्वि. पु. कर्ता असूनहि कर्तृकर्मसंकर प्रयोग न करतां कर्मणि प्रयोग कायम आहे.

कर्मभावसंकर प्रयोग : बुद्धि गहन विषयाकडे लावीत जावी ७१, त्याच ग्रंथकारानें कापसाला झाडाची लोंकर म्हटली आहे ७८.

वा कृदन्तापेवजीं णेंकृदन्त : एवढें बोलणें (बोलावें) लागलें ६३, सहस्र साधनांनीं स्वतः कांहीं होणें (व्हावयाचें) नाहीं ८७.

रीतिभूतकाळाची जुनी तऱ्हा : त्यानें आपलें आयुष्य ख्यालीखुशालीं घालवावें १२.

विशेषणात्मक स्त्रीलिंगी ताकृदन्ताचीं रूपें : करत्येवेळीं ५५, करतेवेळीं ११५, चालत्या (चालू) वर्षी ११५.

'णें' कृदान्ताचें रूप : पियास (पिण्यास; प्यावयास) १०५.

त्यांनी...आपल्या देशांत नेऊन लागवड करूं लागले, ७६–अशी बखरींतल्या-सारखी कर्ता आणि क्रियापद यांत मेळ नसलेली वाक्यरचना क्वचित् आढळते.

मध्यवर्णलोपानें (Syncope) क्रियापदांचा पुढील शब्दांशीं संधि : राहीसा (राहील असा) १२३, दिल्हेंसें (दिल्हें असें) १०४, होतसे (होत असे) ७८.

वर्त० स्त्री० तृ० पु० ए० व० 'ई' : त्याची बुद्धि गोंधळून जाती (जाते) १२०, स्थिति...नीच होऊन जाती (जाते) २, इतकी त्यांची जूट असती (असते) ४४.

वर्त० स्त्री० तृ० पु० ए० व० 'ये' : होत्ये (होते) ९८, पाडित्ये (पाडिते) ५६.

भूत० स्त्री० प्र० पु० ए० व० 'ये' : झाल्यें (झालें) १०३; ११३, (समजलें) ११९, होत्यें (होते) ११३.

वा–कृदन्तचीं जुनीं रूपें : खायास ५६, ठरायाचा ४, भरायाचा ५५, मारायास ५४, लिहायास ३, वाचायास ३.

प्रयोजकापेवजीं साधें रूप : अंगठी घडून (घडवून) ५८, समुद्राचा वारा मानत (मानवत) नाहीं ८४.

अस्थानीं प्रयोजक : यांस अनुसरून वागविलें (वागलें) पाहिजे ७३, सांडर्सन यांचे युक्तीस अनुसरवणें (अनुसरणें) हें...९१.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

प्रयोजकरूपांतील इकाराचा विपर्यय : चालिवतात ११७, दाखिंवतात १२६, दाखिवण्यासाठीं १२४, पिकिवणारे ८४.–मात्र ही लकब कमी प्रमाणावरच आढळते.

कर्मणिऐवजीं साधें रूप : तो पंधरा वीस रुपये मण विकूं लागला. (विकला जाऊं लागला) ७६.

णार–कृदन्ताचें एकारान्ताऐवजीं अकारान्त रूप : असें सांगणार (सांगणारे) सांपडतात ७५.

जुनीं क्रियापदरूपें : दिधलीं (दिलीं) ८, नलगे (लागत नाहीं) ६२; ७४, ठेविजे (ठेवावा) ६६.

शब्दघटना

माडगांवकरांच्या लेखनांत साधित शब्दांच्या घटनेंत जो वेगळेपणा आढळून येतो, त्याची येथें नोंद घ्यायची आहे.

पूर्वोपसर्ग

संधीचा अभाव : निःकाळजी (निष्काळजी) ११०, सुउद्योग (सदुद्योग) १.

चुकीचा संधि : निरापेक्ष (निरपेक्ष) ६३

प्रचलिताहून वेगळे असे उपसर्गयुक्त शब्द : निर्द्रव्य (द्रव्यहीन) ९८, निष्कृत्रिम (अकृत्रिम) ५२, निष्कुलीन (अकुलीन) ९७, बेइलाज (नाइलाज) २७, बेसमजुती १२७.

उत्तरोपसर्ग

अस्थानीं उत्तरोपसर्गाची द्विरुक्ति : खनिजजन्य (खनिज) ९, चारितार्थ्य (चरितार्थ) ८६, तारुण्यपणा (तारुण्य) ६५, दार्ढ्यता (दार्ढ्य) ६५, दुर्भिक्षपणा (दुर्भिक्ष्य) ४, भक्षणीय (भक्ष्य) १, सार्थक्य (सार्थक) ५६.

फारशी गारऐवजीं दार : खिजमतदार (खिजमतगार) ९.

मान : पौष्टिमान् (पुष्टिमान) ६६–साम्याभासाचा प्रभाव.

तद्धितांतील इकाराचें दीर्घीकरण : उपान्त्य दीर्घोच्चारसरणीमुळें इक-इण–इल यांनीं साधिलेल्या तद्धितांतील इकराचें दीर्घीकरण होतें :—चमत्कारीक ४०, पुराणीक ७६, वार्षीक ११९, साहजीक ४०, मळीण ६०, प्रफुल्लीत १०; ६४, दुर्मीळ ९७.

प्रचलिताहून वेगळे वाटणारे जोडशब्द : पापपुण्यवर्तक (पापपुण्यप्रवर्तक) ७४, ह्मणणी (ह्मण–ह्मणी) ११९, संगोपंगन (सांगोपांग) ६९, साळवी (साळी) ५८, सुधारणूक (सुधारणा) ४; ५५. सुव्यसन १००.–वर आलेल्या साधित शब्दांपैकीं सार्थक्य, साळवी, सुधारणूक ही शब्दरूपें अव्वल इंग्रजी काळांत रूढ होतीं. आज

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

आपण 'चाकरनिकर' असा द्विरुक्त जोडशब्द करतों, त्या ऐवजीं 'चाकरचुकर' ११३ असा प्रयोग आढळतो.

इंग्रजी अंश

माडगांवकरी गद्यांत इंग्रजी शब्दांचीं जीं वेगळीं रूपें आढळतात, तीं कालसापेक्षच म्हटलीं पाहिजेत. उदा० ॲ किंवा ऑ यांसारख्या उच्चारांतील अर्धचंद्राचें चिह्न त्याकाळीं मुद्रणांत फारसें प्रचलित नव्हतें. 'फारसें' म्हणण्याचें कारण डॉन १२१, (म० ज्ञा० प्र०, पु० ८, अं० १०, पृ० ३१४) असा अर्धचंद्रयुक्त मुद्रित झालेला शब्द आढळतो, पण तो अपवादभूतच ठरेल.

रुळलेले इंग्रजी शब्द : कांहीं इंग्रजी शब्द मराठी प्रकृतिप्रत्ययांसह आलेले दिसतात, ते मराठी भाषेनें आत्मसात् केले होते असें म्हणतां येईल उदा० कनिस्टेब्लास ५१, कपतान ५५, गलासें ३६, तिकिटा (अ० व०) ५४, टेब्लावर ३६, टेब्लास १०६, फर्म्याच्या ३४, बुकें २८, हापीस ११०.

इंग्रजी शब्दांच्या प्रचलिताहून वेगळया उच्चारांची नोंद आतां घेऊं.

ॲ : ॲ–अ : कपतान ५५. ॲ–आ : आडिसन ७१, थाकरी ७१, लातीन ६७. ॲ–या : क्यालिगुला १२.

ऑ : ऑ–अ : कनिस्टेब्लास ५१, ऑ–आ : आस्त्रेलिया १२५, कालेज २६, हाल ३०, डाक्टर ७८, बाटल् ४२, मकाली ६८, रायल १२५, रेकार्ड १९, लार्ड ६८, वारन ७१, स्काट ७१. ऑ–ओ : ज्योग्राफिकल १२५.

ए : ए–अ : मकाली ६८. ए–ई : डिमास्थीनीस ११३, मकाली ६८.

आउ–औ : टौन ३०.

आय–ऐ : बैबल ७७, बैरन् ७१, सोसैटी ७७.

ट–त : आस्त्रेलिया १२५, डाक्तर १५, लातीन ६७, सरवांतिस १२१.

ड-द : एडमंद ६८.

व्यंजनांच्या पायमोडीबाबत विकल्प आढळतो. उदा.–अमेरिकन ७६; २३, युरोपियन् ७६; ८३. 'ईव्ह्' हा शब्द हवा १७ आणि इव्हा ७६ असा उभयविध आढळतो.

पारिभाषिक शब्द : त्या काळीं इंग्रजांच्या अनुकरणानें येथें संस्था वगैरे निघूं लागल्या होत्या, त्यांचे वाचक शब्द इंग्रजीप्रमाणेंच राहाणें साहजिक आहे. 'इलेक्त्रिसिटी' ६४, 'ब्लिस्टर' ३३. यांसारखे शब्द माडगांवकरांनीं मुळाप्रमाणेंच योजून त्यांचा अर्थ स्पष्ट केला आहे. कांहीं परकीय शब्दांना त्यांनीं मराठी प्रतिशब्द योजिले आहेत. उदा०—उपयुक्त ज्ञान (यूजफुल नॉलेज्) ११६, वादसूत्र (आर्ग्युमेंट) ६९, सर्वपदार्थप्रदर्शन (एक्झिबिशन्) ६१, सर्वसंग्रह ग्रंथ (सायक्लोपीडिया) १०७.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

'सॉक्स'साठीं योजिलेला पिशव्या २७ हा शब्द तसेंच 'वॉचमेकर' साठीं योजलेला शिल्पी ७३ हा शब्द तितकासा अन्वर्थक वाटत नाहीं.

या निबंधांत क्वचित् स्थळीं इंग्रजी धर्तीची वाक्यरचना आढळते. उदा.— मेंढरें, जांपासून लोंकर होती, त्यांची उत्पत्ति मुळीं एशियामधील पर्वतांवरच असावी असा कूव्हियर याचा सिद्धांत आहे ७७.

विशिष्ट वाक्प्रयोग

प्रचलित प्रमाणमराठीहून वेगळीं वाटणारीं वाक्प्रयोगांचीं वैशिष्ट्यें खालीं दिग्दर्शित केलीं आहेत.

(अ) **विभक्ति प्रत्यय :** चतुर्थीच्या 'ना' ऐवजीं षष्ठीचा 'चें' : यांचें (त्यांना) इंग्रेजी भाषेंत गम्य होतें १२१. 'वर' या श. अ. ऐवजीं चतुर्थीचा 'स' : त्याच्याच विचारास (विचारावर) अवलंबून असतात ५०.

(आ) **शब्दयोगी अव्ययें :** वर (पूर्वीं) : दिवसांवर ५९, महिन्यांवर ६०, कडे (साठीं) : सभेच्या कल्याणाकडे चिरकाळपर्यंत झटणारे १२४.

(इ) **वाक्प्रचारांतील क्रियापदें :** 'लागणें' ऐवजीं 'पडणें' : काळ कंठावा पडे ४५, उद्योग...करावा पडतो ४१, मिश्रित करावें पडतें २३, उद्योग करावा पडला २. 'होणें' ऐवजीं 'पडणें' : उपयोग पडणें ३, समज पडणें १२०. 'जाणें' ऐवजीं 'चालणें' : सुधारत चालून १५. 'येणें' ऐवजीं 'जाणें' : लोक मानीत गेले आहेत (आले आहेत) ७४.

(ई) **कांहीं खास वाक्प्रयोग :**

'एकत्र' चा उपयोग : त्यांत भेद इतकाच, एकत्र (एके ठिकाणीं) एक प्रकारचें आधिक्य, अन्यत्र दुसऱ्या प्रकारचें ९९.

आला दिवस : आला दिवस...त्या कामास उद्युक्त असलीं पाहिजे ७२.

घडून आली असतां : घडून आली असतां (संधि मिळाल्यास) भाषांचें पूर्ण ज्ञान घेण्यांत पुष्कळ फायदा आहे ६८.

आणखी : राजानें त्यास ५००० रुपये बक्षिस दिले आणखी (आणि) ते स्वयंपाक्याच्या स्वाधीन केले १२.

निर्दोषी : रसज्ञता संपादन करण्याचें काम निर्दोषी (निर्दोष) असून यशस्कर आहे ७१.

याशिवाय अशानीच (अशानेंच) २७, एकला (एकटा) ५१, कसचें (कसलें) २८, कोण्या (कोणत्या) २, खरीद करणें (खरेदी करणें) २३; ६१, तंवपर्यंत (तोंपर्यंत) ५२, शास्त्रीबावा (शास्त्रीबुवा) २६ या शब्दांत तत्कालीन बोलभाषेची झांक दिसून येते.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

अर्थप्रक्रिया

(अ) **साम्याभासाची छटा असणारी अर्थच्युति :** अश्लाघ्य (असाध्य) ११९; १२१, आकलन (आकर्षण) ५१, उपभोग (उपयोग) ५७, कालातिक्रम (कालक्रमणा) १००, गहन (घन; पक्का) ११७.

(आ) **इतर अर्थभ्रंशाचीं उदाहरणें :** अनुभूत (अनुभवी) ८५, अबरू (कीर्ति) ६३, आर्जवी (खुशामती) १२८, उपमर्द (निरास) ४, उपस्थित (स्थापन) ११७, गंभीरपणा (खोली) १२१, चमत्कारिक (नवलाईची, आश्चर्यजनक) ४०; ५४; ५९; ७०, ताडण करून पाहणें (ताडून पाहणें) ७२, बतावणी (साधना) ६०, लेख (उल्लेख) ७५, शिरोभाग (मुख्य) १०७, सुखवस्तु (सुखानें; सुखेनैव) १.

मुद्रणविषयक वैशिष्ट्यें

(अ) इंग्रजी धरणीप्रमाणें व्यक्तिनामें, ग्रामनामें व संस्थानामें यांतील आद्याक्षरें जाड ठशांत छापण्याची पद्धति होती.

(आ) ओळीवरील अर्धचंद्र [ˇ] या चिह्नाचा उपयोग मराठी मुद्रणांत होऊं लागलेला होता. उदा०—कुँम्भ्याच्या पानांचा ३ (म. ज्ञा. प्र., पु. ८ अं. २, पृ. ५२), डॉन १२१ (म. ज्ञा. प्र., पु. ८ अं १०, पृ. ३१४).

(इ) दीर्घ 'उ'काराचें मुद्रण क्वचित् स्थळीं 'उं' असें केलेलें आढळतें. उदा०—येउंन २८ (म० ज्ञा० प्र०, पु० १० अं० १०, पृ० ३००).

(ई) 'द्धि' हें जोडाक्षर 'त्धि' असें जुन्या हस्तलिखितांतल्याप्रमाणें मुद्रित केलेलें आढळतें. उदा०—बुत्धि (म० ज्ञा० प्र०, पु. १३, अं. ५, पृ० १५९), बुत्धिगत (म० ज्ञा० प्र०, पु० ८ अं० ३, पृ० ८२), सित्ध (म० ज्ञा० प्र०, पु० ८ अं० ८, पृ० २४०).

(उ) 'म्हणून', 'आम्ही' यांसारख्या शब्दांतील 'म्ह' हा 'ह्म' असा मुद्रित करण्याकडे जास्त कल दिसतो.

इंग्रजी राजवटीनें सार्वत्रिक शिक्षण सुरू केलें आणि मराठी गद्याचा इंग्रजी अवतार झाला. या अवताराच्या वैचारिक जडणघडणीची चर्चा आजवर बरीच झालेली आहे. येथें माडगांवकरांसारख्या प्रातिनिधिक गद्यलेखकाचे भाषाविशेष दाखवून त्याच्या भाषिक अंगावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला आहे. भाषाशास्त्राच्या अभ्यासकांस तो उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

—स. गं. मालशे.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

परिशिष्ट क्र. (२)

अपरिचित शब्दांचा कोश

[**सूचना** : शब्दांपुढील आंकडे पृष्ठांचे आहेत.]

अड्डु १०५ कनिष्ठ; अडाणी.

अबनुशी ३४ उंची लांकडाची एक जात.

अवदंड १२३ अरिष्ट; दैवी अद्दल.

इरई ८८ [सं. वीर्य] ईर्षा.

ईषक ९१ ईर्षा.

कवाळ ४२ [कों. खवळा] माड, सुपारी इत्यादींस सांवळ्या फुटतात ती जागा; शेंडा.

काट ३८ द्रोणाचा पुडा.

कांक्षा ३६ शंका.

कुँभा ३ एक प्रकारचें रानझाड.

कुया १७ आरोळ्या; हांका.

कोठिंबर ८ [स. कुस्तुंबर ?] वनस्पति-विशेष.

कोद्रु ७ एक हलकें धान्य; हरीक.

खुमास २५; २६ वस्त्रादिकांचा पोत.

गर्द होणें ४ बरबाद होणें; नाश होणें.

चार ३ मोहाच्या पानांसारखीं लांबट व मोठीं पानें येणारा वृक्ष.

चारितार्थ्य ८६ अस्तित्व.

चिरोटी ५९ चिरटोळी; लांबट पट्टी

जूट ४४ एकोपा.

तिर्कटी तारूं ६१ तीन डोलकाठ्यांचे मोठें गलबत.

तिगस्तां ४४ [सं. त्रिः + फा. गस्त] गेल्या वर्षाच्या मागील वर्षी.

दर्द १२५ [फा. दर्द] काळजी; कळकळ; आस्था.

धंतरमंतर १२८ [तंत्रमंत्र] मंत्रतंत्र, जादूटोणा.

धनवटी २८ कर्नाटकांतील धनवड गांवचें वस्त्र. (लुगडें, शेला, पागोटें, जोट इ.)

धुमाळी १२ धुळधाण; नाश.

धुतारी १२८ [सं. धूर्तय्–प्रा. धुत्तार] मांत्रिक; भविष्यवादी; भगत.

पट्टू २२ रेशमी उंची वस्त्र.

पेंढूर ८ कोंकणांत होणारें एक झाड.– याला जेष्ठआषाढांत पेरूएवढीं फळें येतात. त्याचा रंग हिरवा असतो.

फळस ३७ [सं. पलाश]. पळस.

फर्मास ५८ [फा. फर्माइशी] नजराणा; वरिष्ठांस अर्पण केलेली वस्तु.

फिशारी २७;२८ **फुशारी** १२० पोकळ डौल; फुशारकी.

बूट ६० [हिं. बूटा] वस्त्रादिकांवर पर्ण-पुष्पांची काढलेली नक्षी किंवा वेलबुट्टी.

बेळें ६० बांबूच्या काढलेल्या पातळ चिरफळ्या; बिळें.

भातकिली ४१ पक्षिविशेष.

भुताडे १२८ पंचाक्षरी; भगत.

माउली ३ [माहुली] वृक्षविशेष. याचीं पानें मोठीं असतात.

मरामत ८३ [अर० मरम्मत्] निगा; मशागत.

मालमस्त ५० ऐश्वर्यसंपन्नतेनें मस्त झालेला.

मसरू २ [अर. मश्‍रूअ] गर्भरेशमी कापड; गजनीचें कापड.

मुशारा १०७ [अर. मुशाहिरा] मासिक वेतन; पगार.

मेस्त्री ७३ [पो. मेस्तर] सुतार.

मोहा ३ [सं. मधु] एक वृक्षविशेष; मोहाचें झाड.

यवन ६६; ६८ ग्रीक.

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

युनानी ११३ आयोनिया देशचे; ग्रीक.
रंगांगण ६६ प्रेक्षागरयुक्त आखाडा.
वयी ८३ [सं. वृति-प्रा. वइ] कुंपण.
शेनवर्ते ३८ [कों.] केळीच्या पानाच्या विड्या करण्याकरितां केलेले त्याचे लहान लहान तुकडे.
शेरकें ४२ बाटलीसारखा घरटा बांधणारा पक्षी.
सकलाद २७ [अर. सकलात] एक गरम वस्त्रविशेष.
सण २१ ताग.
सुतेरा ३३ कोळी जातीचा एक किडा.
सुडका २६ फडकें.
सुमार १३ अंदाज; आवांका.
हालमस्त ५० परिस्थितीची पर्वा न करणारा; बेफिकीर.
हुंनर ५६ [फा. हुनर] कौशल्य; कसब.
हुबहु ५७; ६० [अर. हूबहू] हुबेहूब.

शुद्धिपत्र

पृष्ठ ओळ	अशुद्ध	शुद्ध
५ : १४	अं. १	अं. २
९ : ४	रूचि	रुचि
३० : ५	थोडक्याचा	थोडक्याच
४८ : १८	पोपनसाच्या	पोपनसांच्या
४८ : २१	शुद्धिवर	शुद्धीवर
५० : २९	कार्य सिद्धीस गेलें...	कार्य सिद्धीस न गेलें...
५१ - ३२	उपयांनीं	उपायांनीं
६१ : २	विछिन्न	विच्छिन्न
६१ : २५	पदाथ	पदार्थ
७४ : १४	सद्गणांची	सद्गुणांची
७७ : २९	त्यांच्या	त्यांचा
८६ : १६	श्रतपूर्व	श्रुतपूर्व
८७ : १	यत्किंचित	यत्किंचित्
९२ : १७	सिसरोप्रमाणे	सिसरोप्रमाणें होती
१०० : १०	पोचल्यापासून	पोंचविल्यापासून
१०७ : २७	महाजन	माहाजन
१०८ : १२	महात्कार्यें	महत्कार्यें
११६ : ७	उर्जितकाळ	ऊर्जितकाळ
१२० : १८	घालवून	चालवून
१२३ : २३	शांती	शांति
१२६ : २	उर्जितकाळ	ऊर्जितकाळ
१२७ : १७	वर्तणूक	वर्त्तणूक

*

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

प्रमुख विक्रेते :

साहित्य सहकार संघ लिमिटेड

मुंबई विभाग : १७२ नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई १४

पुणे विभाग : विद्यार्थि भांडार, नू. म. वि. प्रशाला, बुधवार, पुणे २

मराठवाडा विभाग : औरंगपुरा, औरंगाबाद

विदर्भ विभाग : लिमयेवाडा, मोदी लाईन नं. ३, सीताबर्डी, नागपूर-

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

मिटेड

११

चवार, दे

वडें; त

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN